# विदर्भ कनिष्ठ महाविद्यालयीन

## अर्थ-वाणिज्य शिक्षक मंडळ





# चंद्रपूर

# चर्चा सत्र २००२



VJCE&CTB

दिनांक :- २२ व २३ नोव्हेंबर, २००२.

स्थळ : फॉरेस्ट रेंजर कॉलेज, मूल रोड, चंद्रपूर

Scanned by CamScanner

# विदर्भ कनिष्ठ महाविद्यालयीन अर्थ-वाणिज्य शिक्षक मंडळ

VJCE&CTB

## चंद्रपूर चर्चासत्र : २००२

**संपादक मंडळ**

- प्रा. डॉ. राम बोडेवार
- प्रा. रमेश हिमते
- प्रा. दुर्वास वाघमारे
- प्रा. दिलीप इंगोले

**स्थळ : फॉरेस्ट रेंजर कॉलेज, मूल रोड, चंद्रपूर.**

मुद्रक
**जगन्नाथ बाबा मुद्रणालय,**
समाधी वार्ड, चंद्रपूर ४४२ ४०२, फोन (०७१७२):२५३८५२, २५३५४३

ही स्मरणिका विदर्भ कनिष्ठ महाविद्यालयीन अर्थ वाणिज्य शिक्षक मंडळ चंद्रपूर जिल्ह्याचे अध्यक्ष प्रा. विजय मसराम यांनी जगन्नाथबाबा मुद्रणालयात मुद्रित करून 'चंद्रपूर चर्चासत्र २००२' फॉरेस्ट रेंजर कॉलेज, मूल रोड, चंद्रपूर येथे प्रकाशित केले आहे.



Scanned by CamScanner

# संदेश

पुणे – ४११००५
दिनांक : १९/१०/२००२

मोहन आवटे
अध्यक्ष,
महाराष्ट्र राज्य शिक्षण मंडळ, पुणे.

दिनांक २२ व २३ नोव्हेंबर, २००२ रोजी 'विदर्भ कनिष्ठ महाविद्यालयीन अर्थ-वाणिज्य शिक्षक मंडळाच्या वतीने' 'सहस्त्राकातील आव्हानां' चा सर्वांगीण विचार करण्यासाठी चंद्रपूर येथे दोन दिवसांची परिषद आयोजित करण्यात येत आहे. त्यानिमित्ताने एक स्मरणिकाही प्रकाशित करण्यात येत आहे. ही खरोखरच आनंददायक गोष्ट आहे. महत्वूपर्ण विषयावर आपण चर्चासत्र आयोजित करीत आहात, त्याबद्दल मी संयोजकांचे अभिनंदन करतो आणि या चर्चासत्रात सहभागी होणाऱ्या शिक्षण क्षेत्रातील सर्व अध्यापक, व विचारवंत मार्गदर्शक यांना शुभेच्छा देतो.

नव्या सहस्त्रकाला सामोरे जातांना नव्या युगाची गतिमानता, ज्ञानाचा स्फोट यांचा विचार आपल्या विषयांच्या संदर्भात करावा लागणार आहे. तसेच, शिक्षणाचा जीवनाशी असणारा संबंध आपल्या उच्च माध्यमिक स्तरावरील युवा विद्यार्थ्याच्या अनुभवाच्या कक्षेत आणून द्यावा लागणार आहे. नव्या युगाला जुळवून घेतांना अध्यापकांनी आपल्या व्यक्तिमत्वाच्या विकासाची साधना करावी, अशी अपेक्षा आहे. आपल्या विषयांचे अध्यापन करतांना नवीन अध्यापन पद्धती, नवीन तंत्रज्ञानाची साधने आणि आपल्या विषयांतील अद्ययावत ज्ञान यांचाही विचार या आव्हानांमध्ये आपण करावा असे वाटते.

धन्यवाद !

मोहन आवटे

Scanned by CamScanner




*Shantaram Potdukhe*

*Former Union Minister of State for Finance (GOI)*
*& Ex-Member of Parliament.*

☎ : (07172)255701, 255001
Fax : 0091-07172 256702


## MESSAGE

It is my proud privilege to congratulate Vidarbha Junior College Economics & Commerce Teachers Conference on 22 nd and 23rd November. 2002.

I am glad that the participants will be deliberating mainly academic issues of Junior College in the field of Commerce and Economics teaching at the Plus two level.

New millennium is the era of itelligentia and the world has undergone tremendous change with advent of Information Technology. Terrorism has badly affected the balance of Trade, Industry and Economics in the World.

This Conference I am sure will throw light on the basic ills that confront the human being and the academic pursuit by Junior Level Teachers will have a way to create new atomsphere in the educational pursuit of economics and commerce at their level.

My best wishes to the Conference and the Participants.

(SHANTARAM POTDUKHE)

Scanned by CamScanner



# शुभेच्छा संदेश

विदर्भ कनिष्ठ महाविद्यालयीन अर्थ–वाणिज्य शिक्षक मंडळातर्फे दि. २२ व २३ नोव्हेंबर २००२ रोजी वाणिज्य व आर्थिक क्षेत्रात जागतिक पातळीवर बदलत जाणाऱ्या आर्थिक समिकरणामुळे निर्माण होणाऱ्या परिस्थितीचा अभ्यास करून सर्व समाजातील लोकांना योग्य मार्गदर्शन, प्रबोधन करण्याचे कार्य प्राध्यापकांनी स्वीकारले आहे, ही आनंदाची बाव आहे.

जगातील ज्ञानाचा विस्फोट लक्षात घेता भारतातील विद्यार्थ्यांना देखील त्याच पातळीवर ज्ञान प्राप्तीची संधी उपलब्ध व्हावी, हा आग्रह शिक्षकांनी धरून वाणिज्य शिक्षणात परिवर्तनाची आवश्यकता आहे हे लक्षात आणून दिले याचा मला अभिमान वाटतो.

चर्चासत्रात सहभागी होणारे विद्यार्थी शिक्षण प्रेमी यांना माझा नमस्कार. या निमित्याने प्रकाशित होणाऱ्या स्मरणिकेस माझ्या शुभेच्छा !

धन्यवाद !

( नितीन गडकरी )



Scanned by CamScanner



महाराष्ट्र विधानसभा

विधान सभा
सत्यमेव जयते
महाराष्ट्र

आमदार
सुधीर मुनगंटीवार
विधानसभा सदस्य
गोल बाजार वार्ड,
चंद्रपूर (म. रा.) ४४२ ४०२.

# शुभेच्छा संदेश

विदर्भ कनिष्ठ महाविद्यालयीन अर्थ-वाणिज्य शिक्षक मंडळाद्वारा आयोजित 'चंद्रपूर चर्चासत्र २००२'च्या निमित्ताने प्रकाशित होणाऱ्या स्मरणिकेसाठी माझ्या मन:पूर्वक शुभेच्छा !

आपल्या संघटनेने आयोजित केलेल्या चर्चासत्राच्या माध्यमातून कनिष्ठ महाविद्यालयीन अर्थ-वाणिज्य शिक्षकांच्या विविध प्रश्नांवर उपाय योजण्याच्या दृष्टीने सविस्तर चर्चा होईल व योग्य उपाय शोधले जातील. आपण जागरूकतेच्या भावनेतून हे चर्चासत्र आयोजित केले आहे. यासाठी आपणा सर्वांचे मन:पूर्वक अभिनंदन ! आपली स्मरणिका सर्व कनिष्ठ महाविद्यालयीन अर्थ-वाणिज्य शिक्षकांच्या भावनांचा अविष्कार ठरावी, हिच मन:पूर्वक शुभेच्छा !

आपला स्नेह व सहकार्य सदैव अपेक्षित.

शुभेच्छासह..........

स्नेहांकित

(सुधीर मुनगंटीवार)



Scanned by CamScanner

# विदर्भ कनिष्ठ महाविद्यालयीन अर्थवाणिज्य शिक्षक मंडळाची मुहूर्त मेढ !

आगामी सहस्त्रकाचा वेध घेवून देशविकासात आपली भूमिका बजावण्याच्या दृष्टीने ११ व १२ नोव्हेंबर २००० रोजी दोन दिवसीय चर्चासत्र संपन्न होउन विदर्भ कनिष्ठ महाविद्यालयीन अर्थ वाणिज्य शिक्षक मंडळाची मुहूर्तमेढ झाली. अध्यक्षस्थानी सी. पी. बेरार शिक्षण संस्थेचे सचिव मा. ॲड. अशोकराव बनसोड हे होते. चर्चासत्रात एकूण ३० निबंध वाचण्यात आलेत. एकूण ५०० प्रतिनिधींनी या चर्चासत्रात भाग घेतला. माननीय प्राचार्य डॉ. सुधीर बोधनकर, नागपूर शिक्षण मंडळाचे अध्यक्ष मा. पांढरीपांडे, तरुण भारतचे संपादक श्री. सुधीर पाठक इत्यादींनी आपले विचार मांडले. याप्रसंगी एका स्मरणिकेचेही प्रकाशन करण्यात आले. या मंडळाचे अध्यक्ष डॉ. चंद्रकांत पाध्ये, सचिव प्रा. राजाभाऊ दुरुगकर, कोषाध्यक्ष डॉ. हुद्दा, प्रा. रमेश हिमते इत्यादींनी मंडळ उभारणीत अथक परिश्रम घेतले. शिक्षक उपसंचालक श्री. म्हस्के साहेब व संस्थेचे अध्यक्ष मा. बाळासाहेब महाजन यांच्या आशीर्वादाने संपन्न झालेल्या या कार्यक्रमाला सी. पी. अँड बेरार महाविद्यालयाच्या सर्व घटकांनी भरघोस सहकार्य दिले.



२६ सप्टेंबर २००१ रोजी महाविद्यालयाच्या सभागृहात माजी कुलगुरु प्राचार्य हरिभाऊ केदार यांच्या हस्ते विद्यार्थ्यांच्या परिसंवादाचे उद्‌घाटन झाले. अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष मा. श्री. बाळासाहेब महाजन हे होते. परिसंवादाचे समालोचक सुप्रसिद्ध अर्थशास्त्रज्ञ व विदर्भ विकास मंडळाचे सदस्य डॉ. एस. ए. देशपांडे ह्यांनी केले. परीक्षक म्हणून प्रा. के. ई. पाटील, डॉ. प्राची देशपांडे यांनी काम केले. हा कार्यक्रम नागपूर नागरिक सहकारी बँक, सेठ पब्लिकेशन प्रा. लि., बेरार फायनान्स लि. नगरसेवक प्रा. पेंडके इत्यादींनी आर्थिक मदत देवून प्रायोजित केला होता. शिक्षक उपसंचालक नागपूर यांच्या विनंतीवरून मंडळाने १० जानेवारी २००२ रोजी निकाल संवर्धनाच्या दृष्टीने शिक्षक प्रबोधनाचे कार्य केले. मंडळाच्या एक मंडळींनी एक संभाव्य प्रश्न संच उपसंचालक कार्यालयाच्या सहकार्याने चक्रमुद्रित करून देण्यात आले होते. नागपुरातील कमी निकाल असणाऱ्या शाळा महाविद्यालयातील शिक्षकांनी याचा लाभ घेवून आपले निकाल वृद्धिंगत केले. अर्थशास्त्राचा वर्ग सी. पी. अँड बेरार महाविद्यालयात तर वाणिज्याचे वर्ग गोविंदराम सेकसरिया महाविद्यालयात घेण्यात



Scanned by CamScanner

आले होते. डॉ. जयंत वेलणकर, प्रा. सोनेगांवकर, प्रा. कळमकर इत्यादींचे या उपक्रमासाठी सहकार्य लाभले.

२००२-०३ केंद्रीय अर्थसंकल्प विचार मंथनाचा कार्यक्रम स्थानिक पी.डब्ल्यु.एस. महाविद्यालयात ११ एप्रिल ०२ रोजी घेण्यात आला. कार्यक्रमात डॉ. प्राची देशपांडे, डॉ. कुमार शास्त्री, डॉ. सोनेगांवकर, डॉ. हुद्दा, प्रा. राजाभाऊ दुरूगकर, डॉ. मेघा कानेटकर, प्रा. हिमते इत्यादींनी अंदाजपत्रकावर आपले विचार व्यक्त केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मंडळाचे अध्यक्ष डॉ. चंद्रशेखर पाध्ये हे होते. तर विचार मंथनाचा समारोप प्रा. अंबादास वानखेडे यांनी केला. कार्यक्रमाचे संचालन प्रा. आशा लांजेवार यांनी केले होते.

चंद्रपूर चर्चासत्र २००२ चे आयोजन करण्यासाठी मान. कापगते साहेब यांचे प्रोत्साहन मोलाचे आहे. प्रा. विजय मसराम, प्रा. चंद्रकांत फेदूजवार, प्रा. देवराव कुटेमाटे, प्रा. डॉ. राम बोडेवार, प्रा. दुर्वास वाघमारे, प्रा. नितीन कुकडे, प्रा. किशोर देवाळकर, श्री. विजय लडके, प्रा. सुनिल खनके, प्रा. सुरेश काटकर, प्रा. राजनहिरे, प्रा. सुहास बहाळे, प्रा. डोमाजी कांबळे, प्रा. हंसा गिरडकर, प्रा. प्रकाश आस्टुनकर, प्रा. विजय राऊत, प्रा. राजा जयस्वाल, प्रा. दिलीप इंगोले, प्रा. पी. डी. खिरटकर, व इतर चंद्रपूरची प्राध्यापक मंडळी चर्चासत्राच्या यशस्वीतेसाठी परिश्रम घेत असून नागपूर कार्यकारिणी त्यांच्या पाठीशी आहे.

या चर्चासत्रासाठी प्राचार्य डॉ. विजय आईंचवार, सरदार पटेल महाविद्यालय, चंद्रपूर. माजी केंद्रीय अर्थराज्यमंत्री श्री. शांतारामजी पोटदुखे, श्री. गजाननरावजी गावंडे, मुख्याध्यापक आदिंनी आम्हाला प्रोत्साहनपर मार्गदर्शन केले. त्याबद्दल मी त्यांचे मन:पूर्वक आभार मानतो.

-प्रा. राजाभाऊ दुरूगकर

# विदर्भ कनिष्ठ महाविद्यालयीन अर्थ-वाणिज्य शिक्षक मंडळ

## केंद्रीय कार्यकारिणी

| | | |
|---|---|---|
| प्रा. डॉ. सी. डी. पाध्ये | - | अध्यक्ष |
| प्रा. डॉ. सौ. ए. डी. सोनेगांवकर | - | उपाध्यक्षा |
| प्रा. आर. ए. दुरूगकर | - | सचिव |
| प्रा. डॉ. एच. ए. हुद्दा | - | कोषाध्यक्ष |
| प्रा. आर. डी. हिमते | - | सदस्य |
| प्रा. डी. ए. सोनेगांवकर | - | सदस्य |
| प्रा. सौ. ए. एस. लांजेवार | - | सदस्य |
| प्रा. एम. बी. बोरकर | - | सदस्य |
| प्रा. एन. व्ही. मेंडूले | - | सदस्य |



Scanned by CamScanner

# संपादकीय

मित्र हो !

चंद्रपूर चर्चासत्र २००२ च्या निमित्याने काढण्यात येत असलेली ही स्मरणिका आपल्या हाती देतांना अत्यानंद होत आहे. नुकतीच आपण दिवळी साजरी केली. अज्ञानाच्या तिमिरावर ज्ञानाच्या प्रकाशाने मात करणारा हा सण ! नव्या उत्साहाने-चैतन्याने संघर्षाला सामोरे जाण्याचा मंत्र तो आपल्याला देतो या २१ व्या शतकात प्रचंड स्पर्धा, ज्ञानाचा विस्फोट, जागतिक मंदी, जागतिकीकरण, बेरोजगारी, गरीबी अशी किती तरी आव्हाने आपणांसमोर उभी आहेत. या आव्हानाना समर्थपणे तोंड देण्याची सामुदायिक जबाबदारी आपणांसर्वांवर आहे. त्या दृष्टीने या सर्व विषयांचा- प्रश्नांचा सखोल अभ्यास आणि चिंतनाची नितांत आवश्यकता आहे. यासाठी कनिष्ठ महाविद्यालयीन अर्थ-वाणिज्य शिक्षक मंडळाने कृतीशील चर्चासत्र आयोजित करण्याचा जो उपक्रम हाती घेतला आहे तो अतिशय स्तुत्य असा आहे. यातून निश्चितच शिक्षक विद्यार्थ्यांना फायदा होईल.

अशा प्रकारचे पहिले चर्चासत्र २००० मध्ये नागपूर येथे आयोजित करण्यात आले होते. यातून अर्थ आणि वाणिज्यांतर्गत येणाऱ्या अनेक विषयांवर चर्चा घडवून आणल्या गेली. त्याला अनुसरूनच चंद्रपूर चर्चा सत्रासाठी आधी विषय निश्चित करण्यात आले. त्यात जागतिकीकरण व जागतिक गरीबी, भारत सरकारचे वर्तमानकालीन मौद्रीक धोरण चंद्रपूर जिल्ह्याचे औद्योगिकीकरण व पर्यावरण, वाणिज्य शिक्षणातील परिवर्तनाची आवश्यकता व वर्तमानकालीन आव्हाने, जागतिकीकरणात वाणिज्य शिक्षणाचे महत्व, या महत्वपूर्ण अशा मूलगामी विषयांचा समावेश करण्यात आला. आणि कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षकांना उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने अभ्यासपूर्ण लेख चर्चासत्रात वाचण्यासाठी पाठविण्याचे आवाहन करण्यात आले. विशेष म्हणजे या आवाहनाला प्रचंड प्रतिसाद मिळाला. अनेकांनी आपले अभ्यासपूर्ण व चिंतनीय लेख पाठविले. त्यातील निवडक ३०-३५ लेख चर्चासत्रात चर्चिले जाणार आहेत. तेव्हा त्यांची गुणवत्ता खऱ्या अर्थाने कसोटीला उतरणार आहेच. मात्र स्मरणिकेतील लेखही अभ्यासकांचे लक्ष वेधून घेतल्या शिवाय राहणार नाही याची खात्री वाटते.

कारण यातील लेख हे केवळ अर्थ-वाणिज्य विषयाच्या शिक्षकांनाच नाही तर सर्वच विषयाच्या अभ्यासकांना ते उपयुक्त ठरणार आहेत. लेखातील आशयघनता, विचारांची सुस्पष्टता, सांख्यिकीय माहिती, त्याचे

# केंद्रीय कार्यकारी मंडळ

अध्यक्ष



डॉ. चंद्रशेखर पाथे

सचिव



प्रा. राजाभाऊ दुरुमकर

उपाध्यक्षा



सौ. अरुणा सोनेगावकर

कोषाध्यक्ष



डॉ. हसनअली हुददा

सदस्य



श्री. दत्तात्रय सोनेगावकर

सदस्य



प्रा. विजय बाबन्नाडे

सदस्या



प्रा. डॉ. प्राची देशपांडे

सदस्या



प्रा. सौ. आशा स्वाईकर

सदस्य



प्रा. रमेश हिमले

# चंद्रपूर चर्चासत्र 2002 चे पदाधिकारी

अध्यक्ष



प्रा. विजय मसराम

सचिव



प्रा. चंद्रकांत पेंदूअवार

कार्याध्यक्ष



उपप्राचार्य देवराव कुटेमारे

कोषाध्यक्ष



प्रा. सुहास बहादे

सदस्य



प्रा. सुरेश काटकर

मु. कार्यकारी संपादक



प्रा. रमेश हिमले

सदस्य



दूर्वास वाघमारे

सदस्य



प्रा. सुनिल खनके

सदस्य




प्रा. नितीन कुकडे

Scanned by CamScanner


विश्लेषण, मांडणी काढलेले निष्कर्ष आणि विशेष म्हणजे लेखकांनी संशोधनीय माहितीसाठी घेतलेली मेहनत वाचकांच्या आवर्जून लक्षात तर येतेच पण वाचक-अभ्यासक त्या-त्या विषयाच्या अंतरंगात शिरून विचार प्रवण होतो. हे ह्या लेखनाचे वैशिष्ट्ये होय.

स्मरणिकेतील साहित्य निवडीसाठी प्रा.डॉ. हुद्दा, प्रा.डॉ. पाध्ये, प्रा. दुरूगकर, प्रा. सोनेगावकर आणि संपादकीय मंडळाचे सर्व सदस्यांची विशेष मदत झाली. तसेच जाहिरात समिती-स्मरणिका समितीच्या सभासदांनी खूप परिश्रम घेऊन ही स्मरणिका सिध्द केली आहे. हे इथे आवर्जून नमूद करावेसे वाटते. स्मरणिकेला पूर्णत्व लाभण्यासाठी अनेक व्यक्ती, संस्था, जाहिरातदार, देणगीदार, लेखक, शिक्षण विभाग आणि चंद्रपूर कार्यकारणी अध्यक्ष व सचिव आणि इतर सदस्यांचे बहुमोह सहकार्य मिळाले. या बद्दल संपादक मंडळ त्यांचे आभारी आहे. स्मरणिका सजावट, मांडणी व निर्मितीत प्रा. किशोर देवाळकर, संगणककार श्री राजू बिट्टूरवार आणि मुद्रक श्री विजय लडके यांची भूमिका मोलाची ठरली आहे. हे सांगायलाच हवे ! अंततः वाचकांना त्यांच्या अभ्यासाच्या दृष्टीने ही स्मरणिका उपयुक्त ठरावी हीच अपेक्षा !.

## • संपादकीय मंडळ •




प्रा. डॉ. राम बोडेवार



प्रा. रमेश हिमते



प्रा. दुर्वास वाघमारे



प्रा. दिलीप इंगोले

Scanned by CamScanner



# GLOBALISATION AND GLOBAL POVERTY

*Dr. H. A. Hudda*
V.N.G.I. A.S.S.
NAGPUR.

GLOBALISATION:- We live in a world today which is in many respect truely global. It means not that the nation, state and its sovereignty to come under danger or finish by the global challenges, rather that there is now greater interaction with the societies. Globalisation have a more meanings in business circles and in the media, it is employed in rather loose sense to deserise increased internationalisation of economic activitees, or political negotiations or eve cultural trends. Academics tends to interpret it more narrowely and to attach the word only to specific forms if inteenitionalisation-involve the 'deepening' rather than fust the widening of international activities.

In defining globalisation, academic economist have tended to begin by stressing that it is a microecomomy process- in contrast to regionalisation, which links countris, and it therefore described as macro economic. Therefore, globalisation defined as the process by which enterprises become imterdependent and interlinked globally through strategic alliances and international network. Alliances may be for individual projects or more long terms.

Globalisation is also described as a multidimensional process. On a study of UNU describes, it as having three main trends namely, the globalisation of markets, the globalisation of culture, and the globalisation of secruity, the first being the more comprehensive more solidly grounded, and more advanced of the three. The social effects of globalisation the United Research Institute for social development, described the trends of globalisation as being the spread of liberal democracy the dominance of market forces, the integration of the global economy, the transformation fo production systems and labour markets, the speed of technological change and the media, revolution and consumerism.

The process of globalisation according to some another views, that it is opening up to trade or liberalisation. In the last decade such liberalisation followed mainly by the ex-socaalist countries, which turned away from central planning in order to link up with the World-economy and by the developing countries, which changed from import substituting industrialisation to export orientation accompanied by partial desmantling of the state.

GLOBAL-SCENE:-Globalisation has helped to create undreamed of opportunities for some people groups and countries. Human indicators such as litercacy, school enrolment, infant mortality, and life



Scanned by CamScanner

expectancy have enormously improved in the last few decades. In low and middle income countries life expectancy has increased from 46 years in 1960 to 63 years in 1990, infat mortality per 1000 live births has fallen in the same period from 149 to 71; adult literacy rates have risen from 46 to 65 percnt and real GDP per head from $ 950 to $ 2170. Globalisation has particularly good for Asia for the global growth of production for profits and for the owners of capitl and sophisticated skills.

ECONOMIC GROWTH AND PRIVATISATION:-Privatisation of public enterprises hs emerged as a world wide-phenomenon in the eighties as this process has cut across different indeologics, economic systems and geographical differences all over the world. It has been follewed by many developed countries and developing countries. Many developing countries in their phase of liberalization and privatisation rampantly affected, and due to this declining the growth rate of economy till near about a decade. Some excerperts in this context are as-

1. BRAZIL- Strong state sector dominated but declined, for indicipline, due to independent power of borrolwings and rampant mismanagement. Country suffered from foreign debts, and flight of capital.

2. NIGERIA- The oil revenue of Nigeria has been invested number of times in public sector projects. The spending from high foreign exchange reserves rsulted in high rates of inflation. It failed to correct foreign payment crises. Consumer imports, prestigious and wasteful profects, political parties and personal enrichment affected the national economy.

3. THAILAND-The ectomony has been sluggish partly due to adopting austerity measures private investment (1958-90) rose at the rate of 0.2 percemt only as against reduction of 2 percnt in public investment. Privasisation solution is not very effective.

4. U. K. :- The U. K. set off the most aggressive and well known privatisation programme. The Britain Govt. initially revised regularly 7 Billion Pound sterling from the sale of nationalised industries primarrily by stock floatation. British Govt. had privatised its Aerospace including defence equipment, British petroleum and British Layland British oil, hotels, Chains of British railways. Britain is the world's biggest and most advanced laboratory for the testing of privatisation. But economy is not conferring the reasonable result to the nation.

5. INDONESIA- The country suffered from world recession and falling foreign exchange revenues resulting in scheduling of projects. Inefficient monopoly, high transport and energy cost make industry no competitive, small size of market, high labour cost, corruption, red tape and lack of infrastructure rpel investors. Infrastructure building is not the field for private investors.

Indonesia has 215 state industries and now started privatisation. Foreign equity can be up to 80 percent in expotr sector forms. It deregulated protected sector since 1985-86 export declined by 9.1 percent oil receipts by 12.5 percent non-oil exports nt 0.7 percent. The official capital inflow was lawer by $ 3.3 percent billion but private investment increased by about $ 156 million only. Privatisation is a poor alternative source of financing and definitely does to met the economic needs of building infrastructure.



Scanned by CamScanner

LIBERALISATION AND INEQUALITY: Globalisation is a two edged sword a number of coutries in East Asia are success stories of export led development combing rapid growth with low inequality and high human debelopment. By contrast many countries in Sub-Saharan Africa have become increasingly marginalised by global force. Many developing countries are facing the basic problems in their economy, like poverty, inequality, unemploymennt, social disparity and recently economic terorisam.

The economic restructuring, liberlisation, technological changes and fierce competition, both in the markets for goods and for labour, that wet with globalisation have contributed to increased impoverishment, inequalities, work insecurity, weakning of institution, and social support systems, and erosion of established identies and values. Liberlisation and educed protection of agriculture by reducing agricultural supplies, have raised the price of food, and food importing countries have suffered as a result. Globalisation has been sad for Africa and in parts of unadoptable skills.

POVERTY:- The poverty and beauty are said to be easily perceived but difficult to describe. Therefore, an attempt to describe poverty of individual, house holds, region, states, nation. and International level is always found to be incomplete and therefore. liable for criteicism. Poverty has been in existence since the origin of man on earth. Therefore, poverty is as old as man of the earth.

DEFINITION OF POVERTY:- In a board sense poverty means lack of sufficient, means or enough income to provide some objectively defined standard of living. In another words As absence of income to procure the basic necessities of life.

ACCORDING TO MARTIN REINS:- Poverty can be defied as subsistence inequality and externality. Subsistence in concerned wity the minimum provision needed to maintain health and working capacity. Inequality is concerned with the relative position of the income groups to each other the concept of poverty must be seen in the context of society as a whole. Externality is concerned with the social consequences of poverty for the rest of the society rather than in terms of the needs of the poor.

GLOBAL-POVERTY:- Poverty exist near about all over the world. For the first time in human history the world leadership taking the enough cognizance to ending a poverty in globe. The poor seem to be every where and are incrasing in numbers due to unemployment, industrial recession, in the world and sceptical growth in population and world wide effects of trade cycle of business and econimic activities, from Malasiys to Zimbawawe and Argentina and Indonisia. The formost rich countries like France, Swiss, U. K. and U.S.A. diverted a small fund of finance from their defence expenditure to meeting the needs of the world's poor people, At least comming generation would realise free humanity from poverty iron grip. The world richest countries have continued their economic growth, for their nation, people, carried fore word by the flowering of science and technology. Even though poor countries seens to be falling ever further believed the trug is more heartening. Large parts of the so called developing world especially in Asia have mae icredible strides awy from absolute



Scanned by CamScanner

poverty.

The poorest of poor in East and other parts of Africa and remote village areas of Latin U.S.A. and Asia Zone, have been facing a crucial problems of poverty. Near about 2 1/12 Billion poeoples are living in very disgust condition which is totally unhygienic and bodily unfit. Morever they are facing the sqralid of hunger, deases and inpoverishment. In may of the developing countries the past thirty year have marked a time of progress and regress.

In the poor countries povety, malnutrition and disease have grow side by side with improvments in living conditions. Nearly one third of the population in developing countries and more than a half of Africa's live in absolute povety. In 1992 six million children under five years died with diarhoea.

The extreme povetyr of the bottom billion people is schoking morally intolerable and great dangerous due to epidemids, violence, kidnapping and economic terrorism. Yet, with the richest countries become richer than ever before and with much of the developing world already escaped from the narrowers of extreme poverty, the balance has shifted in favour of ending global poverty. Rich countries could enable the poorest of the poor to escape from misery by providing just a little fraction of their national income cake.

Globalisation and global poverty are the two sides of world economy, where developing countries still are not came out with their basic problems like, ecomoic growth, population problems, unemployment among the youth, development of research and educational dicipline. According to the labour Report of 2000, many Africa countries are at the bottom line of development poverty and social disparities are two major challenges before them. Health and education are yet in the stationary position, and due to this some intellectual class of people and manpower are not emerged among the population since last decades together. Many sub-saharn countries are depened on the world trade and therefore their imports bill adversely affected to the economy. MNC and other big residential industrialist governing the economy, which is ereation complicated issues in sub-saharan contiental

Asian and Latin American Countries are to more beneficial by the process of globalistation. In the last decate many bitter experience come to notice that, Argentiana Brazil and in early phase of Globalisation Mexico was severely affected. In the Asian region, Indonisia, Malaysia, Taiwan and other developing countries were victimised by the process of the reforms.

European countries and North America countries and ocean continental countries are to suffered by the reorms process severely But in second phase of reforms macro ecomomic stabillity, come to notice in developing countries.

Povety is not problem of any single country in the world, where we easily over come to it. It is a global problem therefore it is a need to take a joint and collective efforts through the different plan's and programmes In this context, recently the subject was discussed in very detail at Johannesburg summit.

The U.S.A. and Europe nations began showcasing public-private partenership to fight poverty at the eirth summit at



Scanned by CamScanner

Johannesburg. The U.S.A., hundreds of millions of Dollar in resources from existing programme and funds to programme meant to meet summit goals of halving poverty by 2015. U. N. organisers sat partnership getting governments to work with local communities, non governmental organisation and businesses in solving the planes ill, could be a big innovation by the Johannesburg Sammit.

In this context aid can be effective in spurring economic growth and reducing poverty in developing countries with good policies and institutions-where good policies and institutions include a stable macro-economic frame work. The millennium Development Goals (MDGS) which aim to have the evidence of poverty and broadly improve human welfare by near future.

**TABLE NO.1**

**GLOBAL- POVERTY**

| SR. NO. | NAME OF CONTINENTAL | YEAR | % OF PERSONS WITH INCOME UNDER POVERERTY LINE |
|---|---|---|---|
| 1. | **AFRICAN- COUNTRIES** | | |
| | A) ALGERIA | 1995 | 22.0 |
| | B) BENIN | 1995 | 33.0 |
| | C)CHAD | 1996 | 64.0 |
| | D)GAMBIYA | 1992 | 64.0 |
| | E)TANZANIYA(UNIT-R) 199152.0 | | |
| | F)UGANDA | 1993 | 55.0 |
| | G)ZAMBIA | 1993 | 86.0 |
| 2. | **ASIA- COUNTRIES** | | |
| | A) AZARBAIZAN | 1995 | 68.0 |
| | B) CHINA | 1996 | 6.0 |
| | C) INDIA | 1994 | 9.0 |
| | D) PAKISTAN | 1991 | 34.0 |
| | E) VIET- NAM | 1993 | 50.0 |
| 3. | **EUROPEIN-COUNTRIES** | | |
| | A) ALBANIA | 1996 | 25.0 |
| | B) DENMARK | 1992 | 6.0 |
| | C) LUXEMBURG | 1994 | 9.0 |
| | D) NORWAY | 1995 | 6.0 |
| | E) SWEEDAN | 1992 | 6.0 |
| | F) UKRAINE | 1995 | 32.0 |
| | G) UNITED-KINGDOM | 1995 | 22.0 |
| 4. | **LATIN AMERICA AND THE CARIBBEN- STATES** | | |
| | A) ARGENTINA | 1991 | 26.0 |
| | B) BRAZIL | 1990 | 18.0 |
| | C) EL-SALVADOR | 1992 | 49.0 |
| | D) HODNURAS | 1992 | 50.0 |



Scanned by CamScanner

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| 6. | **OCEANIA** | | | | | |
| | A)AUSTRALIA | 1994 | 2.2 | 6.7 | 38.2 | 22.7 |
| | B)PAPU NEW GUIEA | 1996 | 1.7 | 4.5 | 56.5 | 40.4 |

***SOURCE-WORLD LABOUR-REPORT-2000***

**REFERENCES**


1) Globalistion technology and Trade in the 21 st Century- Part III BY - HANS-SENGER. Neclambar Hatti, Remeshamlar- Tandon
2) Poverty Rural Development and public policy By - Amareadra
3) Globalisation and Liberlisation New Developments- G.S. Batra, R.C. Dangawal
4) World Labour Report 2000
5) Human Development Report 1996.
6) Economic Times -Act on your promises By-Jeffer D. sachs.
7) Economic -Times Globalisation V.S. Nationalisation- By- Mehata
8) Indian Express- Eirth Summit Unveils-Contraversial pacts.
9) Poverty and Developing Country By- Ratankar Gedam.


✠✠✠✠

Scanned by CamScanner



# पैसा, वर्तमान मौद्रीक धोरण व विदेशी गुंतवणूक

डॉ. सौ. अरुणा सोनेगांवकर
व्ही. एम. व्ही. कॉलेज,
नागपूर

**१. विषय प्रवेश :** १९८० पासून जागतिक व्यापारात अनेक मूलगामी बदल होत आहेत. विकसित, नव्याने औद्योगिकरण करित असलेले विकासमान, चीन-भारतासारखे लोकसंख्येने मोठे व इतर लहान विकसनशील, युरोपीय देश आणि नव्याने विभाजन झालेला रशिया, या असा प्रत्येक देश आणि देशगटात जागतिक व्यापारातील मूलगामी बदलांचे प्रतिबिंब उमटत आहे. अमेरिका, जर्मनी, जापान या औद्योगिक दृष्ट्या बलाढ्य राष्ट्रांनी जागतिक घसरणीच्या दीर्घकालीन संकटातून मार्ग काढण्यासाठी निर्यात वाढ प्रणित विकास मार्गाच्या सीमारेषा विस्तारित करून जागतिक अर्थव्यवस्थेच्या एकात्मिकरणाची प्रक्रिया सुरू केली आहे. वर्ल्ड बँक, आय.एम.एफ. युरोपीय कम्युनिटी, गॅट या आणि १ जानेवारी १९९५ रोजी स्थापन झालेल्या वर्ल्ड ट्रेड ऑर्गनायझेशन (W. T.O.) यांच्या सारख्या जागतिक बलाढ्य आर्थिक संस्था आणि व्यापार संघटनांच्या जबरदस्त दबावामुळे व एकूण परिस्थितीच्या रेट्यामुळे आज जगातील गरीब व मध्यम सर्वच देशांना जागतिक व्यापाराच्या प्रवाहात सामील व्हावे लागत आहे. त्याचप्रमाणे काही देश स्वत:च्या उन्नती करिता स्वच्छेने स्वीकार करित आहे. त्यासाठी त्या देशांना स्वनियंत्रित/संरक्षित व आयात बंधनात्मक धोरणाचा वेगाने त्याग करून बंधनमुक्त उदार आर्थिक नीतीचा अवलंब करावा लागत आहे. **जागतिक बलाढ्य आर्थिक संस्था आणि व्यापारी संघटना या माध्यमातून बड्या राष्ट्रांनी भारतासारख्या विकसनशील राष्ट्रांना अप्रत्यक्षपणे हेच सांगितले आहे की, आता विकसनशील देशांनी परकीय कर्जे, राज्यकोषीय तुटीचा भरणा आणि आंतरराष्ट्रीय मदत या मार्गाऐवजी खुल्या आंतरराष्ट्रीय व्यापाराचा मार्ग पत्करूनच आपला आर्थिक विकास साधावा.**

आंतरराष्ट्रीय व्यापार म्हटला की आंतरराष्ट्रीय पैसा त्याची उपलब्धता, विनिमयता, सार्वत्रिक स्वीकृती, मौद्रीक धोरणे, निश्चित करतांना विचारात घ्यावयाच्या बाबी, विदेशी गुंतवणूक या गुंतवणूकीचे प्रमाण, त्याचे होणारे परिणाम या सर्व बाबींची चर्चा करणे अपरिहार्य ठरते. प्रस्तुत निबंधात मी या मुद्यांना केवळ स्पर्श करण्याचा प्रयत्न केला आहे. विद्यार्थ्यांना व शिक्षकांना अर्थशास्त्रीय समस्यांची जाणीव व्हावी आणि त्या दिशेने तरूण अभ्यासकांनी वाचन, चिंतन व शक्य झाल्यास याच क्षेत्रात पुढे संशोधन करण्यास उद्युक्त व्हावे या मर्यादित हेतूनेच मीं माझे निवेदन पुढील टप्यात विभागले आहे.

१. विषय प्रवेश
२. पैसा ते आंतरराष्ट्रीय मुद्रा
३. वर्तमान मौद्रीक धोरण
४. विदेशी गुंतवणूक

केवळ वर्तमान मौद्रीक धोरणाचा अभ्यास एकांगी होईल. या दृष्टीने सर्वंकष अभ्यासाकरिता मुद्रेच्या प्रगटीकरणापासून आंतरराष्ट्रीय मुद्रेपर्यंतचा मुद्रेचा प्रवास कसा झाला हे ज्ञानात्मक तसेच मनोरंजनात्मक प्रवासवर्णन. तसेच मौद्रीक निश्चिती करतांना विचारात घ्यावयाच्या बाबी. विदेशी विनिमय दराचे निर्धारण व महत्व हे विशद करित असतांना विदेशी गुंतवणूकीच्या मुद्याला उचित स्थान



Scanned by CamScanner

देण्याचा प्रयत्न केला आहे.

२. पैसा ते आंतरराष्ट्रीय पैसा

२:१ उत्पादन वाढ होत असतांना पैशाची वाढ होत राहिली पाहिजे, अन्यथा किंमती घसरू लागतील आणि उत्पादन वाढीला खिळ बसेल. या उलट उत्पादन वाढीपेक्षा पुरवठ्यातील वाढ जास्त वेगाने झाली तर चलनवाढीचा धोका असतो अर्थात पैशावर नियंत्रण असणे अत्यंत महत्वाचे आहे. **वस्तुविनिमयाच्या अवस्थेतून बाहेर आल्यानंतर झालेल्या समाजाच्या आर्थिक विकासात मोठा वाटा असणाऱ्या पैशावर मात्र माणसाला नियंत्रण मिळविण्यात अजून पुरेसे यश मिळालेले नाही[२].**

पुन्हा पुन्हा येणारी व्यापारचक्रे, चलन संकटे, भांडवलाची अकल्पनीय अशी स्थानांतरे, अजूनही पूर्णपणे आकलनात न आलेले चलनवाढीचे स्फोट हे मानवाने पैशावर नियंत्रण मिळविले नाही. हे स्पष्ट करते. १९३० मधील महामंदीसारखे संकट पुन्हा येवू न देण्याइतके विश्वसनीय समष्टी अर्थशास्त्रीय ज्ञान धोरण आखणाऱ्यांनी निश्चित मिळविले आहे. **किंमत स्थैर्य, वाढता आणि टिकाऊ रोजगार, आंतरराष्ट्रीय व्यापाराला मुक्त वाव देवू शकेल. अशा आंतराष्ट्रीय पैशाची निर्मिती आणि त्याचे सर्व देशांना समाधानकारक असे व्यवस्थापनाचे शास्त्र व व्यवहार अजून प्रायोगिक अवस्थेतच आहे.** देशांतर्गत पैसा, त्याचे शास्त्र व प्रभावी पद्धती विकसित झाली आहे. राष्ट्रीय पैशाच्या बाबतीत हे बऱ्याच अंशी खरे असले तरी आंतरराष्ट्रीय पैशाबाबत मात्र तसे निश्चयपूर्वक म्हणता येणार नाही.

२:२ आंतराष्ट्रीय पैसा हा आंतरराष्ट्रीय वस्तू व वित्तीय साधनांच्या व्यापारातील हिशोबपूर्तीसाठी आवश्यक आहे. कोणतीही वस्तू जी सर्वसाधारणपणे हिशोब पूर्तीसाठी स्वीकारली जाते. तिला पैसा पण प्राप्त होते. सोन्याला आंतरराष्ट्रीय स्वीकार्यता असल्याने सुवर्णमान आंतरराष्ट्रीय हिशोब पूर्तीचे साधन म्हणजे आंतरराष्ट्रीय पैसा म्हणून मान्यता पावले. तांबे, रूपे यांचाही धातू पैसा म्हणून कांही काळ उपयोग करण्यात आला. परंतू १८७० च्या दशकात जगातील प्रमुख देशात सोने हेच धातू पैसा म्हणून स्थिरावले.

२:३ सुवर्णमानकाचा काल साधारणपणे १८७० ते १९१४ असा मानला जातो. इंग्लंडमध्ये १८२१ पासून केवळ सोन्याची नाणी परिचलनात आली. पौंड हा केवळ सोन्यावर आधारित म्हणून प्रतिष्ठित झाला. ब्रिटन हे पूर्णपणे सुवर्णमानकाचा अंगीकार केलेले पहिले राष्ट्र म्हणून मानले जाते. इंग्लंड सोडून इतर प्रमुख देश मात्र अनेक वर्षे सुवर्णमानकापासून दूर राहिले. अमेरिका आणि अनेक युरोपीय देश द्वि-धातुवादाचे पुरस्कर्ते होते. आशिया खंडातील बऱ्याच देशात रजतमानक प्रचलित होते. १८७१ मध्ये नव्या जर्मन साम्राज्याने आपले नाणे म्हणून सुवर्णमार्क स्वीकारला. १८७३ मध्ये अमेरिकेने तसाच निर्णय केला. १८७८ मध्ये फ्रान्स आणि इतर युरोपीय देशांनी रूपयाचे विमुद्रीकरण केले. अशाप्रकारे १८७० च्या दशकात पूर्ण स्वरूपातील आंतरराष्ट्रीय सुवर्णमानाकडे कल आणि वाटचाल सुरू झाल्याचे दिसते. १९१४ साली पहिल्या महायुद्धाला आरंभ झाल्यानंतर मात्र याचा त्याग करण्यात आला.

२:४ १९१४ पूर्वीच्या सुवर्णमानाच्या कार्यपद्धतीबद्दल पुष्कळ बोलले आणि लिहिले गेले असले तरी त्या क्षेत्रातील उपलब्ध साधन सामुग्रीची चिकित्सापूर्णक आणि पद्धतशीर तपासणी तसेच आधुनिक आंतरराष्ट्रीय व्यापार आणि वित्तीय संस्थांच्या अनुषंगाने काटेकोर विश्लेषण मात्र अनेक वर्षे जवळजवळ झालेले नव्हते. **सुवर्णमानकाच्या काळातील मध्यवर्ती बँकांची धोरणे, नियमांचे पालन, सुवर्णच्या साठ्यातील वाढ, विविध देशातील मौद्रीक धोरणे, व्याज दरातील बदलांचा आंतरराष्ट्रीय भांडवल प्रवाहावर इत्यादी बाबी तपासून पाहिल्या असता असा निष्कर्ष निघतो की, १९१४ पूर्वीचे सुवर्णमानक पाठ्यपुस्तकात आणि इतरत्र साधे, सोपे, आदर्श असे दाखविलेले आहे, परंतु प्रत्यक्षात ती एक गुंतागुंतीची यंत्रणा होती.** १९१४ पूर्वीचे सुवर्णमानक गृहीत धरून चालणार नाही. त्यासंबंधी बरेच अधिक विश्लेषण झाले पाहिजे या पद्धतीचे कार्य कसे होते आणि पहिल्या महायुद्धोत्तर काळात ती पद्धती समाधानकारक कार्य कां करू शकली

Scanned by CamScanner

नाही हे आपल्याला खऱ्या अर्थाने कळू शकणार नाही.

२:५ पहिले महायुद्ध सुरू झाल्याबरोबर सोन्याचे साठे सुरक्षित ठेवण्यासाठी चलनाची परिवर्तनीयता निलंबित करण्यात आली, मात्र एक कागदी चलन विकून दुसरे कागदीचलन कोणत्याही किंमतीला विकत घ्यायला आडकाठी नव्हती याचा अर्थ विनिमय यंत्रणेच्या जागी अगदी त्याच्या उलट पद्धतीची यंत्रणा आली. शुद्ध तरत्या विनिमय दराची पद्धत सुरू झाली आणि चलनाचे विनिमय दर अस्थिर झाले. युद्ध संपले युद्धोत्तर शांततेची राजकीय व्यवस्था निर्माण झाली आणि सरकारनी आपले लक्ष जागतिक पैसाविषयक सुधारणांकडे वळवले. १९२२ मधील आंतरराष्ट्रीय आर्थिक परिषदेने (जिनोआ) जागतिक स्तरावर सुवर्ण विनिमय मानक (Gold Exchange Standard) स्वीकारण्याची शिफारस केली. या मागील कल्पना अशी होती की, यातून सोन्याच्या मागणीत केंद्रीकरण व समन्वय साधता येईल व यातून अनेक देशांच्या एकाच वेळी होत असलेल्या सोन्याच्या मागणीमुळे निर्माण होणारी परिस्थिती टाळता येईल. मध्यवर्ती बँकांनी त्यांच्या राखीव मत्तेच्या साठ्यात सोन्याच्या जागी विदेशी चलनाचा पर्याय स्वीकारावा म्हणजे सोन्याची बचत होईल. सोन्याचे साठे पद्धतशीर पणे प्रमुख वित्तीय केंद्रात (लंडन) एकत्र करावयाचे होते. केंद्राबाहेरील देशांनी आपल्या चलनाचे विनिमय दर स्टर्लिंगसारखे सोन्यात परिवर्तनीय असलेले चलन सोन्याऐवजी विकत घेवून किंवा स्थिर ठेवावे या नव्या पैसा व्यवस्थेत अभिजात सुवर्णमानकाच्या प्रतिमानावर बेतलेली ताळेबंदातील समायोजनाची यंत्रणा आणि सोन्याच्या कमतरतेमुळे निर्माण झालेल्या परिस्थितीला तोंड देण्यासाठी केलेली नव्या मिश्र वस्तू-चलन-मानकाची योजना या दोन गोष्टी एकत्रित करण्यात आल्या होत्या.

२:६ १९३१ साली युरोपातील बँक व्यवसाय संकटाच्या लाटेत सापडला. ब्रिटनच्या सोन्याच्या राखीव साठ्यावर परिवर्तनासाठी झुंबड उडाली त्यातून निर्माण झालेल्या अवस्थेत आंतरराष्ट्रीय पैसा व्यवस्था कोलमडून पडली. अनेक चलन गट निर्माण होवून ते एकमेकांना विरूद्ध स्पर्धक म्हणून उभे ठाकले आणि आवश्यकता भासू लागली. आंतरराष्ट्रीय नाणे निधीच्या स्थापनेची. आंतरराष्ट्रीय नाणेनिधीच्या कार्याचा ज्यांना परिचय आहे. त्यांना सुद्धा त्या संघटनेची स्थापना ही एक विशेष घटना आहे. हे लक्षात येणे कठीण आहे. **आपल्या चलनाचे विनिमय दर ठरविण्याचा राज्य या सार्वभौम सत्तेचा अधिकार एखाद्या आंतरराष्ट्रीय संस्थेकडे सोपविणे. ही काही किरकोळ घटना नाही. अर्थात तसे करित असतांना अनेक संरक्षक तरतुदी करण्यात आल्या. यात आश्चर्य वाटण्यासारखे काही नाही, परंतु सार्वभौम सत्तेचा अधिकार एखाद्या आंतरराष्ट्रीय संस्थेकडे सोपविला गेला हिच विशेष बाब होय.**

**त्यावेळची परिस्थिती आणि भविष्याचा वेध घेवून त्याला आकार देण्याची विलक्षण प्रतिभा असणाऱ्या माणसांनी केलेल्या अथक परिश्रमाचे ते फळ आहे. मानवाच्या इतिहासात असे प्रसंग विरळच असतात आणि त्यातूनच इतिहास एक वेगळे वळण घेत असतो.** आंतरराष्ट्रीय नाणेनिधीच्या स्थापनेत तसा अनेक अर्थशास्त्रज्ञ, अनुभवी आणि दूरदर्शी धोरणकर्ते अशा कर्तृत्ववान माणसांचा सहभाग होता परंतु त्यात केन्स यांचे नाव उठून दिसते. जनरल थिअरी (१९३६) लिहून यांनी अर्थशास्त्रीय विचारात आणि व्यवहारात अगोदरच क्रांती घडवून आणली होती. त्या पाठोपाठ दुसऱ्या महायुद्धानंतरच्या जगातील पैसाविषयक पुनर्रचना, विशेषत: देशांतर्गत पूर्ण रोजगाराला आणि वाढत्या आंतरराष्ट्रीय व्यापाराला पोषक अशी जागतिक पैसा व्यवस्था निर्माण करण्यासाठी त्यांनी आपल्या चमकदार आयुष्याची अनेक वर्षे खर्च केली आणि आंतरराष्ट्रीय समाशोधन संघाची (clearing union)आजही क्रांतीकारण वाटावी अशी योजना मांडली. आंतरराष्ट्रीय समाशोधन संघाचा प्रस्ताव मांडतांना केन्स यांनी एका नव्या आंतरराष्ट्रीय पैशाची निर्मिती, मध्यवर्ती बँकांची मध्यवर्ती बँक, सर्वमान्य विनिमय दर इत्यादी संबंधी मौलिक व्यवस्था दूरदर्शीपणाने, द्रष्टेपणाने सुचविली होती ती त्यावेळी स्वीकारली गेली नाही.


Scanned by CamScanner

सुरू आहेत. युरो ही कल्पना जुनी आहे. आपापसातली व्यवहार पुर्ण खूला केल्यानंतर चार पाच वर्षातच युरोपीय राष्ट्रांनी या शक्यतेची चाचणी सुरू केली. ही कल्पना मांडल्यापासून बऱ्याच राजकीय व आर्थिक प्रक्रियातून युरोप अधिक एकसंघ बनला. असाच प्रयत्न झाल्यास जागतिकीकरणातून जग एकसंघ होण्याची शक्यता आहे.

एखाद्या चलनाची लोकमान्यता व यशस्विता, त्या देशाची उत्पादन क्षमता, व्यापारी क्षमता, त्या देशातील मौद्रीक धोरण, वित्तीय गुंतवणूकीतील परतव्याचा दर, अपेक्षित व्याज दर व प्रचलित भाववाढ, राजकीय स्थैर्य अशा अनेक घटकांवर अवलंबून असते. युरोपासाठी एकच चलन आणायचे असते तर हे सर्व घटक अवघ्या युरोपीय राष्ट्रांसाठी एका किमान पातळीवर समधर्मी असाव्यास पाहिजे. आंतरराष्ट्रीय चलना करिता संपूर्ण जग अशाप्रकारच्या किमान पातळीवर समधर्मी होणे आवश्यक आहे.

१ जाने. १९९१ रोजी युरो चलन अधिकृत रित्या अस्तित्वात आले. या दिवसांपासून ११ युरोपियन चलने परस्परांशी ठराविक विनिमय दराने स्थिर स्वरूपात बांधली गेली. सदस्य देशांचे युरो हेच अधिकृत चलन बनले. आजवर फक्त युरोपीय सरकार अंतर्गत व्यवहारात वापरले जाणारे हे कृत्रिम लेखा चलन होते. त्याची जागा एकास एक पायावर युरो ने घेतली आहे. सरकारी कर्ज व्यवहार युरोतच सुरु झाले आहे. सध्याची चलने युरोच्या जोडीने चालू राहणार आहे. कागदी नोटा व नाण्यांच्या एका बाजूला युरोचे चिन्ह आणि दुसऱ्या बाजूला देशी मुद्रा आहे.

१ जानेवारी २००२ पासून युरोच्या नोटा आणि नाणी प्रचारात आली आहे. ५, १०, २०, २५, ५० असे त्याचे तुकडे आहेत. एकूण भाग १०० आहेत त्यांना त्या त्या देशाच्या रुढीनुसार फेनिंग, सेटिंम असे म्हटले जाते.

१ जुलै २००२ पासून सध्याची सर्व राष्ट्रीय चलने अधिकृत रित्या स्थगित व नामशेष झाली आहेत व रद्दबादल झालेले चलन घेवून युरो देण्याची जबाबदारी युरोपियन बँकांनी घेतली आहे.

असा हा मुद्रेचा प्रवास आंतरराष्ट्रीय मुद्रेपर्यंत येवून ठेपला आहे. सार्क देशांनी सुद्धा सार्क प्रदेशाकरिता ए सामायिक चलन सुरू करावे अशी मागणी होवू लागली आहे यामुळे सार्क देशांना आपआपसातील व्यापारात ज्या अडचणी व व्यत्यय येतात ते दूर होवू शकतील. सार्क देशातील व्यापार विस्तार व विकास त्यामुळे दक्षिण आशियातील प्रादेशिक सहकार्याच्या कल्पनेला एक नवीन आयाम प्राप्त होईल. व लवकरच या देशांचा आर्थिक विकास होईल. अशी अपेक्षा आहे.

२:११ गेल्या अनेक शतकातील पैशाचा विकास, त्याचे यश अपयश, त्याच्याकडून केलेल्या अपेक्षा, त्याच्यासंबंधी मांडलेले सिद्धांत, केलेल्या अटकळी, सुचवलेली संकलपचित्रे, त्याच्या घडणीत प्रतिबिंबीत झालेले राष्ट्राराष्ट्रांचे हितसंबंध, माणसांची मानसिकता, आंतरराष्ट्रीय कायद्यातील तरतूदी आणि संकेत ही सर्व लक्षात घेवून प्रदीर्घ वाटाघाटीनंतर अनेक तज्ञ धोरणकर्ते, मुत्सद्दी इत्यादींच्या आंतरराष्ट्रीय सहकार्यातून नाणे निधीसारख्या लवचिकपणे आकार घेत घेत प्रगल्भ आणि सुप्रतिष्ठीत झालेल्या आंतरराष्ट्रीय संस्थेच्या मार्गदर्शनाखाली SDR हा खराखुरा पण आज प्रथमावस्थेत असलेला आंतरराष्ट्रीय पैसा तसेच युरो चलन निर्माण करून माणसाने इतिहासातील, हवे तर पैशाच्या इतिहासातील म्हणा एक सोनेरी पान उघडले आहे. आंतरराष्ट्रीय पैशाचा जन्म झाला आहे. एक अदृष्य क्रांतीचे पर्व सुरू झालेले आहे आणि त्याचे आपण साक्षी आहोत.

या पार्श्वभूमीवर भारताचे वर्तमान मौद्रीक धोरण अभ्यासणे तेवढेच महत्वाचे आहे.

### ३. भारताचे वर्तमान मौद्रिक धोरण:

३:१ भारतीय मौद्रिक धोरणात सरकार आणि रिझर्व्ह बँकेच्या त्या निर्णयांचा समावेश होतो जे मुद्रेच्या पुरवठ्याचा आकार आणि रचना बँकेच्या कर्जाचा आकार आणि वितरण, व्याज दराचा स्तर आणि संरचना इत्यादींना प्रभावित करतात. या अंतर्गत राजकोषीय धोरणाचा मौद्रिक प्रभाव आणि मध्यवर्ती बँकेची सरकारी ऋण आणि पत नीतीचाही समावेश होतो. भारतात अंतिक मौद्रिक अधिकारी भारत



Scanned by CamScanner

सरकार किंवा वित्त मंत्रालय आहे, परंतु व्यावहारिकदृष्ट्या मध्यवर्ती बँकेलाच मौद्रिक अधिकारी समजले जाते. देश स्वतंत्र झाल्यानंतर भारतासमोर गरीबी आणि विविध संसाधनांचा अभाव या दोन प्रमुख समस्या होत्या व आजही कांही प्रमाणात आहे. या समस्यांचा सामना करण्याकरिता भारताने ज्या मौद्रिक धोरणाचा स्वीकार केला ते स्वातंत्र्यापूर्वीच्या मौद्रीक धोरणापेक्षा वेगळे आहे. १९५१ नंतर भारताच्या मध्यवर्ती बँकेने देशाच्या आर्थिक विकासाला गती देण्याच्या दृष्टीने आपल्या मौद्रिक धोरणात परिस्थितीनुसार वेळोवेळी फेरबदल केले आहे. पूर्ण रोजगार नाही परंतू पूर्ण रोजगारच्या जवळपास पोहचण्याची क्षमताअसणारी मौद्रीक धोरण हवे आहे. पूर्णपणे किंमतीत स्थायित्व प्राप्त करणे हे भारताच्या धोरणाचे मुख्य लक्ष नसले तरी किंमतीत फारशी उच्चावचने होणार नाहीत असे मौद्रीक धोरण अपेक्षित आहे. विकासाकरिता वित्त व्यवस्था कशी होईल या दृष्टीने भारताचे पत धोरण निश्चित केल्या जाते. या सर्व बाबींचा विचार करता पुढील बाबी स्पष्ट होतात.

■ देशातील चलन पुरवठ्यावर नियंत्रण ठेवण्याचे महत्वपूर्ण कार्य भारताच्या वर्तमान मौद्रिक धोरणातून पार पाडले जाते. भारताच्या वर्तमान मौद्रीक धोरणातून चलन पुरवठा वाढणार नाही याची पुरेपूर काळजी घेतली असल्याचे दिसून येते. चालू वर्षातील किंमतीची स्थिरता हा त्याचा परिमाण आहे.

■ भारताच्या वर्तमान मौद्रीक धोरणातून व्याजावर नियंत्रण ठेवण्याचे कार्य उत्तम प्रकारे पार पडत असल्याचे दिसून येते. उद्योगांना सहजपणे कर्जपुरवठा व्हावा. बाजारात गुंतवणूकी करिता चलनाच्या पुरवठ्यात फारशी वाढ न करता उपलब्ध व्हावा म्हणून व्याज दरात नुकतीच घट करण्यात आली.

■ विनिमय दरावर नियंत्रण असल्याचे वर्तमान मौद्रीक धोरणातून दिसून येते. विनिमय दराचा जागतिक बाजारपेठेवर तसेच देण्या-घेण्याचा व्यवहारावर प्रभाव पडतो. यातून कधी लाभ होतो तर कधी मोठ्या प्रमाणावर तोटा सहन करावा लागतो. विनिमय दर कायम ठेवण्याचे वर्तमान मौद्रीक धोरणातून दिसून येतात.

■ व्यापारी बँकांच्या पत चलनावर नियंत्रण ठेवणे हे भारताच्या वर्तमान मौद्रिक धोरणाचे प्रमुख लक्ष आहे. हे पत चलन मर्यादेपेक्षा वाढणार नाही याची काळजी मध्यवर्ती बँक सतत घेत असते. वर्तमान मौद्रीक धोरणातून या दृष्टीने मध्यवर्ती बँकेने उपाययोजना केल्या आहेत.

■ कोणतेही आर्थिक निर्णय घेतांना दूरदृष्टी, सैद्धांतिक परिपक्वता दाखविणे आवश्यक असते. विदेशी विनिमयाचा साठा वाढविणे ही आंतरराष्ट्रीय व्यापाराकरिता एक अपरिहार्यता आहे. भारताच्या वर्तमान आर्थिक व मौद्रीक धोरणातून या दृष्टीने प्रयत्न करण्यात आले व ते यशस्वी झाले हे देशाजवळील विदेशी चलनाच्या साठ्यावरून लक्षात येते.

■ भांडवलांची उपलब्धता आर्थिक विकासाकरिता प्रमुख गरज आहे. व्याज दर आणि भांडवलांची उपलब्धता यांचा अन्योन्य संबंध आहे. व्याजदर वाढल्यास भांडवलांची टंचाई निर्माण होते. भारताने व्याजदर कमी करण्याचे धोरण स्वीकारून व्याज दर कमी केले आहे. परिणामस्वरूप बाजारात पैसा उपलब्ध झाला आहे. कर्ज देणारे तयार आहेत परंतु उद्योगात मंदीचा काळ आल्यामुळे कर्ज घेणारे त्याला प्रतिसाद देण्याच्या मनस्थितीत नाही.

■ एकाच वेळी गुंतवणूकीच्या संधी आणि कमी व्याजदर अशी परिस्थिती सहसा आढळून येत नाही. वर्तमान मौद्रीक धोरणातून सरकारने ही परिस्थिती निर्माण करण्याचे ठरविलेले दिसून येते. एकीकडे मुक्त अर्थव्यवस्था व दुसरीकडे व्याजाचे दर कमी करण्याचे मौद्रीक धोरण यामुळे बाजारपेठेत उत्साहवर्धक वातावरण निर्माण होईल असा सरकारचा अंदाज आहे.

वर्तमान मौद्रिक धोरणाच्या परिणामस्वरूप आज बाजारात मोठ्या प्रमाणावर अर्थपुरवठा उपलब्ध आहे. सहजपणे कर्ज उपलब्ध आहे. जनतेला आपला पैसा कुठे गुंतवावा हा प्रश्न पडला आहे. मुक्त बाजारपेठेमुळे आयाती बरोबरच निर्यातीला मोठ्या प्रमाणावर वाव आहे. आता उद्योजकांनी पुढे यावयास पाहिजे. जनतेने केवळ बेरोजगारीची चिंता करण्यापेक्षा कुठला ना कुठला उद्योग



Scanned by CamScanner

सुरू केला पाहिजे. स्वत:चे काम स्वत: मिळविले पाहिजे. बाजारात भांडवल उपलब्ध आहे त्याचा वापर केला पाहिजे, एखाद्याने काय करावे हा ज्याचा त्याचा प्रश्न आहे. हे काही सरकार ठरवू शकत नाही. सरकारी धोरणांमुळे केवळ संधी उपलब्ध करून दिल्या जावू शकते. आज ही संधी उपलब्ध झाली आहे. नोकरीची मानसिकता दूर करून, उद्योजकांची मानसिकता समाजाने स्वीकारावयास पाहिजे. असे झाले तर निश्चितपणे देशाचा आर्थिक विकास होवू शकतो.

भूमी, श्रम, भांडवल संघटन व साहस या बाबी उद्योगाच्या स्थापनेकरिता आणि यशस्वीतेकरिता मूलभूत बाबी म्हणून ओळखल्या जातात. आज भारतातील जनतेजवळ या सर्व बाबी उपलब्ध आहे. भांडवलांची उपलब्धता नसणे हा मोठा अडसर विकासाच्या मार्गात होता. सरकारच्या मौद्रिक धोरणाने हा अडसर आज दूर झालेला आहे. याच बरोबर राजकोषीय धोरणानुसार अर्थव्यवस्थेवर नियंत्रण ठेवण्याचा सरकारचा प्रयत्न आहे. तर आर्थिक धोरणानुसार उद्योजकांना जागतिक बाजारपेठ उपलब्ध झाली आहे. पाश्चिमात्य देश ज्याप्रमाणे आपल्या देशात येवून व्यापार करू शकतात, त्याचप्रमाणे आपल्या देशातील उद्योजक दुसऱ्या देशात जावून व्यापार करू शकतात. ही नाण्याची दूसरी बाजू आपण लक्षात घेतली पाहिजे. व्यापाराची ही समान संधी इतरांप्रमाणे आपणासही उपलब्ध आहे. आर्थिक परिस्थितीमुळे पाश्चात्य देश कदाचित या संधीचा ६० टक्के लाभ घेतील तर आम्हीही ४० टक्के फायदा निश्चितपणे घेवू शकतो व आपली आर्थिक परिस्थिती सुधारू शकतो. सकारात्मक दृष्टिकोनाची आणि त्या दृष्टीने प्रयत्न करण्याची मात्र आवश्यकता आहे. आर्थिक परिस्थितीमुळे पाश्चिमात्य सहजपणे जे काम करतील ते काम करण्यास तुलनात्मक दृष्ट्या आम्हाला जास्त कष्ट करावे लागतील एवढाचा काय तो फरक आहे. परंतु कष्टाला आम्ही कधीच घाबरलो नाही आम्ही गरीब आहोत ? आम्ही कसा विकास करून शकणार ? आम्ही हे करूच शकणार नाही या व यासारख्या विचारांचा आपण त्याग करणे आवश्यक आहे. आम्ही अमृताचे पुत्र आहोत. आम्ही मनात आणले तर आर्थिक विकास सहजपणे घडवून आणू शकतो हे जगा[...] दाखविण्याची वेळ आली आहे. हा दुर्दम्य आत्मविश्वा[...] समाजमनात निर्माण करणे ही काळाची गरज आहे. [...] ओळखून आम्ही शिक्षकांनी कामास लागले पाहिजे.

अशा प्रकारे मौद्रिक धोरण देशात उत्साहवर्ध[...] वातावरण निर्माण करू शकते. मौद्रिक धोरण म्हणून[...] काळजीपुर्वक निर्धारित करणे आवश्यक आहे. या दृष्टी[...] धोरण निश्चित करतांना पुढील मुद्यांचा सखोल विचा[...] व्हावयास पाहिजे.

१. मुद्रेकरिता असणारी मागणी ही अप्रत्यक्ष असते[...] त्यामुळे पुरवठा निश्चित करतांना याचा नीट अभ्या[...] व्हावयास पाहिजे.

२. मुद्रेची एकूण उपयोगिता स्थिर असते. याचे भा[...] मौद्रिक धोरण ठरवितांना असावयास पाहिजे.

३. मुद्रेच्या पुरवठ्याची लवचिकता ही एकक असते[...] काळा पैसा आणि खोट्या नोटांचे बाजारातील चलन याच[...] निश्चित अंदाज धोरण ठरवितांना घेता आला पाहिजे.

४. विधीग्राह्य मुद्रेचा पुरवठा व तिचा प्रवेग परस्परावलं[...] आहेत याचा विचार धोरण निश्चितीच्या वेळी होणे आवश्य[...] आहे.

५. प्रत्यय मुद्रेचा परिणाम तिच्या प्रवेगावर होता याच[...] कल्पना धोरण निश्चितीच्या वेळी असली पाहिजे.

६. मुद्रेचा पुरवठा वाढल्यामुळे किंमतीची पातळी वाढ[...] त्यामुळे लाभसीमा वाढते व उद्योगपती उत्पादन वाढविता[...] त्यामुळे व्यापारात वाढ होते. या उलट परिणाम मुद्रापुरव[...] कमी केल्यास होतो. याची जाणीव मौद्रीक धोर[...] निश्चितीच्या वेळी असली पाहिजे.

७. विधीग्राहय मुद्रेत परिवर्तन झाल्यास प्रत्यय मुद्रे[...] त्याचप्रमाणात परिवर्तन होईल असे नाही. हे मौद्रिक धोर[...] निश्चित करतांना लक्षात घ्यावयास पाहिजे.

८. चलनातील मुद्रेच्या पुरवठयाचे परिपूर्ण मापन कर[...] कठीण आहे, कारण खाजगी कोषातील संचित मुद्रेचे परिमा[...] अंदाजावरूनच ठरवावे लागते. बिनाहिशोबी मुद्रा किती[...] प्रमाणात चलनात आहे याचा अंदाज करणे कठीण आहे[...]



Scanned by CamScanner

कोणत्यावेळी किती मुद्रा चलनात आहे याचे मोजमाप जवळपास अशक्य आहे. मुद्रा प्रचलनाचा प्रवेश निश्चितपणे मोजता येणे शक्य नाही असे असले तरीही मौद्रिक धोरण ठरवितांना वस्तुस्थितीशी जवळिक साधणारा अंदाज घेणे आवश्यक आहे.

९. किंमत पातळी ही सरासरी किंमत असल्यामुळे प्रत्यक्ष परिस्थितीची यथार्थ कल्पना येत नाही. यामुळे मुद्रेच्या मूल्याचाही निश्चित अंदाज घेता येत नाही. मौद्रिक धोरण ठरवितांना याचाही विचार आवश्यक आहे.

१०. मागणीतील आकस्मिक बदल, राजकीय अशांतता सरकारची वित्त नीती, विदेश बाजारपेठेतील उच्चावचने या सारख्या अमौद्रिक घटनांचा किंमत पातळीवर परिणाम होत असतो. याची जाणीव मौद्रिक धोरण निश्चितीच्यावेळी असावयास पाहिजे.

११. मौद्रिक धोरण ठरवितांना मुद्रेच्यापुरवठयाबरोबरच मुद्रेच्या मागणीचाही विचार करणे अनिवार्य आहे. धोरण निश्चितीपूर्वी यांचा सखोल अभ्यास आवश्यक ठरतो.

१२. किमतींच्या पातळीचा सुद्धा मुद्रेच्या पुरवठ्यावर परिणाम होतो हे धोरण निश्चितीच्या वेळी विचारात घेणे आवश्यक आहे.

१३. अल्पकाळात मुद्रामूल्य कसे निश्चित होते. याचा विचार मौद्रिक धोरण ठरवितांना करावयास पाहिजे कारण व्यक्तीच्या दृष्टीने अल्पकाळ महत्वाचा असतो.

१४. मुद्रेच्या मागणी पुरवठ्याबरोबरच संचयात असलेल्या मुद्रेचा देखील समावेश मौद्रिक धोरण निश्चित करतांना करावयास पाहिजे.

१५. विशिष्ट काळातील मौद्रिक देवघेव ही त्याच काळातील वस्तू व सेवांच्या व्यवहाराबरोबर असू शकत नाही. कारण आजकाल बहुतांश व्यवहार हे प्रत्ययावर आधारलेले आहेत. याचाही विचार मौद्रिक धोरण निश्चित करतांना करावयास हवा.

१६. मुद्रेची मागणी ही विनिमयासोबतच मूल्य संग्रहाकरिता होत असते. याचा विचार मौद्रिक धोरण निश्चित करतांना व्हावयास पाहिजे.

१७. मुद्रेचा पुरवठा स्थिर किंमतीची पातळी वाढलेली दिसून येते तर मंदीच्या काळात ती घसरलेली दिसून येते. असे कां ? याचाही विचार मौद्रिक धोरण निश्चितीच्या वेळी व्हावयास पाहिजे.

१८. अपूर्ण रोजगारीच्या परिस्थितीत मौद्रिक धोरण कसे असावे याचा विचार अग्रक्रमाने करणे महत्वाचे आहे कारण प्रत्यक्षात पूर्ण रोजगारीची आदर्श परिस्थिती अभावानेच आढळून येते.

१९. प्रत्येक वेळी मुद्रा पुरवठ्यातील बदलामुळे किंमतीच्या पातळीत बदल झाला असे समजणे योग्य ठरत नाही. १९२० मध्ये जर्मनीत किंमत वाढल्यामुळे मुद्रा परिमाणात वाढ करावी लागली. याउलट १९२९च्या जागतिक मंदिच्या काळात किंमत पातळी बरीच घसरली होती. या घटनेचा मुद्रापुरवठ्यातील बदलाशी काहीही संबंध नव्हता. मौद्रिक धोरण निश्चितीच्या वेळी याचाही विचार व्हावयास पाहिजे.

२०. वस्तु विनिमय पद्धती पूर्णत: संपलेली नाही. याची जाणीव मौद्रिक धोरण निश्चित करतांना आवश्यक आहे.

२१. विदेशी व्यापाराचा किंमत पातळीवर प्रभाव पडतो याचे भान मौद्रिक धोरण निश्चितीच्या वेळीअसणे आवश्यक आहे.

२२. आंतरराष्ट्रीय मुद्रा व तसेच युरोचलन यांनाही मौद्रिक धोरण निश्चितीचया वेळी उचित स्थान द्यावयास हवे.

यावरून हे स्पष्ट होते की, मौद्रिक धोरण ठरवितांना अनेकविध बाबींचे अवधान ठेवावे लागते. मौद्रिक धोरण ही एक प्रकारची कसरत आहे. या पार्श्वभूमीवर वर्तमान मौद्रिक धोरणाची उपलब्धी पाहता भारतात योग्य दिशेने वर्तमान मौद्रिक धोरणाची वाटचाल सुरू आहे हा निष्कर्ष निघतो.

रिझर्व्ह बँकेला नेहमीच आर्थिक विकासाला चालना देणे भाववाढीवर नियंत्रण ठेवणे या दोन परस्पर विरोधी जबाबदाऱ्यांमध्ये उत्तम समतोल राखावा लागतो. मौद्रिक धोरणाचा हा प्रमुख उद्देश आहे. हा समतोल राखतांना परिस्थितीनुसार मौद्रिक धोरणात बदल घडवून आणले



Scanned by CamScanner

प्रत्यक्ष व रोख्यातील विदेशी गुंतवणूक

| वर्ष | विदेशी प्रत्यक्ष गुंतवणूक (कोटी डॉलर्स) | रोख्यातील विदेशी गुंतवणूक (कोटी डॉलर्स) |
|---|---|---|
| ९०-९१ | ९७ | ६ |
| ९२ | १२९ | ४ |
| ९३ | ३१५ | २४४ |
| ९४ | ५८६ | ३५६७ |
| ९५ | १३१४ | ३८२४ |
| ९६ | २१४४ | २७४८ |
| ९७ | २८२ | ३३१२ |
| ९८ | ३५५७ | १८२८ |
| ९९ | २४६२ | ६१ |
| २००० | २१५५ | ३०२६ |

स्त्रोत : रिझर्व्ह बँकेचे वार्षिक उलाढाल

१९९८-९९ या काळात रोखे विकून गुंतवणूक काढून घेण्याचे प्रमाण जास्त होते. मात्र २००० साली रोख्यातील गुंतवणूक १९९८ च्या पूर्वीची स्थिती दर्शविते. गुंतवणूकीतील हा चढ उतार चिंतनीय वाटतो. याकरिता राजकीय परिस्थितीची अस्थिरता, अनिश्चितता तर नाही याचा विचार होणे आवश्यक आहे.

४:३ भारतात विदेशी गुंतवणूक कशी करता येईल यावर प्रकाश टाकण्यासाठी ८ सप्टेंबर २००० च्या अधिसूचनेचा विचार करू. या अधिसुचनेनुसार तंबाखू, सिगरेट, दारू, गुंगीची द्रव्ये, आण्विक पदार्थ, शस्त्रे व दारू गोळा यांचे निर्माणक उद्योग वगळता खास आर्थिक विभागात (झोन) १०० टक्यापर्यंत विदेशी प्रत्यक्ष गुंतवणूक करता येईल. तसेच दुरसंचार उद्योगात १०० टक्यापर्यंत विदेशी गूंतवणुक करता येईल. पाच वर्षाच्या कालावधीत २६ टक्या इतका भारतीयांना त्यात वाटा मिळायला हवा. निर्यातीच्या ८ टक्के स्वदेशातील विक्रीच्या ५ टक्के एवढे स्वामीत्वधन विदेशी संलग्न कंपन्यांना आपल्या मूळ कंपन्यांकडे पाठविता येईल. यात राष्ट्रीय सुरक्षेला बाधा पोहचेल असे कुठलेही कारण दिसून येत नाही.

४:४ १९९१ पूर्वी विदेशी गुंतवणूकीवर ५ प्रकारचे अडथळे होते.

१. उत्पादनात देशातील साधनेत वापरण्याची अट,

२. निर्यात करण्याची अनिवार्यता

३. विदेशी गुंतवणूकीच्या प्रमाणांवर मर्यादा व देशवासीयांचा भांडवल गुंतवणूकीत भाग.

४. नव तंत्रज्ञानासाठी गुंतवणूक व त्याचे हस्तांतरण

५. विदेशी चलन व्यवहारावर, विशेषत: नफा विदेशी चलनातून आपल्या देशात नेण्यावर नियंत्रणे.

ही अडथळे दूर व्हावीत व विदेशी गुंतवणूक खुलेपणाने व्हावी हा जागतिकीकरणाचा गॅट १९९४ चा एक उद्देश आहे. हे उद्देश साध्य करण्यासाठी भारत सरकार पायरी-पायरीने प्रयत्न करीत आहे.

उद्योगानुसार भारतात प्रत्यक्ष विदेशी गुंतवणूक
**१९९२-२००० (कोटी डॉलर्स)**

| | प्रकार | रकम | टक्के |
|---|---|---|---|
| १. | अभियांत्रिकी | २५५ | २२ |
| २. | इलेक्ट्रॉनिक व विद्युत सामुग्री | १४८ | १३ |
| ३. | रासायनिक संलग्न उत्पादन | १४१ | १२ |
| ४. | वित्त | ९८ | ९ |
| ५. | सेवाक्षेत्र | १०४ | ९ |
| ६. | संगणक | ४७ | ४ |
| ७. | औषधी | २८ | २ |
| ८. | अन्न व दुग्ध पदार्थ | ७१ | ६ |
| ९. | घरगुती वापर यंत्र | १४ | १ |
| १०. | अन्य | २४६ | २२ |
| | | ११५२ | १०० |

**निष्कर्ष:** उद्योगानुसार, अभियांत्रिकी, इलेक्ट्रानिक्स व विद्युत व रासायनिक उद्योगातील विदेशी गुंतवणूकीचे प्रमाण जास्त आहे.

यात तपशिला अभावी ३८३ कोटी डॉलर्सचा अनिवासी भारतीयांच्या प्रत्यक्ष व भारतीय कंपन्यांतल्या भाग भांडवलांचा समावेश झालेला नाही. विदेशी गुंतवणूकीस मान्यता दिलेल्या रकमेचा २१.५ टक्के एवढीच प्रत्यक्ष गुंतवणूक झाली. १९९२ ते १९९८ या काळात प्रत्यक्ष विदेशी गुंतवणूकीस ५४७९ कोटी डॉलर्स एवढी मान्यता दिली होती पण प्रत्यक्षात ११८१ कोटी डॉलर्स एवढीच विदेशी गुंतवणुक झाली.



Scanned by CamScanner

एकूण भांडवल निर्मितीत प्रत्यक्ष विदेशी गुंतवणूकीचे प्रमाण

| | १९८४-८९ | १९९० ते ९४ |
|---|---|---|
| ब्रिटन | ११.५ | १२.२ |
| अमेरिका | ५.८ | ४.१ |
| सर्व प्रगत देश | ३.९ | ३.६ |
| सिंगापूर | २८.३ | २८.४ |
| मलेशिया | ८.८ | २२.४ |
| चीन | १.८ | ११.६ (१९९४-२४.५) |
| भारत | ०.२ | ०.५ |
| एकूण विकसनशील देश | २.८ | ५.२ |

**निष्कर्ष** - एकूण भांडवल निर्मितीत विदेशी गुंतवणूकीचे भारतातील प्रमाण अन्य देशांच्या तुलनेत नगण्य आहे.

**संदर्भ** - अजितसिंग व ॲन झम्मिट (१९९८)

अशाप्रकारे मुद्रेचा प्रवास आंतरराष्ट्रीय चलनापर्यंत येवून ठेपला आहे. देशाच्या आर्थिक विकासाकरिता विदेशी गुंतवणुक मोलाचे योगदान देवू शकते. भांडवल गुंतवणुकीत वर्तमान परिस्थितीत विदेशी गुंतवणूकीचे प्रमाण नगण्य आहे. ते वाढविण्याचे प्रयत्न वर्तमान मौद्रिक व आर्थिक धोरणातून होत असलेले दिसून येतात. केवळ मौद्रिक धोरणाने अपेक्षित आर्थिक विकास शक्य नाही. त्याला राजकोषीय व आर्थिक धोरणांची योग्य साथ मिळाली तरच आर्थिक विकास शक्य आहे. केवळ एकतर्फी प्रयत्नांनी विकास साध्य होणार नाही. देशातील जनतेचे, पुढाऱ्यांचे सहकार्य व सामंजस्य आर्थिक विकासाकरिता अत्यंत आवश्यक आहे. केवळ एकाच घटकाचे प्रयत्न पुरेसे नाही.

**अपेक्षा:**

एक एकट्याने केलेल्या प्रयत्नांनी आर्थिक विकास होण्यास बराच कालावधी लागतो हे सर्व जाणतातच. असे जर आहे तर आम्ही संघटीत व्हावयास पाहिजे. संघटीत होवून उद्योगाची निर्मिती केली पाहिजे. स्वत:च्या कंपन्या स्थापन केल्या पाहिजे. देशी कंपन्यात वाढ झाली पाहिजे. जीवनाचे प्रत्येक क्षेत्र या कंपन्यांनी व्यापले पाहिजे. समाजाने देशी कंपन्यात आपला पैसा गुंतवावा असे आवाहन केले पाहिजे. वैयक्तिक स्वार्थ बाजूला ठेवून संचालकांनी देश विकासार्थ परस्पर कलह टाळून एकोप्याने कंपनीला प्रगतीपथावर नेले पाहिजे. माझी खात्री आहे आम्ही हे सर्व करू शकतो. आवश्यकता आहे ती फक्त तीव्र इच्छा शक्तीची.

जगात आपला देश अग्रक्रमावर असावा ही प्रत्येक देशवासीयांची आंतरिक इच्छा असते. ज्याप्रमाणे समाजात प्रतिष्ठा प्राप्त करण्याकरिता वावरावे लागते, आपले कौशल्य प्रगत करावे लागते. मग मान मिळतो. त्याप्रमाणे जगात मान मिळविण्याची संधी जागतिकीकरण व उदारीकरण यामुळे आपणास या दशकात प्राप्त झाली आहे. या संधीचं सोनं किंवा माती करणं आपल्या हाती आहे. समस्येला संधी बनविण्याची आपली परंपरा आहे ती आपण जपली पाहिजे. केवळ दुष्पपरिणामांची चिंता करण्यापेक्षा यातून चांगले काय साधता येईल याचे चिंतन करणे आवश्यक आहे.

आपण सर्व शिक्षक या दृष्टीने आपले सामाजिक योगदान देवू शकतो. चांगली फळे येण्यास जास्त कालावधी लागतो. आपणास धीर धरून प्रतिक्षा करणे जमले पाहिजे, असे म्हणतात. अंधार दाटे भोवती, हाती असे इवला दिवा. सारे दिवे पेटावया धीर थोडासा हवा. इथे हे लक्षात ठेवणे आवश्यक आहे, की कोणताही दिवा आपोआप पेटंत नाही, तो पेटवावा लागतो. परंतु पेटलेला एक दिवा असंख्य व अगणित दिवे पेटविण्याचे सामर्थ अंगी बाळगुन असतो. विचार करा. आपण असा दिवा बनू शकतो कां !

**संदर्भ**

ज्ञी. एन. झामरे (१९९९):आंतरराष्ट्रीय अर्थशास्त्र, पी. एस.जैन (१९८९): मौद्रिक नीती, पी. सुब्बाराव (२००२): इंटरनॅशनल बिझीनेस, डॉ. भ. ग. बापट (१९९६): आंतरराष्ट्रीय पैसा, डॉ. गि. सो. कल्याणकर (१९९८): भारताचा परकीय व्यापार व व्यापार विषयक धोरणे, एम. सी. वैश्य (१९९८): मौद्रिक अर्थशास्त्र, डॉ. के. जी. पठाण (१९९५): आंतरराष्ट्रीय व्यापार आणि भारतीय कृषी व्यवस्था-संरक्षण नीतीपासून ते उदारीकरणापर्यंत वाटचाल, अहवाल (विविध): रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया.



Scanned by CamScanner



# वाणिज्य शिक्षणातील परिवर्तनाची आवश्यकता

प्रा. रमेश हिमते
सी.पी. अॅन्ड बेरार
महाविद्यालय, नागपूर

मानवी जीवनातील प्रत्येक क्षेत्रात वाणिज्याचे अनन्य साधारण महत्व सिद्ध झाले आहे. सकाळी उठल्यानंतर लागणाऱ्या पेस्ट पासून तर रात्री झोपतांना लागणाऱ्या गुड नाईट पर्यंतच्या सर्व गरजा पूर्ण करण्याचे कार्य वाणिज्य क्षेत्रांतर्गत येते. मानवाच्या प्रगतीत वाणिज्य क्षेत्राचा संबंध नवीन नाही तर तो अति प्राचीन काळापासून आहे.

अगदी अलिकडच्या काळात दक्षिण महासागरात भारत व श्रीलंकेच्या दरम्यान एक ३० कि.मी. लांबीचा पूल सापडलेला आहे. या पुलाचा उल्लेख रामायणात आढळतो. म्हणजे त्या काळात इतका मोठा पूल बांधण्याचे ज्ञान व त्यासाठी लागणाऱ्या सर्व प्रकारच्या व्यवस्था अस्तित्वात होत्या. महाभारतातील एका कथानकात भगवान श्रीकृष्णाच्या कापलेल्या करंगळीला द्रौपदीने स्वतःचे महावस्त्र फाडून त्याची चिंधी बांधल्याचा उल्लेख आहे. याचा अर्थ त्यावेळी महावस्त्र होते व महावस्त्र निर्माण करणारे उद्योग देखील होते. महाभारताच्या युद्धात अश्वत्थामाने ब्रम्हास्त्राचा उपयोग केल्याचे महाभारत या ग्रंथात लिहीले आहे. महाभारत युद्ध ज्या ठिकाणी झाले होते. त्या कुरूक्षेत्रातील मातीचे नुकतेच परीक्षण करण्यात आले व त्यात अणुबॉम्ब मध्ये वापरण्यात येणाऱ्या युऱ्यानियमचे कण आढळून आलेत. रामायण या ग्रंथात श्रीलंकेतील युद्धानंतर प्रभू रामचंद्र विमनातून अयोध्येला परत आलेत असा उल्लेख आहे. द्वारकानगरीचे अवशेष समुद्रात प्राप्त होत आहेत. या सर्व विवेचनांवरून आपणास असा निष्कर्ष कांढता येवू शकतो की तत्कालीन ग्रंथात दिलेली कथानके आज पुराव्यानिशी सिद्ध होत आहेत. तत्कालीन मानवाने जीवनाचे अति उच्च शिखर गाठले होते. विज्ञान, उद्योग, व्यापार, वाहतूक या सर्व क्षेत्रात प्रगती केली होती, म्हणजेच वाणिज्य प्रभाव त्या काळात देखील होता हे वेगळे सांगण्याची आवश्यकता नाही.

सद्यस्थितीत काही लोक जागतिकीकरण व उदारीकरणाचा उदो-उदो करीत आहेत तर काही स्वतःच्या अस्तित्वाची भिती बाळगुण आहेत. वास्तविक पाहता ही संकल्पना देखील जुनीच आहे. काबुली घोडे व सुका मेवा संपूर्ण जगात प्रसिद्ध होता. भारतातील हस्तकला वस्तुंना विदेशात मागणी होती. १७ व्या शतकात इंग्रज भारतात व्यापार करण्याकरिता आले होते. त्याकाळी देश, देशातील व्यापारी व जनतेचे हित लक्षात घेवून व्यापार करण्याला संबंधित देशातील राज्यसत्ता परवानगी देत होती.

भारतात सोन्याचा धूर निघता होता असे इतिहास सांगतो. भारत व्यापार क्षेत्रात अत्यंत प्रगत होता. सातत्याने होणारी परकीय आक्रमणे व इंग्रजांनी केलेल्या आर्थिक निःसारणामुळे भारताची अर्थव्यवस्था कोलमडली. राजकीय व आर्थिक गुलामगिरीसोबत वैचारिक मरगळ आली.

सुप्रसिद्ध राजनितीज्ञ व अर्थतज्ञ कौटिल्याचा देश फार फार काळ मरगळलेल्या अवस्थेत राहणे शक्य नव्हते. स्वातंत्र्य प्राप्ती नंतर नवीन जीवन मूल्ये स्वीकारून आम्ही सर्व क्षेत्रात प्रगती करण्यास सुरूवात केली. जगातील सर्व क्षेत्रातील आव्हाने व समिकरणे आम्हाला पचतील या पद्धतीने आम्ही स्वीकारलीत, आर्थिक धोरणे राबविलीत व स्वतःचे अस्तित्व जागतिक अर्थ-व्यवस्थेत निर्माण केले.



Scanned by CamScanner

अनेक भारतीय आज विदेशात व्यापार व उद्योग जगतातील सम्राट म्हणून वावरत आहेत. भारताचा उद्योग व व्यापार क्षेत्रातील प्रभाव जागतिक अर्थकारण परिणाम करणार आहे.या सर्व पार्श्वभूमीवर आमच्या वाणिज्य शिक्षणात परिवर्तन करण्याची आवश्यकता आहे.

वाणिज्य शिक्षण-आवश्यकता-स्वरूप-व्याप्ती

केवळ स्वत:च्या गरजा भागविण्यासाठी उत्पादन हेच आर्थिक जीवन ही संकल्पना बदलून जागतिक गरजा भागविण्यासाठी उत्पादन ही नवीन संकल्पना अस्तित्वात आली आहे. मानवाने बुद्धी कौशल्यतेचा उपयोग करून जीवनाच्या सर्व क्षेत्रात नेत्रदीपक अशी प्रगती केली. राजकीय, सामाजिक, शैक्षणिक, धार्मिक इत्यादी सर्व क्षेत्रात नवीन व्यवस्था, आर्थिक प्रवाह निर्माण झाले. प्रत्येक क्षेत्राचे व्यापारीकरण सुरू झाले. विविध क्षेत्रातील संस्थांना हिशोब देयता व पारदर्शकत्व निर्माण करण्यासाठी वाणिज्याचा आधार घेणे आवश्यक आहे. उद्योग, सेवा उद्योग व व्यापार या सोबतच वाणिज्याची आवश्यकता मानवी जीवनातील इतर क्षेत्रात देखील निर्माण झाली व वाणिज्याच्या सीमा असिमीतपणे विस्तारल्यात.

वाणिज्य क्षेत्रापुढील काही नवीन आव्हाने

१. उद्योगाच्या संकल्पना बदललेल्या आहेत. पूर्वी केवळ भांडवलदाराचे हित लक्षात घेवून उद्योग चालविण्यात येत असत, परंतु आता श्रमिक, ग्राहक यांच्या हिताचा देखील विचार करण्यात येत आहे. परिणामत: औद्योगिक समीकरणे व व्यवस्था बदलत आहे., २. सेवा उद्योगात नव-नवीन साधनाचा व प्रसार माध्यमांचा उपयोग सुरू झाला आहे. नवीन तंत्रज्ञान उपलब्ध होत आहे., संगणक, इंटरनेट, ई-कॉमर्स या सारखी अत्यंत प्रगत साधने आपला प्रभाव पाडीत आहेत., ३. व्यापार क्षेत्र विस्तारीत झाले आहे. जाहिरातीचे नवीन तंत्र आले आहे. अलपकाळात जास्त नफा कमविण्यापेक्षा दीर्घकाळ व्यापार करून कमी नफा स्वीकारून व्यापार पेढ्यांचे अस्तित्व टिकविण्याचे लक्ष ठेवण्यात येवू लागले आहे. ४. सार्वजनिक क्षेत्रात व्यापार करणाऱ्या संस्थांमध्ये स्पर्धा निर्माण झाली आहे. स्पर्धेच्या परिस्थितीत स्वत:चे अस्तित्व टिकविण्यासाठी जनहिताच्या कार्यांना उदा. शैक्षणिक संस्था, वैद्यकीय सेवा, ग्राहक मेळावे यांना महत्व देण्यात येवू लागले आहे., ५. उद्योग आणि व्यापार करणाऱ्या संस्था सोबतच समाजाच्या हितासाठी कार्यरत असणाऱ्या संस्थांना देखील व्यवस्थापन, हिशोब लेखन, नफ्याचे विनियोजन इत्यादी विविध वाणिज्य क्षेत्राची मदत आवश्यक झाली आहे., ६. व्यक्तिगत सेवा करणाऱ्या डॉक्टरी, वकील, इंजिनियर या वर्गातील व्यक्तींना देखील त्यांच्या व्यवसायात मदतीसाठी म्हणून वाणिज्य विषयक दृष्टिकोन बाळगुण वाणिज्याची मदत घेणे आवश्यक झाली आहे., ७. कर-निर्धारणाच्या नूतन पद्धती व विविध कायदे यामुळे सर्वच क्षेत्रामध्ये वाणिज्य विषयक व आर्थिक सल्ला देणाऱ्यांचा वर्ग निर्माण करण्याची गरज भासू लागली आहे.

वाणिज्य क्षेत्रातील या विविध आव्हानांना अनुसरून अध्ययन व अध्यापनांच्या नवीन संकल्पना तंत्र व पद्धती अस्तित्वात येत आहेत. नवी आव्हाने पेलण्यासाठी सक्षम असा विद्यार्थी वर्ग निर्माण करण्याची जबाबदारी, सरकार, शिक्षण तज्ञ, शिक्षक व समाजावार आहे व त्या दृष्टिकोनातून या विद्या शाखेतील शिक्षणात परिवर्तन आवश्यक आहे.

वाणिज्य शिक्षणातील अपेक्षित बदल

**१. शैक्षणिक वातावरण निर्मिती:-** वाणिज्य शिक्षणात विद्यार्थ्यांची रूची वाढविणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांची आकलन शक्ती वाढविण्यासाठी दृष्य-श्राव्य साधनांचा उपयोग करणे, विविध संस्थांना भेट देणे, भेट, वृत्तांत तयार करणे, प्रात्याक्षिक परीक्षांचे आयोजन करणे, इत्यादी उपाय योजना करावी.

**२. प्रात्यक्षिक ज्ञान देण्यात यावे:-** परंपरागत पद्धती ऐवजी प्रात्यक्षिक ज्ञान देण्याची व्यवस्था असावी. निरनिराळ्या व्यापारी संस्थांनी व्यापार, व्यवस्थापन, लेखाकर्म या विषयीचे ज्ञान उपलब्ध करून द्यावे. संस्थेत चालणाऱ्या कामाचा परिचय विद्यार्थ्यांना करून द्यावा, त्या कामात त्यांचा सहभाग निर्माण करण्यात यावा, खाते लिहिणे, अर्ज लिहिणे, पत्रव्यवहार हाताळणे, विविध विभागाचे कामकाज सांभाळणे, कर्ज घेणे व देण्यासंबंधीच्या विविध प्रक्रियांची



Scanned by CamScanner

माहिती करून घेणे, कर्मचाऱ्यांचे पगार पत्र तयार करणे, जाहिरात तयार करणे, संगणक व त्याचे ज्ञान प्राप्त करणे, वाहतूक व्यवस्था हाताळणे इत्यादी विविध कार्यात त्यांना सहभागी करून घ्यावे व त्यावर आधारित परीक्षांचे आयोजन करण्यात यावे.

**३. विशेषीकरण :** वाणिज्य शाखेतील अभ्यासक्रमात विशेषीकरण साधणे आवश्यक आहे. विज्ञान व कला शाखेतील अभ्यासक्रमात विशेषीकरण आढळते त्यामुळेच एका विशिष्ट विषयात पारंगत होतो. वाणिज्य शाखेत तसे नाही. त्यामुळे Jack of all but master of none अशी त्याची अवस्था होते. वाणिज्य शाखेतील विद्यार्थ्याला लेखाकर्म, विमाशास्त्र, परिव्यय-लेखांकन, व्यवस्थापन, अधिकोषण, वित्तीय प्रबंधन या सारख्या कोणत्याही एका विषयाचे परिपूर्ण ज्ञान देवून पारंगत ही पदवी देण्यात यावी.

**४. व्यापार व उद्योगातील विशेष तंत्र आकलनाची संधी द्यावी:-** व्यापार व उद्योग जगात आधुनिक तंत्रज्ञानाचा अविष्कार झालेला आहे. यंत्र व तंत्राच्या वापरामुळे मानव शक्ती व कार्यकुशलता वाढली आहे. आमचा विद्यार्थी या ज्ञानापासून आजही वंचित आहे. त्याला ज्ञानाचे हे दालन मोकळे करून देणे आवश्यक आहे. शालेय किंवा महाविद्यालयीन शिक्षण घेत असतांनाचा संगणक, इंटरनेट, ई कॉमर्स या तंत्रज्ञानाची माहिती त्याला देण्यात यावी. त्याचप्रमाणे प्राप्त ज्ञानाचा व्यवहारात उपयोग करण्याकरिता त्याला संधी देण्यात यावी. व्यापार-उद्योग करणाऱ्या संस्थांमध्ये अशा प्रशिक्षणाची व्यवस्था होवू शकल्यास हे सहज शक्य होईल.

**५. वाणिज्य विषयक कायद्याचे ज्ञान:-** वाणिज्याचे शिक्षण देण्यामागील उद्देश केवळ नोकरी मिळविणे हा नसून प्रत्यक्ष उद्योग व व्यापारात स्वत:चे अस्तित्व निर्माण करणे हा होय. आमच्या विद्यार्थ्याला देशातील विविध वाणिज्य विषयक कायद्याचे ज्ञान असले पाहिजे. करार अधिनियम, वस्तुविक्री अधिनियम, परक्राम्यविलेख कायदा, कंपनी कायदा, भागीदारी अधिनियम, श्रम कायदा, औद्योगिक अधिनियम इत्यादी कायद्यांच्या ज्ञानामुळे नोकरी किंवा स्वयंरोजगार करता येणाऱ्या अडचणीवर तो मात करू शकेल.

**६. वाणिज्याशी संबंधित विविध प्रलेखांचे ज्ञान:-** वाणिज्य क्षेत्रात व्यवसाय व उद्योगातील कार्यानुसार विविध प्रकारचे प्रलेख हाताळावे लागतात. विद्यार्थ्यांला हे सर्व प्रलेख अभ्यासता आले पाहिजेत. त्याचा उपयोग कोठे व कसा करावा याचे ज्ञान प्राप्त झाले पाहिजे. त्यातील अनेक प्रलेख त्याच्याच जीवनात उपयोगी पडणार असतात. उदा. वित्तीय संस्थेकडून ऋण घेतांना तयार करण्यात येणारे दस्तऐवज, विमा पॉलीसी, माल वाहतुकीसंबंधात तयार करण्यात येणारे प्रलेख इत्यादी या ज्ञानामुळे तो जेंव्हा प्रत्यक्ष कार्य करेल त्यावेळी त्याला जाणवणाऱ्या अडचणी कमी असतील.

**७. व्यावसायिक अर्थशास्त्राचे ज्ञान-** व्यावसायिक अर्थशास्त्र ही अशी एक नवीन उदयास आलेली विद्याशाखा आहे की ज्यात व्यवसाय व अर्थशास्त्राचा समन्वय साधण्यात आला आहे. उद्योग व व्यापार क्षेत्रात असणाऱ्या व्यक्तींना विविध समस्यांना तोंड द्यावे लागते. या समस्या सोडविण्यासाठी आर्थिक सिद्धांत व तत्वांचा आधार घेतल्यास या समस्यावर मात करणे सहज शक्य होते. काही विद्यापीठांनी हा अभ्यासक्रम स्नातक पातळीवर सुरू केला आहे. तेंव्हा वाणिज्य विषयाच्या अभ्यासक्रमात + २ स्तरावर हा विषय असल्यास वाणिज्य व अर्थशास्त्राचा संबंध समजून येईल व उद्योग व्यापार क्षेत्रात कार्यक्षम असा वर्ग निर्माण करणे शक्य होईल.

वाणिज्य विषयात कार्य करण्यासाठी सक्षम असा वर्ग निर्माण करण्याची जबाबदारी देशातील सरकार, शिक्षणतज्ञ, शिक्षक, पालक व शिक्षण प्रेमी इत्यादी घटकांची आहे. या क्षेत्रात काम करणाऱ्या व्यक्तींचे तीन वर्गात वर्गीकरण केल्यास धोरण ठरविणारा, धोरणानुसार काम करवून घेणारा व नियंत्रण ठेवणारा, प्रत्यक्ष काम करणाराअसे तीन वर्ग पाडता येतील. कामाच्या स्वरूपानुसार कार्यक्रम वर्ग निर्माण करण्यासाठी अभ्यासक्रमाची फेररचना करावी लागेल. या अभ्यासक्रमात प्रत्यक्ष कार्यानुभावला महत्व द्यावे लागेल. विद्यार्थ्यांची



Scanned by CamScanner

शिक्षणातील रूची, क्षमता व गुणवत्ता लक्षात घेवून त्याचे या क्षेत्रातील स्थान ठरवावे लागेल. या कार्यासाठी उद्योजक व व्यापारी वर्गाचे सहकार्य मिळणे आवश्यक आहे. त्यांनीआपल्या प्रतिष्ठानात उद्योगात प्रशिक्षण देण्याची आवश्यकता आहे. पालकवर्गाने या विद्या शाखेविषयी आपला दृष्टिकोन बदलवून पाल्यांना योग्य ते मार्गदर्शन करावे. शिक्षकांनी केवळ परंपरागत पद्धतीने न शिकविता प्रत्यक्ष व्यवहार ज्ञान विद्यार्थ्यापर्यंत पोहचावे. परीक्षा पद्धतीत बदल करून प्रात्याक्षिक ज्ञानावर आधारित प्रश्न विचारण्यात यावे. या सर्व प्रयत्नांना यश येणारच हे लक्षात ठेवून आपण सर्वांनी काम करणे आवश्यक आहे. असे झाल्यास एक सक्षम असा विद्यार्थी वाणिज्य शाखेतून निश्चितच तयार होईल.

Scanned by CamScanner



# चंद्रपूर जिल्ह्यातील औद्योगिकीकरण व पर्यावरण

प्रा. अशोक भांडेकर
श्री शिवाजी महाविद्यालय,
राजूरा जि. चंद्रपूर.

## प्रास्ताविक

प्राचीन ऐतिहासिक संस्कृतीने नटलेला निसर्ग निर्मित खनिज संपत्ती वनसंपदेची देण असलेला पूर्वीचा लोकपूर तर कधी काळी इंद्रपूर व त्यानंतरचा चांदा आणि १९६४ पासून अस्तित्वात असलेला आजचा चंद्रपूर जिल्हा विदर्भातील नव्हे तर महाराष्ट्राचा आणि संपूर्ण भारतात औद्योगिक दृष्ट्या अत्यंत महत्वाचा जिल्हा म्हणून प्रसिद्ध आहे.

## भौगोलिक स्थिती

महाराष्ट्राच्या पूर्वेस उत्तर रेखा अक्षांशास १८.४ ते २०.५ व पूर्व रेखांक्षांस ७८.५ ते ८०.६ वर स्थापित आहे. भौगोलिक क्षेत्रफळ १०६९५ चौ. कि.मी. असून शहरी १०६२६.३ तर ग्रामीण ४९९७ चौ. कि. मी. आहे. सन २००२ च्या जनगणनेनुसार जिल्ह्याची लोकसंख्या २०,७७,९०९ असून पुरूष १०,५५,८७५ तर महिला १०,१८,०३४ आहे. नागरी लोकसंख्येचे प्रमाण ग्रामीण लोकसंख्येपेक्षा कमी आहे. नागरी लोकसंख्या ६,७२,६७७ तर ग्रामीण लोकसंख्या १४,०५,२२३ आहे. साक्षरतेत चंद्रपूर जिलह्याने ७३.०७ टक्के साध्य केले असून यात ८३.१९ टक्के पुरूष तर ६२.५६ टक्के महिलांचा समावेश आहे

## जिल्हयाची सीमारेषा

या जिल्ह्याच्या दक्षिणेस आंध्रप्रदेशची सीमा असून पूर्वेस गडचिरोली जिल्ह्याची सीमा आहे. पश्चिमेस यवतमाळ, वर्धा, तर उत्तरेस नागपूर, भंडारा, गोंदिया जिल्हयाच्या सीमांनी वेढलेला आहे. विपूल प्रमाणात खनिज संपत्तीचे साठे असून यात कोळसा सिमेंट, स्पंज, आयरन, कागद, चीनीमाती, उत्तम सागवाने लाकूड इत्यादी उत्पादक घटक व कच्च्या मालाचे भांडार उपलब्ध आहे. तसेच उद्योग धंद्यामुळे वाहतुकीची व दळणवळणाची सोय उपलब्ध आहे. जिल्ह्यातील राष्ट्रीय महामार्गाची लांबी ५६.०० किलोमीटर राज्य मार्गाची लांबी २०६१.२०० कि.मी. आहे. जिल्हा मार्ग २६७४ कि.मी. चा असून ग्रामीण मार्ग ५१५३ कि.मी. लांब आहे. रेल्वे मार्ग ब्रॉडगेज ३३७ कि. मी. लांबीचे आहे.

## जिल्ह्याचे कृषी उद्योगाचे क्षेत्र

कृषी क्षेत्रात लागवडी योग्य क्षेत्र २००२-०३ वर्षा करिता ५,६७,१०० हेक्टर असून पिका खालील क्षेत्र ३,५०,१०० हेक्टर आहे. जिल्हयातील मुख्य पीक धान असून १,४२,३०० हेक्टर जमीनीखाली धानाची लागवड होते. तर खरीप पीकामधे कापूस ज्वारी, तुर, मुग, उडीद, तीळ, सोयाबिन व इतर कडधान्ये घेतली जातात तर रब्बी पीकाखाली२,१२,१०० हेक्टर जमीन वापरामध्ये असून ४० टक्के लघु उद्योग कृषीवर निर्भर आहे. त्यात २,५८० लोकांना प्रत्यक्ष रोजगार प्राप्त झाला आहे. खाद्य तेल, साबणासाठी लागणारे तेल, विटा निर्मितीसाठी कोंडा, उसाच्या चिकांपासून कागद, हार्डबोर्ड इत्यादी उद्योग सहज सुरू करता येतात.

## औद्योगिक उत्पादनात जंगल व सिंचन क्षेत्राची स्थिती

महाराष्ट्रात एकूण गुणक्षेत्र ६४००० चौ. कि.मी. आहे. राज्याच्या एकूण क्षेत्राफळाच्या २०:८ टक्के आहे. भारतातील एकूण वनक्षेत्राच्या हे प्रमाण ८.७ टक्के आहे. महाराष्ट्रातील वनापैकी ६४ टक्के वने आरक्षित असून आणखी २६ टक्के वने संरक्षित आहे. अशा प्रकारे ८० टक्के वनक्षेत्र खात्याच्या ताब्यात आहे. केवळ १० टक्के क्षेत्रच अवर्गीकृत आहे. पूर्व विभागात चंद्रपूर, गडचिरोली या दोन



Scanned by CamScanner



# चंद्रपूर जिल्ह्यातील औद्योगिकीकरण व पर्यावरण

प्रा. अशोक भांडेकर
श्री शिवाजी महाविद्यालय,
राजूरा जि. चंद्रपूर.

### प्रास्ताविक

प्राचीन ऐतिहासिक संस्कृतीने नटलेला निसर्ग निर्मित खनिज संपत्ती वनसंपदेची देण असलेला पूर्वीचा लोकपूर तर कधी काळी इंद्रपूर व त्यानंतरचा चांदा आणि १९६४ पासून अस्तित्वात असलेला आजचा चंद्रपूर जिल्हा विदर्भातील नव्हे तर महाराष्ट्राचा आणि संपूर्ण भारतात औद्योगिक दृष्टया अत्यंत महत्वाचा जिल्हा म्हणून प्रसिद्ध आहे.

### भौगोलिक स्थिती

महाराष्ट्राच्या पूर्वेस उत्तर रेखा अक्षांशास १८.४ ते २०.५ व पूर्व रेखांक्षांस ७८.५ ते ८०.६ वर स्थापित आहे. भौगोलिक क्षेत्रफळ १०६९५ चौ. कि.मी. असून शहरी १०६२६.३ तर ग्रामीण ४९९७ चौ. कि. मी. आहे. सन २००२ च्या जनगणनेनुसार जिल्ह्याची लोकसंख्या २०,७७,९०९ असून पुरूष १०,५५,८७५ तर महिला १०,१८,०३४ आहे. नागरी लोकसंख्येचे प्रमाण ग्रामीण लोकसंख्येपेक्षा कमी आहे. नागरी लोकसंख्या ६,७२,६७७ तर ग्रामीण लोकसंख्या १४,०५,२२३ आहे. साक्षरतेत चंद्रपूर जिल्ह्याने ७३.०७ टक्के साध्य केले असून यात ८३.१९ टक्के पुरूष तर ६२.५६ टक्के महिलांचा समावेश आहे

### जिल्हयाची सीमारेषा

या जिल्ह्याच्या दक्षिणेस आंध्रप्रदेशची सीमा असून पूर्वेस गडचिरोली जिल्ह्याची सीमा आहे. पश्चिमेस यवतमाळ, वर्धा, तर उत्तरेस नागपूर, भंडारा, गोंदिया जिल्हयाच्या सीमांनी वेढलेला आहे. विपूल प्रमाणात खनिज संपत्तीचे साठे असून यात कोळसा सिमेंट, स्पंज, आयरन, कागद, चीनीमाती, [illegible] लाकूड इत्यादी उत्पादक धटक व कच्च्या मालाचे भांडार उपलब्ध आहे. तसेच उद्योग धंद्यामुळे वाहतुकीची व दळणवळणाची सोय उपलब्ध आहे. जिल्ह्यातील राष्ट्रीय महामार्गाची लांबी ५६.०० किलोमीटर राज्य मार्गाची लांबी २०६१.२०० कि.मी. आहे. जिल्हा मार्ग २६७४ कि.मी. चा असून ग्रामीण मार्ग ५१५३ कि.मी. लांब आहे. रेल्वे मार्ग ब्रॉडगेज ३३७ कि. मी. लाबींचे आहे.

### जिल्ह्याचे कृषी उद्योगाचे क्षेत्र

कृषी क्षेत्रात लागवडी योग्य क्षेत्र २००२-०३ वर्षा करिता ५,६७,१०० हेक्टर असून पिका खालील क्षेत्र ३,५०,१०० हेक्टर आहे. जिल्हयातील मुख्य पीक धान असून १,४२,३०० हेक्टर जमीनीखाली धानाची लागवड होते. तर खरीप पीकामधे कापूस ज्वारी, तुर, मुग, उडीद, तीळ, सोयाबिन व इतर कडधान्ये घेतली जातात तर रब्बी पीकाखाली२,१२,१०० हेक्टर जमीन वापरामध्ये असून ४० टक्के लघु उद्योग कृषीवर निर्भर आहे. त्यात २,५८० लोकांना प्रत्यक्ष रोजगार प्राप्त झाला आहे. खाद्य तेल, साबणासाठी लागणारे तेल, विटा निर्मितीसाठी कोंडा, उसाच्या चिकांपासून कागद, हार्डबोर्ड इत्यादी उद्योग सहज सुरू करता येतात.

### औद्योगिक उत्पादनात जंगल व सिंचन क्षेत्राची स्थिती

महाराष्ट्रात एकूण गुणक्षेत्र ६४००० चौ. कि.मी. आहे. राज्याच्या एकूण क्षेत्राफळाच्या २०.८ टक्के आ[illegible] भारतातील एकूण वनक्षेत्राच्या हे प्रमाण ८.७ टक्के आ[illegible] महाराष्ट्रातील वनापैकी ६४ टक्के वने आरक्षित अ[illegible] आणखी २६ टक्के वने संरक्षित आहे. अशा प्रकारे ८० ट[illegible] वनक्षेत्र खात्याच्या ताब्यात आहे. केवळ १० टक्के क्षे[illegible] अवर्गीकृत आहे. पूर्व विभागात चंद्रपूर, गडचिरोली या

Scanned by CamScanner

जिल्हयात एकूण वनक्षेत्र १८००० चौ कि. मी. असून राज्याच्या एकूण वनक्षेत्राच्या सुमारे ३० टक्के आहे. चंद्रपूर जिल्ह्याच्या एकूण क्षेत्रफळाच्या सुमारे ७० टक्के क्षेत्र जंगल व्याप्त आहे. गडचिरोली जिल्ह्याचे क्षेत्र ७७ टक्के आहे.

चंद्रपूर जिल्ह्याची जंगलव्याप्त क्षेत्राची एकूण भौगोलिक टक्केवारी ३०.५० असून ३,९१,९०० हेक्टर जमीन जंगलाखाली आहे. जिल्ह्याची सिंचन क्षमता मध्यम ०८, लहान राज्य ३ व स्थानिक ५ प्रकल्प असून लघू पाटबंधारे राज्य ४३ व स्थानिक ७४ आहे. महाराष्ट्र मालगुजारी ५१ व स्थानिक १९०१ असून उपसा सिंचन योजना राज्याची १८ व स्थानिक ५ आहे. एकूण सिंचनाखालील क्षेत्र १,१८,६६४ हेक्टर एवढे आहे. हवामानाचा विचार करता उष्ण कोरडे, पावसाळ्यात गरम तसेच उष्णतामान किमान ७.१८ तर कमाल ४७.२ पर्यंत असते. जिल्ह्याची पावसाची सरासरी १३.०९५ मिमि. आहे.

### वनसंपदा व त्यावरील उद्योग

विपूल अशा वनसंपदेने नटलेल्या या जिल्ह्यात इमारती लाकूड, गुरांना चारा, लघु व मोठ्या उद्योगासाठी लागणारा चारा, डिंक, हिरडा, बेहडा, लाख, राळ, मध, वनौषधी द्रव्ये, तेंदूपाने, सुगंधित द्रव्ये, रेझिन तेले, टॅनीन कात, रेशिम कोसा इत्यादी उत्पादने वनाच्या माध्यमातून उपलब्ध झाला आहे, त्याप्रमाणे प्लायवुड इंडस्ट्रीज, कार्डबोर्ड इंडस्ट्रीज आणि पेपर इंडस्ट्रीज मुळे अनेक लोकांना रोजगार मिळाला आहे.

लघु उद्योगात कामगारांची संख्या ४ ते ५ हजार आहे. बल्लारपूर येथे इमारती लाकडाचे मोठे डेपो असून याठिकाणी फर्निचर व इमारती साठी लागणारे साहित्य उपलब्ध होतात. त्यामुळे त्यावर आधारित अनेक लघुउद्योग सुरू होण्याचया दृष्टीने इथे फार वाव आहे. तसेच आगपेट्या, प्लायवूड, टॅनिन निर्मिती, नौकानिर्मिती व औषधी कारखाने सुरू करण्यास बराच वाव आहे.

### औद्योगिक दृष्ट्या चंद्रपूर गडचिरोली जिल्ह्याचे महत्व

जिल्ह्यातील औद्योगिक दृष्ट्या विचार केला असता हेमे टाईट व मॅग्नेटाईट प्रकारचे लोह खनिज, सिमेंट उद्योगाला आवश्यक लाईम स्टोन (चून खडी दगड) कोळसा इत्यादी मोठ्या प्रमाणात उपलब्ध आहे. यासाठ्याची उपलब्धता विचारात घेतल्यास १० कोटी मॅ. टना पेक्षा जास्त लोह खनिज महाराष्ट्रातील केवळ चंद्रपूर गडचिरोली जिल्हात उपलब्ध आहे. आणि २५० वर्षे पूरेल एवढे चुनखडी दगड उपलब्ध आहे. तर ६० वर्ष पुरेल येवढा कोळसा वेगवेगळ्या खाणीमध्ये उपलब्ध आहे. आज जवळ-जवळ ३६ कोलमाईन्स (ओपन कास्ट व् अंडरग्राऊंड) असून २०,००० कामगारांना प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष रोजगार उपलब्ध आहे. ४ सिमेंट प्रकल्प (अंबुजा, माणिकगढ, एल अॅन्ड टी, लाफार्ज) हे विदर्भातील सिमेंट उत्पादनाचे उद्योग, रेफ्रीजरेटर प्लँट, पेपरमिल, स्पन, आयर्न, औष्णिक विद्युत केंद्र एकट्या चंद्रपूर जिल्ह्यात आहेत. म्हणूनच वाहतूक क्षेत्राचा विकास झपाट्याने झाला आहे. गडचिरोली जिल्ह्याची वनसंपदा ही या जिल्ह्याचे वैशिष्ट्य असून खनिज व जंगल समृद्धीमुळे ह्या जिल्ह्याचे वेगळेपण आहे. देऊळगाव, सुरजागड आसोली, पूसरे भामरागड विभागात लोहखनिज साठे असून हे प्राचिन स्तरीय दगडात आहेत. यातील लोहाचे प्रमाण ६१ ते ६७ टक्के आहे तर सिरोंचा जवळील पहाडी व नद्यांच्या पात्रा जवळ नुकत्याच झालेल्या सर्वेक्षणात हिरे मिळाल्याने हे क्षेत्र सरकारने आरक्षित करून संरक्षित केलेले आहे. व क्षेत्र सानिध्यांत काही भाग येत असल्याने हिऱ्याचे उत्पादन करण्यासाठी सरकारला व पर्यायाने त्या उत्पादनाशी संबंधी कंपन्यांना अडचणी निर्माण झालेल्या आहेत. परंतू भविष्यात उत्खननाचा प्रश्न केंद्र सरकार व राज्य सरकारच्या विचाराधीन आहे.

### औद्योगिक शक्ती साधने

महाराष्ट्रात औष्णिक विज जलविद्युत व नैसर्गीक वायू पासून विद्युत निर्मिती केली जाते. राज्यात एकूण विद्युत निर्मितीच्या ७२ टक्के विद्युत औष्णीक विद्युत निर्मितीद्वारे मिळते. २१ टक्के जलविद्युत नैसर्गिक वायुदर ४ टक्के तर अन्य ४ टक्के विद्युत प्राप्त होते. चंद्रपूर जिल्ह्यात वैनगंगा, वर्धा, उमा, अंधारी ह्यासारख्या नद्या असून मोठी धरणे आणि

त्यापासून जलविद्युत निर्मितीच्या बाबतीत सरकार उदासीन असून औद्योगिक पोषक वातावरण असूनही जिल्ह्यात मागासलेपण निर्माण व्हावेही दु:खाची बाब आहे. निर्मित साधन संपत्तीचा योग्य उपयोग झाल्याने औद्योगिक विकासाबरोबर त्यावर आधारीत सहउद्योगामुळे रोजगार उपभोग , उत्पादन, विनिमय, वाटणी ह्या किन्स च्या सिद्धांताचा एक विचार अर्थशास्त्रीय परिभाषेत मांडता येऊ शकतो त्यामुळे बेकारी, बेरोजगारीचे प्रश्न सहज सोडवता येईल. या उलट पश्चिम महाराष्ट्रात नैसर्गीक विपुलता नसतांना जर नवनवीन उद्योग स्थापन करून तेथील लोकांचीआर्थिक स्थिती सुधारली जाते. तर मग नैसर्गिक साधन संपत्तीची विपुलता लाभलेल्या चंद्रपूर जिल्ह्याला मागासलेला संबोधने योग्य होणार नाही. परंतू येथे समीकरणे वेगळी आहेत. हे जुळविण्यासाठी सलोखा आणि योग्य नेतृत्वाची गरज आहे. वेगवेगळ्या उद्योगांत अनेक प्रकारची गुंतवणूक करण्यात आली असली तरी बदलत्या परिस्थितीत व लोकसंख्या वाढीमुळे भविष्यात ही गुंतवणूक पुरेशी नाही. आज मोठे उद्योग व खाणी यातील १०-१५ हजार कामगांराना प्रत्यक्ष रोजगार उपलब्ध झालेला आहे व दळणवळण वाहतूक क्षेत्राला वाव मिळाला असून विदर्भात नागपूर नंतर चंद्रपूर जिल्हा एक औद्योगिक जिल्हा आहे आणि भविष्यात अनेक प्रकल्प येण्याच्या दृष्टीने मुबलक श्रमपुरवठा, कोळसा व विज इत्यादींमुळे जिल्ह्यात नवीन उद्योग स्थापनेसाठी पुरेशा प्रमाणात पोषक वातावरण आहे. बदलत्या परिस्थितीत पर्यावरणाचे निकष न पाळण्यामुळे वातावरणात बदल घडून आलेला दिसतो.

**जिल्ह्याच्या वाढत्या औद्योगिकरणाचा पर्यावरणावर परिणाम**

वातावरणातील बदल वाढती लोकसंख्या व प्रचंड प्रमाणात वाहतूक साधने, कोळसा खाणीतील धूर, वाहने शहरा लगतच्या जंगलातील प्रचंड प्रमाणात वृक्षतोड यामुळे पर्यावरणाचा समतोल ढासळत चालला आहे. हवेचे प्रदूषण ही मानव निर्मित समस्या सर्वासमोर आहे. वाढत्या औद्योगिकरणाचा आणि पर्यावरणाचा जवळचा संबंध आहे. जे घटक वायु, जल व स्थल जीव वृष्टीच्या विकासासाठी आवश्यक असताना त्यामध्ये संतुलन देखील महत्वाचे असते. मनुष्य निर्मीत परिवर्तनामुळे बिघडलेले संतुलन सहजपणे पुर्नस्थापीत होऊ शकत नाही कारण औद्योगिक कारखान्यातून निघणारे विषारी वायु($NO_2$, $So_2$, $CoCo_2$, $H_2O$) इत्यादी वायू हवेतील ऑक्सीजन चे प्रमाण कमी करीत असून वातावरणाचे उष्णतामान वाढविण्यास कारणीभूत ठरवित आहे. हरितगृह परिणाम (Green HOuse Effect) मुळे जिल्हयाचे वाढते तापमान व त्याचा होणारा ओझोनवर परिणाम त्याचे मान राखणे आवश्यक आहे.

पर्यावरणात बदल झाल्याने संपूर्ण मानव जातीला याचा परिणाम भोगावा लागतो. हवेतील प्रदुषणाने त्वचेचे कॅन्सर, फुफ्फुसाचे तंतुभवन, दमा, ॲलर्जी व मानसिक स्वास्थ्यावर परिणाम देखील झालेल्या अनेक रूग्णांची संख्या दिवसेदिवस वाढत आहे. भाभा अणुसंशोधन केंद्रातील शास्त्रज्ञ डॉ. देशमुख यांच्या मते येत्या १० वर्षात १० व्यक्तीमागे २ व्यक्ती ही कॅन्सरसारख्या वेगवेगळ्या आजाराने पिडीत असतील असे भाकीत केले आहे.

प्रदूषण वाढल्याने अंमली पर्जन्य (Acoa Rain) वाहनातून निघणाऱ्या धुरामुळे शिसा सारखे विषारी घटक, कोळसा खाणीतील धुळीमुळे होणारे प्रदुषण थर्मलपावर स्टेशन व स्पन आयर्न आणि सिमेंट उद्योगातील प्रदुषण यामुळे हजारो एकर जमीन अकृषक झाली असून कृषी उत्पादनाची जमीन निकामी आहे. सातत्याने वाढणाऱ्या वसाहती, त्यातील नियोजनाचा अभाव व मालवाहू गाड्यांचा वापर मोठ्या प्रमाणावर होत आहे. त्यातून धुर, विषारी वायु, रासानियक द्रव्य यांचे हवेतील मिश्रम यामुळे वातावरणात झालेला बदल कार्बनमोनोक्साईड, कार्बनडाय ऑक्साईड शिसे यासारखे अनेक विषारी घटक हवेचे प्रदुषण घडवून आणीत आहेत.

याचा परिणाम मानसिक स्वास्थ्यावर दिसून येतो. मानसिक अस्वस्थता, डोकेदुखी ह्दयविकार, रक्तदाब यासारख्या विकाराने ग्रासलेल्या रूग्णांची संख्या तसेच लहान मुलातील चिडचिडेपणा निमोनिया, यकृतसंबंधी विकार,



Scanned by CamScanner

कावीळ, पचन संस्थेचे विकार, विविध प्रदुषणामुळे होत आहे. त्यामुळे शुद्ध हवा मिळण्याची शक्यता भविष्यात मिळणे कठीण होईल.

**प्रदुषण रोखण्यासाठी मानवी प्रयत्नांची गरज**

पर्यावरण व्यवस्थापन अत्यंत व्यापक स्वरूपाचे कार्य आहे. भारतात इ. स. १९८० मध्ये स्वतंत्र पर्यावरण विभागाची स्थापना करणण्यात आली. सन १९८५ मध्ये पर्यावरण मंत्रालय सुरू झाले. महाराष्ट्रात १९८३मध्ये पर्यावरण प्रदुषण नियंत्रण अधिनियम लागू करण्यात आला. सन १९८६ मध्ये पर्यावरण सुरक्षा समितीची स्थापना करण्यात आली. केद्र शासनातर्फे केद्रीय अपारंपारीक ऊर्जास्रोत विभागाची स्थापना करण्यांत आली.

भारतात प्रदूषण नियंत्रणासाठी केंद्रीय प्रदुषण नियंत्रण मंडळ आहे. प्रदूषण नियंत्रणासाठी कायदेशीर तरतुदी करण्यात आल्या असून जलप्रदूषण नियंत्रण कायदा १९७७ व पर्यावरण संरक्षण कायदा १९८६ हे प्रमुख कायदे असून इस. १९७२ मध्ये स्टॉकहोम (स्वीडन) येथे पहिली आंतरराष्ट्रीय पर्यावरण परिषद संपन्न झाली. संपूर्ण सजिव सृष्टीचे अस्तित्व स्वीकारण्यासाठी पर्यावरणाचे स्थळ व संवर्धन करणे आवश्यक आहे, याची जाणीव या परिषदेमुळे सर्व जगाला झाली. याचे कारण वातावरणातील ओझेन वायु प्रमाण १% ने घटले आहे व अतिनीत (Ultra voilet)किरणांचे प्रमाण ३०%$Co_2$ ने वाढले आहे. याचा परिणाम पृथ्वीच्या तापमानावर होईल व दोन्ही धृवावरील बर्फ वितळून सागराची पातळी ५-७ मीटरने वाढेल. किनाऱ्यालगतचा प्रदेश बेट नष्ट होतील व पर्यावरण संतुलन बिघडेल. चंद्रपूर जिल्हयात औद्योगिक प्रगती सोबतच प्रदूषणाचा परिणाम आरोग्यावर होत आहे. जिल्ह्यातील राजुरा, कोरपना, तालुक्यात नुकतेच एक सर्वेक्षण करण्यात आले असून त्यात हिवतापाच्या रोग्यांची संख्या अधिक आहे. ते म्हणजे रोड लगतच्या डबक्यातील केरकचरा व घाणीमुळे डासाचे वाढते प्रमाण होय. त्याचप्रमाणे कोळसाच्या खाणीतील पाणी नदी-नाले यांना मिळते. पर्यायाने प्लोरीन (F) चे प्रमाण जास्त आहे. त्यामुळे दाताचा प्लोरीसीर (Dental Floricis) प्रमाण अधीक आहे.

**काही उपाय योजना**

१. वाढती बेरोजगारी आणि लोकसंख्या यासाठी जिल्हयात औद्योगिकीकरण होणे आवश्यक असले तरी पर्यावरणाचे संतुलन राखण्यासाठी प्रदुषण नियंत्रणाचे निकषांवर उद्योगांना परवानगी देण्यात यावी.

२. उद्योगाचा दर्जा व उत्पादन आणि कच्च्या मालाचा वापर यावरही प्रदूषण अवलंबून असते. प्रदुषणकारी उद्योगांसाठी इन्कुलीअर ट्रीटमेंट सारखे प्लॅन्ट उभारून (ज्यांचा खर्च ९०-१३५ करोड आहे) असे प्लॅन्ट बसवून नदीत पाणी बायोटेस्ट करून सोडावे जेणे करून गुरेढोरे, वनस्पती यांना कुठलीही हानी होणार नाही.

३. वृक्षतोडीच्या मानाने वृक्ष लागवडीचे प्रमाण अत्यंत कमी असून वृक्षतोड व लागवड यातील फरक हा वने नष्ट होण्याची चिन्हे असून पर्यावरण समतोलासाठी वनाची सुरक्षा व वन्यजीवांची रक्षा हे दोनही कार्य एकत्रित राबविणे महत्वाचे असून अनेक वन्यजीव दुर्मिळ होण्याची चिन्हे आहेत. त्याचे संवर्धन करणे पर्यायाने वनाचे संवर्धन करून दुर्मिळ वनौशधीसाठी वनाची अवैध कटाई थांबविण्यात यावी.

४. उत्तम प्रकारच्या सागवनी लाकडाचे उत्पादन गडचिरोली व चंद्रपूर जिल्हयात होत असल्याने आणि खनिज लोहाचे साठे भरपूर असल्याने मोठ्या रेल्वेमार्गाचे जाळे ह्या जिल्हयात पसरविणे महत्वाचे आहे.

५. चंद्रपूर व गडचिरोली जिल्हयात औद्योगिकीकरणासाठी मोठे वाव असलेले जिल्हे आहेत. हे जिल्हे मागासलेले म्हणून संबोधण्यात येते. परंतु येथील साधनसंपत्तीचा विचार करता महाराष्ट्रातील इतर जिल्हाच्या तुलनेत हे श्रीमंत जिल्हे आहे. हे मागास ठेवण्यात लोकप्रतिनिधींच्या मागासवृत्तीचा परिचय यातून मिळतो.

६. वन-औषधीवर आधारीत औषध निर्मिती केंद्र स्थापण्याच्या दृष्टिने प्रयत्नांची गरज आहे. त्याचप्रमाणे मोठे उद्योग निर्माण झालयास विपूल साधनसंपत्तीचा योग्य उपयोग होईल. रोजगार उपलब्धता आणी बेकारी कमी करण्यासाठी मदत होईल.



Scanned by CamScanner

# जागतिकीकरण, जागतिक गरीबी आणि भारत

प्रा. दत्तात्रेय सोनेगांवकर
व्ही. एम.व्ही. कॉलेज, नागपूर

अनादीकालापासून प्रत्येक देशाला गरीबीचा सामना करावा लागत आहे. असा एकही देश नाही जिथे गरीबी नाही. देशांपरत्वे गरीबीचे स्वरूप मात्र भिन्न-भिन्न आहे. प्रत्येक देशाची दारिद्र्यरेषा व या रेषेवरील उत्पन्न यात फरक राहू शकतो परंतु समस्या मात्र बऱ्याच अंशी समान आहे. गरीबीचा आणि बेरोजगारीचा अगदी जवळचा संबंध आहे. बेरोजगारी हे गरीबीचे प्रमुख कारण मानले जाते. एक कमावणारा आणि चार खाणारे अशी परिस्थिती आपल्या देशांत सर्वत्र दिसून येते. गरीबीचे हेही एक महत्वाचे कारण आहे. अनेक वर्षापासून गरीबी हटाओ कार्यक्रम आम्ही उत्साहाने सुरू केले. मोठ्या प्रमाणावर रोजगार उपलब्ध करून देण्यात आला. परंतु जुन्या लोकसंख्येला रोजगार उपलब्ध करून देत पावेतो, लोकसंख्येची दुसरी मोठी फळी रोजगाराच्या प्रतिक्षेत आपल्या समोर उभी असते.

जागतिकीकरण हा एक शाप आहे असे मानणारा एक वर्ग तर जागतिकीकरण एक वरदान आहे असे आग्रहाने प्रतिपादन करणारा दुसरा वर्ग असे समाजात दोन गट पडलेले दिसून येतात. आम्हाला जागतिकीकरणाशी काय देणे घेणे असा विचार करून स्वस्थ बसणारा एक वर्ग तर जागतिकीकरण म्हणजे काय त्याचा आर्थिक विकासावर कोणता परिणाम होणार आहे. याची कुठलीही जाणीव नसणारा अशिक्षीत आदिवासी व दुर्गम भागात राहणारा दुसरा वर्गही या समाजात आहे. त्यांच्या जागतिकीकरणाच्या संदर्भातील प्रतिक्रियांचा प्रश्नच निर्माण होत नाही. परंतु विचारवंत व प्रतिक्रिया देणारा पहिल्या दोन गटातील वर्ग स्वतंत्रपणे नाण्याच्या एकाच बाजूचा विचार करून टोकाची प्रतिक्रिया देत आहे. एक सकारात्मक प्रतिक्रिया आहे तर दुसरी नकारात्मक परंतु तितक्याच पोट तिडकेने प्रतिक्रिया आहे.

उपरोक्त परिस्थितीचा समग्र विचार करून जागतिकीकरण म्हणजे नेमके काय ? जागतिकीकरणाचे बिजारोपण कधी झाले ? जागतिकीकरणाची संकल्पना कशी प्रगत झाली ? जागतिकीकरणाचा प्रसार कोणी व कां केला? जागतिकीकरणाच्या विरोधात भारतातील जनता का आहे? निर्यातीत वाढ करण्याचे प्रयत्न प्रत्येक देश का करीत आहे? निर्यातीत विकसनशील देशांचा वाटा कसा वाढला आहे ? भारतातील बेरोजगारी का कमीझाली नाही ? देशात छुप्या बेरोजगारीचे प्रमाण किती आहे ? दारिद्र्य निर्मूलनाकरीता काय करावयास हवे ? भारताने जागतिकीकरण का स्वीकारले? खाजगीकरणामुळे व्यक्ती विकास कसा होतो ? उपभोक्त्याला जागतिकीकरणाच्या माध्यमातून कसा लाभ होणार आहे ? जागतिकीकरणामुळे भारतातील गरीबी नजिकच्या काळात कमी होण्याची शक्यता कशी वाढली आहे ? या सर्व मुद्यांवर येथे प्रकाश टाकण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

१. जागतिकीकरण म्हणजे आर्थिक, सामाजिक आणि सांस्कृतिक सीमांचे विलोपन, मोकळेपण आजवर देशा-देशांनी उभ्या केलेल्या विविध अडथळ्यांचे विसर्जन. जागतिकीकरण म्हणजे बाजारपेठेत वस्तू व सेवांच्या व्यापारात वेगाने वाढ व त्यांचा विकास घडवून आणणे होय. देशादेशांमध्ये होणाऱ्या व्यापाऱ्यांच्या मुक्त प्रवाहावरील, तांत्रिक ज्ञानावरील व गुंतवणूकीवरील संरक्षणात्मक अडथळे



Scanned by CamScanner

दूर करणे म्हणजे जागतिकीकरण होय.

जागतिकीकरणाच्या उपरोक्त व्याख्यावरून सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक, व्यापार विषयक, तंत्रज्ञान विषयक, गुंतवणूक विषयक प्रत्येक देशाने घातलेली बंधने सैल करणे जेणेकरून य बंधन मुक्ततेतून परस्परांच्या विकासाचा अभ्यास करणे शक्य होईल. यातून चांगले ते निवडता येईल व नको त्याचा अस्वीकार करता येईल. या दृष्टीने इतर देशवासीयांना आपल्या सीमेवरच थोपवून ठेवण्याकरीता स्वत:च्या कायद्यानुसार, नियमानुसार घातलेल्या बंधनांचे विसर्जन करणे म्हणजे जागतिकीकरण असे म्हणता येईल.

२. जागतिकीकरणाचे बिजारोपण १९४७ साली बेटन वुडस (यु.एस.ए.) येथील परिषदेत झाल्याचे दिसून येते. तेंव्हापासून आंतरराष्ट्रीय मुद्रानिधी (IMF) व जागतिक बँक (WORLD BANK) आणि इतर संस्था जागतिक आर्थिक व्यवहारांचे नियंत्रण करतांना आढळून येतात. आज जगात गरीबांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढली आहे. कर्जबाजारीपणा वाढला आहे. दिवाळे काढणाऱ्यांचे प्रमाण वाढले आहे. या समस्यांचा सामना जागतिक स्तरावरून करता येवू शकतो असा विचारवंतांना, अभ्यासकांचा विश्वास व आग्रह त्यांच्या प्रतिपादनातून दिसून येतो.

३. जागतिक व्यापार व व्यवसाय वाढीस लागावा. त्यातून रोजगाराच्या संधी निर्माण व्हाव्यात व प्रत्येक देशातून गरीबीचे उच्चाटन व्हावे. प्रगत देशांना बाजारापेठ उपलब्ध व्हावी व विकसनशील देशांना विकासाची संधी उपलब्ध व्हावी जेणेकरून संपूर्ण मानवजातीचा आर्थिक विकास व्हावा. या उद्देशाने जागतिकीकरणाची संकल्पना प्रगट झाली.

४. बहुराष्ट्रीय कंपन्यांनी तिचा प्रसार केला. अमेरिकेने हा विचार उचलून धरला व सात धनवान राष्ट्रांच्या प्रभावाखालील आंतरराष्ट्रीय नाणेनिधीने व जागतिक बँकेने कर्ज देतांना ऋणकांनी व जागतिक बँकेने कर्ज देतांना ऋणकांनी तो अंमलात आणावा अशा अटी घातल्या.

५. एखादी गोष्ट स्वत:हून करणे आणि दुसऱ्याने बाध्य केल्यामुळे करणे. या दोन करण्यात एक मूलभूत फरक आहे. स्वत:हून केलेल्या गोष्टीचे परिणाम भोगण्यास आपण मानसिकदृष्ट्या सदैव तयार असतो. परंतु तीच गोष्ट करण्यास बाध्य केल्यास होणाऱ्या वाईट परिणामांचा स्वीकार करण्याची आपली तयारी नसते.

६. जागतिकीकरणाच्या संदर्भात असेच झाले आहे. जागतिकीकरणास एकीकडे उत्पादकांचा, व्यापाऱ्यांचा पाठिंबा आहे तर दुसरीकडे कामगारांचा त्याला विरोध सुरु झाला आहे. हा विरोध धनवान, मध्यम आणि गरीब या तीनही वर्गात मोडणाऱ्या सर्वच देशातून दिसून येतो. प्रत्येकाची विरोधाची कारणे मात्र वेगवेगळी आहेत.

७. आपल्या देशाच्या सीमा आंतरराष्ट्रीय व्यापारास खुल्या करतांना देशाच्या सुरक्षेविषयी प्रत्येक देश साशंक आहे. या आर्थिक स्वातंत्र्य तर नष्ट होणार नाही, देश गुलामगिरीत तर जाणार नाही, देशात बेरोजगारी कमी होण्याच्या ऐवजी वाढणार तर नाही, देशाची संस्कृतीतर नष्ट होणार नाही, जीवनमूल्ये तर बदलणार नाही या आणि यासारख्या अनेक शंका प्रत्येक देशातून व्यक्त होत आहेत.

८. एक सत्य मात्र सगळ्यांनाच मान्य आहे की बाजारपेठेच्या विकासावर, विस्तारावर आर्थिक विकास प्रामुख्याने अवलंबून असतो. जसजसा बाजारपेठेचा विस्तार होतो आर्थिक उलाढाल वाढते व या उलाढालीतूनच आर्थिक विकास घडून येतो.

९. आंतरराष्ट्रीय व्यापार पूर्वीही होता. आजही आहे. पुढे ही तो वाढत जाणार हे स्पष्टपणे दिसत आहे. मात्र आज या व्यापारास नवेरूप, नवी झिलाई, नव्या संघटना व नवी गती मिळत आहे. ही एक संधी आहे. जो देश या संधीचा उपयोग करून घेईल त्याचा आर्थिक विकास निश्चितपणे होईल ही आशा वाढीस लागली आहे.

१०. जागतिकीकरणामुळे जग एकात्म बनत आहे. तंत्रज्ञानाची वाढ व विस्तार यामुळे अशा एकात्मतेला गती मिळाली आहे. हे दळणवळणाच्या, माहितीच्या तंत्रज्ञानात होत असलेल्या अभूतपूर्व क्रांतीने सर्व अनुभवत आहेत. परदेशातून व्यवसाय नोकरीची संधी उपलब्ध होत आहे. उपभोक्त्यांना पाहिजे त्या वस्तू उत्पादक पुरवू पहात आहेत.



Scanned by CamScanner

वित्तीय बाजारात रात्रंदिवस व्यवहार सुरू झाला आहे. निर्माणाधीन विदेशी चलनाचे देशांतर होवू लागले आहे. संशोधन कार्यात परस्पर संपर्क व विस्तार केला जात आहे.

११. जागतिकीकरणामुळे जागतिक उत्पादन आणि निर्यात मोठ्या प्रमाणावर वाढली आहे. १९८० साली १७७ टक्के असलेली वाढ १९९९ साली २२७ टक्यापर्यंत वाढली होती. मात्र धन हे धनवानांकडे अधिक आकर्षित होत असल्याने ही वाढ प्रचंड प्रमाणात श्रीमंत राष्ट्रांचीच झाली. एकूण उत्पादनवाढीत श्रीमंत राष्ट्राचा वाटा ८३ टक्के तर निर्यातीत ८१ टक्के होता. कमी उत्पन्न गटातील राष्ट्रांचा वाटा अनुक्रमे १.६३ व २.६३ टक्के राहिला म्हणजे श्रीमंत, मध्यम व निम्न स्तरातील उत्पन्न गटाच्या राष्ट्रातील ही वाढ विषम प्रमाणाने झाली.

१२. निर्यातीत निर्माणक वस्तूंचा विचार केल्यास विकसनशील देशांचा लाभ झाला आहे असे दिसून येते.

बेकारीच्या संदर्भात पुढील परिस्थिती आढळून येते.

■ देशात कृषी व्यवसाय अवरूद्ध होता त्यात कामे मुळीच वाढली नाहीत.

■ उत्पादन वाढीच्या प्रमाणात निर्माणक क्षेत्रात अपेक्षेप्रमाणे वाढ झाली नाही. निर्माण क क्षेत्रातील वाढीचे प्रमाण सालाना ७.८ टक्के होते. यात दर १ टक्का वाढीवर हुकूम ०.२५ टक्याने कामे कमी वाढतील अशी अपेक्षा होती. परंतु ही वाढ ०.१७ टक्याने झाली.

■ सार्वजनिक क्षेत्रातील रोजगारात वाढ झाली नीह. आधीच अतिरिक्त रोजगार आणि संरचना करण्याची आवश्यकता हे त्यामागील प्रमुख कारण दिसून येते.

■ कामगार कपात करण्यातील कायद्यांचे अडथळे आणि कामगार संघटनांचा विरोध यामुळे वाढविण्यास निर्माणक क्षेत्र तयार नाही.

■ सुशिक्षितात बेरोजगारीचे प्रमाण संख्येने वाढले

**तक्ता क्र. १:१**

(निवडक निर्माण वस्तूंच्या निर्यातीचे गटवार प्रमाण १९८० व १९९१)

| अ. क्र. राष्ट्रे | वस्त्रोद्योग १९८०-१९९५ | रासायनिक उद्योग १९८०-१९९५ | यंत्रे व वाहन उद्योग १९८०-१९९५ | धातू उद्योग १९८०-१९८५ | अन्य उद्योग १९८०-१९९५ |
|---|---|---|---|---|---|
| १.विकसित | ६१.७-४२.० | ८७.२-७९.३ | ८६.०-७६.४ | ७८.९-६३.१ | ६८.८-७०.० |
| २. विकसनशील | ३४.०-५३.८ | ७.८-१६.५ | ५.८-२२.० | १४.९-२३.४ | १७.२-२३.८ |
| ३. संक्रमणावस्थेतील | ४.३-४.२ | ५.०-४.२ | ८.२-१.६ | ६.२-१३.५ | १४.०-३.२ |
| | १०० - १०० | १०० - १०० | १०० - १०० | १०० - १०० | १०० - १०० |

स्त्रोत : डीन बेकर (१९९८) पृ.क्र.

उपरोक्त आकडेवारीवरून हे स्पष्ट होते की, तंत्रज्ञान कमी प्रमाणात लागणाऱ्या वस्त्रोद्योगासारख्या निर्माणक उद्योगातूनच नव्हे तर मोठ्या प्रमाणाने तंत्रज्ञानाचा उपयोग कराव्या लागणाऱ्या यंत्रे व वाहन उद्योगांच्या निर्यातीतही विकसनशील राष्ट्रांचा वाटा वाढला आहे.

१३. भारतात १९९१ ते १९९५ या काळात शिथिलकरण आले परंतु पुढे ते काही काळ रेंगाळत राहीले. या शिथिलीकरणामुळे बेकारी वाढत आहे असा एक विचारप्रवाह देशांतर्गत दिसून येतो परंतु याला आधार नाही. या काळात आहे. याचे कारण कामास अनुरूप असे शिक्षण त्यांना मिळाले नाही, कला, विज्ञान व वाणिज्य शाखांची पदवी काम मिळविण्यास पूर्ण पात्रता देत नाही. व्यापार व व्यवसाय प्रशिक्षणची जोड आवश्यक झाली आहे.

■ जगभर मंदीचे सावट निर्माण झाले आहे. त्यामुळे रोजगार वाढीस अनुकूल वातावरण सद्यस्थितीत नाही.

१४. बेरोजगारी हे गरीबीचे प्रमुख कारण आहे. भारतातील बेकारी केवळ जागतिकीकरणाशी संलग्न नाही. त्या आधीही ती येथे होती. कृषीक्षेत्रात आधुनिक तंत्रज्ञान न वापरल्याचा,



Scanned by CamScanner

औद्योगिक मागासलेपणाचा व वाढत्या लोकसंख्येचा बेकारी हा परिणाम आहे. या बेकारीमुळे गरीबी वाढली आहे.

१५. भारतातील बेकारी जागतिकीकरणाची कशी संलग्न नाही हे पुढील आकडेवारीच्या सहाय्याने अधिक स्पष्ट होईल. २००१ च्या जनगणनेनुसार भारताची लोकसंख्या १०२७० लाख आहे.

तक्ता १:२

दरहजारी बेकारांचे विवरण

| अ.क्र. | वर्गवारी | १९९३-९४ | १९९९-२००० | फरक |
|---|---|---|---|---|
| १. | ग्रामीण पुरूष | ०८ | ०८ | - |
| २. | ग्रामीण महिला | ०३ | ०३ | - |
| ३. | नागरी पुरूष | २२ | २४ | +२ |
| ४. | नागरी महिला | १० | ०८ | -२ |
| | | ४३ | ४३ | ० |

स्रोत: इकॉनॉमिक्स टाईम्स, इंटेलिजन्स ग्रुप, मार्च २००१ चा अहवाल

उपरोक्त आकडेवारीनुसार हे स्पष्ट होते की, १९९३-९४ साली असलेले बेरोजगारांचे प्रमाण १९९९-२००० साली कायम आहे. त्यात वाढ व घट झालेली नाही. छुपी बेरोजगारी जी दिसून येत नाही परंतु अस्तित्वात आहे. तिच्या प्रमाणात मात्र १९९३-९४ च्या तुलनेत १९९९-२००० साली ७.३ टक्याने वाढ झाली आहे. तक्ता क्र. १:३ वरून ही बाब स्पष्ट होते.

तक्ता क्र. १:३

छुप्या बेरोजगारीचे शेकडा प्रमाण

| अ.क्र. | गट | १९९३-९४ | १९९९-२००० | फरक |
|---|---|---|---|---|
| १. | ग्रामीण पुरूष | ६.९ | १०.५ | ३.६ |
| २. | ग्रामीण महिला | ६.० | ८.३ | २.३ |
| ३. | नागरी पुरुष | ४.४ | ६.१ | १.७ |
| ४. | नागरी महिला | ५.१ | ५.८ | ०.७ |
| | | २२.४ | ३०.७ | ७.३ |

स्रोत : निबंध, रिफॉर्मस ॲन्ड लेबर मार्केट इन इंडिया-डॉ. सुधा देशपांडे

१६. बेरोजगारीचे आणि गरीबीचे उच्चाटन करण्यात देशाला अपयश का आले या संदर्भात पुढील विचारप्रवाह आढळून येतो. १९४८ ते १९८८ या काळात भारतात लायसन्स व परमीट राज यामुळे खाजगी क्षेत्राची गळचेपी झाली. संरक्षणाच्या आवरणाखाली येथील उद्योगधंदे बेफिकी राहिले. उपभोक्त्यांना त्यांनी गृहीत धरले 'चलता है' अश मानसिकता जोपासली. नवीन तंत्रज्ञानाचा स्वीकार केल नाही. जुन्या यंत्रसामुग्रीस राबवीत रेटीत नेले. स्पर्धेचा अभा असल्यामुळे नूतनीकरणाची प्रक्रिया मागे पडली व विका अवरूद्ध झाला. परिणाम बेरोजगारी वाढण्यात झाला.

१७. दारिद्र्य घालविण्याचा उत्तम मार्ग काम हा आहे. का करू इच्छिणाऱ्याला काम हे मिळालेच पाहिजे. मग ते खाजगी क्षेत्रात असो वा सार्वजनिक. वेतनाचा दर तासाल २५ रूपये कमीत कमी असावा. कुटुंबातून कुणीही पूर्णवे कामावर असेल तर त्याची साप्ताहिक प्राप्ती किमान १००० रूपये असावी. आठवड्यास २००० रूपये मिळकतीपर्यं प्राप्तीकर लागू करू नये. देशातील दारिद्र्य निर्मूलनाकरित ही परिस्थिती निर्माण होणे आवश्यक आहे.

१८. जागतिकीकरण, शिथिलीकरण हा १९८० च्या दशकापासून पुढे आलेला वेगळा विषय आहे. भारतावर ते लादला आहे हा प्रवाद बरोबर नाही कारण आंतरराष्ट्री नाणेनिधीकडे कर्जाची मागणी करण्या आधीपासून इथे त्य दिशेने पावले उचलावयास सुरूवात झाली होती. कर्जफेडीचं पात्रता यावी व पुन्हा विदेशी आर्थिक अडचणीस सामो जावे लागू नये म्हणून धनकोने सुचवलेली ती व्यवस्था होत व आपल्या हिताची होती. तेंव्हा कुण्या परकीयांच्य जुलमामुळे आपण शिथिलकरण स्वीकारलेली ही भावन आपण झटकली पाहिजे.

१९. व्यक्तिस्वातंत्र जपण्याला आणि व्यक्तींना उद्योगप्रवृ करण्याला खाजगी मालकी आवश्यक आहे. खाजगी मालकीतून येणाऱ्या सत्तेचा दुरूपयोग होवू शकतो. परं सार्वजनिक मालकीने येणारी सत्ता त्याच मार्गाने जाते हेह दिसून येते. उलट खाजगी मालकी असतांना जेवढे व्यक्तीस्वातंत्र्य असते तेवढेही सार्वजनिक मालकीच्य व्यवस्थेत असत नाही असे अनेकदा अनुभवास आले आहे एवढेच काय साम्यवादी मालकीच्या व्यवस्थेत ज्य व्यक्तीजवळ कसलीही सत्ता नाही, दिडकीही नाही ती पू परावलंबी बनते. अशा परिस्थितीत खाजगीकरण हा



Scanned by CamScanner

सर्वोत्तम पर्याय ठरतो. व्यक्तीविकासातून समाज विकास शक्य आहे याचाहीविचार होणे आवश्यक आहे.

२०. १९९४ मध्ये झालेल्या ब्रिटनमधील एका पाहणीनुसार लोक वस्तू व सेवांच्या पुरवठ्यात खाजगी संस्थांनी पुरविलेल्या व सार्वजनिक संस्थांनी पुरविलेल्या असा भेदाभेद मानीत नसल्याचे आढळले आहे. वस्तुसेवा कुणी पुरवली यापेक्षा किती तत्परतेने, कार्यक्षमतेने, सुलभतेने आणि दर्जेदार सेवा मिळते याचाच लोक प्रामुख्यने विचार करतात. जागतिकीकरणातून उपरोक्त सेवा देण्यावर विशेष लक्ष देणे क्रमप्राप्त ठरणार आहे. गरीबी दूर करण्याचा आशावाद व्यक्त होतो तो या कारणांमुळे. प्रत्यक्षात जागतिक गरीबीदूर होण्यास किती कालावधी लागेल याचे उत्तर येणारा काळच देईल.

२१. आज उदारीकरण व त्याचवेळी जागतिकीकरण आणि निर्गुतवणूक या प्रक्रियेतून खाजगी क्षेत्राच्या विकासाला कधी नव्हे एवढी संधी उपलब्ध झाली आहे. व्याज दर कमी झाल्यामुळे बाजारात भांडवल उपलब्ध आहे. बाजारपेठेचे कल्पनातीत विस्तार झाला आहे. संदेशवहनाची साधने हात जोडून उभी आहेत. संगणकामुळे कार्यक्षमतेत अत्यंत वाढ झाली आहे. आंतरराष्ट्रीय देवाण-घेवाणीत वाढ झाली आहे. अण्वस्त्र सज्जतेमुळे युद्धाची शक्यता कमी झाली आहे. कारण अण्वस्त्रांची संहार क्षमता सर्वच जाणून आहेत. परस्परातील विश्वास वाढीस लागला आहे. आंतरराष्ट्रीय नेत्यांच्या भेटी-गाठीत वाढ झाली आहे. करारमदार होत आहेत. रोजगाराच्या संधीत वाढ होण्याची शक्यता बळावली आहे. यातूनच जागतिक गरीबी दूर होण्याची शक्यता वाढीस लागली आहे.

२२. भारतातील गरीबी नजिकच्या काळात बऱ्याच मोठ्या प्रमाणावर कमी होण्याची शक्यता वाढली असल्याचे पुढील उपलब्धी वरून लक्षात येते. याला जागतिकीकरणाच्या आगमनाची पार्श्वभूमी लाभली आहे.

### ■ आर्थिक विकासाची मूलभूत गरज म्हणजे सुलभ वाहतूक व्यवस्था

आज दिल्ली, मुंबई, कलकत्ता व चेन्नई ही शहरे महामार्गाद्वारे परस्परांना जोडल्या गेली आहेत. ५४००० कोटी रूपये खर्च करून आंतरराष्ट्रीय दर्जाचे ४ ते ६ पदरी रस्ते जवळपास पूर्ण होत आले आहेत. १९९७ पर्यंत देशात ५५६ किलोमिटर लांबीचे चौपदरी राष्ट्रीय महामार्ग होते. १९९८ ते २००२ पर्यंत देशात २१५१ किलोमिटर लांबीचे महामार्ग तयार झाले आहेत. १९९७ पूर्वी महामार्गाची वार्षिक सरासरी ११.१२ किलोमिटर याप्रमाणे होती. २००२ साली ती १६५० किलोमिटर इतकी आहे. आर्थिक विकासाला गती देण्याचे काम मुख्यत्वे रस्त्यांद्वारेच होते. १९९८ नंतर ६० हजार कोटी रूपये खर्च करून प्रत्येक गाव पक्या रस्त्याने जोडण्याची योजना कार्यान्वित झाली आहे.

चांगल्या रस्त्यामुळे वेळ व इंधनाची बचत होते. वाहतूकीच्या साधनांचा देखभाल खर्च वाचतो. भाजीपाल्या सारख्या नाशवंत वस्तूंना दूरची बाजारपेठ उपलब्ध होते. इटावाचा भाजीपाला दिल्लीच्या बाजारात विकल्या जातो. नाशिकचा कांदा दिल्लीत स्वस्त मिळू शकतो. शहराची सोय होते तर गावातील मालाला चांगला भाव मिळतो. भारतात आजमितीला जवळपास २५० मोठे कंत्राटदार रस्ते तयार करित आहेत, अतिशय वेगाने हे काम सुरू आहे. या रस्त्याच्या बाजुबाजूला नव्या वस्त्या तयार होत आहे. उद्योग सुरू केले जात आहे. या रस्त्यांमुळे दरवर्षी ८००० कोटीरूपयांची बचत होणार आहे. रस्त्यांच्या कामामुळे मोठ्या प्रमाणावर रोजगार निर्मिती झाली आहे. रस्त्यांमुळे सिमेंट आणि इस्पात उद्योगांची स्थिती सुधारली आहे. प्रत्येक क्षेत्रात लाखो मजूर काम करीत आहेत.

### ■ आर्थिक विकासाची दुसरी मूलभूत गरज म्हणजे दूरसंचार व्यवस्था

१९९७ पूर्वी देशात सुमारे ६ लाख गावांपैकी केवळ १० टक्के गावांमध्येच टेलिफोन व्यवस्था होती. या वर्षाच्या मध्यापर्यंत ५०४,६९१ गावे टेलिफोनने जोडली गेली आहेत. या वर्षाच्या शेवटी प्रत्येक गाव टेलिफोनने जोडण्याचा संकल्प व्यक्त झाला आहे. १९९७ पूर्वी देशांत १ कोटी ८२ लाख टेलिफोन कनेक्शन्स होते. गत ३ वर्षात २ कोटी ८४ लाख कनेक्शन्स वाढले आहे. गत वर्षात ५० लाख टेलिफोन धारक वाढले आहे. देशभरातील पी.सी.ओ. ची संख्या



Scanned by CamScanner

११,१५,५२९ एवढी असून गत ३ वर्षात ७,२१,५८९ पी.सी.ओ. एवढी प्रचंड वाढ झाली आहे. यातून २३१ लाख लोकांना रोजगार मिळाला आहे. रोजगारीतून गरीबी दूर होत असल्यामुळे देशातील गरीबी कमीहोण्याची शक्यता वाढली आहे.

■ आर्थिक विकासाची तिसरी मूलभूत गरज म्हणजे स्वस्त व मुबलक इंधन

१९९७ पर्यंत गॅस कनेक्शन मिळविण्याचे काम अतिशय कठीण होते. अनेकांनी कनेक्शनप्रमाणे १० ते १५ हजार रूपये मोजल्याची उदाहरणे आहेत. स्वातंत्र्यानंतरच्या ४० वर्षात देशात केवळ ३ कोटी ३७ लाख गॅस कनेक्शन होते. गत ३ वर्षात ३ कोटी १७ लाख गॅस कनेक्शन्स देण्यातआले. याची वार्षिक सरासरी १ कोटीपेक्षा जास्त आहे. गॅस कनेक्शन साठी असलेली संपूर्ण प्रतिक्षा यादी संपविण्यात आली. भ्रष्टाचार संपला व समस्या ही एकदम सुटली. यातून अनेकांना रोजगार मिळाला व बेरोजगारी कमी झाली. पर्यायाने गरीबीचे प्रमाण कमी झाले.

■ आर्थिक विकासाची चवथी मूलभूत गरज म्हणजे सहज, सुलभ कर्जपुरवठा

कर्ज मिळविणे ही छोट्या शेतकऱ्यांसाठी अतिशय बिकट समस्या होती. दोन वर्षापूर्वी देशात किसान क्रेडीट कार्ड योजना राबविण्यात आली. गत आर्थिक वर्षात २ कोटी ४२ लाख किसान क्रेडीट कार्ड जारी करण्यात आले. या कार्डाद्वारे ४९,८३३ कोटी रूपयांचे कर्ज वाटण्यात आले. आजमितीस किसान क्रेडीट कार्ड ची संख्या ३ कोटीवर गेली आहे. याचा अर्थ असा की, १८ कोटी लोकसंख्येला त्याचा लाभ मिहाला आहे. यावर्षी कृषी क्षेत्रात १,६२,११६ कोटी रूपयांचे कर्ज वाटप झाले आहे. १४ लाख हेक्टर जमिनीवर अतिरिक्त सिंचन क्षमता निर्माण करण्यात आली आहे. २४५३ लघूसिंचन योजनाही पूर्ण करण्यात आल्या आहे. यातून अनेकांना रोजगार मिळाला आहे. हे असेच जर सुरू राहिले तर गरीबी दूर होण्यास फारसा कालावधी लागणार नाही.

■ आर्थिक विकासाची पाचवी मूलभूत गरज म्हणजे

निर्यातीत वाढ

निर्यात वाढ आणि तीही शेतमालाची गरीबी दूर करण्यास मदत करू शकेल. भारत आज ३० देशांना अन्नधान्याची निर्यात करतो. यावर्षी ६००० कोटी रूपयांपेक्षा जास्त किंमतीचे धान्य निर्यात करण्यात आले आहे. निर्यातीत वाढ झाल्यामुळे उत्पादन घेण्यास प्रोत्साहन मिळते. उत्पादन वाढीतून, रोजगार वाढतो व रोजगार वाढला की गरीबीतून मुक्तता होते. जागतिकीकरणामुळे बाजारपेठेचा कल्पनातीत विस्तार झाला आहे. संगणक व दूरसंचार व्यवस्थेमुळे परस्पर संपर्क वाढलाआहे. याचा परिणाम निश्चितच रोजगार वाढीत होईल व त्यामुळे जागतिकीकरण स्वीकारणाऱ्या देशातून गरीबीचे प्रमाण कमी होईल अशी आशा व्यक्त केल्या जात आहे.

ताज्या आकडेवारीनुसार भारतात २३ टक्के लोक दारिद्र्य रेषेखाली राहतात. याचा अर्थ जवळपास ५ कोटी कुटुंबे दारिद्र्य रेषेखाली जगतात. १९९८ पूर्वी भारतात एकूण लोकसंख्येच्या ३२ टक्के लोक दारिद्र्य रेषेखाली राहत होते. १९९८ ते २००२ या काळात ९ टक्के लोक दारिद्र्य रेषेच्या वर आले आहे म्हणजे ९ टक्याने गरीबी कमी झाली आहे. गरीबी कमी होण्याचा वेग असाच राहिला तर २०१५ ते २०२० या दरम्यान देशातून बऱ्याच मोठ्या प्रमाणात गरीबीचे उच्चाटन झाल्याचे दिसून येईल. या कालावधीत गरीबीचे उच्चाटन करण्याचा संकल्प आंतरराष्ट्रीय समुदायाने सोडला आहे. हा संकल्पसिद्धीस जावो, एवढीच शुभेच्छा व्यक्त करून सर्व देशवासी अपरिहार्यता म्हणून का होईना, या परिवर्तनाकडे सकारात्मक दृष्टीने पाहतील व आपले शक्य तेवढे सक्रिय योगदान आर्थिक विकास कार्यात देतील याअपेक्षेसह पूर्णविराम.

### संदर्भ

१. इकॉनॉमी टाईम्स इंटेलिजन्स ग्रूप (२००१): एम्प्लॉयमेंट ट्रेन्डस इन इंडिया १९९३-१९९९,
२. सी. प. खेर (२००२): जागतिकीकरण-समस्या, आशय आणि अनुभव,
३. जे. एम. केन्स (१९३६): दि जनरल थेअरी



Scanned by CamScanner

ऑफ एम्प्लॉयमेंट इंटरेस्ट ॲन्ड मनी, कॅकमिलन, लंडन,
. डॉ. सुधा देशपांडे (२००१):रिफार्म्स ॲन्ड लेबर मार्केट इन इंडिया,
डिन बेकर, जेरॉल्ड एप्सीन व रॉबर्ट पॉलीन : ग्लोबलायझेशन ॲन्ड प्रोग्रेसिव्ह इकॉनॉमीक पॉलिसी, केंब्रीज, युनिव्हर्सिटी प्रेस, ब्रिटन,
. वर्ल्ड बँक (१९९९): ट्रेड पॉलीसी ॲन्ड मार्केट ॲक्सेस इश्युज फॉर डेव्हलपिंग कंट्रीज ऑक्टोंबर १९९९,
७. वर्ल्ड ट्रेड आर्गनायझेशन : वार्षिक अहवाल १९९९ व २०००,
८. पी. सुब्बाराव (२००२): इंटरनॅशनल बिझीनेटस, अेस्ट ॲन्ड केसेस,
९. दिनानाथ मिश्र (२००२): संपादकीय वर्तमान, तरूण भारत.

✠✠✠✠

# वाणिज्य शिक्षणातील परिवर्तनाची आवश्यकता व वर्तमान आव्हाने

प्रा. बाबुराव काळबांडे
गो. से. अर्थ व वाणिज्य महाविद्यालय,
नागपूर

आज औद्योगिक युगात व वाणिज्याच्या क्षेत्रात अभूतपूर्व परिवर्तन होत आहे. नवे-नवे सिद्धांत, नवे परिवर्तन, मूलभूत सिद्धांतातून उदयास येत आहे. हे सर्व परिवर्तन जागतिक बाजारपेठेने स्वीकारल्याने अर्थातच वाणिज्य शाखेला महत्व यायला हवे. परंतु जी शाखा अर्थव्यवस्थेचा पाया आहे ती बुरसटलेली आहे. तर अर्धशतकापर्यंत वाणिज्य शाखेची इमारत तात्पुरत्या डागडुजीवरच उभी होती. ती केंव्हा कोसळून पडेल हे देखील सांगता येत नव्हते. पश्चिम महाराष्ट्रात वाणिज्य शाखा भरभराटीला आली असतांनाच विदर्भातील अनेक महाविद्यालयातील वाणिज्य शाखेचे दरवाजे बंद करण्यात आले होते. वाणिज्य शाखा सुरू ठेवण्यासाठी या शाखेला विद्यार्थी मिळणे विदर्भात दुरापास्त झाले होते. अनेक व्यावसायीक, वाणिज्य तज्ञ अन् अर्थशास्त्र तज्ञ असतांना वाणिज्य शाखेला आधुनिक काळाच्या बदलत्या परिस्थिती व अवस्थेनुसार संजीवनी कां मिळाली नाही ? हा प्रश्न आहे. त्याला कारण एवढेच की, येथील लोक 'जैसे थे स्थितीवादी' आहेत. युगानुसार बदलते परिवर्तन स्वीकारावयचे म्हणजे आज जे आहे ते मृतप्राय झाले असले तरी त्याला अग्नी देण्याचा संस्कार आम्ही करीत नाही. कारण जुने ते सोने म्हणून नवे तर पुरोगामी धोरणाचा स्वीकार करण्याची आमची मानसिकताच नाही. नवे धोरण स्वीकारतांना त्यासाठी करावे लागणारे अध्ययन, नव्हे प्रशिक्षण आत्मसात करून, नवा असा बदलत्या काळानुसार अभ्यासक्रम स्वीकारण्यासाठी जे धैर्य लागते, परिवर्तनासाठी जी क्रांती करावी लागते ती करायला जे धाडस हवे असते, जी दृष्टी हवी असते त्याकडे सोईस्कररित्या दुर्लक्ष करण्यात येते. हे मान्य करायला मात्र कोणीही तयार होत नाही. बाजारपेठेचा अन् भविष्यकालीन स्थितीचा संशोधनात्मक अभ्यास करून जो अभ्यासक्रम तयार करणे आवश्यक होते ते तयार झालेच नाही. त्यामुळे काळाच्या ओघात वाणिज्य शाखा मागे पडली. त्या शाखेला दुसऱ्यांसमोर हात पसरविण्याची गरज पडली. कारण सद्यपरिस्थितीत वाणिज्य शाखेचा अभ्यासक्रम असा आहे की, प्रत्यक्ष व्यवहार आणि पुस्तकी ज्ञान याची कुठेही सांगड नाही. आजचा आमचा वाणिज्य शाखेचा पदवीधर हा शैक्षणिक संस्थाचे, व्यापाऱ्यांचे हिशोब नीट लिहू शकत नाही. आयकर विवरण पत्रे भरू शकत नाही. बाजारपेठेतील बदलांच्या स्थितीचे अवलोकन करता येत नाही असा हा एकंदरीत जुना व रटाळ असा अभ्यासक्रम आहे त्यामुळे हा अभ्यासक्रम विद्यार्थ्यांच्यापदरात निराशा नाही पाडणार तर मग काय पाडेल. म्हणून सद्य परिस्थिती नागपूर विद्यापीठातील अनेक मान्यवर व तज्ञ मंडळी एकत्र येवून नवीन अभ्यासक्रम आखण्याचे ध्येयाने प्रेरित झाली आहेत. या मंडळींनी व्यापाऱ्यांच्या, व्यवसायीकांच्या, समाजाच्या काय अपेक्षा आहेत हे जाणून घेण्याचा प्रयत्न करून त्यानुसार अभ्यासक्रम आखण्याचा प्रयत्न केला आहे.

आज राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय संस्था वाणिज्य शाखेचा जो अभ्यासक्रम राबवित आहे तशाच प्रकारचा अभ्यासक्रम राबविण्याचे धोरण आता काळानुसार तज्ञांनी स्वीकारल्याचे दिसून येते.


वाणिज्य शाखेतील विविध तंत्रज्ञान, संगणक, अर्थशास्त्राचे तत्व आणि इतर अभ्यासाचा त्यात समावेश केला पाहिजे. वाणिज्य शाखेमध्ये नव्याने आलेले परिवर्तन लक्षात घेता सर्व प्रकारचे ज्ञान प्राप्त करण्यासाठी प्राध्यापकांना

व शिक्षकांनाही कार्यप्रवण करण्याची गरज आहे. सर्व प्रकारचे ज्ञान प्राप्त करण्यासाठी इंटरनेटचाही उपयोग कसा करावा याचा सराव अध्यापक, प्राध्यापक यांना द्यावा लागणार आहे हे करीत असतांना विद्यार्थ्यांना नवीन अभ्यासक्रमाविषयी माहिती मिळावी यासाठी प्रयत्न असावा.

वाणिज्य शाखेतील बदल व त्या दिशेने करण्यात येणाऱ्या बदलाचे स्वप्न साकार करण्यासाठी प्राध्यापक, शिक्षकांनी पुढे येण्याचे धोरण ठेवल्यास वाणिज्य शाखेला सोन्याचे दिवस प्राप्त झाल्याशिवाय राहणार नाही.

वाणिज्य शाखेला जर चांगले दिवस प्राप्त करावयाचे असेल, वाणिज्य शाखेत आमुलाग्र परिवर्तन करावयाचे असेल तर या क्षेत्राशी संबंधित असलेल्या लोकांनी विद्यार्थ्यांच्या भविष्याला समोर ठेवून अभ्यासक्रम तयार केल्यास निश्चितच वाणिज्य शाखेला चांगले दिवस येतील असे आपण म्हणू शकू.

Scanned by CamScanner



# जागतिकीकरण, निर्गुंतवणूकीकरण आणि भारतीय शेती

प्रा.डॉ.राम बोडेवार

जनता महाविद्यालय, चंद्रपूर

भारताने उदारीकरणांचे धोरण स्वीकारण्याला आता साडेआठ वर्ष उलटून गेली. त्याचे उलट-सुलट परिणाम आता सामान्यापर्यंत पोहचू लागलेले आहेत. त्यातून चांगल्यापेक्षा वाईटांचीच अधिक झळ जाणवू लागली आहे. म्हणूनच त्याच्या सार्वत्रिक चर्चेला परत एकदा गती आली आहे. विशेषकरून निर्गुंतवणूकीचा मुद्दा सध्या ऐरणीवर आहे.

जागतिकीकरण ! परदेशीय विचारवंताच्या सूपीक डोक्यातून निघालेली सुपीक कल्पना. याच दुसरं नावं म्हणे उदारीकरण ! भारतीय लोक उधार ऐकून होते. त्याचेच उदात्तरूप म्हणजे उदारीकरण असावे असे त्यांना वाटले. मांडणाऱ्यांनीही आकर्षक वेष्टनात मांडली .पाहताच तोंडाला पाणी सुटावे अशा तऱ्हेने ते मांडले .लोकांचे राहाणीमान उंचावेल व्दिपक्षीय व्यापार कराराचा अवलंब केल्याने दोन्ही पक्षाचा खूप उध्दार होईल. गरीब देशातील लोकांना श्रीमंत देशातील लोक उदार अंतकरणाने मदत करतील अशी गोड स्वप्नाची आंबट चिंच दाखवून तोंडाला पाणी सोडले आणि हो-नाही ,हो-नाही,करत आपल्या नेत्यांनीही १५ एप्रिल १९९४ रोजी या उदारीकरणाची दीक्षा घेऊनच टाकली मग आपण त्यांचे फालोर्स (मेंढरं) की नाही. मग चाल्ला पोहा महादेवाला, बोला हर हर महादेव.

जागतिकीकरणाचे गुऱ्हाळ तसे १९८५ च्या आसपासच सुरु होते. तो पर्यंत जवळपास त्याच्या सात फेऱ्या झाल्या म्हणजे सप्तपदी आटोपली. त्यातून मग गॅट (जागतिक व्यापार संघटना) नावाच्या कलंकीचा अवतार झाला आणि १९८६ ते १९९३ या दीर्घकालावधीत काथ्याकूट करून आठवी फेरी उरूग्वे येथे साजरी झाली. यात डंकनं डंका वाजवला. जगभर त्याचा आवाज गेला. अनेक देश तर या आवाजानं भारावून गेले. काही जण तर त्या तालावर नाचूही लागले. एका दणक्यात त्यांनी करारावर सह्याही करून टाकल्या. भारत मात्र काकू.... काकू करत राहिला. हे त्या गोऱ्याच्या चाणाक्ष दृष्टीनं हेरलं. कोठं अन् कसं नाक दाबलं की तोंड उघडते, हे त्यांना चांगलं ठावूक होतं. त्यांनी मग दोन पिलंटू भारताच्या अंगावर सोडली त्यात एक होतं जागतिक बँक आणि दुसरं होतं आंतरराष्ट्रीय नाणे निधी. मग आपल्या नेत्यांना पडता भुई थोडी झाली. 'भिक नको पण कुत्रं आवर' म्हणण्याची पाळी त्यांच्यावर आली. धावून-धावून या घायकुतीस आले. तसे १९९०-९१ पासूनच सरकार समोर आर्थिक समस्या गंभीर स्वरूपात उभी होती, त्यामुळे आधीच सरकार या पिलांटू समोर पदर पसरून विनवणी करीतच होते. या गंभीर संकटातून बाहेर पडण्यासाठी त्यांनी लादलेल्या लाजिरवाण्या अटी त्यांना मान्य करणे भाग पडले आणि २४ जुलै १९९१ रोजी सरकारने तशा प्रकारचे नवे औद्योगिक धोरण जाहीर करून शरणागती पत्करल्याचा पुरवा या पिलांटुना दिला. आणि शॉपेन बाटल्यांचे चित्कार उडवून दिवाळी ? (दिवाला) साजरी केली. धन्य ते नेते आणि धन्य तो देश. आता बोंबला.

आंतरराष्ट्रीय व्यापाराचे नियमन आणि नियंत्रण करण्यासाठी म्हणे या गॅटची (जागतिक व्यापार करार) स्थापना करण्यात आली. मुक्त स्पर्धा, जागतिकीकरण, उदारीकरण इत्यादी गोंडस शब्दांची पखरण करून सहदात घोळवून आपल्या कानात का तोंडात ओतला. आणि जगाच्या कल्याणाचा ठेका उदात्त अंत:करणाने यांनीच घेतल्याचा आव आणला. हेच खरे गरीबाचे-विकसनशील आणि अविकसीत देशाचे तारणहार आहेत. असा अस्सल

Scanned by CamScanner

देखावा त्यांनी रंगवला आणि आम्ही अर्ध्या हळकंडात पिवळे झालो. म्हणे याचा शेतीव्यवसायावर शेतमालावर, शेतकऱ्यांवर फारच चांगला परिणाम होईल हे एकूण पोट खपाटीला गेलेल्या शेतकऱ्यांच्याही मनात आशेच्या अकुरांन शेव घेतला. आता कृषी मालाला रास्त भाव मिळेल. कृषी क्षेत्रास आणि पर्यायाने देशाला मुक्त शेतमालाच्या व्यापाराने लाभ होईल. शेतमाल बाजारपेठेच्या मुक्ततेमुळे स्पर्धात्मक व कार्यक्षम देशांना संधी मिळेल. असा आशेचा एक मोठा फुगा फुगवून शेतकरी बसले. कुणी तरी म्हणाला की, भारतीय शेतकरी थोड्याच दिवसात म्हणे मारूती घेवून फिरेल. मारूतीतं राहिली दूर पण डंकेलचा दंडा बसला टाळक्यावर आणि धाडदिशी खाली पडला. डोळे वटारले. एवढ्या लवकर काऊन बा असं झालं. शेतमालांना योग्य भाव तर सोडाच पण आता शेतीचेच अस्तित्व धोक्यात आलं. सरकारने शेतीची अनुदाने कमी केल्यामुळे उत्पादन खर्चात वाढ झाली आहे. मुळातच भारतीय शेती उत्पादन कमी व उत्पादन खर्च जास्त. या चक्रव्युहात शेती सापडलेली असतांना वरून सबसिडी कमी झाल्याने आणखी जास्तच तळाला गेली आणि आयातीवरील बंधनं उठविल्याने स्वस्त शेतमालाची आयात प्रचंड प्रमाणात होत आहे. त्यामुळे इथल्या शेतकऱ्याला उत्पादन खर्चापेक्षाही कमी किंमतीत आपला माल विकावा लागत आहे. म्हणजेच मुद्दलात घाटा. घ्या आता मारूती.

सरकारच्या धोरणामुळे साखर, गहू, तेलबिया, नारळ रेशीम, मोहरी इत्यादी वस्तूंची आयात वाढल्याने त्यांच्या किंमती कमी झाल्या आणि सबसिडीच्या कमी मुळे उत्पादन खर्चात वाढ झाल्याने देशातील गहू, साखरेचे साठे मात्र उघड्यावर पडून आहेत. बीजदरात प्रचंड वाढ, पाणी पट्टीत वाढ, खतांच्या किमतीत वाढ या सर्वांचा परिणाम म्हणजे उत्पादन खर्चात वाढ झाली. या आघाताचा फटका शेतकऱ्यांना बसत आहे. जागतिकीकरणाच्या-उदारीकरणाच्या या जबरदस्त आघाताने शेतकरी भिषण दुष्चक्रात सापडला आहे. आत्महत्या आणि भूकबळीचा शिकार होत आहे आणि तज्ज्ञ म्हणतात की, या करारामुळे शेती क्षेत्रास अधिक महत्व प्राप्त झाले आहे. या करारा अंमलबजावणीसाठी १९९५ ते २००४ हा १० वर्षे कालावधी निश्चित करण्यात आला आहे आणि म्हणजे त्यांनी ठरविल्याप्रमाणे एकूण व्यापाऱ्याच्या व्यापार हा करारातंर्गत होत आहे. तुम्ही मेले तरी चाले पण करार मात्र पाळलाच पाहिजे. शेतकऱ्यांना देशोधडी लावणारा हा करार ७०% शेतीवर अवलंबून असणा देशातील शेतकऱ्यांच्या हिताचा नसेल, तर मग देशहिताचा तरी कसा ठरू शकेल ? याचा मायबाप सरका त्यांच्या स्वतःच्या गुंधाळ्यातून फुरसत मिळाल्यास विचार करावा नाहीतर तुका म्हणे उगे-मुगे रहा.

या कराराच्या निमित्याने दुसरा एक महत्वाचा आला आहे आणि तो म्हणजे खाजगीकरणाचा. सार्वजनि क्षेत्रातील उद्योगांची वित्तसंस्था, खाजगी भांडवलदार निर्गुंतवणूक (डिसइन्व्हेस्टमेंट) अशा गोंडस नावा विक्री करणे, आपल्या सरकारने हा मुद्दा तर फारच मना घेताआहे बुवा. केंव्हा एकदाचं सर्व सरकारी क्षेत्र खाजगीकरण करून टाकतो असं त्यांना झालं आहे. ता तावडतोब एक स्वतंत्र मंत्रालय त्यासाठी उघडून निर्गुंतवणूक मंत्रीही नेमला. (बहुधा जगातला हा असा ए मंत्री असावा) याचं एकच काम सार्वजनिक क्षेत्रा उद्योगांना विकणे, गिऱ्हाईक शोधणे, आता पर्यंत या मंत्र सरकारी क्षेत्रातील सार्वजनिक उपक्रमातील मारूती उद्यो मॉडर्न फुडस, लगान ज्युट मशिनरी, बाल्को सी.एम.सी.एच.सी.एम., इंडियन पेट्रोकेमिकल्स कॉर्पोरे लि. हॉटेल कार्पोरेशन, नॅशनल ॲल्युमिनियम कार्पोरेश पारदीप फर्टिलायझर्स, व्ही. एस.एन.एल., ओरि इलेक्ट्रीसिटी बोर्ड, शिपींग कार्पोरेशन ऑफ इंडिया यासारख्या १४ उद्योगांची वाट लावली. म्हणजे विकले असे न म्हणता त्यांची निर्गुंतवणूक प्रक्रिया पूर्ण केली असे म्हणतात. प्रक्रियेतील विशेष गोम म्हणजे या अजस्त्र व्यवसाय-उद्योगां योग्य मूल्यमापन करणे. म्हणजे हे उद्योग नेमके केवढ्या विकावे हे ठरविणे होते. या १०० कोटी लोकसंख्या असलेल्या भारतात म्हणे कंपनी वा तज्ज्ञ नाही जो

व्यवसायाचे उचित मूल्यमापन करू शकेल. मग सरकार पुढे, मंत्र्यापुढे मोठा बिकट प्रश्न पडला. आता करायचे कसे ? मग त्यांच्या विचार मंथनातून सार्वजनिक क्षेत्रातल्या उपक्रमाचे आर्थिक आणि व्यावसायीक मूल्यमापन करण्यासाठी सरकारने 'जार्डीन अँड फ्लोमिंग' या कंपनीची आणि त्याच तोडीचा दुसरा एक तेलक्षेत्र आणि तेल उद्योगातील मालमत्ता तसेच मूल्यमापन करणारा तज्ज्ञ वाल्टर जे. लेव्ही यांची आयात करण्याचे ठरले. खाजगीत असं ऐकलं की, ही कंपनी त्यांच्या देशात थर्डक्लास म्हणून गाजलेली आहे आणि हा तज्ज्ञ ही तथाकथितच आहे. पण सरकारने मोठ्या परिश्रमाने समुद्रमंथनातून काढलेल्या या रत्नांना आपण नावं ठेवणं शोभत नाही आणि बरं ही नाही, असो.

पण आपण, असो म्हटलं तरी दुसऱ्याला दिसत नाही असं थोडचं आहे. अगडबंब कामासाठी अगडबंब मानधन देवून आणलेल्या कंपनीने केलेली गुलू गुलू आणि इल्लु इल्लु दिसलचं. तर काय झालं म्हणे बाल्कोच्या खाजगीकरणाच्या वेळी तिच्या मालमत्तेचे जे मूल्यांकन केले गेले ते खूपच घटवून केल्या गेले. म्हणजे मालमत्तेची वास्तविक किंमत आणि मूल्यांकित नमूद केलेली किंमत यात जमीन आस्मानचा फरक होता. म्हणजेच मातीमोल किंमतीनं या संपत्तीची विल्हेवाट लावल्या गेली म्हणायची असे सरकारचे महालेखा परीक्षक म्हणतात आम्ही नव्हे. या बाबतीत आणखी एक उदाहरण मननीय आहे. मुंबईचे सेंटार हॉटेल (सार्वजनिक उपक्रमातील एक हॉटेल) एकाला ८३ कोटीरूपयात सरकारने तीन महिन्यापूर्वी विकले आणि या महाशयांनी तेच हॉटेल सहारा इंडिया कंपनीला ११५ कोटीत विकून ३२ कोटीचा नफा केवळ तीन महिन्यात कमावला हा काय गोडबंगाल आहे. हे आपणच ठरवा. आमचं काही म्हणनं नाही बुवा. मॉडर्न फुडस इंडस्ट्रिजच्या बाबतीतही भारत सरकारच्या महालेखापालांच्या अहवालात सरकारवर ताशेरे ओढण्यात आले आहेत. खरीददार कंपनी हिंदुस्थान लिव्हर ने स्वत: या उद्योगाची किंमत १६७.४७ कोटी एवढी ठरविली आणि सरकारने याच उद्योगांची किंमत केवळ ७२.५५ कोटी ठरविली हा गौडबंगालीचा प्रकार नव्हे तर काय ?

इतक्यात मात्र या निर्गुंतवणूकीच्या मुद्यावर सरकारमध्ये धुसफूस सुरू झाल्याचे दिसते. त्यामुळे ७८० अब्ज रूपये निर्गुंतवणुकीचे लक्ष ठरवूनही दहाव्या पंचवार्षिक योजनेच्या आराखड्यास मंजुरी देतांना त्याबद्दल ब्र काढण्यात आलेला नाही. हा घुमजावचा प्रकार नक्की काय आहे. याचा उलगडा अजून झालेला नाही. पण सध्या मात्र सरकारला जागतिकीकरणाची व उदारीकरणाची फारच घाई झालेली दितसे. यामागे देशहित, सामान्याचे हित आहे की आणखी काही आहे ? हे एक कोडेच आहे. तशी मंत्रालयाच्या कामाची उरक जोरदार आहे. अनेक मंत्रालयात कामं होत नसल्याची ओरड सतत ऐकू येते. पण याची गतीमात्र नेत्रदिपवणारी आहे. याबद्दल त्यांना शाबासकी द्यायलयाच हवी. नाही कां ? पण आपल्यात तो सुज्ञपणा अजूनपर्यंत आला नाही हे दुर्दैवच की नाही.

आता हे उद्योग विकून येणाऱ्या पैशातून काय करायला हवे बरे. सरकार म्हणे देशाच्या अंदाजपत्रकातील तूट भरून काढण्यासाठी तो वापरत आहे. म्हणजे घर खर्चासाठी घरातील दागदागिणे विकण्याचा हा प्रकार आहे. सामान्य शेतकरी तरी किमान स्वत:वरील कर्ज फेडण्यासाठी याचा उपयोग करतो. आणि मग काही उरल्यास घरखर्च. पण इथे तर नुसता अदूरदर्शीपणाचा व्यवहार चालला आहे. या सरकारी तज्ञांना काय म्हणावे समजत नाही. खरं तर सार्वजनिक क्षेत्रातील उद्योग विकायला काढणे हेच मुळात संयुक्तिक नाही. पण काही उद्योग तोट्यात चाललेले असतील. काही डबघाईस आलेले असतील तर अशा उद्योगाची विल्हेवाट अत्यंत जबाबदारीने लावून देशहित साधण्याच्या दृष्टीने प्रयत्न व्हायला हवे होते. मात्र इथे अगदी उलट चालले आहे. फायद्यात असलेल्या भारत पेट्रोलियम, हिंदुस्थान पेट्रोलियम सारख्या कंपन्या प्रचंड नफ्यात चालत असून लाभांशाच्या रूपाने कोट्यावधी रूपयाचा नफा सरकारला देत आहेत. पण सरकारला मुळासकटच उपटण्याची घाई झाली आहे. खरे तर आपल्या देशाला



Scanned by CamScanner

आर्थिक गुलामगिरीत लोटण्याचे पद्धतशीरपणे कारस्थान या बलाढ्य बहुराष्ट्रीय कंपन्या करीत आहेत. अशा परिस्थितीत तेलासारखे उर्जाक्षेत्र परकीयांच्या ताब्यात देणे किंवा खाजगी क्षेत्राकडे देवून त्यांची गुलामीच पत्करण्यासारखेच आहे आणि सरकारचे नियंत्रण जसजसे सैल होत जाईल तसतसा देश भांडवलदारांच्या ताब्यात जाईल मग तो भांडवलदार स्वदेशी असो की विदेशी असो त्यात सामान्याच्या दृष्टीने विशेष फरक नाही म्हणूनच सरकारने सार्वजनिक क्षेत्राचे खाजगीकरण करतांना देशाचे व्यापक हित लक्षात घेवून किमान फायद्यात चालणाऱ्या सरकारी उद्योगांचे खाजगीकरण करून नये, विक्री करतांना शक्य असल्यास भारतीयांनाच करावी, पेट्रोलियम कंपन्या, इंडियन ऑयल, उर्जा उत्पादन, बँका या सारख्या मूलभूत स्वरूपाच्या उद्योगांचे कोणत्याही परिस्थिती निर्गुंतवणुकीकरण करण्यात येवू नये. याबाबत कुणीही कसाही सल्ला देवो. तो विदेशी सल्ला असला तरी मान्य करू नये. या दृष्टीने सरकार मधील काही मंत्र्यांना उशीरा कां होईना जाग आली हे आपले सुदैव समजायला हरकत नाही. पण या देशाचे पुढील भविष्य उज्वल असेलच हे आता छाती ठोकपणे सांगण्याची हिंमत होत नाही कारण जो दुसऱ्यावरी विसंबला, त्याचा कार्यभाग बुडाला हे संत वचन मायबाप सरकारने तरी लक्षात घ्यायलाच हवे.

केवळ साडे आठ वर्षातले हे दुष्परिणाम तज्ज्ञांच्या, किंवा सरकारच्या लक्षात येत नसतील आणि असेच या विदेशी उदारीकरणाचे गोडवेच गात राहिले तर आपले गाणे सुरूच राहिल आणि हाती मात्र कटोरा असेल. बस फरक एवढाच जय उदारीकरण, जय खाजगीकरण आणि जय जागतिकीकरण.

✠✠✠✠

> 'शिक्षकाची किंमत त्याच्या विद्वत्तेवरून ठरत नाही, तर वर्तनावरून ठरते.'
>
> -डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन

Scanned by CamScanner



# 'जागतिकीकरण व भारतीय गरीबी'

**प्रा. राजाभाऊ दुरुगकर**
नवप्रतिभा कनिष्ठ महाविद्यालय,
मिरची बाजार, नागपूर

१५ एप्रिल १९९४ रोजी भारताने जागतिक व्यापार संघटना करारावर स्वाक्षरी केली. १ जानेवारी १९९५ रोजी जागतिक व्यापार संघटना अस्तित्वात आली. जागतिक व्यापार संघटना जागतिक स्तरावरील देशादेशातील व्यापार, आयातीत वस्तू वरील जकात, वस्तू निर्यातीवरील कोटा इ. नियमन ह्या संस्थेद्वारे केले जात होते. जागतिक सभेत विभिन्न संशोधन कार्यावर नियंत्रण व त्यासाठी पेटंट कायद्यात दुरुस्तीचा प्रस्ताव आर्थर डंकेल यांनी मांडला. त्यावर प्रदीर्घ काळ चर्चा चालली. ह्या प्रस्तावाला जागतिक, पातळीवरील विकसनशील देशांनी विरोध दर्शविला. श्रीमंत देशांनी कुटील नीतीचा वापर करून जागतिक पातळीवरील विकसनशील देशांना करारावर सह्या करण्यास भाग पाडले. जागतिकीकरण मुक्त व्यापार व खाजगीकरण ह्या सर्व बाबी विकसनशील राष्ट्रातील लोकांच्या कल्याणासाठीच असल्याचा आभास निर्माण करण्यात आला होता. हे आता विकसनशील राष्ट्रात स्पष्ट होऊ लागले आहे.

जागतिकीकरणाच्या प्रक्रियेमुळे भारताची कृषीवर आधारभूत आर्थिक रचनाच उध्वस्त होत आहे. भारतात शेती क्षेत्राला दिली जाणारी आर्थिक मदत व अनुदाने कमी करण्यात आली व विदेशी कंपन्यांनी देशात भांडवल गुंतवणूकीसाठी मोठ्या प्रमाणात सोयी सवलती उपलब्ध करून देण्यात येत आहेत. देशात १४३० शेतमाल व अन्य उत्पादनासाठी आयात खुली केली. त्यामुळं विदेशातून मोठ्या प्रमाणावर शेतमाल आयात होऊन तो स्वस्त दरात विकला जात आहे. याचे नुकतेच उदा. म्हणजे चीन मधुन स्वस्त दराने रेशीम आयात होऊ लागल्याने भारतातील रेशम उद्योग आर्थिक संकटात सापडला. नारळाची आयात मोठ्या प्रमाणावर झाल्याने देशातील नारळाचे भाव अर्ध्यापेक्षा खाली आलेत. दुधजन्य पदार्थांवर श्रीमंत देशांनी सबसीडी दिल्याने स्वस्तदरात दुग्धजन्य पदार्थ आयात होत आहे. परिणामी भारतातील दुग्ध उत्पादन व्यवसायावर त्याचा विपरीत परिणाम घडून आला आहे. भारतातील अनुदान कपातीमुळे बीज दरात वाढ, रासायनिक खतांच्या किमतींत बि-बियाणांच्या किमतीत, वाहतूक खर्चात वाढ झाल्याने शेतमाल उत्पादन खर्च सतत वाढतो आहे. परिणामी विदेशी शेतमाल सबसीडी सह असल्याने बाजारपेठ काबीज करीत आहे. तर भारतीय शेतमाल खरेदीसाठी बाजारपेठ नाही.

जुलै २००२ मध्ये अमेरिकेने २ लाख ५६ हजार कोटींची सबसीडी आपल्या शेतकऱ्यांना दिली. भारतात मात्र सबसीडी कपात केल्यामूळे शेती उद्योग पूर्णत: कोसळून पडणार आहे की काय? अशी अवस्था निर्माण झाली आहे. भारतात शेती उत्पादनाचा खर्च जास्त व शेतमालाला मिळणारी किंमत कमी अशी स्थिती चालू आहे. जागतिकीकरणामुळे शेती उद्योग धंद्यांचा विकास रोजगारांचया संधीत वाढ व त्यातून दारिद्र निर्मूलन ही संकल्पना खोटी ठरत आहे.

१९९१ मध्ये खजगीकरण व उदारीकरणावर भर देत भारताने नवीन आर्थिक व औद्योगिक धोरण अमलात आणले. तेव्हापासून अनेक देशातील श्रम संघटनांनी जागतिक व्यापार संघटनेला विरोध दर्शविला. जागतिकीकरणामुळे निरनिराळ्या देशातील सर्व सामान्य जनता भरडली जावून बेकारी, गरिबी व विषमता वाढत जाईल हे भाकीत खरे ठरत असल्याचा अनुभव देशातील सरकारांना देखील येत आहे. जागतिक व्यापार संघटना मुठीभर प्रगत देशाच्या हिताची जोपासना करीत असल्याने

Scanned by CamScanner

दिसून येत असून जी-७ राष्ट्रांमध्ये देखील बेकारीचे प्रमाणात वाढ होत असल्याचे आढळून आले . भारतात १९८० च्या दशकात सार्वजनिक व खाजगी क्षेत्रातील रोजगार वाढीचा दर १.७४१ होता. उदारीकरणाच्या काळात १९९१ मध्ये १.४४२ १९९४ मध्ये ०.७३६, १९९८ मध्ये ०.४६२ तर २००० मध्ये ०.१४८ एवढ्यावर आला. सरकारी अहवालानुसार नोंदणीकृत बेकारांची संख्या ३.५६ होती. १९९१-२००० या दशकात बेकारीचा सरासरी दर २.५% होता तर मागील दशक म्हणजे १९८१ ते ९० या कालातील बेकारीचा सरासरी दरापेक्षा जास्त आहे.

जागतिकीकरणाच्या काळात देशात नवीन उद्योग धंदे सुरू होऊन रोजगार वाढेल अशी अपेक्षा होती परंतु गेल्या १० वर्षात रोजगार न वाढता उलट घट झाली असल्याचे आकडेवारी वरून स्पष्ट होते. भारतातील अनेक लहान उद्योग आजारी झाल्याने तेथील कामगार बेरोजगार होऊ न दारिद्रयावस्था निर्माण झाली आहे. आजमितीस दारिद्रयरेषेखाली ३५.५ कोटी लोक जीवन जगत आहेत.

उदारीकरणाच्या काळात देशात जीवनावश्यक वस्तूंच्या किंमती वाढल्या. सरकार किंमतीवर नियंत्रण ठेवू शकले नाही. लोकांच्या हातात पुरेशी क्रयशक्ती नसल्यामुळे उपभोग स्तरावर परिणाम होवून गरीबीच्या स्वायत्तेत वाढ घडून आली. सरकार गरीबी निर्मूलन कार्यक्रमांतर्गत प्रतिवर्ष ४०००कोटी रूपये खर्च करते. परंतु योग्य प्रमाणात त्याचे वाटप गरीबापर्यंत होत नाही. ही वास्तविकता आहे. १९९७ मध्ये भारताची लोकसंख्या ९५.१ कोटी होती. २००१ मध्ये १०२.९ कोटी झाली. म्हणजे ४ वर्षात लोकसंख्येतील वाढ ५.८ कोटीने झाली. २००२ पर्यंत लोकसंख्या ६ कोटीने आणि २०१२ मध्ये लोकसंख्या ७ कोटीने वाढणार आहे. लोकसंख्येची वाढ ही सरकारी समोरची गंभीर समस्या आहे.

भारतातील खाजगीकरण व उदारीकरण यामुळे देशाच्या विकासाच्या दराच्या तुलनेत गरीबी कमी होवू शकली नाही. गेल्या ५५ वर्षांच्या काळात भारतातील गरीबी हटली नाही. तेथे खाजगीकरण व उदारीकरणामुळे गरीबी कशी काय हटवणार ?

खाजगीकरणाची अर्थव्यवस्था ही शोषणा[illegible] आधारित अर्थव्यवस्था असल्याने खाजगी क्षेत्राच्या एकाधिकार शाहीमुळे नव्याने समाजाचे शोषण चालू होणा[illegible] हे निश्चित. कारण कोणतेही खाजगी क्षेत्र नफ्याचे उद्दि[illegible] समोर ठेवूनच गुंतवणूक करीत असते. सेवेसाठी गुंतवणू[illegible] ही संकल्पनाच खाजगी क्षेत्राला मान्य नाही. अशा वेळे[illegible] सरकारने सार्वजनिक क्षेत्राचे खाजगीकरण करून निर्गुंतवणू[illegible] व श्रमिक कायद्यात बदल करीत आहे. ते भविष्यात[illegible] भारताला परवडण्यासारखे नाही. सार्वजनिक क्षेत्राती[illegible] उत्पादन क्षमता व कार्यक्षमता वाढविण्यासाठी संपू[illegible] उद्योगाचा मालकी हक्क व व्यवस्थापन खाजगी क्षेत्रा[illegible] सोपविल्याने खरोखरच देशांमध्ये रोजगाराच्या मोठ्या सं[illegible] उपलब्ध होणार आहेत काय ?

भारतात मोठ्या उद्योगांपेक्षा कुटीर व लघू उद्योगां[illegible] संख्या जास्त आहे. २००२-०३ च्या अंदाजपत्राकत कें[illegible] अर्थमंत्र्यांनी लघू उद्योगांच्या विकासासाठी एक विशेष पॅ[illegible] घोषित केले. यापूर्वी देखील लघू उद्योगांच्या विकासास[illegible] आर्थिक मदतीचे पॅकेज घोषित झालेले होते. परंतु असे दि[illegible] आले की, लघू उद्योगांना दिल्या जाणाऱ्या आर्थिक मदतीमु[illegible] या उद्योगांची कर्ज फेडीची क्षमता अपेक्षेप्रमाणे वाढू शक[illegible] नाही. ३१ मार्च २००० मध्ये लघू उद्योगांकडे असले[illegible] थकबाकीचे प्रमाण ४५६८ कोटी रूपये होते. ते मार्च २०[illegible] पर्यंत ४८४४५ कोटी रूपये पर्यंत वाढले. याचे का[illegible] भारतातील तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात झालेल्या संशोधन व विका[illegible] कार्यक्रमाचा लाभ केवळ मोठ्या उद्योगधंद्यांना झाल[illegible] परिणामी उत्पादन खर्च कमी करून स्पर्धात्मक क्षम[illegible] वाढविण्याबाबत लघु क्षेत्र पूर्णपणे अयशस्वी ठरले. त्यामु[illegible] लघुक्षेत्र आजारी होवून अनेक कामगार बेरोजगार झाले आहे[illegible] त्याचबरोबर जागतिकीकरणाच्या काळात देशाचा आर्थि[illegible] विकास दर वाढेल. त्या प्रमाणात देशातील रोजगार पातळी[illegible] वाढ होईल हे निश्चितपणे सांगता येत नाही. २००२-०[illegible] च्या अंदाजपत्रकात देशात रोजगार निर्मितीसाठी अर्थमंत्र्यांनी जाहीर केलेली जयप्रकाश ग्रामीण योजना, जवाहर ग्रामीण समृद्धी योजना, संपूर्ण ग्रामीण रोजगार योजना, रोजगा[illegible]



Scanned by CamScanner

मूल्यांकन योजना प्रत्यक्ष स्वरूपात कार्यान्वित होण्यात अनेक अडचणी येणार असून त्यामधून किती लोकांना रोजगार उपलब्ध होईल हे काळच सांगणार आहे.

उद्योग क्षेत्रामध्ये निर्माण झालेल्या मंदीच्या लाटेमुळे रोजगार वाढीला खीळ बसलेली आहे. ग्रामीण व शहरी भागातील सुशिक्षीत व अल्पशिक्षीत बेरोजगार युवकांनी व्यावसायीक प्रशिक्षणाची कास धरून स्वत:चा रोजगार निर्माण करावा अशी शासनाची धारणा आहे. परंतु अल्प व अर्धवट व्यवसाय शिक्षणाने रोजगार व स्वयं रोजगार खरोखरच निर्माण होणार आहे काय ?कारण अगोदरच पूर्ण वेळ शिक्षण व प्रशिक्षण घेतलेल्या बेरोजगारांची संख्या जास्त आहे. पूर्ण प्रशिक्षण घेतलेला हा बेरोजगार मंदीच्या काळात स्वत:चा व्यवसाय सुरू करण्यास मागे पुढे पाहतो अशावेळेस अल्पशिक्षण व प्रशिक्षण घेतलेल्या बेरोजगारांचे काय ? मंदीच्या लाटेमुळे देशातील मध्यम व लघू उद्योग बंद पडण्याच्या मार्गावर असतांना व्यावसायिक शिक्षण व प्रशिक्षण घेतलेले युवक आपले पैसे गुंतवून स्वत:चा उद्योग धंदा स्थापन करण्याचा प्रयत्न करील काय ? याशिवाय देशात नवनवीन विदेशी कंपन्या स्थापन होत असतांना त्यांचेशी लहान उद्योग स्पर्धा करू शकेल काय ?

सरकार स्वत:चेच उद्योग तोट्यात चालत असल्याने जागेसह मोठ्या भांडवलदारांना विकून बेरोजगारांच्या संख्येत वाढ करीत आहे व अगोदरच बेरोजगार असलेल्यांना स्वयंरोजगार करण्यास सांगत सुटले आहे. सरकारने प्रथम मोठ्या भांडवली गुंतवणूकीच्या उद्योगांची कार्यक्षमता वाढविणे अतिशय आवश्यक आहे. त्यामुळे मोठ्या उद्योगांना साहित्य, सुटे भाग, अवजारे, कच्चा माल व इतर आनुषंगीक सामुग्री पुरविण्यासारख्या उद्योगाद्वारे बेरोजगारांना स्वयं रोजगार प्राप्त होवू शकेल अन्यथा सरकारने स्वयंरोजगार निर्मिती करण्यासाठी देत असलेल्या तांत्रिक शिक्षण व प्रशिक्षणाचा कोणताही फायदा देशातील बेरोजगार युवकांना होणार नाही.

जागतिकीकरणाच्या अवस्थेत भारताला आंतरराष्ट्रीय स्तरावर मालाची निर्यात वाढवावयाची असेल तर तंत्रज्ञानाच्या सोयी, कामाचा वेग, जलद वाहतूकीच्या कार्यक्षम सोयी व उच्च दर्जाची श्रमिक कार्यक्षमता कठोर पणे निर्माण करणे आवश्यक आहे तरच भारतीय उद्योग विदेशी कंपन्यासमोर टिकाव धरू शकणार आहे. गेल्या ५५ वर्षाच्या कालखंडात देशाचे नियमितीकरण वाढू शकले नाही. नियोजनाच्या अंमलबजावणीतील दोष, भ्रष्टाचार व लक्ष गाठण्याप्रती असलेली उदासीनता, ठरविलेला विकास दर कधीच लादू शकले नाही. त्यामुळे अद्यापही भारतात गरीबांचे प्रमाण ३६% आहे. जागतिकीकरण व उदारीकरणाच्या प्रक्रियेत भारत सहभागी झाल्याने भारतातील केवळ वरच्या २०% औद्योगिक घराण्यांचा फायदा होणार असून ८०% लोकांना वस्तूच्या वाढत्या किंमती बेरोजगारी, वाढती लोकसंख्या, उत्पन्नातील कमतरता इत्यादी गोष्टींना सातत्याने तोंड द्यावे लागणार हे निश्चित.

"निराकाराकडून साकाराकडे, साकाराकडून सदाचाराकडे नेते ते शिक्षण." -वि. वि. चिपळूणकर


हार्दिक शुभेच्छा !

ज्योती

मेडिकल स्टोअर्स

देशी व विदेशी दवाओंके विश्वसनीय विक्रेता

पठाणपूरा रोड, महात्मा गांधी चौक, चंद्रपूर, फोन : ६४३६८

# वर्तमान काळातील भारताचे मौद्रीक धोरण

डॉ. डी. एन. पाटणकर,
धरमपेठ कॉलेज, नागपूर

मुद्रेचा वापर नसणाऱ्या व पूर्णपणे वस्तु विनिमय पद्धतीने व्यवहार करणाऱ्या, अविकसीत अर्थव्यवस्था केंव्हाच इतिहास जमा झाल्या आहेत. मुद्रेचा वापर असूनही मुद्रेला आर्थिक निर्णायात महत्व न देणाऱ्या, केंद्रीय निर्देशात साम्यवादी अर्थव्यवस्थांनी देखील, भांडवलशाही बाजार अर्थव्यवस्था स्वीकारून, मुद्रेचे महत्व मान्य केले आहे. आधुनिक काळात सर्वच देशांच्या अर्थव्यवस्था मुद्रेच्या वापरावर आधारित आहेत. ह्या देशांच्या आर्थिक घडामोडींमध्ये त्या देशाचे कायदेशीर चलन तसेच Legel tender व्यापारी अधिकोषांदवारे निर्मित प्रत्यय मुद्रा Credit Money महत्वाची भूमिका बजावतात. मुद्रेच्या परिमाणाचा देशाच्या अर्थव्यवस्थेवर मोठ्या प्रमाणावर परिणाम होत असतो. मुद्रा परिमाण सिद्धांतानुसार (Quantity Theory of Money) सर्वसाधारणपणे मुद्रेच्या परिमाणात वाढ झाल्यास किंमतीच्या पातळीत वाढ होवू लागते म्हणजे Inflation किंवा मुद्रा स्फितीची परिस्थिती निर्माण होते. याउलट मुद्रेच्या परिमाणात घट झाल्यास किंमतीच्या पातळीत घट म्हणजेच Deflation किंवा अस्फितीची परिस्थिती निर्माण होते. किमंतीच्या पातळीतील हे बदल देशतील उत्पादन, रोजगार, उत्पन्न विदेशी व्यापार तसेच आर्थिक विषमता, सामाजिक मुद्दे इत्यादीवर व्यापक परिणाम घडवून आणतात. ह्यातील काही परिणाम देशहिताच्या दृष्टीने हितकारक व काही परिणाम अपायकारक असल्याने किंमतीतील हे बदल योग्य प्रमाणात व योग्य स्वरूपाचे असणे आवश्यक असते. किंमतीतील हे बदल मुद्रा परिमाणाद्वारे नियंत्रीत करता येणे शक्य असल्याने आधुनिक काळात सर्व देशात मुद्रेचे परिमाण व त्याची उपलब्धता यावर नियंत्रण ठेवण्यासाठी केंद्रिय अधिकोष स्थापन करण्यात आले आहेत. कायदेशीर चलन आणि प्रत्यय मुद्रा ह्याच्या परिमाणाच्या नियंत्रणाचे कार्य पार पाडता यावे ह्यासाठी केंद्रीय अधिकोषाला चलन निर्मितीचा एकाधिकार व अधिकोषदरातील बदल (Change in Balance Rate खुल्या बाजारातील व्यवहार (Open Market Operations) यासारखी प्रत्यय नियंत्रणाच्या उपाययोजना अंमलातआणण्याचे अधिकार दिले आहेत. ह्या अधिकारांचा वापर करून केंद्रिय अधिकोष मुद्रेच्या परिमाणाचे, देशाच्या आर्थिक धोरणानुसार वेगवेगळी उद्दिष्टे समोर ठेवून नियंत्रण करत असते. ह्या संबंधीच्या केंद्रीय अधिकोषाच्या धोरणालाच मौद्रीक धोरण (Monetary Policy)असे म्हणतात. एखाद्या विशिष्ट परिस्थितीत केंद्रीय अधिकोषांनी एखादे विशिष्ट धोरण का अवलंबिले हे समजण्यासाठी आपल्याला मौद्रीक धोरणाच्या विविध उद्दिष्टांची माहिती असणे आवश्यक आहे.

### मौद्रीक धोरणाची प्रमुख उद्दिष्टे

**१. किंमतीचे स्थैर्य (Price Stability)**-किमतीच्या पातळीत हळू हळू वाढ होत असल्यास (म्हणजेच मुद्रास्फिती सौम्य स्वरूपाची असल्यास), उत्पादनाला प्रोत्साहन मिळून रोजगार व उत्पन्नात वाढ होते आणि देशाची आर्थिक भरभराट होवू लागते. परंतु ही विशिष्ट परिस्थिती सोडल्यास सर्वसाधारणपणे मुद्रास्थिती व अस्फिती ह्या दोन्ही अवस्था अनिष्ट समजल्या जातात व ह्या दोन्ही अवस्था टाळून किमतीची पातळी स्थिर राखणे इष्ट समजल्या जाते म्हणून किंमतीच्या पातळीची स्थिरता हे मौद्रीक धोरणाचे एक प्रमुख उद्दिष्ट मानले जाते.

**२. पूर्ण रोजगार (Full Employment)**- १९२९ च्या जागतिक महामंदीच्या काळातील बेकारीचे अनिष्ट परिणाम अनुभवल्यानंतर, बेकारी दूर करून पूर्ण रोजगाराची परिस्थिती स्थापन करणे, हे बहुतेक देशांच्या आर्थिक धोरणाचे मुख्य उद्दीष्ट ठरविण्यात आले. बेरोजगारीची परिस्थिती प्रभावी मागणीच्या (effective de-

mand) कमतरतेमुळे निर्माण होत असल्याने, प्रभावी मागणी निर्माण करून रोजगार निर्माण करणे हे मौद्रीक धोरणाचे महत्वाचे उद्दिष्ट मानण्यात येवू लागले.

**३. आर्थिक विकास :** आधुनिक काळात भारतासारख्या अनेक अविकसीत देशांचा जलद गतीने आर्थिक विकास घडून यावा ही इच्छा असते. असा विकास घडून येण्यासाठी बचत व भांडवली गुंतवणूक ह्यात मोठ्या प्रमाणात वाढ होणे आवश्यक असते. म्हणून बचत व गुंतवणूकीला चालना देवूनआर्थिक विकासाचा वेग वाढविणे हे ह्या देशाच्या मौद्रीक धोरणाचे महत्वाचे उद्दिष्ट मानले जाते.

**४. विनिमय दराचे स्थैर्य-** विदेशी व्यापार सुरळीत चालण्यासाठी विनिमय दर स्थित राखणे आवश्यक असते. विनिमय दर हा बाजारातील विविध मुद्राच्या मागणी पुरवठ्यावर अवलंबून असल्याने, मुद्रेच्या पुरवठ्यात बदल घडवून विनिमय दरातील बदल प्रभावित करता येतात व विनिमय दरात स्थैर्य आणणे शक्य होते म्हणून मुद्रेच्या पुरवठ्यात आवश्यकतेनुसार बदल करून विनिमय दर स्थिर राखण्यास मदत करणे हे मौद्रीक धोरणाचे परंपरागत उद्दिष्ट आहे.

वरील उद्दिष्टे साधण्यासाठी ज्या उपाययोजना केल्या जातात त्या प्रामुख्याने व्यापारी अधिकोषाद्वारे होणाऱ्या प्रत्ययावर नियंत्रण करणाऱ्या असतात. ह्यापैकी काही महत्वाच्या उपाययोजना पुढील प्रमाणे.

**अ. संख्यात्मक नियंत्रणे (Quantitative Controls):**

१. अधिकोष दरातील बदल(Change in Bank Rate)

२. रोखता अनुपातात बदल(Change in Cash Reserve Ratio)

३. खुल्या बाजारातील व्यवहार(Open Market Operations)

**ब. गुणात्मक नियंत्रणे Qualitative Controls:**

१. कर्जावरील तारण सीमेत बदल (Change in inargiv requirements)

२. ग्राहक कर्जावरील नियंत्रणे (Control of consumer credit)

३. प्रत्ययाचे वाटप (Rationing of credit)

४. नैतिक प्रभाव (Moral suasion)

मौद्रीक धोरण हे देशाच्या एकूण आर्थिक धोरणाचाच एक भाग असल्याने वर्तमान काळातील मौद्रीक धोरणाची चर्चा करतांना आपल्याला बदललेल्या आर्थिक धोरणाचा संदर्भ लक्षात ठेवणे आवश्यक आहे. भारताच्या सध्याच्या आर्थिक धोरणातील सुरूवात १९९० च्या सुमारास झाली. त्यापूर्वी स्वातंत्र्यानंतरच्या चाळीस वर्षाच्या काळात भारताने अवलंबिलेल्या आर्थिक धोरणाची वैशिष्ट्ये खालील प्रमाणे होती.

अ. खाजगी क्षेत्रातील उद्योग आणि सेवा ह्यावर अनेक प्रकारचे सरकारी निर्बंध व नियंत्रण

ब. विदेशी व्यापार आणि गुंतवणुक ह्यावरील व्यापक स्वरूपाचे निर्बंध व नियंत्रण आणि त्यामुळे इतर देशांच्या अर्थव्यवस्थापासून सरंक्षित असलेली बंदिस्त अर्थव्यवस्था (closed economy)

क. सरकारी क्षेत्राचीअर्थव्यवस्थेतील वर्चस्वाची भूमिका.

अशी वैशिष्ट्ये असलेल्या अर्थव्यवस्थेत खाजगी गुंतवणूक किंवा विनिमय दर प्रभावित करण्याच्या दृष्टीने मौद्रीक धोरणाला फारसा वाव नव्हता. त्यामुळे ह्या काळात मौद्रीक धोरणांची उद्दिष्टे प्रामुख्याने मुद्रास्फितीला आळा घालण्यासाठी रिझर्व्ह बँकेने वेळोवेळी अधिकोष दर १९९० पर्यंत बारा टक्यापर्यंत पोहचवला. वाढलेल्या अधिकोष दरामुळे बाजारातील व्याजदर सोळा ते अठरा टक्यापर्यंत पोहचले. जगातील इतर देशांतील व्याज दराच्या तुलनेत हे दर बरेच जास्त होते. रोखता अनुपात पंधरा टक्यापर्यंत वाढल्याने व्यापारी बँकाची लाभ क्षमतेत घट झाली. सरकारला निधी उपलब्ध करून देण्यासाठी रिझर्व्ह बँकेने सरकारी कर्ज रोखण्यासाठी मोठ्या प्रमाणात विक्री केली. ह्या काळात खुल्या बाजारातील व्यवहारांमध्ये विक्रीचे प्रमाण खरेदी पेक्षा जास्त राहिले.

१९९० च्या सुमारास सुरू झालेल्या आर्थिक सुधारणांचे तीन प्रमुख पैलू आहेत. १. उदारीकरण, २.

Scanned by CamScanner

खाजगीकरण, ३. जागतिकीकरण. उदारीकरणामुळे खाजगी उद्योगांवर असलेले अनेक निर्बंध काढून टाकण्यात किंवा शिथिल करण्यात येत आहेत. खाजगीकरणामुळे सरकारी उद्योगांची मक्तेदारी नष्ट होवून अर्थव्यवस्थेचा एक मोठा हिस्सा खाजगी गुंतवणूकीसाठीखुला होणार आहे. जागतिकीकरणामुळे व विशेषकरून भारत जागतिक व्यापार संघटनेचा (W.T.O.) सदस्य झाल्यामुळे भारताची अर्थव्यवस्था पूर्वीसारखी बंदिस्त राहणार नसून तिचे जगातील इतर देशांशी व्यापार विषयक आदान प्रदानात मोठ्या प्रमाणात वाढ होईल. त्यामुळे इतर देशांच्या आर्थिक परिस्थितीचा भारतीय अर्थव्यवस्थेवर परिणाम होणे अटळ आहे. या बदललेल्या आर्थिक परिस्थितीत भारतीय उद्योगांना आता बाजारात इतर देशी तसेच विदेशी उद्योगांच्या तीव्र स्वरूपाच्या स्पर्धेला तोंड द्यावे लागेल. अशा स्पर्धात्मक वातावरणात, उत्पादकांना गुंतवणूक करतांना, उत्पादन खर्च प्रभावित करणाऱ्या व्याज दराचा विचार करणे आवश्यक होईल. ह्या कारणाने तसेच अस्थिरता निर्माण करणाऱ्या भांडवली प्रवाहांना आळा घालण्यासाठी भारतातील व्याजाचे दर जगातील इतर देशातील व्याजदराच्या पातळीवर आणणे आवश्यक आहे.

जगातील इतर देशात व्याजाचे दर दोन ते तीन टक्के एवढे कमी असल्याने भारतातील व्याज दर देखील हळू हळू घटविण्याचे रिजर्व्ह बँकेचे वर्तमान धोरण आहे. ह्या धोरणाच्या फलस्वरूप पाच वर्षापूर्वी व्यापारी अधिकोषाच्या ठेवींवरील चौदा ते पंधरा टक्के व्याजाचे दर आता सात ते आठ टक्यापर्यंत खाली आले आहेत. अगदी अलिकडे म्हणजे २९ ऑक्टोबर २००२ ला पुन्हा एकदा अधिकोष दरात कपात करून तो ६.२५ टक्के एवढा कमी करण्यात आला आहे. व्याज दराप्रमाणेच रोखता निधी अनुपातात कपात करून तो ४.७ टक्के एवढा करण्यात आला आहे. ह्या दोन्ही प्रकारच्या कपातीमुळे प्रत्ययाचा पुरवठा अधिक सुलभ होवून तो गुंतवणूकीला मिळण्याची अपेक्षा आहे.

व्याज दर कमी करण्याच्या या धोरणावर अधिकोषाचे ठेवीदार नाराज आहेत. एक ठराविक रक्कम बँकेत पोष्टात ठेवून त्याच्या व्याजावर निर्वाह करणाऱ्या लोकांचा एका मोठा वर्ग ह्या देशात आहे. व्याज दर कमी झाल्याने ह्या लोकांना आपल्या ठेवींवर पूर्वीपेक्षा कमी उत्पन्न मिळेल. परंतु ह्या बाबत सरकारचा असा युक्तीवाद आहे की ठेवींवरील व्याजदर जरी पूर्वी पेक्षा कमी असला तरी त्याचबरोबर मुद्रास्फितीचा दर ही सात ते आठ टक्यापासून दोन ते तीन टक्के पर्यंत खाली आल्याने वास्तविक व्याज दर फारसा कमी झालेला नाही.

व्याजदर व रोखता अनुपात कमीकरून गुंतवणूकीला चालना देण्याच्या धोरणावर ही टीका करण्यात येते. व्याज दर येवढ्या मोठ्या प्रमाणावर कमी होवूनही मंदिच्या परिस्थितीत फार सुधारणा झाल्याचे दिसत नाही. अनेक तज्ज्ञांच्या मते सध्याच्या मंदीच्या परिस्थितीला भारतातील राजकीय अस्थिरता, इतर देशतील मंदीची परिस्थिती असे अनेक इतर घटक कारणीभूत आहेत. त्यामुळे केवळ मौद्रीक धोरणाद्वारे मंदीच्या परिस्थितीत सुधार होणे शक्य नाही.

मौद्रीक धोरणाद्वारे अपेक्षित परिणाम न दिसून येण्याची जी कारणे आहेत त्यामध्ये सर्वात जास्त महत्वाचे कारण म्हणजे सरकारचे राजकोषीय धोरण (Fiscal Policy) दर वर्षी उत्पन्नापेक्षा खर्च जास्त झाल्याने सरकारच्या अंदाजपत्रकात मोठी तूट असते. ही तूट रिझर्व्ह बँकेकडून कर्ज घेवून भरून काढली जाते. तूट भरून काढण्याच्या या पद्धतीमुळे मुद्रेच्या पुरवठ्यात अनुचित वाढ घडून येते. ह्या शिवाय ही तूट बहुतांशी अनुत्पादक खर्चामुळे निर्माण झाली असल्याने त्याचे अर्थव्यवस्थेवर गंभीर परिणाम होतात. म्हणून मौद्रीक धोरण देशाच्या अर्थव्यवस्थेला नवे वळण देण्यात यशस्वी ठरायचे असेल तर सरकारला अंदाजपत्रीय तूट कमी करून आपली जबाबदारी पार पाडली पाहिजे.

मौद्रीक पद्धतीच्या कार्याचा आढावा घेण्यासाठी श्री चक्रवर्ती ह्यांचा नेतृत्वाखाली नेमलेल्या समितीने वर्तमान मौद्रीक धोरणातील दोष लक्षात घेवून अनेक मौलीक सूचना केल्या आहेत. त्यापैकी काही उल्लेखनीय सूचना पुढील प्रमाणे

१. मौद्रीक धोरणाचे प्रमुख उद्दिष्ट किमतीचे स्थैर्य राखणे असले पाहिजे, २. अंदाजपत्रकातील तुटीच्या सध्याच्या व्याख्येत बदल करून नवीन व्याख्येत सरकारच्या राजकोषीय

Scanned by CamScanner

धोरणाचे मौद्रीक परिणाम दिसून आले पाहिजेत., ३. व्यापारी बँकांना आपले व्याजाचे दर ठरविण्यात जास्त स्वातंत्र्य दिले पाहिजे.

समितीच्या अनेक सूचनांपैकी काही सूचना स्वीकारल्या गेल्या असून त्याची काही प्रमाणात अंमलबजावणीही झाली आहे. परंतु अजूनही बरेच बदल आवश्यक आहेत. हे बदल झाले तरच मौद्रीक धोरण आर्थिक धोरणाचा एक उपयुक्त घटक म्हणून कार्य करू शकेल अन्यथा सुप्रसिद्ध अर्थशास्त्रज्ञ पार्थ सेन ह्यांनी सध्याच्या मौद्रीक धोरणाचे केलेले पुढील मूल्यमापन सार्थ ठरेल.

'भारताचे मौद्रीक धोरण अशा परिस्थितीत कार्य करीत आहे की, त्यापासून फार अपेक्षा ठेवणे योग्य होणार नाही आणि थोड्या वेगळ्या शब्दात सांगायचे म्हणजे भारतीय मौद्रीक धोरणामध्ये स्वतःच्या भरवशावर चांगले घडवून आणण्याची क्षमता मर्यादित आहे, परंतु योग्य परिस्थिती नसल्यास वाईट घडवून आणण्याची क्षमता भरपूर आहे.'

Scanned by CamScanner

# उदारीकरणात वाणिज्य शिक्षणाचे महत्व

डॉ. माधुरी प्रदीप लेले
श्री. बिंझाणी नगर महाविद्यालय,
उमरेड रोड, नागपूर

शिक्षण हे समाजपरिवर्तनाचे एक प्रभावी साधन आहे. विद्यार्थ्यांमधून उत्तम, राष्ट्रनिष्ठ आणि प्रगल्भ नागरिक घडविण्याचे उत्तम शस्त्र म्हणजे शिक्षण.

प्राचीन काळापासून शिक्षणाला भारतीय संस्कृतीत अनन्यसाधारण महत्व प्राप्त झाले होते. प्रत्येकाला मिळणारे शिक्षण त्याच्या गरजा पूर्ण करू शकेल या पद्धतीचे होते. शिक्षणाने मनुष्य स्वयंपुर्ण व्हावा आणि त्याने स्वत:चा विकास साधावा असे उद्देश सद्यस्थितीप्रमाणेच त्या काळात देखील होता. प्राचीन काळातील समाजात समाजाची विभागणी चातुर्वर्ण्यात करून प्रत्येकाला त्याच्या उपजिवीकेकरीता योग्य शिक्षण प्राप्त करण्याचा अधिकार होता. हे शिक्षण त्याला परंपरागत पद्धतीने मिळत असे. चातुर्वर्ण्य समाप्त होवून जातीप्रथा अस्तित्वात आली आणि त्यानंतर पिढीजात व्यवसायाद्वारे व्यवसाय शिक्षण मिळू लागले. बलुतेदारीत परंपरेने व्यावसायिक शिक्षण मिळाल्याने स्वयंपूर्णता येवून उपजिवीकेचा प्रश्न आपोआप सुटत असे. कालांतराने समाजात अनेक स्थित्यंतरे घडून आली. विचारशील व परिवर्तनशील मानवाने काळानुसार आणि परिस्थितीनुरूप शिक्षण पद्धतीत बदल घडवून आणला.

स्वातंत्र्यपूर्व काळात ब्रिटीशांनी केवळ 'कारकुन निर्मितीसाठी शिक्षण' या मर्यादित उद्देशाने शिक्षणाचा प्रसार सुरू केला. त्याविरूद्ध श्री. गोपाळ गणेश आगरकर, लोकमान्य टिळक यांनी राष्ट्रीय शिक्षणाची चळवळ सुरू केली. देशाभिमान निर्माण करणारे धर्मशिक्षण, लोकांना उदरनिर्वाहासाठी चालना देणारे औद्योगिक व धंदेशिक्षण आणि संशोधनाची दिशा दाखविणारे उच्च शिक्षण टिळकांना अभिप्रेत होते.

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भारत सरकारने शिक्षणाला राष्ट्रीय प्रगतीचे आणि सुरक्षेचे प्रभावी साधन मानून त्याकडे विशेष लक्ष पुरविले. त्यासाठी निरनिराळ्या शिक्षण तज्ञांच्या समित्या स्थापन करून त्यांच्या शिफारशीनुसार वेळोवेळी गरजेनुसार बदल घडवून आणले. भारतीय समाजाला उपयुक्त ठरावे या दृष्टीने शैक्षणिक धोरण तयार करण्यात आले. १९४८-४९ मध्ये डॉ. राधाकृष्णन यांच्या अध्यक्षतेखाली 'विश्वविद्यालय शिक्षण आयोग' स्थापन करण्यात आला. १९५२-५३ मध्ये शिक्षणतज्ञ श्री. मुदलियार यांच्या अध्यक्षतेखाली 'माध्यमिक शिक्षण आयोगाची' स्थापना झाली. त्यानंतर १९६४ मध्ये डॉ. कोठारी यांच्या अध्यक्षतेखाली 'कोठारी आयोगाची' स्थापना झाली. १९६८ मध्ये 'राष्ट्रीय शैक्षणिक आयोग' आणि १९७९ मध्ये 'राष्ट्रीय शैक्षणिक धोरण' तयार करून शिक्षण समाजातील सर्व स्तरापर्यंत पोहचविण्याचे कार्य करण्यात आले.

जानेवारी १९८५ मध्ये देशाचे तत्कालीन तरूण पंतप्रधान श्री. राजीव गांधी यांनी देशाला २१ व्या शतकात योग्य विकास साधता यावा याकरिता 'नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची' घोषणा केली. त्यादृष्टीने Program of action तयार करून मे १९८६ मध्ये संसदेने नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाचा स्वीकार करून मान्यता दिली.

या नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात 'सर्वांना शिक्षण' हे तत्व गृहीत धरले आहे. माणूस ही राष्ट्रीय संपत्ती आहे. या राष्ट्रीय संपत्तीचे मनुष्यबळाचे विकसन शिक्षणानेच साध्य होते. राष्ट्राच्या विविध क्षेत्रात कौशल्य येण्यासाठी, उत्पादन वाढ होण्यासाठी सक्षम अशी माणसे निर्माण करणे हे नव्या शैक्षणिक धोरणाचे उद्दिष्ट आहे. उदयोन्मुख भारताच्या सामाजिक, शैक्षणिक गरजा पूर्ण करण्यासाठी नवीन शैक्षणिक धोरणात अनेक नवीन गोष्टींचा समावेश करण्यात आला.



Scanned by CamScanner

यानुसार प्रत्येक विद्यार्थी वर्ग १० पर्यंत सर्व विषयांचे मुलभूत ज्ञान मिळवितो. त्यानंतर शिक्षणासाठी कला, विज्ञान व वाणिज्य अशा तिन शाखांमधून आपल्या आवडीनुसार शाखेची निवड करतो. यालाच १०+२+३ असा नवीन आकृतीबंध संबोधण्यात येतो. या आकृतीबंधातील +२ या दुसऱ्या स्तरापासून वाणिज्य शिक्षणाची सुरूवात होते.

वाणिज्य शिक्षणाची उद्दिष्ट्ये - प्रचलित शिक्षण पद्धतीचा उद्देश केवळ ज्ञानप्रसार किंवा विद्यार्थ्यांना माहिती प्रदान करणे एवढाच मर्यादित नाही तर प्रत्येक शाखेतील विद्यार्थ्यांना आपल्या विषयाचे परिपूर्ण ज्ञान आणि त्याचे उपयोजन कौशल्य प्राप्त करून देणे हाच आहे. त्याचबरोबर विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साध्य करणे हाही ज्ञानार्जनाचा एक उद्देश आहे. परंतु वाणिज्य शाखेतील अभ्यासक्रमाचा वरिल सर्व उद्देशांशिवाय एक महत्वाचा उद्देश आहे तो म्हणजे 'स्वयंपूर्णता' किंवा 'स्वावलंबन'.

वाणिज्य शाखा ही प्रत्यक्ष मानवी जीवनातील आर्थिक घडामोडींशी संबंधित असल्याने त्यातून व्यक्तिविकास व त्याचबरोबर समाजविकासाचे उद्दिष्ट्य साध्य केले जाणे आवश्यक ठरते. जगात आर्थिक व औद्योगिक क्षेत्रात प्रचंड वेगाने घडामोडी घडत असतात. त्यांचे ज्ञान विद्यार्थ्यापर्यंत पोहचविणे हे वाणिज्य विषयाच्या अभ्यासक्रमातून साध्य होणे गरजेचे आहे. अद्ययावत तंत्राचा वापर, उत्पादन वाढ या आर्थिक घडामोडी सोबतच मानवीय दृष्टिकोनाचा विकास देखील विद्यार्थ्यांमध्ये अपेक्षित आहे.

उदारीकरण आणि वाणिज्य शिक्षण-१९९१ पासून भारताने 'नवीन आर्थिक धोरण' स्वीकारले त्यानुसार संपूर्ण आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक क्षेत्रात अनेक बदल हळुहळू पण निश्चित दिशेने होवू लागले. उदारीकरण शिथीलीकरण, खाजगीकरण आणि जागतिकीकरण यांचा स्वीकार करून झपाट्याने विकास साध्य करण्यासाठी भारत कटीबद्ध झाला. जागतिकीकरणाच्या माध्यमाने भारताला जागतिक स्पर्धेत सहभागी करून विकसीत राष्ट्राच्या बरोबरीत आणण्यासाठी भारत गॅट करारात सहभागी झाला. उदारीकरण म्हणजे कार्यपद्धतीमधील अनावश्यक निर्बंध, नियंत्रणे काढून टाकणे, जागतिकीकरण म्हणजे देशांदेशांमध्ये होणाऱ्या व्यापाऱ्याच्या मुक्त प्रवाहावरील, तांत्रिक ज्ञानावरील, उत्पादनांच्या साधनांवरील निर्बंध दूर करून त्यांचा सर्वत्र मुक्त संचार होवू देणे. खाजगीकरणाचा अर्थ सरकारी मालकीचे उद्योग हळुहळू खाजगी क्षेत्रांकडे सोपविणे.

या नवीन धोरणाचा परिणाम असा झाला की, १९९१ नंतर भारतीय बाजारपेठ संपूर्ण जगासाठी खुली झाली. तसेच भारतालाही जागतिक बाजारपेठ सहज उपलब्ध झाली. अनेक बहुराष्ट्रीय कंपन्यांचे भारतात आगमन झाले. भांडवली गुंतवणुक वाढली. उपभोक्त्यांना नवनवीन वस्तू उपलब्ध होवू लागल्या. भारतीय वस्तुंची विदेशी वस्तूंसोबत गळेकापू स्पर्धा सुरू झाली. स्पर्धेत टिकण्यासाठी वस्तूचा दर्जा व किंमत घटकांना प्राधान्य प्राप्त झाले. या सर्व घडामोडींचा परिणाम समाजमनावर झाल्याशिवाय कसा राहील ?

या सर्व 'आर्थिक परिवर्तनाचा' परिणाम प्रत्यक्ष अप्रत्यक्षरित्या वाणिज्य शिक्षणावर होणे अपरिहार्यच आहे. कारण हेच सर्व क्षेत्र वाणिज्याचा अभ्यासविषय आहे. जागतिकीकरणामुळे उत्पादन, व्यापार, बँका, विमा, माहिती तंत्रज्ञान या सर्वच क्षेत्रात तिव्र बदल घडून आलेत. माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील बदल तर सर्वानुगामी ठरला. आज संगणकीय ज्ञान नसलेली व्यक्ती अशिक्षीत ठरू पहात आहे. वाणिज्य शाखेच्या अभ्यासक्रमात या सर्व बदलांचा समावेश तात्काळ करणे किती अनिवार्य आहे हे यावरून आपल्या लक्षात येईल. संगणक व इंटरनेटच्या माध्यमाने जगभरातील कोणतेही ज्ञान विद्यार्थ्यांनासहज उपलब्ध आहे. त्यामुळे कोणतेही ज्ञान विद्यार्थ्यांना केवळ पुस्तकी ज्ञान, वर्गाच्या चार भिंतीत मिळणारे अध्यापन अनुभव पुरेसे ठरणार नाहीत.

जागतिकीकरणामुळे इतर कोणत्याही शाखेपेक्षा वाणिज्य शाखा अधिक महत्वाची ठरू पहात आहे. इतर शाखेतील विद्यार्थीदेखील अपरिहार्यपणे आपल्या वाणिज्य शाखेकडे वळतांना दिसतोय. उदा. इजिनिअरींग ची पदवी मिळविणारा विद्यार्थी पुढे एम.ई. न करता एम.बी.ए. करणे पसंत करतो. कला शाखेचे विद्यार्थी संगणक शिक्षण आवश्यक समजतात. वाणिज्य शाखा आज सर्वात समृद्ध



Scanned by CamScanner

शाखा आहे असे म्हटल्यास आतिशयोक्ती होणार नाही. वाणिज्य शाखेत आज अनेक वैविध्यपूर्ण अभ्यासक्रम उपलब्ध आहेत. बँका, विमा, वाहतूक या परंपरागत क्षेत्रांबरोबरच आज जाहिरात क्षेत्र, पॅकेजिंग, साठवणुकीची नवीन माध्यमे, आयात निर्यात व्यापार, पर्यटन, निरनिराळ्या क्षेत्रात व्यवस्थापन उदा. हॉस्पीटल मॅनेजमेंट, टुरिझम मॅनेजमेंट, वित्त आणि विपणन या सर्व क्षेत्रात रोजगार मिळविण्यासाठी वाणिज्य शाखेच्या विद्यार्थ्यांना इतरांपेक्षा अधिक संधी आहे. उपरोक्त सर्व क्षेत्रांशी संबंधित अनेक अल्पकालीन व दीर्घकालीन अभ्यासक्रम उपलब्ध आहेत.

परंतु दुर्दैवाने वाणिज्य शाखेचे विद्यार्थी स्पर्धेत टिकण्यासाठी पर्याप्त गंभीरतेने या वेगळ्या वाटांकडे वळत नाहीत. वाणिज्य शाखेचे अभ्यासक्रम तयार करणाऱ्याचे आणि अर्थातच आम्हा शिक्षकांचे हे कर्तव्य ठरते की त्यांना या वेगळ्या अभ्यासक्रमांकडे आकर्षित केले पाहिजे. वाणिज्य म्हणजे केवळ व्यापार किंवा खरेदी विक्री नव्हे तर व्यापाराशी संबंधित इतर अनेक मुलभूत सेवा क्षेत्रांचाही समावेश वाणिज्यात होतो. अशा जवळपास २० ते २२ प्रकारचे अनेक लहानमोठे अभ्यासक्रम आपल्या वाणिज्य विषयाशी निगडीत आहेत. इतर विद्यार्थ्यांपेक्षा वाणिज्याचे विद्यार्थी हे अभ्यासक्रम अधिक उत्तमरितीने पूर्ण करतात. गरज आहे ती अशा रोजगाराभिमुख अभ्यासक्रम आपल्या विद्यार्थ्यांपर्यंत पोहचविण्याची.

जागतिकीकरण म्हणजे तीव्र स्पर्धा. या स्पर्धेत टिकून राहायचे असेल तर गुणवत्ता हा एकच निकष कामी येणार आहे. अन्यथा फक्त सरकारी नोकरी मिळावी या उद्देशाने जर वाणिज्य शिक्षणांकडे पाहिले जाणार असेल तर केवळ निराशाच पदरी पडल्याशिवाय राहणार नाही. कामगार कपात व स्वेच्छानिवृत्तीच्या या कल्लोळात विद्यार्थ्यांना आपल्या विकासासाठी वेगळ्या वाटा शोधाव्या लागतील. त्याशिवाय 'स्वयंपूर्णता' आणि 'स्वावलंबन' ही वाणिज्य शिक्षणाची मुलभूत उद्दिष्ट्ये पूर्ण होणार नाहीत. त्यासाठी 'स्वयंरोजगार' हाच एक उत्तम मार्ग दिसतो आहे. गरज आहे ती प्रशिक्षणाची त्यासाठी वर दर्शविलेली दिशा मार्गदर्शक ठरेल अशी अपेक्षा आहे. काळाच्या कोणत्याही तडाख्यात, प्रतिकूल परिस्थितीत वाणिज्य शिक्षणाचे महत्व कमी होवू शकत नाही, कारण ते मानवी जीवनाशी अत्यंत जवळून संबंधित आहे.

### संदर्भ ग्रंथ


१. Indian education and its problems today : S. K. Nanda, Kalyani Publications, New Delhi.

२. India Government of Ministry of Education Report of the Education Commissions. Ministry of Education, India १९४८-४९, १९५२ 5 १९६४-६६.

३. शैक्षणिक समस्यांचा इतिहास : म. बा. कुंडले, श्री. विद्या प्रकाशन, पुणे (१९७८)

४. अध्यापन शास्त्र व पद्धती : म. बा. कुंडले, व्हीनस प्रकाशन, पुणे (२सप्टेंबर १९८५)



Hearty Congratulation !

Rakesh Tahilyani
Ravi Tahilyani

M/s. Sapna

Suiting & Shirtings
Dress Materials
Readymade Jeans
Shirts & T- Shits

Main Road. Chandrapur (M.S.)
07172-(S) 50227. (R)53784




Scanned by CamScanner

# चंद्रपूर जिल्ह्यातील औद्योगिकरण व पर्यावरण

प्रा. डी. आर. कुटेमाटे
उपप्राचार्य, सरदार पटेल महा. चंद्रपूर

प्राचीन काळी हा जिल्हा लोकपुरा म्हणून ओळखला जात असे काही काळानंतर इंद्रपूर असे नामाभिधान झाले व पुढे चंद्रपूर असे नामाभिधान झाले. ब्रिटीशराजवटीत हा चांदा नावाने ओळखला जावू लागला. १९६४ पासून पुन्हा चंद्रपूर असे नामकरण झाले. बऱ्याच काळपर्यंत हिन्दु व बौद्ध राजाची सत्ता होती. नंतर मराठ्याची सत्ता येईपर्यंत गोंडराजाची सत्ता होती. १८५३ नंतर नागपूर प्रांतासहीत चंद्रपूर हे ब्रिटीश साम्राज्यास जोडण्यात आले. चंद्रपूर जिल्ह्यात १५ तालूके व १४ पंचायत समित्या व ८४६ ग्रामपंचायती आहेत. या जिल्ह्याची ऐतिहासिक परंपरा असून गोंडराजे अनेक वर्ष राज्य करीत होते. पांडववंशाच्या इतिहासाची सुरूवात ही कोततमिलुल नावाच्या गोंड वंशियापासून झाली असून गोंड वंशियाचा प्रथम अधिपती भीम व लाल भीम पासून होवून शेवटी निलकंठ शहा पर्यंत गोंडवंशिय राजवट होती. याच राजवटीत बल्लारशहा आणि चंद्रपूर शहराभोवती मजबूत असा दगडी परकोट संरक्षणासाठी बांधली. ते चंद्रपूर शहराचे वैशिष्ट्ये अजून अस्तित्वात आहे. याशिवाय भद्रावती, बल्लारपूर, माणिकगड येथे सुद्धा किल्ले आहेत. येथे अंचलेश्वर व महाकाली मातेचे इतिहास प्रसिद्ध मंदीर गोंड राजाने बांधले. येथे दरवर्षी चैत्र पोर्णिमेला यात्रा भरते. यासाठी परभणी, नांदेड भागातून हजारो लोक मोठ्या प्रमाणात येतात. जिल्ह्याच्या पूर्व सीमेवर उत्तरेकडुन दक्षिणेस वाहणारी वैनगंगा पश्चिम सीमेवर वाहणाऱ्या वर्धा नदीने दोन जिल्ह्याच्या सीमा आखल्या आहे. जिल्ह्यातील नद्या उत्तरेकडून दक्षिणेस वाहतात.

महाराष्ट्र राज्य १ मे १९६० रोजी अस्तित्वात आले. त्यापुर्वी १ नोव्हेंबर १९५६ रोजी द्वैभाषिक राज्य अस्तित्वात आले होते. त्यादिवशी महाराष्ट्रास मध्यप्रांतातून विदर्भ व हैद्राबाद राज्यांतून मराठवाडा हे जोडले गेले. आजच्या महाराष्ट्रात कोकण, मध्य महाराष्ट्र, मराठवाडा व विदर्भ असे भाग येतात. महाराष्ट्र राज्यात एकूण ३५ जिल्हे आहेत. त्यापैकी एक म्हणजे विदर्भातील पश्चिम भागात असलेला चंद्रपूर जिल्हा महाराष्ट्रातील विदर्भ प्रदेशातील सर्वात मोठा जिल्हा पूर्वीपासूनच चंद्रपूर हा असून राजकीय दृष्ट्या २६ ऑगस्ट १९८२ ला चंद्रपूर जिल्ह्याचे विभाजन करून गडचिरोली हा जिल्हा अस्तित्वात आला. नैसर्गिक दृष्ट्या चंद्रपूर जिल्ह्याला संपन्नता लाभलेली आहे. अनेक नद्या वनसंपत्ती व खनिज द्रव्यांनी हा जिल्हा संपन्न आहे. त्यामुळे त्यावर चालणारे उद्योग सद्या चंद्रपूर जिल्ह्यात निर्माण झालेले आहेत. मुबलक पाणी पुरवठा व जंगलाचे जाळे यामुळे हा जिल्हा संपन्न आहे.

### चंद्रपूर जिल्ह्याचे वैशिष्ट्ये

विशेषत्व हेच ज्याचे वैशिष्ट्य तो हा 'चंद्रपूर जिल्हा' होय. विशाल वैशिष्ट्यपूर्ण भाग, प्रमाणबद्ध ढंगदार आकार, अमाप नित्य वाहते पाणी, मौल्यवान निबिड घनदाट अरण्ये, अक्षम पायाभूत खनिजे, अंगभूत औष्णीक उर्जाशक्ती अशी एकापेक्षा एक सरस वैशिष्ट्ये हे या जिल्ह्याचे विशेषत्व होय. अशी पायाभूत वैशिष्ठ्ये एका ठिकाणी केंद्रित झालेले सापडते. हे एक निसर्गाचे दुर्लभ आश्चर्य होय. निसर्गाची ही अद्भूत कामगिरी भारतातील एकट्या चंद्रपूर जिल्ह्यात केंद्रित झालेली आहे. औद्योगिक प्रगतीसाठी आत्मविश्वास पूर्वक पायाभूत साधन संपत्तीचे भरपूर भांडार उपलब्ध करून दिलेले आहे. लोखंड, दगडी कोळसा, चुनखडी, सिमेंटचे दगड, अभ्रकादी खनिजांचा खजिना आपल्या हवाली करण्याची तत्परता दाखवून दिल्याचा हा जिल्हावार आढावा पहा.

१. क्षेत्रफळ : ११,४४३ चौ. किमी

२. लोसकंख्या : २०,७७,९०९



Scanned by CamScanner

३. लोकसंख्येची घनता : १८२ प्रति चौ. कि.मी.

४. **साक्षरतेचे प्रमाण :** ७३.०७%

५. **हवामान :** उष्ण व कोरडे, पावसाळ्यात दमट व उन्हाळ्यात गरम.

६. **पर्जन्यमान :** १४० से.मि.

७. **नद्या:** वर्धा, पैनगंगा, वैनगंगा, इरई, अंधारी, मूल

८. **पर्वत :** पेरजागड व चांदूरगडचे डोंगर.

९. **पिके :** धान, कापूस, ज्वारी, गहू, हरभरा

१०. **खनिजे :** दगडी कोळसा, लोहखनिज, चुनखडक, अभ्रक

११. **उद्योगधंदे :** धानाच्या गिरण्या, पोह्याच्या गिरण्या, हातमाग, लाकूड कटाई, प्लायवुड, जिनिंग व प्रेसिंग, काच, कागद, सिमेंट, रेफ्रिजरेटर, मॅगनिज, शुद्ध व आयुध निर्माण, औष्णीक विद्युत

१२. **औद्योगिक ठिकाणे :** बल्लारपूर, दुर्गापूर, घुग्घुस, चिमूर, भद्रावती, वरोरा, ब्रम्हपुरी, सिंदेवाही, मूल, नवरगांव, राजुरा, सास्ती, गोंडपिपरी,

१३. **तालुके :** कोरपना, गोंडपिपरी, चिमूर, चंद्रपूर, जिवती, नागभीड, पोंभूर्णा, बल्लारपूर, ब्रम्हपुरी, भद्रावती, मूल, राजूरा, वरोरा, सावली, सिंदेवाही,

१४. **औद्योगिक वसाहत :** चंद्रपूर, घुग्घुस, मूल

**जिल्ह्यात उद्योग वाढण्याची कारणे**

चंद्रपूर जिल्ह्यात उद्योगांची वाढ होण्यास अनेक कारणे आहेत ते पुढील प्रमाणे:

१. कच्चा माल व कच्च्या मालाची उपलब्धता.

२. दळणवळणाच्या सोयी

३. औद्योगिक वसाहत स्थापण होण्यास भूमीची उपलब्धता

४. जंगल संपत्तीवर आधारित उद्योग स्थापन होण्यासाठी जंगलांची उपलब्धता.

५. भरपूर पाण्याची सोय.

६. नैसर्गिक बाबींची उपलब्धता.

७. मजूर व कामगारांची उपलब्धता (कुशल व अकुशल)

८. लघु उद्योगासाठी आरक्षीत असलेल्या उत्पादन क्षेत्राची यादी व्यापक केल्यामुळे लघु उद्योगांना जिल्ह्यात चालना मिळाली.

९. जिल्हा उद्योग केंद्राची स्थापना

१०. जिल्ह्यात लघू उद्योगासाठी जागा, पाणी, विद्युत ह्यासारख्या सोयी उपलब्ध.

भारतीय अर्थव्यवस्थेत पुर्वीपासूनच लघू उद्योगांना महत्वपूर्ण स्थान आहे. परंपरागत लघु उद्योगांमध्ये श्रमाचा जास्त वापर करण्यात येतो. आधुनिक लघू उद्योगात श्रमाबरोबरच भांडवलाचाही वापर होतांना दिसतो. लघूउद्योग विषयक विविध संकल्पना आढळून येतात. सयंत्र व यंत्रसामुग्री यात ५ लाख रूपयापेक्षा कमी गुंतवणूक असणाऱ्या उद्योगांना अति लघु उद्योग असे म्हणतात, सयंत्र व यंत्रसामुग्रीत ६० लाख रूपयांपेक्षा कमी गुंतवणुक करणारे उद्योग लघू उद्योग समजले जातात. तर मोठ्या उद्योगांना पूरक म्हणून स्थापण होणाऱ्या उद्योगांना पुरक उद्योग असे म्हणतात. पूरक उद्योगांची भांडवली गुंतवणूक ७५ लाख रूपये आहे. लघु उद्योगांना आर्थिक व्यवस्थेत महत्वपूर्ण आहे. श्रमप्रधान तंत्रांचा ते वापर करीत असल्याने मोठ्या प्रमाणावर ते रोजगार पुरवितात. लघू उद्योगामुळे ग्रामीण भागात उद्योग स्थापन होवून उद्योगाचे विकेंद्रीकरण करणे शक्य होते. ग्रामीण भागातील लोकांना खेड्यातच रोजगार प्राप्त होवून त्यांना स्थैर्य प्राप्त होते. खेड्यातील संसाधनांचा वापर खेड्यांचा विकासासाठी करता येतो. प्रादेशिक व क्षेत्रीय असंतुलन दुर करता येते. देशाला आवश्यक असणाऱ्या परकीय चलनाची प्राप्तीही लघु उद्योगामुळे होते. जिल्ह्यातील डोंगर टेकड्यांनी महाराष्ट्र आणि भारताच्या अर्थव्यवस्थेला हातभार लावण्याचे भरीव कार्य अंगिकारले आहे. ह्या जिल्ह्यातील जंगले दाट, विशाल, उत्तुंग आणि मौल्यवान आहेत. साग हे त्याचे वैशिष्ट्ये आहे. आलापल्ली क्षेत्रातील साग तर जगप्रसिद्ध आहे. जंगलसंपत्तीवर चालणारे कितीतरी उद्योग ह्या जिल्ह्यात पहावयास मिळतील. वर्धा, पैनगंगा, वैनगंगा, प्राणहिता, गोदावरी आणि इंद्रावती या नद्यांची सरहद्द लाभलेल्या चंद्रपूर जिल्ह्यातील संगम मनोहर आहेत.



Scanned by CamScanner

चंद्रपूर ह्या जिल्ह्यात अनेक नद्या बारमाही पाणी पुरविणाऱ्या असल्या तरी सध्या ह्या जिल्ह्यात अमलनाला धरण, इरईडॅम, तोतलाडोह, आवंढा चारगांव हे धरण महत्वाचे आहेत.

निसर्गाने उपलब्ध करून दिलेल्या भूजल आणि खनिजांच्या पायाभूत साधनांच्या बळावर भारतातले महत्वाचे उद्योग केंद्र होण्याची क्षमता चंद्रपूर जिल्ह्यात आहे. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर ४० वर्षांनी भारत सरकारचे लक्ष या जिल्ह्याकडे केंद्रित झाले आहे. कोळसा खाण उद्योगाचे राष्ट्रीयकरण झाल्याने चंद्रपूरच्या दुर्गापुर औष्णिक केंद्राचा पाया भरला गेला आहे. बल्लारपुरचा कागद कारखाना, घुग्घुस, आवारपूर, पालगांव, माणिकगड, गडचांदूर, राजूरा येथील सिमेंट कारखाने इत्यादी चंद्रपूरचा इलेक्ट्रोस्मेल्ट कारखाना, भद्रावती येथील आयुध निर्माण कारखाना, लाकूड कटाई उद्योग हे येथील संपन्नतेची सुरूवात होय. सिमेंट, पोलाद व अन्य खनिज निर्मितीचे उद्योग हे पायाभूत उद्योग होय.

भारतात चंद्रपूर जिल्ह्यानेही महत्वपूर्ण योगदान लघू उद्योगाच्या क्षेत्रात दिलेले आहे. बऱ्याच लोकांना रोजगार पुरविला आहे. लघू उद्योगातील उत्पादन वाढत असून त्याचे स्वरूपही आधुनिक होत आहे. हस्तकलेच्या वस्तू, चामडी वस्तू, खाद्य पदार्थ, जंगलावर आधारित उद्योग जसे मोह, लाख, डिंक, हिरडा, बेहाडा, औषधी वनस्पती, बांबू, यातून स्थानिक लोकांना रोजगार मिळालेला आहे.

चंद्रपूर जिल्हा हा महाराष्ट्र राज्याच्या दक्षिणपूर्व भागात १८.४ ते २०.५ या उत्तर व ७८.५ ते ८०.६ या पुर्व रेखांश या भौगोलीक क्षेत्रातील पट्यात बसला आहे. जिल्ह्यात सर्वच तालुक्यात वन क्षेत्र विखुरलेले असून जिल्ह्यातील ३५०२०० हेक्टर इतके क्षेत्र वनाखाली असून जिल्ह्याच्या एकूण क्षेत्राशी ३२.०६% इतकी टक्केवारी आहे. जिल्ह्यातील एकूण लोकसंख्येपैकी ७१.९६% लोक ग्रामीण व २८.०४% शहरी भागात राहतात. १९९१ च्या जनगणनेनुसार एकूण लोकसंख्येत १६.९०% अनूसूचित जाती तर १९.७०% अनुसूचित जमातीकडे लोक आहेत. जिल्ह्यात एकुण १९०० मालगुजारी तलाव ७ मध्यम तलाव आहे. नलेश्वर, चारगांव (बु), आसोलामेंढा, लभान सराड, अमलनाला चंदई नाला, घोडाझरी या तलावामुळे मुख्यत: मत्स्य व्यवसाय मोठ्या प्रमाणात होतो. जलसिंचनासाठी ५२७ कोल्हापुरी बंधारे, १८०८६ सिंचन विहीरी १९३५ इतर तसेच ४७७६ तेलपंप व १२८७ विजपंप आहे. जिल्ह्यातील ८०% लोक शेतीवर उपजिविका करतात.

**औद्योगिकरणाचा आरोग्य व औद्योगिकरणाचे परिणाम**

औद्योगिकरण हे मानवी विकासाचे साधन आहे. तसेच ते पर्यावरण संतुलन बिघडविणारे साधन ही आहे. त्यामुळे त्याचे विविध घटकावर परिणाम होतात. उद्योगासाठी ज्या विविध घटकाचा वापर करण्यात येतो. त्यातील दुषित घटक बाहेर टाकली जातात. त्यामुळे पर्यावरण बिघडते. चंद्रपूर जिल्ह्यातील जे उद्योग आहेत. त्याचा दुषित घटकांमुळे खालील परिणाम आढळून येते.

१. हवा प्रदुषणामुळे शुद्ध हवेत धुळीचे कण विषारी वायु मिसळल्यामुळे त्याचा परिणाम जीवनावर व आरोग्यावर होतो. सर्दी खोकल्यापासून ह्दय फुफ्फुसाच्या मोठ्या रोगाची लागन होवून दैनंदिन जीवन विस्कळीत होते.

२. पाणी प्रदूषण विविध उद्योगातून बाहेर पडणारे रसायन युक्त पाणी नदी नाल्यात व तलावात सोडल्यामुळे पाणी प्रदुषीत होते. त्याचा परिणाम मानवी जीवनावर व जलचर प्राण्यावर होतो.

३. ध्वनी प्रदूषण

४. शहरीकरण

५. जंगलतोडीचा परिणाम

६. शेतजमिनीचा ऱ्हास

७. नैसर्गिक साधन संपतीचा ऱ्हास

८. ओझोन विवरावर परिणाम

९. किरणोत्सर्गी टाकावू पदार्थ

एकंदरीत औद्योगिकरणामुळे सजीव सृष्टीवरील परिणाम फारच घातक आहे. सजीव सृष्टीवरील परिणाम खालील तीन प्रकारे होते.

१. मानव जातीवर परिणाम



Scanned by CamScanner

२. वनस्पतीवरील परिणाम

३. प्राणी सृष्टीवरील परिणाम,

वरील प्रमाणे होणारे दुष्परिणाम टाळण्यासाठी खालील नियंत्रण आवश्यक आहे.

१. उद्योगाची स्थापना दूर अंतरावर करावी. त्यामुळे मानवजातीवरील दुष्पपरिणाम कमी होईल

२. वनीकरणावर भर द्यावा त्यामुळे हवेचे प्रदूषण नियंत्रणात ठेवता येईल.

३. टाकावू पदार्थाची विल्हेवाट करून त्यावर प्रक्रिया केल्यास दुषित घटक अलग होईल.

४. प्रदुषण नियंत्रण मंडळाची स्थापना करून देखरेख ठेवणे व आवश्यक अटीची पूर्तता उद्योजकांकडून पूर्ण करणे.

५. आधुनिक तंत्राचा वापर करून विविध योजना राबविणे.

६. जंगल तोडीवर नियंत्रण ठेवणे की जेणेकरून जंगलतोड कमी होवून नापीक, पडीत जमिनीवर उद्योग स्थापन करणे.

सध्या वरील उपायाची अंमलबजावणी योग्य रितीने केल्यास पृथ्वीपासून १५ ते २० किमी अंतरावरील ओझोन (०३) वायुचा दाट असलेला थर कायम राखण्यास मदत होईल कारण निरनिराळ्या उद्योगातील रासायनिक वायु हवेत सोडल्यामुळे आणि हे वायु वजनाने हलके असल्यामुळे वरपर्यंत जावून ओझोन थरास हानी पोहचवितात अशीच परिस्थिती कायम राहल्यास ओझोन वायुचा थर विरळ होवून सूर्याची प्रखर किरणे पृथ्वीवर पडून जीवसृष्टीची अपरिमीत हानी होईल वातावरणात अति उष्मा निर्माण होवून सर्व सजीवास त्याचे परिणाम भोगावे लागतील.

**"जे मुलांच्या मनाची, मेंदूची व मनगटाची मजबुती करील तेच खरे साहित्य."**

– डॉ. पंजाबराव देशमुख

Scanned by CamScanner



# जागतिकीकरण व जागतिक गरीबी


दिलीप जनार्दन जुमडे

श्री. तुकाराम कनिष्ठ महाविद्यालय

कढोली, त. कुरखेडा, जि. गडचिरोली


### जागतिकीकरण पार्श्वभूमी, व्याख्या

भिन्न भिन्न देशाच्या व्यापारात असलेल्या सीमा व प्रतिबंध यांचा अभाव म्हणजे जागतिकीकरण होय किंवा जगातील कोणत्याही देशाच्या विदेश व्यापारात निर्बंधाचा अभाव म्हणजे जागतिकीकरण होय. जागतिकीकरणात काळ, अंतर, कार्यपद्धती चालीरिती, श्रद्धा नीतीमान्यता यांच्या सर्व परंपरागत सीमा तोडण्याची शक्ती असते. जागतिकीकरणात विविध देशातील वैचारिक सामाजिक, आर्थिक, नैतिक अंतर मिटविण्याची शक्ती असते.

२१ व्या शतकात जागतिकीकरणाचे वारे अनेक देशात वाहतांना दिसून येत आहे. साम्यवादी देशात सुद्धा काही प्रमाणात जागतिकीकरणाला सुरूवात झालेली आहे.

### भारतामध्ये जागतिकीकरणाची सुरूवात

भारताची नवीन आर्थिक धोरणाची पूर्वस्थिति

भारताचा १९९१ च्या पूर्वीची आर्थिक स्थितीचा अभ्यास केला असता विदेश व्यपारात मोठ्या प्रमाणावर प्रतिकूल व्यापाराधिक्य निर्माण झालेले होते. निर्याती पेक्षा आयातीत मोठ्या प्रमाणावर वाढ झालेली होती. सार्वजनिक उद्योग क्षेत्रामधील खर्चात प्रचंड वाढ झालेली होती. भारतातील राष्ट्रीय उत्पन्नापेक्षा खर्चात प्रचंड वाढ झालेली होती. त्यामुळे देशातील परकीय कर्जाचा बोजा असह्य झालेला होता. आंतरराष्ट्रीय बाजारात भारत सरकारला देणे वेळेवर चुकते करणे कठीण झालेले होते. दुसऱ्या देशाकडून घेतलेल्या मालाचे पैसे लेखी करार असलेल्या वेळेवर देवून टाकणे अवघड बनले. जुनी कर्ज व त्यावरील व्याज फेडणे अशक्य वाटू लागले. उलट नवीन कर्जे घ्यावी लागली जुनी कर्जे फेडण्याची मुदत संपली की आपल्या नावे अधिक रक्कमेची कर्ज घ्यायची त्यातून जुने कर्ज व व्याज फेडायचे व कर्ज आहे हे विसरून उरलेली रक्कम खर्चात टाकायची असे दिवसें दिवस वाढत होती. भविष्यकाळात आंतरराष्ट्रीय स्तरावर भारताची पत जाणार आपल्यास कोणीउधारी व नवीन कर्ज देणार नाही याचा परिणाम देशांतर्गत चलन पुरवठा वस्तूच्या किंमतीत प्रचंड वाढ झाली असली या सोबत जागतिक बँक व आंतराष्ट्रीय नाणेनिधी, भांडवलवादी देशाचे दडपण अशा आर्थिक चक्रव्युहात भारत सापडलेला होता. यामधून आपली सुटका करून भारताची आर्थिक स्थिती सबळ करण्यासाठी भारताने २४ जुलै १९९१ ला कॉंग्रेसच्या राजवटीत पी. व्ही. नरसिंहरावच्या काळात तत्कालीन केंद्रीय अर्थमंत्री मनमोहन सिंग यांनी भारताचे नवीन आर्थिक धोरण जाहीर केले.

१९९१ ला नवीन आर्थिक धोरण अंमलात आले या धोरणाचा प्रमुख उद्देश अर्थव्यवस्था खुली करणे व आंतरराष्ट्रीय प्रवाहात भारतीय अर्थव्यवस्था समाविष्ट करणे हाच होता. नवीन आर्थिक धोरणात परकीय गुंतवणुकीत वाढ, भारतीय उद्योजकाची मक्तेदारी विषयक कायद्यातून मुक्तता व सार्वजनिक उद्योगाचे खाजगीकरण करणे, रूपयाची परिवर्तनशीलता, आयात निर्यातीचे उदारीकरण धोरण, भारतीय कर विषयक धोरणात बदल, विमा क्षेत्रात परकीय गुंतवणुकीस मान्यता देणे इत्यादी बदल करण्यात आले.

### जागतिकीकरणातील मुक्त धोरण (खाजगीकरण व मुक्त बाजारपेठेतील वाटचाल)

जागतिकरणाची सुरूवात दुसऱ्या महायुद्धानंतर झाली. जागतिक व्यापाराची स्थिती अत्यंत विस्कळीत झालेली होती. आंतरराष्ट्रीय व्यापार वाढावा, विकसीत व्हावा याची जाणीव अनेक विचारवंतांना व पुढाऱ्यांना झाली. यावर चर्चा



Scanned by CamScanner

करण्यासाठी ३० ऑगस्ट १९४७ ला जिनीव्हा येथे शिखर परिषद भरविण्यात आली. त्यात २३ देशांनी भाग घेतला. यामध्ये भारताचा प्रतिनिधीसुद्धा होता. या शिखर परीषदेमध्ये गॅट चा जन्म झाला. जनरल ॲग्रीमेंट ऑन ट्रेड ॲन्ड टरीफ गॅट च्या कामाला सुरूवात २३ जानेवारी १९४८ पासून झाली. त्यावेळी ५६ देश सदस्य होते. आजच्या स्थितीत गॅटचे ११७ च्या वर सदस्य आहे.

### गॅटची उद्दिष्ट्ये

१. आंतरराष्ट्रीय व्यापारात वाढ करणे.

२. सदस्य देशाचे उत्पादन वाढवून त्या देशाची पूर्ण रोजगाराकडे वाटचाल घडवून आणणे.

३. जागतिक साधन सामुग्रीचा जास्तीत जास्त उपयोग करून सदस्य देशाचा विकास करणे.

४. सदस्य देशातील लोकांचे जीवनमान उंचावणे.

५. सदस्य देशाचा जकात कर कमी करून प्रगत देशांना जकाती व्यतिरिक्त इतर निर्बंध लावण्यास मनाई करणे.

६. सदस्य देशातील आंतरराष्ट्रीय व्यापार सुरळीत, उत्तम, बंधन विरहीत करणे.

७. सदस्य देशांनी गॅट च्या सर्व देशांना समान वागणूक देणे व आपसातील भेदभाव नष्ट करणे.

८. गॅटचे सदस्य संस्थेच्या परवानगीने आपआपसात द्विपक्षीय किंवा बहुपक्षीय करार करू शकतील.

९. सदस्य राष्ट्रात व्यापार विषयक काही तक्रारी किंवा तंटे उद्भवल्यास ते शिखर परिषदेद्वारे सोडविणे.

गॅटच्या शिखर परिषदेच्या खालील फेऱ्या झालेल्या आहेत

| फेरी | साल | स्थान |
|---|---|---|
| १. | १९४७ | जिनिव्हा |
| २. | १९४९ | अन्नेसी (फ्रान्स) |
| ३. | १९५०-५१ | तोटक्वे |
| ४. | १९५५-५६ | जिनिव्हा |
| ५. | १९५९-६२ | जिनिव्हा |
| ६. | १९६३-६७ | जिनीव्हा |
| ७. | १९७३-७९ | जिनिव्हा |
| ८. | १९८७-८८ | उरूग्वे (डंकेल प्र.) |

पहिल्या सहा शिखर परिषदेत सदस्य राष्ट्रांनी व्यापार वाढविण्याच्या दृष्टीने जकात कर कमी करून सवलती द्याव्यात असे ठरले. सातव्या शिखर परिषदेत विकसीत देशातील वस्तूची आयात करणे त्यावर निर्बंध लादू नये.

आठवी शिखर परिषद उरूग्वे येथे झाली. श्री डंकेल हा गॅटचा डायरेक्टर जनरल आहे. त्याने प्रस्तावाचा मसुदा तयार केला म्हणून त्याला डंकेल प्रस्ताव म्हणतात.

### डंकेल मसुदा

श्री. डंकेल यांनी प्रस्ताव २४ भागात विभाजन केला आणि जवळजवळ ४४१ पृष्ठे लेखकाने उपयोगात आणली आहे. या मसुद्यातील पसंत असलेले मुद्दे फक्त स्वीकारावेत किंवा नापसंत म्हणून सोडून द्यावेत असे म्हणून चालणार नाही स्वीकाराचे असेल तर त्या चांगल्या वाईट हानीकारक मुद्यासहीत हा पूर्ण प्रस्ताव स्वीकारावा लागेल. अन्यथा गॅट मधून बाहेर पडावे लागेल. अशी अट यात आहे. रशिया व चीन व इतर साम्यवादी देश गॅटचे प्रथमपासून सदस्य नाही ते बाहेर राहुनच आपल्या देशाचीप्रगती करीत आहेत.

### जागतिकीकरणामधील मुक्त धोरण

जागतिकीकरण म्हणजे देशांदेशामध्ये होणाऱ्या व्यापाराच्या मुक्त प्रवाहावरील, तांत्रिक ज्ञानावरील व गुंतवणुकीवरील संरक्षणात्मक अडथळे दूर करणे होय. अर्थव्यवस्थेचे जागतिकीकरण म्हणजे स्पर्धेच्या माध्यमावाटे देशांतर्गत किमतीचे अंतर राष्ट्रीय स्तरावरील किमतीशी समानीकरण करणे होय. यामध्ये व्यापारी आपल्या संशोधनाचे कोणत्याही ठिकाणी स्थानांतरण व आपल्या इच्छेनुसार कोणत्याही किंमतीला विक्री करू शकतात.

### भारतातील खाजगीकरण व मुक्त बाजारपेठेकडील वाटचाल

भारताने १९९१ च्या नवीन आर्थिक धोरणानुसार मुक्त बाजारपेठेचा स्वीकार करून उद्योग धंद्याचे खाजगीकरणास प्रारंभ झाला. १. उपभोग्य वस्तूच्या आयातीवरील निर्बंध हटविणे. २. जनता प्रशुल्क कमी करणे, ३. विदेशी गुंतवणुकीस चालना देणे, ४. रूपया परिवर्तनशील करणे, ५. अधिकोषण व विमा ही सेवाक्षेत्रे विदेशी भांडवलाकरीता

Scanned by CamScanner

खुली करणे.

नवीन आर्थिक धोरणानुसार सार्वजनिक क्षेत्रातील गुंतवणुक कमी करून खाजगीकरणाला वाव देणे. भारताने १९९१-९२ च्या अंदाजपत्रकात जकात शुल्क १५०% वरून ९२-९३ मध्ये ११०% घटविले. १९९१ मध्ये रूपयाचे १८% अवमूल्यन केले. पेट्रोलियम तेल उत्पादने, संरक्षण साहित्य खते, जीवनावश्यक औषधी इत्यादी. उत्पादनाच्या बाबतीत उद्योगाचे खाजगीकरण करणे ८०% उद्योगातील परवाने धोरण हटविण्यात आले. परदेशी तंत्रज्ञान आयात करण्याचे धोरण सुद्धा समाविष्ट करण्यात आले.

**भारत सरकारने स्वीकारलेले निर्गुंतवणूक धोरण**

नवीन आर्थिक धोरणात सार्वजनिक क्षेत्र कमी करून सरकारी खर्चात कपात करायची. फक्त अत्यंत महत्वाच्या क्षेत्रातच सरकार भांडवलाची गुंतवणूक करेल. त्यामुळे सरकारने सुरूवातीला आपल्या मालकीच्या उद्योगातील भांडवल विक्रीस काढावे. प्रथम २०% नंतर ४९% भागभांडवल विक्रीस काढावे.

सार्वजनिक उद्योगात वारंवार तोट्याचे प्रमाण, अकार्यक्षमता, उत्पादनाचा दर्जा यामुळे भारताने सार्वजनिक क्षेत्रात निर्गुंवणूकीचे धोरण राबवायचे ठरविले.

भारत सरकारने २००२ मध्ये सुरू होणाऱ्या १० व्या पंचवार्षिक योजनेत ७८० अब्ज रू. निर्गुंतवणुकीचे धोरण निश्चित केलेले आहे.

**सार्वजनिक क्षेत्राचा वाटा कमी करून खाजगी क्षेत्रातील गुंतवणुकीतील वाढ**

भारत सरकारने १९९१ पासून सार्वजनिक क्षेत्रातील गुंतवणूक कमी करून खाजगी क्षेत्रातील गुंतवणुकीस वाव दिलेला आहे. ऑक्टोंबर २००२ मध्ये दहाव्या पंचवार्षिक योजनेस केंद्र सरकारने मंजुरी दिलेली आहे. दहाव्या पंचवार्षिक योजनेची प्रमुख उद्दिष्ट्ये खालील प्रमाणे आहेत.

१. आठ टक्के विकास दर, २. वर्षाला ७.५ अब्ज अमेरिकी डॉलर्स प्रत्यक्ष विदेशी गुंतवणूक, ३. पाच वर्षात ७८० अब्ज निर्गुंतवणूक, ४. पाच कोटी रोजगार उपलब्ध करणे, ५. सार्वजनिक क्षेत्रासाठी १५,९२,३०० कोटी, ६. सर्व गावांना पिण्याचे पाणी, ७. प्रदुषित मोठ्या नद्यांचे शुद्धीकरण-दहाव्या पंचवार्षिक योजनेतील ६ कलमी कठोर कार्यक्रम खालीलप्रमाणे आहे.

१. कर सुधारणांनावेग देणे, २. केंद्र आणि राज्य स्तरांवर मूल्याधिष्ठीत कर व्यवस्था लवकर सुरू करणे, ३. आर्थिक सुज्ञतेसह आगेकुच करणे., ४. गुंतवणूकीत अधिकाधिक उत्पादन व क्षमता प्राप्त करणे, ५. विद्यमान भांडवली संपत्ती अधिक विकसीत करणे, ६. सर्व क्षेत्रात कर्मचाऱ्यांची कार्यकुशलता व ज्ञान वाढविणे,.

१० व्या पंचवार्षिक योजनेत दरवर्षी १ कोटी लोकांना रोजगार देणे आणि गरीबाचे प्रमाण २६% वरून २१% पर्यंत आणण्यासाठी ८% विकासाचा दर निश्चित केलेला आहे. ८% विकासाचा दर साध्य करण्यासाठी निर्गुंतवणूक, कर व कामगार सुधारणा यांचा समावेश असलेला सहा कलमी कठोर कार्यक्रम राबविण्याचे संकेत पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयींनी दिलेला आहे.

भारतातील गरीबी व बेरोजगारी दूर करण्यासाठी सार्वजनिक कंपन्या, कामगार सुधारणा कृषी बाजारपेठेवरील बंधने हटविणे, कर सुधारणांना वेग देणे, केंद्र व राज्य सरकार सतरावर मूल्याधिष्ठीत कर लावणे, उर्जा, परिवहन जलसंसाधनाची मुलभूत क्षेत्रे आणि प्रशासन संचालनात सुधारणा आणणे, कृषी वर आधारित उद्योग, लघू व कुटीर उद्योग तसेच असंघटीत क्षेत्रात आर्थिक स्रोत उपलब्ध करून देणे व सर्व कायदेशीर अडचणी दूर करणे, आर्थिक विकासाला वेग देण्यासाठी सार्वजनिक क्षेत्रातील तोटा कमी करणे, विकास मार्गातील आर्थिकेत्तर अडचणी दुर करणे, राष्ट्रीय बाजारपेठेतील अडचणी दुर करणे, इत्यादी अनेक उद्दिष्ट्ये नव्या शतकातील दहाव्या पंचवार्षिक योजनेत निश्चित करण्यात आलेले आहे.

**प्रत्यक्ष विदेशी गुंतवणुकीचा परिणाम**

२१ व्या शतकातील दहाव्या पंचवार्षिक योजनेत वर्षाला ७.५ अब्ज अमेरिकी डॉलर्स प्रत्यक्ष विदेशी गुंतवणूकीचे उद्दिष्ट्ये निश्चित करण्यात आलेले आहे. भारत सरकारच्या निर्गुंतवणूक धोरणाला सत्ताधारी पक्षातील काही



Scanned by CamScanner

सदस्य व विरोधी पक्षांनी विरोध केलेला आहे. सार्वजनिक उद्योगातील उदा. खनिज तेल, वायु, खनिज संपत्ती उद्योग, विज, पाणी पुरवठा वितरण वित्तीय संस्था व अन्य सरकारी उद्योगाचे खाजगीकरण करून मोठ्या प्रमाणावर विदेशी गुंतवणूक करायची की ज्यामुळे सरकारचा या उद्योगावर होणाऱ्या खर्चात बचत होईल व अनुकूल व्यापाराधिक्य निर्माण होवून देशाचा विकास साध्य होईल.

भारताला विदेशी गुंतवणूकीसोबतच अनेक परिणामास मुद्दा सामोरे जावे लागेल.

१. सन १९९१ ते ९७ या कालावधीत औद्योगिक उत्पादन वृद्धीचा दर सरासरी ६% होता. या अगोदर हा दर ७.५ होता. याचाच अर्थ असा की, औद्योगिक दरात वाढ होण्याऐवजी घट झालेली आहे.

२. सन १९९५-९६ मध्ये २.३६ लाख उद्योग आर्थिक दृष्ट्या सक्षम नव्हते त्यापैकी २३ लाख लघुउद्योग होते.

३. सन १९९०-९१ मध्ये देशात बेकारीचे प्रमाण ३.९ होते. हेच प्रमाण १९९५-९६ मध्ये ५.५% पर्यंत वाढले आणि यामध्ये सतत वृद्धी होत आहे.

४. करार मजुराच्या प्रमाणात २.३% वरून ३% पर्यंत वाढ झाली.

५. १९९८ पर्यंत भारतात सुशिक्षीत बेकारांची संख्या ४ कोटी होती त्यापैकी फक्त १.४ लाख व्यक्तीला रोजगार उपलब्ध झाला.

६. सार्वजनिक आजारी उद्योगातील सन १९९६ पर्यंत ९८,५९३ कर्मचाऱ्यांची कपात करण्यात आली.

७. भारतातील आर्थिक बदलामुळे औद्योगिक क्षेत्रात विवाद वाढून कामाचे दिवसाचा अपव्यय होत आहे.

**आयात निर्यात धोरण व त्याचा अर्थव्यवस्थेवरील परिणाम**

भारताने १९९१ ला नवीन आर्थिक धोरणाचा स्वीकार करूनही प्रतिकूल व्यापाराधिक्य वाढतच आहे. निर्यातीपेक्षा आयातीवर चालू वित्तीय वर्षात एकूण अंतर्गत राष्ट्रीय उत्पादनात ६% ते ६.५% वाढ होईल अशी अपेक्षा होती. परंतु अर्थव्यवस्थेच्या वाढीला मारक अशा अनेक अनिष्ट घटकांची युती लाभल्यामुळे आशा मावळू लागल्या आहेत. या वर्षी ५% वार्षिक सरासरी विकासाचा वेग गाठू शकत नाही. चालू वर्षाच्या शेतीच्या हंगामात जुलै व त्यानंतरच्या महिन्यात पावसाने दगा दिल्यामुळे शेतीच्या उत्पादनात १५% घट होण्याची शक्यता आहे. दुसरी गोष्ट म्हणजे युद्धजन्य परिस्थिती त्याचप्रमाणे सरकारच्या जमा खर्चात मोठ्या प्रमाणांवर तूट चालू वर्षाच्या केंद्रीय अर्थसंकल्पात वित्तीय तुटीचे एकूण अंतर्गत राष्ट्रीय उत्पन्नाशी तौलनिक प्रमाण ५.३% ठेवण्याचे उद्दिष्ट ठरविण्यात आले. चालू वर्षी तूट १५ ते १८ हजार कोटी रूपयाची वाढण्याची शक्यता आहे. अनुदानासाठी वाढीव मागणी, टंचाई निवारण्यासाठी अर्थसहाय्य कर रूपी महसुलात अपेक्षित घट यामुळे वित्तीय तूट आवाक्याबाहेर जाणार आहे. केंद्र व राज्य सरकारच्या वित्तीय तुटीचा विचार केला तर ती तूट एकूण अंतर्गत राष्ट्रीय उत्पन्नाच्या तुलनेत ११% च्या जवळपास पोहचली आहे.

सरकारी उपक्रमाच्या भाग भांडवलाची वेगाने विक्री झाली असती तर त्यामधून चांगले उत्पन्न मिळून सरकारची वित्तीय तूट आटोक्यात राहिली असती. सरकारी उपक्रमाचे खाजगीकरण झाल्यामुळे त्यांचे आधुनिकीकरण शक्य झाले असते आणि यामधून मोठ्या प्रमाणावर नफा मिळाला असता परंतु भारतात हे शक्य होवू शकले नाही. त्यामुळे गुंतवणूकदारांमध्ये अनिश्चिततेचे वातावरण निर्माण झाले.

भारतातील खाजगी उद्योग मुक्त बाजारपेठेत जागतिक स्पर्धेला तोंड देण्यासाठी सक्षम बनण्याचा पिडादायक प्रक्रियेतून जात आहे. देशातील शेअर बाजारात मंदीचे वातावरण वाढले. कर्ज, कर्जावरील व्याजाचे चढते दर या गोष्टी भारतातील भांडवली गुंतवणूकीला प्रोत्साहन देणाऱ्या नाहीत.

१९९४-९७ च्या काळात भारतीय अर्थव्यवस्थेच्या सुवर्ण युगात विकासाचा जो चांगला, चढता क्रम गाठण्यात आला होता तो आता भूतकाळात जमा झाला आहे.

**कृषी उद्योग क्षेत्रातील गुंतवणूक व रोजगार निर्मिती**

भारत सरकारच्या १९९१ च्या आर्थिक धोरणामुळे कृषी क्षेत्रात सुद्धा आमुलाग्र बदल करणे आवश्यक आहे. ती खालीलप्रमाणे

Scanned by CamScanner

१. लागवडी क्षेत्रात वाढ, २. कृषी उत्पादकतेत वाढ, ३. कृषी उत्पादनात वाढ, ४. शेती विषयक संशोधन, ५. तंत्रज्ञान नवीन बि-बियाणाचा व खताचा वापर, ६. पाणी पुरवठ्याच्या सोयींत वाढ, ७. उत्पादन खर्चात कपात, ८. कृषी सहाय्य व सरकारी धोरण, ९. कृषी व्यवसाय व विपणाच्या पद्धती, १०. कृषी उत्पादनाचे निर्यात वाढ करणे, ११. कृषी व्यवसायातील वस्तूवरील पेटेंट इत्यादी बाबतीत भरीव गुंतवणूक करणे आवश्यक आहे. परंतु भारताच्या नवीन आर्थिक धोरणामुळे कृषी क्षेत्रावर विपरीत परिणाम झालेला आहे. गॅट करारानुसार भारताला आयातीची गरज नसली तरी ३% अन्नधान्याची आयात करावी लागणार. भारत अन्नधान्य उत्पादनाच्या बाबतीत सक्षम असला तरी गॅट बोझा सहन करून आयातीवर पैसा खर्च करावा लागणार.

डंकेल प्रस्तावानुसार शेतकऱ्यांना दुसऱ्यांदा बि-बियाणाच्या, खरेदीला जादा भाव द्यावा लागणार आहे. तसेच रासायनिक खते, औषधी या सर्व बाबतीत बहुराष्ट्रीय परकीय कंपन्यांशी बियाणे शेतकऱ्यांना महाग भावाने घेवून वापरावी लागणार. देशी कंपन्यांना ही बि-बियाणे निर्माण करता येणार नाही. शेतकऱ्यांना संकरीत बियाणे निर्माण करण्यावर बंदी राहणार पेटंटमुळे महागडी बि-बियाणे औषधी, खते भारतातील परंपरागत शेती करणाऱ्या शेतकऱ्याना परवडणारी नसल्यामुळे परंपरागत असंकरीत बियाणांकडे वळावे लागेल. शेती उत्पादन कमी होवून सरकारला मोठ्या प्रमाणावर धान्य विदेशातून आयात करावे लागेल.

## जागतिकीकरणात विदेशी कंपन्यांचे अर्थव्यवस्थेत वाढते वजन

डंकेल प्रस्तावामुळे भारतात सर्वच क्षेत्रात विदेशी कंपन्यांचे प्रस्थ वाढलेले आहे. वीज उत्पादन दळणवळण वाहतूक साधन उद्योग, पेटेंटमुळे तर औषधी, खते, संकरीत बि-बियाणे यावर विदेशी कंपन्यांची मक्तेदारीत वाढ होत आहे.

पाश्चात्य देशात भारतातील आयुर्वेदिक औषधाला प्रचंड मागणी आहे. भारतीय औषधी बाबतीत विदेशी कंपन्यांचे पेटंट मिळण्याचा प्रयत्न होता. परंतु भारतातील तज्ञ शास्त्रज्ञांनी अचुक वेळी त्याचा प्रयत्न हाणून पाडला. या बाबतीत उदा. द्यायचे झाले तर कडुलिंबाचे देता येते. भारतातील मार्गो साबणाला युरोप व अमेरिकेत प्रचंड मागणी आहे तेथे कडुनिंबाच्या झाडालामेडीकल ट्री ऑफ इंडिया असे म्हटले जाते. पाश्चात्य देशात कडूनिंबापासून बनणारी साबणाची लोकप्रियता पाहुन, रॉबोलेस ने कलकत्तापासून कंपनीला विकत घेतले आणि रॉबर्ट लर्सन आणि डॉ. जेम्स क्लार्क या दोन वैज्ञानिकांनी कडुनिंबापासून तयार होणाऱ्या रोगनिवारक वस्तूवर पेटंट घेतले.

औद्योगिक क्षेत्रात भवितव्य असलेले उद्योग घशात घालायचे हे धोरण बहुराष्ट्रीय कंपन्यांनी आखलेले आहे. भारतातील मल्होत्रा दाढीचे ब्लेड तयार करणारा भलामोठा समूह गिलेट या बहुराष्ट्रीय कंपनीने घशात घातला. थंडपेयांनी भारतीय बाजारपेठा काबीज केलेल्या आहेत. मिठाच्या बाबतीत विचार केला तर बहुराष्ट्रीय कंपन्यांनी विदेशात सर्टिफाय करून शुद्ध मिठ वापरण्याचा सल्ला अनेक देशांना दिलेला आहे. भारतात खुल्या मिठाची किंमत २ किंवा ३ रूपये किलो असायची ज्यासाठी महात्मा गांधीने स्वातंत्र्यपूर्व काळात मिठाचा सत्याग्रह करून कर लावायचा नाही. यासाठी जनआंदोलन केले त्याच मिठासाठी आपण २ पॉकेट ७ रू. किलो ८ रूपये किलो विकत घेतो आहे. ज्या मिठाच्या बाबतीत उत्पादन खर्च नाही त्यावर विदेशी कंपन्यानी खोऱ्यांनी नफा मिळविला आहे. विदेशी कंपन्यांची हळदीच्या पेटेंट मिळविण्याचा प्रयत्न केला होता. परंतु भारतातील डॉक्टर, शास्त्रज्ञ व सरकारने त्याचा प्रयत्न हाणून पाडला आहे.

औद्योगिक क्षेत्रात बहुराष्ट्रीय कंपनीतील उत्पादित होणाऱ्या वस्तूची प्रचंड स्पर्धा करावी लागत आहे. देशी उद्योग, देशोधडीला जात आहे. विदेशी वस्तूची भारतीय बाजारपेठेत आवक मोठ्या प्रमाणावर वाढलेली आहे.

जागतिकीकरणात विदेशी कंपन्यांचे देशांतर्गत वाढत्या प्रस्थामुळे भारतात कृषी क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर शेतमजुराच्या बेकारीच्या संस्थेत वाढ झालेली आहे.



Scanned by CamScanner

पाण्याचे जलव्यवस्थापन भविष्यात विदेशी कंपन्यांच्या हाती जाणार त्यामुळे मोठ्या प्रमाणावर उपभोक्त्यांकडून किंमत वसूल करतील. कृषी क्षेत्रात प्रचंड बेकारी निर्माण होण्याची चिन्हे आहे.

औद्योगिक क्षेत्रात देशी कारखाने भारतातील ग्रामीण भागातील कुटीर, लघुउद्योग तोट्यामध्ये असल्यामुळे मोठ्या प्रमाणावर बेकारीचे स्वरूप पहायला मिळणार आहे. दरवर्षी बेकारीच्या संख्येत वाढ होत आहे. कर्मचारी कपात धोरण, सरकारी तूट यामुळे बेकारी वाढत आहे.

**रोजगार बेकारी या संदर्भात सरकारचे वर्तमान मौद्रीक धोरण, राजकोषीय धोरण**

२१ व्या शतकातील दहाव्या, पंचवार्षिक योजनेत दरवर्षी १ कोटी लोकांना रोजगार देणे आणि गरीबाचे प्रमाण २६% वरून २१% पर्यंत आणण्यासाठी ७% विकास देशाचे लक्ष्य निर्धारित केलेले आहे.

८% विकासाचा दर साधण्यासाठी दहाव्या पंचवार्षिक योजनेत निर्गुंतवणूक कर, कामगार सुधारणा यांचा समावेश असलेल्या सहा कलमी कठोर कार्यक्रम राबविण्याचे संकेत पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांनी दिले. भारतातील गरीबी व बेरोजगारी दूर करण्यासाठी कठोर निर्णयाचा समावेश केलेला आहे. उदा. सार्वजनिक कंपन्या, कामगार सुधारणा, कृषी बाजार पेठेवरील बंधने हटविणे, कर सुधारणा, विद्यमान भांडवली संपत्ती विकंसीत करणे इत्यादी बदल घडवून भारतात रोजगारीची संधी उपलब्ध करून बेकारीचे प्रमाण कमी करण्याचे उद्दिष्ट्ये निश्चित करण्यता आलेले आहे.

**गरीबी म्हणजे काय ?**

गरीबीच्या संदर्भात व्याख्या करीत असतांना तुलनात्मक रित्या राष्ट्रीय उत्पन्न लक्षात घेवून गरीबीचा अर्थ स्पष्ट करता येतो. ज्या देशांचे राष्ट्रीय उत्पन्न इतर देशाच्या मानाने कमी असते त्या देशात मोठ्या प्रमाणावर केंद्रीकरण आहे. आर्थिक विषमतेचे प्रमाण जास्त असेल त्या देशात गरीब्रीचे प्रमाण जास्त असते.

भारतात जागतिक बँकेच्या अहवालानुसार १९७० ला ग्रामीण भागात २३७, १९८३ ला २५१, १९९८ ला २५२ तर शहरी भागात १९७० ला ५१, १९८३ ला ६५, १९९८ ला २५१ प्रमाणे गरीबीचे प्रमाण होते.

१९९० साली निरनिराळ्या राष्ट्राचे निर्यातीचे खालील प्रमाणे उत्पन्न होते.

| | | |
|---|---|---|
| १. | भारत | १८ अब्ज डॉलर |
| २. | चीन | ६२ अब्ज डॉलर |
| ३. | जपान २८७ | ,, |
| ४. | जर्मनी | ३९८ ,, |
| ५. | अमेरिका | ३७१ ,, |
| ६. | सिंगापूर | ६२ ,, |
| ७. | स्वित्झर्लंड | ६४ ,, |
| ८. | मलेशिया | २९ ,, |

यावरून असे लक्षात येते की, प्रगतीशील राष्ट्रा बेकारीचे प्रमाण कमी असलेले दिसून येते तर विकसनशील व अविकसीत देशात मोठ्या प्रमाणावर बेकारीचे स्वरू दिसून येते. भारताने नवीन आर्थिक धोरणाचा स्वीका केल्यापासून बेरोजगारीच्या संख्येत मोठ्या प्रमाणावर वाढ झालेली आहे.

**विकसीत व विकसनशील राष्ट्रात सापेक्ष व निरपेक्ष गरीबी**

निरपेक्ष गरीबीचा विचार करतांना समाजातील ज्यांचे उत्पन्न फारच कमी आहे की ज्या उत्पन्नात त्याच्या आवश्यक गरजाची पूर्तता होवू शकत नाही. गरीबीची व्याख्या देशपरत्वे बदलणारी असते. भारतातला गरीब व अमेरिकेतला गरीब यांची तुलनाएकाच ठिकाणी करता येत नाही. विकसनशील व अविकसीत देशातला गरीब म्हटलाकी ज्याचे उत्पन्न इतरांच्या मानाने अत्यंत कमी असते की ज्या उत्पन्नात आपल्या आवश्यक गरजेची पूर्तता होवू शकत नाही.

सापेक्ष गरीबीचा विचार करीत असतांना समाजातील व्यक्तीची जीवनावश्यक गरज पूर्ण झालेली असते. समाजातील अधिक उत्पन्न असणाऱ्या लोकांची तळातील, अत्यंत कमी उत्पन्न असणाऱ्या लोकांशी तुलना केली जाते. विकसीत देशांमध्ये सुद्धा मोठ्या प्रमाणावर गरीबी आहे. उदा.

अमेरिका, जर्मनी, फ्रान्स, इंग्लंड, जपान या देशांमध्ये पण गरीबीचे प्रमाण आहे. परंतु अविकसीत व विकसनशील देशांमध्ये वेगळे आहे. विकसीत देशात गरीबीची व्याख्या करीत असतांना, 'ज्याचे दरडोई उत्पन्न कमी, की ज्या उत्पन्नात इतरांप्रमाणे चैनीच्या वस्तूची कमतरता असते त्यास गरीब म्हटले जाते.' उदा. अमेरिकेत एखाद्या व्यक्तीकडे मोटार नसेल आणि ती घेण्याची त्याची आर्थिक क्षमता नसेल तर अधिक उत्पन्न असून मोटार घेण्याची क्षमता असणाऱ्यांच्या तुलनेत तो गरीब ठरतो.

भारताने जागतिकीकरणाचा स्वीकार केल्यामुळे अतिशय वेगाने वाढ अपेक्षित असलेल्या योजना सुरू झाल्यानंतर काही काळापर्यंत अर्थरचनेला धक्के बसत राहणार. हे धक्के बसतांना असे अनेक देशातील संशोधनाने सिद्धही झालेले आहे, हे शॉक बसले तरी सामाजिक व राजकीय परिस्थिती सुद्धा सुदृढ असणे आवश्यक असते.

भारतातील राजकीय व सामाजिक परिस्थिती पाहीलीतर वाढती लोकसंख्या, निरक्षरतेचे प्रमाण, अकार्यक्षम कामगार, भ्रष्टाचार, जातीय विषमता वाढते दंगलीचे प्रमाण वाढतात, दहशतवाद, अस्थिर राजवट वाढती गरीबी दारिद्र्य इत्यादी कारणांमुळे आर्थिक वाढीच्या मार्गात अडथळे येतात.

पूर्व आशियातील राष्ट्राचे उदाहरण नेहमी आपल्यासमोर आदर्श म्हणून उभे केले जाते. त्यांनी नवीन धोरण स्वीकारून जलदगतीने प्रगती साध्य करून घेतली. त्याचे कारण म्हणजे त्या देशातील सामाजिक व राजकीय परिस्थिती सुदृढ होती म्हणून तेथील अर्थव्यवस्था धक्के सहन करू शकते.

भारतातील गरीबीचे प्रमाण इतके प्रचंड आहे की, कोणतेही सरकार त्यांचेकडे दुर्लक्ष करून आर्थिक कार्यक्रम यशस्वी होणे अशक्य आहे. गरीबांना मध्यवर्ती स्थान देवूनच आर्थिक विकासाच्या योजना आखल्या आणि अंमलात आणल्या तरच यशस्वी होतील.

भारताने २००२ मध्ये चालू होणारी दहावी पंचवार्षिक योजनेत प्रमुख उद्दिष्टांपैकी दरवर्षीला १ कोटी लोकांना रोजगारदेणे, आणि गरीबीचे प्रमाण २६% वरून २१% पर्यंत आणण्यासाठी ८% विकासाचा दर निश्चित केलेला आहे. योजना आयोगाचे उपाध्यक्ष कृष्णचंद्र पंत यांनी सुद्धा असे स्पष्ट केले की वाढत्या लोकसंख्येच्या तुलनेत रोजगार संधीचा तुटवडा हे देशापुढील सर्वात मोठे आव्हान आहे.

दहाव्या योजनेचा उद्देश रोजगार वाढविणे व त्यासाठी विकासाचा दर वाढविण्यासोबतच, गरीबी निर्मुलन आणि सामाजिक मागासलेपणा दूर करण्याची आवश्यकता व्यक्त केली. युनोच्या मानवी विकास अहवाल (१९९६) यामध्ये ही बाब स्पष्टपणे नमुद करण्यात आली आहे की, बाजार शक्तीच्या नियंत्रणाखाली अर्थव्यवस्था देण्याचे जे धोरण सरकार राबवित आहेत त्यामुळे बहुसंख्य जनतेचे हीत व कल्याण साधले गेलेले नाही. आर्थिक सुधारणा असे गृहीत धरतात की, मानवी संपत्तीचा विकास झाला नाही तर, आर्थिक वाढीला प्रतिबंध होते. मानवी साधनसामुग्री संपत्तीच्या विकासावरही लक्ष देणे आवश्यक असते.

### दरडोई उत्पन्नात घट

मानवी विकास अहवाल (१९९६) वरून असे आढळून येते की, गेल्या १० वर्षातील जगातील ८९ देशाची आर्थिक अवनती झालेली आहे. दहा वर्षापूर्वी ८९ देशांची स्थिती सध्याच्या मानाने बरी होती. आफ्रिका, दक्षिण अमेरिका खंडातील आणि आशिया खंडातील एकूण सत्तर विकसनशील देश आहेत की ज्यांची १९६० आणि १९७० च्या शतकात त्यांचे दरडोई राष्ट्रीय वार्षिक उत्पन्न वाढले होते. ते १९९६ च्या अहवालात कमी झालेले दिसते.

खांडा, लायबेरीया, निकाराग्वा या देशातील लोकांचे राष्ट्रीय उत्पन्न घटले कारण तेथे यादवी युद्ध झाले. व्हेनुझुएला हा नैसर्गिक संपत्तीने समृद्ध असलेलादेश त्याचीही आर्थिक अवनती झाली. घाना या देशात सुद्धा दरडोई उत्पन्नात घट झाली. ज्या देशाचे आर्थिक उत्पादन वाढले व त्यांनी रोजगार निर्मितीकडे लक्ष दिले नाही, त्याचा परिणाम म्हणून दरडोई उत्पन्न घटले. २७ देशात रोजगार वाढला. १९ देशात रोजगार वाढला उत्पादनात वाढ झाली. या शेवटच्या वर्गात भारत आहे.

Scanned by CamScanner

## जागतिक मंदी

२१ व्या शतकाच्या सुरूवातीपासून जागतिक स्तरावर आर्थिक मंदीची लाट सर्वत्र दिसून येते याचे दुष्परिणाम विकसीत, विकसनशील व अविकसीत देशांमध्ये सुद्धा दिसून येतात. विकसीत देशाचा विचार केला असता अमेरिका सारख्या बलाढ्य देशात मंदीचे वातावरण दिसून येते. अमेरिकेत मंदीत असेल तर जागतिक स्तरावर मंदी येते हे समीकरण गृहीत धरले जाते. अमेरिकेत गुंतवणूक प्रक्रियेत ता बसलेली खिळ, बेरोजगारीचे वाढते प्रमाण, सरकारी तूट, शेअर्स बाजारात घसरण, अफगाण इराक विरूद्ध युद्धजन्य परिस्थिती, औद्योगिक कंपन्यांची पिछेहाट, कंपनी मधील गैरकारभार इत्यादी मुळे मंदीची लाट दिसून येते.

युरोप मध्ये सुद्धा आर्थिक व राजकीय बदल घडून आले. पूर्व व पश्चिम युरोपाचे एकत्रीकरण, युरो डॉलरचा प्रयोग, राजकीय बदल यामुळे आर्थिक वाढ दरसाल १०% कमी झालेले आहे. बेरोजगारी १०% जास्त वाढलेली आहे. ज्याप्रमाणे जर्मनी मध्ये मंदिची लाट निर्माण झालेली आहे. त्याचप्रमाणे इटली, फ्रान्स या देशामध्ये सुद्धा मंदीचे वातावरण दिसून येते.

आशिया खंडात सुद्धा आर्थिक मंदी व अनिश्चितता दिसून येते. जपानमध्ये बँका व वित्तसंस्था डबघाईस आलेल्या आहेत. जपानमध्ये बुडीत कर्जाची समस्या निर्माण झालेली आहे. त्याचप्रमाणे इंडोनेशिया, थायलंड या देशामध्ये सुद्धा बिकट आर्थिक परिस्थिती निर्माण झालेली आहे.

आशिया खंडामध्ये इतर देशाच्या मानाने चीनची परिस्थिती वेगळी आहे. १९८० पासून साम्यवादी अर्थव्यवस्थेत थोडा फार बदल करून नवीन आर्थिक धोरणाची अंमलबजावणी करून मोठ्या प्रमाणावर विदेशी भांडवलाचा फायदा घेतला. ए. टी. कर्णिक या जागतिक सल्लागार समितीने परदेशी भांडवल आकर्षित करणारा पहिला अभ्यासक्रमाचा देश आहे असे शिक्कामोर्तब केलेले आहे.

भारत सुद्धा मंदीच्या विळख्यात अडकलेला आहे. भारतातील राजकीय मंडळी आर्थिक परिस्थिती चांगली आहे असे वारंवार सांगतात परंतु वस्तुस्थिती वेगळी आहे.

भारत ही आर्थिक समस्येने आर्थिक विकासाचा वेग वाढविण्यात अपयशी ठरला आहे. उदा. दारिद्र्य, गरीबी, बेकारी, अपुरा मानव विकास, औद्योगिक क्षेत्रातली अनिश्चितता, गुंतवणूकीचे प्रमाण कमी, तोट्यातील वित्तसंस्था, विदेशी व्यापारातील तूट, युद्धजन्य परिस्थिती, वाढता दहशतवाद, राजकीय अस्थिरता, संयुक्त सरकारे क्रुडतेलाच्या वाढत्या किंमती इत्यादी मुळे भारतामध्ये सुद्धा मंदीची स्थिती दिसून येते.

भारताने आर्थिक वाढीचा वेग ५११ टक्के निर्धारित केलेला होता परंतु ते उद्दिष्ट साध्य करू शकला नाही. दहाव्या पंचवार्षिक योजनेत ८% विकासाचा दर निश्चित केलेला आहे परंतु एवढे उद्दिष्ट साध्य करू शकत नाही.

जागतिक वित्तसंस्था व संशोधन संस्था यांच्या अहवालानुसार चालू असलेली आर्थिक मंदी काही काळ राहून कठोर निर्णय कायदे, उपाययोजना, करून भरभराटीस येवू शकते.

## जागतिक गरीबीमध्ये वाढ

जागतिकीकरणामुळे अनेक देशात जलद गतीने विकास साध्य करण्याच्या हेतूने कर्मचारी कपात, खर्चाला लगाम सार्वजनिक उद्योगाचे खाजगीकरण यामुळे अनेक देशात मोठ्या प्रमाणावर बेकारी, गरीबी, दरडोई उत्पन्नात घट, आर्थिक विषमता निर्माण झालेली दिसून येते. १९९६ च्या मानवी विकास अहवालानुसार जगातील श्रीमंत देश अधिक श्रीमंत होत आहे तर गरीब देश हे गरीब होत आहे. बेकारीचे प्रमाण जितके कमी असेल तितके आर्थिक प्रगतीबरोबरच दरडोई उत्पन्न वाढते.

पूर्व युरोपात कम्युनिस्ट देशात १९९० साली जे दरडोई उत्पन्न होते ते १९९६ साली घसरले आहे. अमेरिकेत मुक्त अर्थव्यवस्था असून सुद्धा १९९३ मध्ये अमेरिकन दरडोई वार्षिक उत्पन्न सरासरी २४,२४० होते. अमेरिकेतील खालच्या १/५ गरीब लोकांचे दरडोई वार्षिक उत्पन्न ५८१४ डॉलर्स होते. हे प्रमाण २४% इतके होते. श्रीमंत देशांमध्ये सुद्धा आर्थिक विषमता व गरीबी आहे. अमेरिकेत वरच्या २०% लोकांचे उत्पन्नात यांचे प्रमाण ९:१ झाले आहे.



Scanned by CamScanner

इंडोनेशिया, मलेशिया, सिंगापूर अशा अतिपूर्व आणि पूर्व आशिया खंडातील देशात मात्र दरडोई उत्पन्नात इतकी तफावत नाही. या देशांनी आरोग्य, महिला कल्याण, शिक्षण, कमी उत्पन्न गटातील लोकांना कर्जपुरवठा, लघू उद्योगांना कर्जपुरवठा संरक्षण व पाठिंबा देण्यात आला.

## जागतिकीकरण व विदेश व्यापार व त्यावर होणोर भविष्यकालीन परिणाम

भारतीय उद्योगावर जागतिक व्यापार संघटना(डब्ल्यु.टी.ओ.), जागतिक बँक (डब्ल्यु. बी.), आंतरराष्ट्रीय नाणे निधी (आय.एम.एफ.) व बहुराष्ट्रीय कंपन्या यांनी लादलेल्या जाचक अटी गॅट करार, पेटंट कायदा, सी.टी.बी.टी. करार मुक्त आयात निर्यात धोरण, विदेश गुंतवणूकीस प्रोत्साहन यामुळे अनेक उद्योगाचे खाजगीकरण सार्वजनिक उद्योगाचे हळुहळु होणारे खाजगीकरण ग्रामीण भागातील पायाभूत उद्योगांवर सुद्धा विपरीत परिणाम दिसायला लागलेले आहे. भारतातील उत्पादने अत्यंत कमी किंमतीत विकली जाणार आहे. कृषी क्षेत्रात विदेशी कंपन्या आपले प्रस्थ वाढून कृषी अर्थव्यवस्था खिळखिळी होणार यात शंका नाही. भारतात एकीकडे उत्पादन वाढीत, गतिरोध असेल तर दुसरीकडे चलन फुगवटा वाढत जाईल याचा परिणाम भारतीय उद्योग क्षेत्राची मोठ्या प्रमाणावर पिछेहाट होईल. देशांतर्गत बेकारी, गरीबी आर्थिक विषमता दरडोई उत्पन्नात घट विदेशी व्यापारात तूट मोठ्या प्रमाणावर वाढत जाईल.

जागतिकीकरणाच्या परिणामाला तोंड देण्यासाठी सरकारने कठोर धोरणाचा अवलंब करणे आवश्यक आहे. सध्या १० व्या पंचवार्षिक योजनेत या परिणामाला तोंड देण्यासाठी ६ कलमी कार्यक्रम जाहीर केला आहे.

जागतिकीकरणाच्या संभाव्य परिणामाला तोंड देण्यासाठी सरकारकडे धोरणाच्या संदर्भात मर्यादित पर्यायच उपलब्ध आहेत. वित्तीय तूट आटोक्यात ठेवण्यासाठी सरकारला खर्चावर कठोर नियंत्रण ठेवावे लागेल त्यामुळे सरकारी खर्च वाढवून, अर्थव्यवस्थेला, चालना देण्याचा पर्याय सरकारकडे उपलब्ध नाही. दुसरीकडे चलन फुगवट्यातील वाढीमुळे भारतीय रिझर्व्ह बँकेला व्याजदरातील कपातीच्या मार्ग अनुसरता येणार नाही. उलट चलन फुगवटा रोखण्याला अग्रक्रम देवून व्याजदर वाढवावे लागतील. तिसरी गोष्ट म्हणजे जगाची अर्थव्यवस्था संथगतीने सपाट रेषेत मार्गक्रमण करीत असल्यामुळे निर्यात वाढीला प्रोत्साहन देवून विकासाला चालना देण्याच्या पर्यायाला सुस्पष्ट मर्यादा आहेत. अमेरिकेत अर्थव्यवस्थेमुळे डबलडिप मंदीचे आव्हान उभे आहे. युरोपात विकासाचा वेग वार्षिक २% पेक्षा जास्त असणार नाही. जपान अजुनही मंदीच्या श्रृंखलातून, बाहेर पडण्याचा प्रयत्न करीत आहे. जगात सध्या सुव्यवस्थेत असलेली एकमेव अर्थव्यवस्था चीनची आहे. भारताची चीनला होणारी निर्यात शिशुअवस्थेत आहे.

भारतीय अर्थव्यवस्थेतील सार्वजनिक उद्योगाचे खाजगीकरण करण्याला तीव्र विरोध होत आहे. टाटा उद्योग समुहाने बी. एस. एन.एल. पूर्णपणे नियंत्रण मिळविणे मान्य नाही. खाजगीकरण हा आधुनिकीकरणाचा मार्ग आहे ही भूमिका, स्वीकारून वास्तविकतेकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. एकीकडे देशात साडे सहा कोटी टनाचे साठे सरकारी गोदामात आहे. सरकार जवळ ६५० कोटी डॉलरची गंगाजळी आहे. तर दुसरीकडे भूकबळी, दुष्काळ इत्यादी परिस्थितीमुळे बेरोजगारी वाढलेली आहे.

जागतिकीकरणाच्या परिणामाला तोंड देण्यासाठी जास्तीत जास्त रोजगार वाढविण्याच्या संधी वाढविण्याचे प्रयत्न करायला पाहिजे. रोजगार निर्मिती करणाऱ्या उद्योगाची स्थापना, कठोर कर कायद्याची अंमलबजावणी शेती, क्षेत्रात विकास, आरोग्य सुविधा, शिक्षणात बदल विदेशी व्यापारातील तूट कमी करण्यासाठी तोट्यात चालणाऱ्या, उद्योगाचे खाजगीकरण, निर्यात वाढीसाठी प्रयत्न इत्यादी कठोर निर्णय घेतल्याशिवाय भारताला तरणोपाय नाही. जागतिकीकरणात टिकायचे असेल तर कठोर निर्णय घेवूनच देशाची प्रगती साध्य करणे अगत्याचे ठरेल.

***संदर्भ:*** १.नवे आर्थिक धोरण-डॉ. ना. य. डोळे, २. भारताचे अर्थशास्त्र-प्रा. डी. एस. एन. ब्रोधनकर, प्राचार्य आर. डी. कड्डू, ३. विविध वृत्तपत्रीय विचार मंथन, ४. आंतरराष्ट्रीय अर्थशास्त्र- प्रा. झामरे



Scanned by CamScanner



# जागतिकीकरण आणि बेकारीची समस्या

प्रा. दुर्वास वाघमारे
जनता महाविद्यालय, चंद्रपूर

जागतिकीकरणाच्या नावांखाली संपूर्ण जग बदलत आहे. विज्ञान व तंत्रज्ञान क्षेत्रात अफाट प्रगती व वाढ, यांत्रिकीकरण, संगणक क्रांती, जैवतंत्रज्ञान, भौतिक वस्तूंचा हव्यास व पाश्चिमात्यांचे अंधानुकरण या सर्व बाबी एकीकडे तर दुसऱ्या बाजूला भारतासारख्या विकसनशील देशांत अज्ञान, अनिष्ट रुढी, परंपरा, अंधश्रद्धा, कर्मकांडवाद, आळस, जातीभेद, बेकारी, भ्रष्टाचार यासारख्या कुप्रथांना आलेले उधान यामुळे भारतीय जनजीवन ढवळून निघाले आहे.

आर्थिक सुधारणांच्या दूसऱ्या टप्प्याच्या नावांखाली प्रत्येक क्षेत्रात बहुराष्ट्रीय कंपण्यांच्या शिरकावाला पूर्ण परवानगी देण्याचा सपाटा सुरू आहे. निर्गुंतवणुकीच्या नावांखाली सार्वजनिक क्षेत्रातील राष्ट्रीय संपत्ती फुकून टाकली जात आहे. लघू उधोगांसाठी राखीव असलेले क्षेत्र मक्तेदार व बहुराष्ट्रीय कंपण्यांसाठी मोकळे केले जात आहे. जागतिकीकरणाच्या धोरणाला साथ देण्यासाठी केंद्र व राज्य सरकार आपली असली नसली प्रतिष्ठा पणास लावीत आहे. याचा परिणाम बेरोजगारीचे प्रमाण वाढून दारिद्र्याचे प्रमाणही अतिशय वाढले आहे. लघू उद्योग उध्वस्त होत आहे.

आज जागतिक बँक, आंतरराष्ट्रीय नाणेनिधी, जागतिक व्यापार संघटना आणि संयुक्त राष्ट्रसंघ या सर्व ठिकाणी अमेरिकेची सत्ता चालते. या संस्थामधून अमेरिकेचा आर्थिक दहशतवाद राजरोसपणे सुरू आहे. विकसनशील देशाची साधन संपत्ती आणि बाजार पेठ यावर कब्जा करीत, विकसीत देशाची अर्थव्यवस्था अंकीत करण्याचा त्यांचा हेतू आहे. जापान, जर्मनी, फ्रान्स अशा जी-७ या संपन्न देशाचीही यासाठी अमेरिकेची साथ आहे.

खाजगीकरण व उदारीकरणाच्या नावांखाली कारखानदारांना कामगार कपातीचा अधिकृत परवाना मिळाल्यामुळे त्यांनी कामगारांचे लचके तोडण्याचे षडयंत्र रचले आहे. शेतमाल बाजारपेठेच्या मुक्त व्यवस्थेत शेतकरी नागवला जात आहे. त्याच्या एकाधिकार कापूस योजना गुंडाळून ठेवल्या जात आहे. त्यामुळे ४० टक्केपेक्षा अधिक जनता दारिद्र्यरेषेखाली येवून त्यांच्यात आत्महत्येचे प्रमाण वाढत आहे. कुपोषणाने अन्नावाचून त्यांचा बळी जात आहे. स्वातंत्र्याचा ७५ वर्षानंतरसुद्धा २५ कोटी युवक युवती रोजगारासाठी भटकत आहे.

### जागतिकीकरणाचे परिणाम

आज जगातील बडे भांडवलदाराचे देश आणि त्यांचे दुय्यम साथीदार एकामागून एक अरिष्टाला बळी पडत आहेत. येत्या काळात अमेरिकेच्या राष्ट्रीय उत्पादनाचा वाढीचा दर १ टक्याने, युरोपीय राष्ट्राचा १.५ टक्याने, जपानचा एक टक्याने, भारताचा ४ टक्याने घसरेल. कारण अफगणिस्तानातील अमेरिकेच्या आक्रमणाची लढाई दीर्घकाळपर्यंत राहिल्याने जगातील अनेक देशाच्या अर्थव्यवस्थांवर भयंकर परिणाम झाला आहे.,

### चीनच्या प्रवेशाचा परिणाम

जागतिक उत्पादनाला चालना देणारी एक उपयुक्त उत्पादनशक्ती म्हणून जगाचे नेतृत्व करण्याचा चीनचा पवित्रा आहे. यासाठी समाजवादी चीन मात्र मोठ्या आत्मविश्वासाने जागतिक व्यापार क्षेत्रात पदार्पण करीत आहे. चीनसुद्धा आर्थिक समस्यापासून मुक्त आहे असे नव्हे. जागतिक व्यापार संघटनेत प्रवेश घेतल्यानंतर चीनला अधिकच मोठ्या प्रमाणावर संकटाचा सामना करावा लागणार आहे. कारण जागतिक व्यापार संघटनेचे सूत्रधार अमेरिका आणि युरोपीय राष्ट्रसंघ हे मोठ्या धर्मवीरत्वाचा दावा

Scanned by CamScanner

करीत असले तरीही प्रत्यक्षात ते सैतानाचीच अवलाद असल्याचे सिद्ध झाले आहे. मुक्त आंतरराष्ट्रीय व्यापाराचा कितीही आक्रोश ते करीत असले तरी त्यांच्या नफ्याला थोडीसीही धस लागली तरी ते लगेच परदेशी मालाच्या मुक्त संचाराला वेसन घालून आत्मसंरक्षक व्यापार नितीचा अवलंब करतात.

आज चीन ही जगातील सर्वात मोठी बाजारपेठ बनली असून त्या बाजारपेठेच्या कक्षेतील ग्राहकांची संख्या १३० कोटींच्या पलिकडे गेली आहे. आज जगातील बहुतेक सर्व देशावर मंदी आणि गुंतवणूकीचा तुटवडा या विदारक आर्थिक आपत्तीपायी समूळ उध्वस्ती करणाचे सावट पडले असतांना गेल्या वर्षी चीनमध्ये झालेल्या थेट गुंतवणूकीची रक्कम २०.४ टक्क्याने वाढून २७.४ अब्ज डॉलर्सची रेखा ओलांडून गेली. औद्योगिक वाढीचा अत्यंत शास्त्रशुद्ध समाजवादी पद्धतीचा योजनाबद्ध विकास, गुंतवणूकीवर तर्कसंगत समाधानकारक परतावा, भ्रष्टाचार मुक्त कारभार यंत्रणा आणि सर्वांच्याही पलिकडे जावून साऱ्या जगाचा कौतुकाचा आणि वाखाणणीचा विषय बनलेली चीनची समर्थ अशी कामगारशक्ती या सर्वांमूळे चीन हा सर्व गुंतवणूकदारांच्या आकर्षणाचा केंद्रबिंदू बनला आहे. अशा परिस्थितीत टाचणीपासून तर विमानापर्यंतचे आणि प्रवासी गाड्यांचे उत्पादन करणाऱ्या भांडवलदारी पश्चिम जगातल्या राक्षसी कंपण्या जगातील सर्वात मोठी बाजारपेठ असणाऱ्या चीनच्या १३० कोटी ग्राहकांच्या बाजारपेठेत हात धुवून घेण्यासाठी एकमेकांशी अहमहमिकेने रेटारेटी करीत आहेत. जागतिकीकरण साऱ्या जगालाच महाग पडले असून अधिकाधिक गाढ होत जाणाऱ्या जागतिक मंदीने अनेक राष्ट्राच्या अर्थव्यवस्था कोलमडून पडत आहे.

**अर्जेंटिनांची वाताहत**

अर्जेंटिना हा लॅटीन अमेरिकेतील आर्थिकदृष्ट्या बलवान असलेला तिसऱ्या क्रमांकाचा देश आहे. साक्षरतेच्या बाबतीत हा देश वरच्या क्रमांकावर आहे. परंतु जागतिक नाणेनिधीच्या निर्देशाप्रमाणे आर्थिक धोरणे राबविल्या मुळे या देशाची आर्थिक दुरावस्था निर्माण झाली आहे.

अर्जेंटिनांची लोकसंख्या तिन कोटी साठ लाख आहे. शेती, पशुधन व तेल उत्पादन यामूळे क्षेत्रफळात भारताची बरोबरी करणारा हा देश श्रीमंत गणला जात होता परंतू जागतिक नाणेनिधी, जागतिक बँक, जागतिक व्यापार संघटनेच्या निर्देशाप्रमाणे उदारीकरण, खाजगीकरण अवलंबिल्यामुळे या देशाची पुरती दुर्दशा झाली आहे.

अर्जेंटिनातील शासनावर व्यापारी वर्गाचे वर्चस्व आहे. देशातील औद्योगीकरण होतांना प्रारंभी देशी उद्योगांना परदेशी बहुराष्ट्रीय कंपन्यापासून संरक्षण देण्याचा या देशाने प्रयत्न केला. परंतू जागतिक बँक व जागतिक नाणेनिधीच्या दबावामुळे तेथील सरकारला हे संरक्षण काढून घ्यावे लागले. परिणामत: परदेशी बहुराष्ट्रीय कंपन्यांना देश लुटण्याची पूर्ण मुभा मिळाली याचा फायदा विशेषत: अमेरिकन कंपण्यांनी घेतला. शिथिलीकरणामुळे राजकीय व आर्थिक पातळीवर भ्रष्टाचार ही वाढला. जागतिक अर्थसंस्थाकडून घेतलेल्या कर्जाची फेड जनतेच्या बचतीच्या पैशातून व पेन्शनच्या पैशातून करण्यात येत आहे. त्यामूळे गरजवंतांना आपला पैसा असूनही तो गरजेच्या वेळी मिळू शकत नाही. भयानक मंदी, प्रचंड बेरोजगारी यामूळे भूकेकंगाल झालेल्या जनतेत असंतोषाचा स्फोट झाला. अर्जेंटिनाची राजधानी ब्युनस आयर्स मध्ये लोकांनी दंगे, लुटालूट सुरु केली. पोलिसांशी मोठ्या प्रमाणात लोकांच्या झटापटीही सुरु झाल्या. हे प्रकार गेले अनेक दिवस अर्जेंटिनांच्या राजधानीतच सुरू होते. या अस्थिर परिस्थितीमुळे या देशाच्या अर्थमंत्र्यांनी राजीनामा दिला. २० डिसेंबर २००१ रोजी या देशाच्या अध्यक्षांनी हेलीकॉप्टरमधून पलायन केले. फक्त दोन आठवड्यात या देशांत पाच अध्यक्ष झाले. एकूणच अर्जेंटिनामध्ये राजकीय व आर्थिक अराजकता निर्माण झाली आहे.

परकीय कर्जाचा प्राण कासावीस करणारा विळखा या राष्ट्राभोवती आहे. तसा परकीय कर्जाच्या



Scanned by CamScanner

पापाचा इतिहास फार मोठा आहे. खाजगीकरणामुळे अर्जेंटीनांच्या गरीब जनतेची पुरती नाकेबंदी करून टाकण्यात आली आहे. कामधंदा व कमीत कमी गरजेच्या वस्तू आणि सार्वजनिक सेवा यासारख्या नागरिकांच्या मुलभूत आर्थिक हक्काची गळचेपी झाली आहे. आय.एफ.एफ. च्या तालावर नाचणाऱ्या अर्जेंटिनांच्या राजवटीने देशाची खरीखुरी अर्थव्यवस्था पोखरून टाकली आहे. त्यामुळे अर्जेंटिनाच्या जनतेला त्याचे दुरगामी परिणाम भोगावे लागणार आहे.

**मेरा भारत महान**

माधवराव गोडबोले समितीच्या शिफारशीनुसार उदारीकरण, जागतिकीकरण, व्यापारीकरण, नागरिकीकरण व शेवटी खाजगीकरण या गोष्टी भारतातही जागतिक बँक आणि आंतरराष्ट्रीय नाणेनिधीच्या दबावामुळे वेगाने सुरू झालेल्या आहेत. सरकारी दवाखाने, प्राथमिक आरोग्य केंद्रे, दुग्धशाळा, पाणी पुरवठा, सार्वजनिक वाहतूक व्यवस्था एस. टी. रेल्वे यांचेही खाजगीकरण सुरू झाले आहे. सर्व कल्याणकारी योजना हळुहळू बंद करण्यात येत आहे. पाटबंधारे, तंत्रशिक्षण, रस्ते निर्मीती, सार्वजनिक बांधकाम, बंदर विभाग यांचे रूपांतर मंडळात केले आहे. स्वेच्छा निवृत्तीस अति उत्साहाने सुरूवात करण्यात आली आहे. याशिवाय कामगार कायद्यात बदल करून उद्योगधंदे बंद केले जात आहे. मनमानेल तशी कामगार कपात सर्रास सुरू झाली आहे. हे सर्व जागतिकीकरणाच्या प्रक्रियेमुळे होत आहे. शिक्षण बंद होवून, बेकारी वाढणार आहे. सामाजिक न्याय व समानता ही तत्वे देखील सोडून दिली जात आहे.

देशाचे पंतप्रधान बड्या राष्ट्रांसमोर, अमेरिका, इंग्लंडसमोर, आंतरराष्ट्रीय नाणेनिधी व जागतिक बँकेसमोर गुडघे टेकत आहे. त्यामुळेच त्यांना गुडघ्याचा त्रास झाला असावा असे जाणकारांना वाटते.

गॅट करारामुळे शेती तोट्यात आहे. शेतकरी कंगाल बनणार आहे. जागतिक बँकेच्या दबावाखाली केंद्र व राज्य शासन खाजगीकरण, कंत्राटीकरण करीत आहेत. सरकारी खात्याचा संकोच करीत आहेत. सरकारी कर्मचारी कपात करण्यासाठी व खाजगीकरण करण्यासाठी गीताकृष्णन, राकेश मोहन व अहवुलिया समिती स्थापन केली आहे.

या देशाला मोगलांनी जेवढे लुटले त्याच्या चौपट इंग्रजांनी लुटले आहे. आणि जितके इंग्रजांनी लुटले त्याच्या अनेक पटीने बहुराष्ट्रीय कंपण्या करीत आहे. जागतिकीकरणाचा प्रश्न भावनिक प्रश्न नसून हा अरिष्टाग्रस्त साम्राज्यवादी भांडवलशाहीच्या राजकीय अर्थकारणाचा प्रश्न आहे. जागतिकीकरणामुळे राष्ट्र धोक्यात आले असून गोरगरीब, कष्टकरी, दिनदुबळ्या वर्गाने मिळविलेले स्वातंत्र्य भांडवलवादी महासत्ता समजणारे देश कुरतडुन खात आहे. त्यामुळे स्वतंत्र भारताच्या अस्तित्वाचाच प्रश्न उभा ठाकला आहे.

**बेकारीचा उद्रेक**

देशात अर्धी जनसंख्या महिलांची आहे. जागतिकीकरणाचा जिवघेणा हल्ला महिलांवर होत आहे. त्यांचा रोजगार हिरावून घेतला जात आहे. जागतिकीकरणातुन संस्कृतीचे विडंबन होत असून महिलांचे वस्तूकरण होत आहे. अश्लिलता वाढत आहे. यातुनच महिलासंबंधी अपराधात वाढ होत आहे. साम्राज्यवादी देशातून येणारी जागतिकीकरणाची संस्कृती महिलांना अप्रतिष्ठित करीत आहे. गेल्या ५० वर्षात आपल्या देशातील समाज व्यवस्थेत मुलभूत परिवर्तन झालेले आहे. परंतू या परिवर्तनामुळे महिलांवरील बोझा अनेक दृष्टिने वाढलेला आहे.

सध्याचा काळ हा देशात आर्थिक आणि सामाजिक अरिष्टांचा काळ आहे. भारताच्या अर्थव्यवस्थेला तीव्र मंदीच्या लाटेने ग्रासले आहे. सामान्य जनतेची क्रयशक्ती खालावली आहे. हे या मंदीचे मुख्य कारण आहे. त्याचा जागतिकीकरण उदारीकरणाशी सरळ संबंध आहे. भारतीय उद्योगांना आणि शेती व्यवसायालाही जागतिकीकरणाचा फटका बसला आहे. उत्पादन खर्चात वाढ आणि स्वस्त आयात मालाची स्पर्धा यामुळे बहुतांश शेतकरी भिकेला लागण्याची वेळ आली आहे.

भारतात दर वर्षाला रोजगार शोधू पाहणाऱ्या



Scanned by CamScanner

नवतरुणांची संख्या शेकडा १.३३ ने वाढत आहे. तर रोजगार निर्मीती मात्र १.०४ ने वाढली आहे. त्यामूळे बेरोजगारीमध्ये दरवर्षी लाखोची भर पडत चालली आहे. आजमितीस संपूर्ण भारतात शहरी व ग्रामीण भागात मिळून बेरोजगारी १५ कोटी च्या वर गेली असावी असा अंदाज आहे. जनतेची क्रयशक्ती कमी होणे आणि मागणी घटत जाणे हे याचेच परिणाम आहे. महाराष्ट्रातील सत्ताधारी आघाडीतील प्रमुख पक्ष उदारीकरण, जागतिकीकरणाच्या धोरणाला बांधिल आहेत. गेल्या १२ वर्षात राज्यामध्ये सत्ताधारीपक्ष आणि मुख्यमंत्री बदलत गेले असले तरी प्रत्येकाने हेच धोरण मागच्या पेक्षा अधिक जोमाने राबविण्याचा निर्धार व प्रयत्न केलेला आहे. उर्जा क्षेत्रात महाराष्ट्र राज्य वीज मंडळाचे विभाजन आणि खाजगीकरण व वीजदराची पुनर्रचना यासाठी त्यांनी निर्धार केलेला आहे. कापूस एकाधिकार खरेदी योजना गुंडाळून टाकण्याचा निर्णयही त्यांनी जाहीर केला आहे. शासकीय दुग्धयोजनेचे ही खाजगीकरण करण्याचे त्यांनी ठरविले आहे.

सरकारचा खर्च कमी करण्यासाठी त्यांनी शासकीय कर्मचाऱ्यांवर सुरी चालविली आहे. आतापर्यंत जवळपास ३० हजार पदे अतिरिक्त ठरवून ती रद्द करण्याची कारवाई सुरू आहे. नव्याने भरती होणाऱ्या कर्मचाऱ्यांना त्यांच्या श्रेणीचे नियमित वेतन न देता एक ठोक रक्कम देण्यात येईल. शिक्षण क्षेत्रात शिक्षकांऐवजी अर्ध्या पगारावर शिक्षण सेवक नेमण्यात आले आहेत. तिच प्रथा आता सर्व विभागांना लागू करण्यात येणार आहे. कायम कामगारांऐवजी कंत्राटी मजुरांकडून काम करवून घेण्याचा परवाना उदारीकरणाच्या धोरणाने खाजगी मालकांना दिलेला आहे. आता सरकारी नोकरीतही हिच प्रथा चालू झाली आहे.

कारखान्यातील रोजगार दोन-तिन वर्षात ठप्प आहे. रोजगारासाठी कृषिक्षेत्रावरील अवलंबित कमी होत आहे. सध्या राज्यातील ५५ टक्के लोकसंख्याच कृषिक्षेत्रावर निर्भर आहे. म्हणजे राज्य उत्पन्नात अर्धा वाटा असलेल्या या दोन्ही क्षेत्रात रोजगार वाढत नाही.

आर्थिक दिवाळखोरीने पेचप्रसंगात सापडलेल्या अर्जेंटिनांत बेरोजगार कामगारांचा लढा जोर धरत आहे. सार्वजनिक उद्योग खाजगी उद्योगाला विकणे, नव्या मालकाचे कामगार विरोधी धोरण, कामगार कपात, कामगारांचे खालावलेले वेतन व राहणीमान, कामगार संघटनावरील हल्ले, सामाजिक सेवांमध्ये बेसूमार काटछाट, निवृत्तीवेतन धारकांसमोरील वाढत्या समस्या, खाजगीशाळांची चलती इत्यादी कारणे बेरोजगार कामगार चळवळीच्या मुळाशी आहे.

एकविसाव्या शतकात तरूण पिढीने बेरोजगारी आणि दारिद्र्याने गारद होवून वैफल्यात पडण्यापेक्षा जागतिक बँक आणि आंतरराष्ट्रीय मुद्रानिधीच्या नवउदारमवादी जागतिकीकरणाच्या विरोधात प्रखर लढा दिल्याशिवाय श्रमजिवी वर्गाला उज्वल भविष्यकाळाची अपेक्षा करणे गैर आहे. कारण जागतिकीकरणाची प्रक्रिया ही भारतीय घटनेच्या मुळावरच घातलेला घणाघाती प्रहार आहे.

हार्दिक शुभेच्छा !

मदन कोतपल्लीवार



मेन रोड, चंद्रपूर

Scanned by CamScanner



# जागतिकीकरण व जागतिक गरीबी

एम. व्ही. मुरकुटे
जि.प. कनिष्ठ महाविद्यालय,
सडक अर्जुनी, जि. गोंदिया

**जागतिकीकरण-पार्श्वभुमी व्याख्या**

जागतिकीकरणाची व्याख्या पुढीलप्रमाणे करता येऊ शकते.

१. भिन्न भिन्न देशांच्या व्यापारात असलेल्या सीमा व प्रतिबंध यांचा अभाव म्हणजे जागतिकीकरण.

२. जागतिकीकरणात काळ, अंतर, कार्यपद्धती, चालीरीती, श्रद्धा, नितीमान्यता यांच्या सर्व परंपरागत सीमा तोडण्याची शक्ती आहे. म्हणजेच जागतिकीकरणात विविध देशातील वैचारिक, सामाजिक, नैतिक अंतर मिटविण्याची शक्ती आहे.

**भारतामध्ये जागतिकीकरणाची सुरूवात**

भारतामध्ये जागतिकीकरणाची सुरूवात १९९० च्या दशकापासून झाली आहे. १९९१ च्या बडोद्याच्या भारतीय मजदुर संघाच्या अ. भा. अधिवेशनात आर्थिक स्वातंत्र्याच्या लढ्यासाठी सज्ज राहण्याचे आवाहन मा. दत्तोपंत ठेंगडी यांनी केले होते. त्यावेळी तेथी अर्थतज्ज्ञांनी केंद्र सरकारने जून १९९१ मध्ये खाजगीकरण, उदारीकरण, जागतिकीकरण यांचे जे नवे आर्थिक व औद्योगिक धोरण जाहीर केले. त्याचे समर्थन केले होते.

सद्यस्थितीत जागतिकीकरण हे आर्थिक बाबींशीच अधिक जोडले गेले असल्यामुळे त्याचे अनिष्ट परिणामच अधिक दिसण्याची आशंका भारतीय मनाला वाटून जाते.

जागतिकीकरणाच्या सर्व बाबी पाहता भारताची सध्याची स्थिती पुढीलप्रमाणे आहे. सध्या भारताचे दरडोई उत्पन्न २००१-०२ च्या चालू किंमतीनुसार फक्त रूपये १६४८७.०० आहे. दारिद्र्यरेषेखालील कुटुंबाचे प्रमाण २६.१०% आहे म्हणजेच पुरेशा किमान गरजा प्राप्त करण्यास एवढी संख्या अपयशी ठरत आहे. सध्या भारताच्या राष्ट्रीय उत्पन्नात कृषी क्षेत्राचा वाटा २८%आहे. भारतातील ७३.३% लोकसंख्या ग्रामीण भागात राहते याचाच अर्थ ६०% च्या वर लोक प्रत्यक्ष अप्रत्यक्षरित्या शेतीवर अवलंबून आहेत म्हणजेच सर्वाधिक रोजगार निर्मिती अजुनही शेती क्षेत्रातूनच होते. विकसीत देशाच्या राष्ट्रीय उत्पन्नात शेतीचा हिस्सा ५% पर्यंत एवढा कमी असतो आणि त्यातील रोजगार निर्मितीही तितकीच कमी असते म्हणून जागतिकीकरणाशिवाय कृषिक्षेत्रात व्यावसायिकता आणणे कठीण आहे.

जागतिक बँकेने जगातील देशांचे 'विकसीत' आणि 'विकसनशील' या दोन प्रकारात वर्गीकरण केले आहे. १९९६ च्या जागतिक विकास अहवालात १९९४ सालच्या किंमतीनुसार ज्या देशांचे दरडोई वार्षिक उत्पन्न ८९५५ डॉलर अथवा अधिक आहे. त्यांचे वर्गीकरण 'विकसीत देश' असे केले आहे. जगातील १३३ देशांपैकी सर्वोच्च दरडोई उत्पन्न असलेल्या २५ देशांचा यात समावेश आहे. दरडोई उत्पन्नाच्या सर्वोच्च मर्यादेपेक्षा कमी दरडोई उत्पन्न असलेले १३३-२५=१०८ देश 'विकसनशील' देश मानले आहेत. अशा देशांची गर्भित उत्पादनक्षमता वाढविण्यास वाव आहे व ती वाढविण्याचे प्रयास चालू आहेत असा अर्थ 'विकसनशील' या संज्ञेत अभिप्रेत आहे. अशा १०८ देशापैकी ज्यांचे दरडोई उत्पन्न ७२६ ते ८९५५



Scanned by CamScanner

डॉलर्सच्या आत आहे. अशा ५७ राष्ट्रांचा समावेश मध्यम उत्पन्न गटात केला जातो. ज्या देशांचे दरडोई वार्षिक उत्पन्न ७२५ डॉलर्सपेक्षा कमी आहे अशी १०८-५७=५१ राष्ट्रे गरीब मानली जातात.

सामान्यपणे लोकसंख्येची घनता, दरडोई वास्तव उत्पन्न, लोकांचे सरासरी आयुर्मान, शैक्षणिक पातळी,आरोग्य, शहरी लोकसंख्येचे प्रमाण राष्ट्रीय उत्पादनातील विविध आर्थिक उलाढालींचा सापेक्ष वाटा; विदेशी व्यापाराची रचना आणि आकारमान, श्रमशक्ती व तिचे क्षेत्रावर वाटप, अर्थव्यवस्थेची उत्पादन व खर्च रचना, या निकषांचा वापर करून एखादा देश विकसित किंवा विकसनशील आहे हे ओळखता येते.

ज्या देशांची लोकसंख्येची घनता जास्त असते तेथे जास्त प्रमाणात दारिद्रय असते असे दिसून येते.

**जागतिकीकरणामधील मुक्त धोरण, खाजगीकरण व मुक्त बाजारपेठेकडील वाटचाल**

१९९१ पासून भारतातील अनेक संघटनांनी विश्व व्यापार संघटनेला(W.T.O.) विरोध दर्शविला. आंदोलने केलीत कारण विश्व व्यापार संघटनेने पुरस्कृत केलेल्या व्यापाराच्या जागतिकीकरणामुळे सामान्य जनता भरडली जाईल, बेकारी वाढेल, आर्थिक विषमता वाढेल ही संघटना प्रगत मुठभर देशाच्या हिताची जोपासना करील, हे भाकित वर्तविल्या जात होते. ते आता खरे ठरेल. विकसनशील राष्ट्रांसोबत औद्योगिक दृष्ट्या प्रगत व विकसीत राष्ट्रातील सामान्य जनता देखील उदारीकरण, जागतिकीकरण, मुक्त व्यापार यामुळे भरडली जात आहे हे सिद्ध झाले आहे. जगातील गरीब व विकसनशील देशातच बेरोजगारी वाढू लागली आहे असे नव्हे, तर जी-७ राष्ट्रांमध्ये सुद्धा बेकारी वाढू लागली आहे. गरीब व श्रीमंत यांच्यातील तफावत औद्योगिक दृष्ट्या पुढारलेल्या देशातही वेगाने वाढू लागली आहे. प्रदूषण व निसर्ग संतुलनाचा ऱ्हास यांनी चिंताजनक अवस्था गाठली आहे. भारतात प्रत्येक योग्य व्यक्तीला रोजगाराच्या पुरेशा संधी प्राप्त करून देता आल्या नाहीत, हे सत्य आहे.

**जागतिकीकरणामुळे गरीबीत वाढ**

जागतिकीकरणामुळे नवीन उद्योग सुरू होतील व रोजगार वाढतील अशी अपेक्षा होती. पण गेल्या १० वर्षात रोजगार व गरीबीची नवीन समस्या निर्माण झाली आहे. बरेचसे छोटे उद्योग आजारी झाल्यामुळे बरेच कामगार बेरोजगार होवून दारिद्रयावस्था निर्माण झाली. शेतकऱ्यांच्या शेतमालाला योग्य किंमत न मिळाल्यामुळे शेतकरी सुद्धा दारिद्रय रेषेखाली ओढल्या गेले. संघटीत क्षेत्रातील सार्वजनिक व खाजगी क्षेत्रातील १९८० च्या दशकात रोजगार वाढीचा दर १.७ प्रतिशत होता. तो १९९१-९२ मध्ये १.४४ प्रतिशत झाला. १९९२-९३ मध्ये तो 0.४४ प्रतिशत झाला.

श्रम मंत्रालयाच्या आकड्यांवरून २000 मध्ये रोजगार वाढीचा दर 0.१५ प्रतिशत होता. या वर्षात ४५000 रोजगार कमी झालेत. संघटित क्षेत्रात १९९१ ते १९९८ या काळात १५.९ लक्ष रोजगार वाढले. या कालावधीत लोकसंख्या १२ कोटींनी वाढली व श्रमसंख्या ५.२ कोटींनी वाढली. सरकारी आकड्यावरून पंजिबद्ध बेरोजगारांची संख्या १९९७-९८ च्या दरम्यान ३.५६ प्रतिशत व १९९८-९९ च्या दरम्यान ३.१३ प्रतिशत वाढली. उदारीकरणाच्या या दशकात बेरोजगारीचा सरासरी दर २.७ प्रतिशत होता. तो मागील दशकापेक्षा सर्वात जास्त आहे. दारिद्रयरेषेखाली जीवन जगणारे ३५.५० कोटी लोक होते.

.जीवनावश्यक वस्तूंच्या किंमती वाढल्यामुळे गरीबांची संख्या द्रुतगतीने वाढली. सरकार मूल्यवाढीवर नियंत्रण ठेवू शकली नाही. सरकार जर मूल्यवाढीवर नियंत्रण ठेवू शकत नसेल तर सरकारने सार्वजनिक खर्च वाढवून गरिबांच्या उपभोग स्तराला संरक्षण द्यावयास हवे. सरकार गरीबी हटविण्यासाठी दरवर्षी सरासरी ३५00 कोटी रूपये खर्च करते. पण ती मत गरीबापर्यंत पोहोचत नाही. लोकसंख्येत सतत वाढ होत आहे. भारतात १९९७ मध्ये ९५.१ कोटी

Scanned by CamScanner

लोकसंख्या होती ती २००२ मध्ये १०२.९ कोटी होईल. ही वाढ सरकारसमोर आवाहन ठरते.

उदारीकरण व खाजगीकरण यामुळे विकास दराच्या तुलनेत गरीबी हटली नाही. गेल्या ५० वर्षात गरीबी हटविण्याचा प्रयत्न होवून सुद्धा गरीबी हटली नाही तर खाजगीकरणामुळे गरीबी हटेल हे अशक्य आहे. यासाठी राजकीय इच्छाशक्ती, सामुदायिक नेतृत्व, सामाजिक अंकेक्षण आणि गरीब व श्रमिकांचा व्यवस्थापनात सहभाग हवा.

**आर्थिक उदारीकरण**

आर्थिक उदारीकरणामुळे शहरात रोजगार वाढीला प्रोत्साहन मिळते. भारतात श्रमप्रधान उद्योग जे तुलनात्मक रित्या स्वस्त व चांगले उत्पादन करू शकतात. त्यांची निर्यात वाढवावी. आयातीवर निर्बंध लावून देशी व श्रमप्रधान कुटीर उद्योगांना प्रोत्साहन द्यावे. उदारीकरणामुळे रोजगार संधी कमी झाल्यामुळे क्रयशक्ती कमी झाली. त्यामुळे अन्य क्षेत्रातील उत्पादन व रोजगार कमी होण्याचे दुष्टचक्र सुरू झाले आहे. दारिद्रय निर्मुलन व रोजगार प्रवणनिती यशस्वीपणे अंमलात येण्यासाठी आर्थिक उदारीकरणाचे भारतीयीकरण आवश्यक झाले आहे.

क्रमांक एक वर असलेली कामगार संघटना भारतीय मजदूर संघ सुद्धा मूलभूत दृष्टिकोनातून रचनात्मकतेचा आयाम देण्यास अयशस्वी झाला, असे म्हटल्यास वावगे होणार नाही. १६ एप्रिल २००१ ला दिल्लीत लक्षावधी कामगारांचा मोर्चा काढला होता. गेल्या एक वर्षात सरकारची मानसिकता बदलविण्यास भामसं यशस्वी झाला नाही. भारतीय मजदूर संघ विनियोजनाच्या विरोधात नव्हता. विदेशी कंपन्यांना २६ टक्के सहभाग देण्याबरोबर भारतीय जनतेचा किंवा कामगारांचा बौद्धिक संपदेत मूल्य काढून त्यात कामगारांचा ३५ ते ४० टक्के वाटा असावा. श्रमिकीकरणाची मागणी रेटण्याची ही योग्य वेळ आहे. भामसं, भारतीय किसान संघ, स्वदेशी जागरण मंच, ग्राहक पंचायत व लघू उद्योग भारती यांनी सामुहिक लढ्याद्वारे हा प्रश्न धसास लावला पाहिजे. त्यासाठी ही उत्तम वेळ आहे. भामसं च्या विचारांचा प्रभाव नजरेत येत आहे. समाजाला हे जितक्या लवकर कळेल तितक्या लवकर समाज स्वतःहून या लढ्यात उतरेल. आजही देशाला गुलामगिरीत टाकणारी जागतिकीकरणाची योजना हाणून पाडणे अतिशय महत्वाचे आहे.

**ईस्ट इंडिया कंपनीची पुनरावृत्ती**

ईस्ट इंडिया कंपनी व्यापाराच्या हेतूने भारतात आली आणि भारताला लुटले. त्याच दिशेनी जागतिक व्यापार संघटनेची वाटचाल आहे. १४ हजार विदेशी कंपन्या भारतात आल्या आहेत, विदेशी विद्यापीठांच्या विविध अभ्यासक्रमांचा मुक्त संचार सुरू झाला आहे. विदेशी वृत्तपत्रे सुद्धा येवू घातली आहेत. जागतिकीकरण व स्पर्धेच्या नावाखाली जो मुक्त संचार झाला आहे त्याला आवर घालण्याची आवश्यकता आहे.

१६ एप्रिल २००१ च्या दिल्लीतील लक्षावधी कामगारांच्या प्रदर्शनामुळे भामसं राजकारण विरहीत संघटना आहे असा जनतेचा समज झाला आहे. पण भामसंनी विश्वकर्मा शोध संस्थान स्थापून बरीच वर्षे लोटलीत तरी संशोधनात्मक गतिशीलता मिळालेली नाही. विश्वकर्मा शोध संस्थानने स्वेच्छानिवृत्ती घेणाऱ्या कामगारांचा उपयोग करून घेवून ग्रामीण व शहरी भागात श्रमप्रधान स्थानिक स्त्रोतावर आधारित लघू व कुटीर उद्योग निर्माण करण्याचे भारतीय तंत्र विकसित करण्याची गरज आहे. भामसंच्या अधिकाऱ्यांनी यासाठी पुढाकार घेण्याची आज गरज आहे.

संघटीत क्षेत्रातील कामगारांना मिळणाऱ्या वेळेचाउपयोग ग्रामीण भागातील कामगार क्षेत्र दत्तक घेवून त्यांच्या विकास योजना राबविल्या तर ग्रामीण क्षेत्रात नवचैतन्य निर्माण करता येईल. असा विचार भामसंनी केला होता, पण अजून त्याला मूर्त स्वरूप प्राप्त झाले नाही. यासाठी विश्वकर्मा शोध संस्थानद्वारे असे प्रकल्प राबविण्यासाठी ह्या संस्थेचे पुनरूज्जीवन करणे आवश्यक झाले आहे.

Scanned by CamScanner

आजपर्यंत उद्योगहीत व राष्ट्रहीत लक्षात घेवून कधीहीकोणत्याही संघटनेनी आंदोलन उभारले नाही. भामसनी प्रयत्न केला. पण सेवाशर्ती व वेतन यांच्यासाठी कामगारांना रस्त्यावर येण्याची सवय लागल्याने यापूर्वी जरी प्रतिसाद कमी मिळाला असला तरी आंदोलनाकडे बघण्याचा जनतेचा दृष्टिकोन रचनात्मक करण्यासाठी भामसच्या वरिष्ठ नेतृत्वापासून तर तळागाळातल्या नेतृत्वामध्ये वैचारिक क्रांती घडवून आणावी लागणार आहे. २ ऑक्टोबर २००२ चे भामसचे जागतिकीकरणाच्या विरोधात केलेले आंदोलन त्या दृष्टिकोनातून दिशादर्शक ठरेल अशी खात्री आहे.

**जागतिक व्यापार संघटना व भारतातील उच्च शिक्षणाचे भवितव्य**

जागतिक व्यापार संगठन या संस्थेच्या कतारची राजधानी दोहा येथील परिषदेत संपूर्ण शिक्षण क्षेत्र जागतिक व्यापार संघटनाच्या नियंत्रणाखाली आणण्यात आले आहे. याचे दूरगामी परिणाम विकसनशील देशांच्या शिक्षणक्षेत्रांवर होणार आहेत.

**शिक्षणक्षेत्र-एक नफा मिळविण्याचे साधन**

सध्या संपूर्ण विश्वामध्ये शिक्षणावर एकूण खर्च ४७ लक्ष कोटी रूपये एवढा प्रचंड आहे. भारताचेच नव्हे तर कित्येक विकसनशील देशांच्या अंदाजपत्रकातील तरतुदी यापेक्षा कितीतरी कमी आहेत. या प्रचंड खर्चाकडे प्रगत राष्ट्रांतील व्यावसायीकांचे लक्ष केंद्रित झालेले आहे. सध्याच्या औद्योगिक मंदिच्या काळात नफा मिळवून देणारा एक उपक्रम म्हणून प्रगत राष्ट्रातील व्यावसायीक शिक्षण क्षेत्राकडे पहात आहेत. कित्येक परदेशीय विद्यापीठे व व्यापारी संस्था विकसनशील देशातील विद्यार्थ्यांना आपल्या विद्यापीठांमध्ये शिक्षण घ्यावे म्हणून निरनिराळे उपाय योजून आकर्षित करीत आहेत.

दोहा परिषदेच्या अहवालावर सदस्य देशांच्या प्रतिनिधींच्या सह्या झाल्यानंतर परदेशीय विद्यापीठांना विकसनशील देशांमध्ये आपल्या शाखा उघडण्याचा मार्ग मोकळा होणार आहे. सध्याच अमेरिकेतील "मोटारोला" संस्थेच्या १२९ देशांमध्ये शाखा आहेत. ही संस्था फक्त प्रशिक्षणावरच लक्ष देत आहे. सध्या सर्वच क्षेत्रांमध्ये विशेषत: ज्ञानाच्या क्षेत्रामध्ये अतिशय द्रुतगती परिवर्तन होत आहेत. या सर्व परिवर्तनाचे विकसनशील देशांच्या विशेषत: भारताच्या शिक्षण क्षेत्रावर दूरगामी परिणाम (चांगले आणि वाईट असे दोन्ही प्रकारचे परिणाम) होण्याची वेळ येवून ठेपलेली आहे. सध्याच्या सर्वदूर अंगिकारलेल्या उदारीकरण, खाजगीकरण व जागतिकीकरण या नीतीमुळे स्पर्धेचे वातावरण निर्माण झालेले आहे.

परदेशीय विद्यापीठांच्या आपल्या येथील शिक्षणक्षेत्रातील प्रवेशामुळे आपल्या विद्यापीठांना स्पर्धेला तोंड द्यावे लागणार आहे. या स्पर्धेमुळे आपल्या येथील शिक्षणाचा दर्जा वाढण्यास नक्कीच मदत होईल. अशी अपेक्षा आहे. सध्याच्या स्पर्धेच्या वातावरणामध्ये आपल्या विद्यार्थ्यांना उत्कृष्ट कामगिरी बजावता येईल. अशाप्रकारचे नवे अभ्यासक्रम तयार केल्यास व प्रचलीत अभ्यासक्रमात आवश्यक बदल केल्यास आणि त्यांची सुयोग्य अंमलबजावणी केल्यास भावी पिढी सध्याच्या पिढीला निश्चितच दुवा देईल अन्यथा भावी पिढीला सुयोग्य शिक्षण न देण्याचे पातक आपल्या माथी येईल. स्वातंत्र्यानंतरच्या ५० वर्षाच्या काळात भारतातील शिक्षणक्षेत्रांमध्ये शिक्षण संसाधनाच्या रूपाने अतिशय मोठी गुंतवणूक झाली आहे. सध्या सूरू असलेल्या युगात गुणात्मक बदल त्वरित न केल्यास भारतीय विद्यापीठे ही उच्च शिक्षण व्यवस्था आपले अस्तित्व कायम ठेवू शकणार नाहीत. तद्वतच शिक्षण संशोधनाचे रूपाने झालेली गुंतवणूक आणि या व्यवस्थेत कार्यरत संपूर्ण मानवी संशोधन भविष्यात उघड्यावर येईल. उच्च शिक्षणक्षेत्रातील अधिकारी व्यक्तींनी यावर त्वरित व गांभीर्यपूर्वक विचार करून योग्य असे शैक्षणिक व प्रशासकीय बदल करण्याची आणि या सर्वांची त्वरित अंमलबजावणी केल्यास भावी पिढीचा भविष्यकाळ उज्ज्वल होईल.

# वर्तमान काळातील भारताचे मौद्रिक धोरण

प्रा. सौ. आशा सतीश लांजेवार
पी.डब्ल्यु.एस. महाविद्यालय,नागपूर.

२७ एप्रिल २००२ रोजी देशाच्या शिखर बँकेने म्हणजेच रिझर्व बँकेने भारताच्या २०००-०१ सालचे मुद्रा व पतविषयक धोरण जाहीर केले. हे धोरण मुख्यत: तीन महत्वाच्या समस्यांवर लक्ष केंद्रित करते. पहिले अर्थव्यवस्थेचा आढावा घेणे, दुसरे सर्वसामान्य लोकांना दैनंदिन जीवनात भेडसावणाऱ्या प्रश्नांवर लक्ष देणे म्हणजे महागाई वाढ रोखून धरण्याचे प्रयत्न करणे, परकीय चलनाचा दर कसा रहावा याच्या व्यवस्थापनावर लक्ष देणे व तिसरे आर्थिक क्षेत्रातील सुधारणांवर लक्ष केंद्रित करणे.

या आधी देशांचे मुद्राविषयक, नाणेविषयक धोरण जाहीर करतांना इतकी चांगली पार्श्वभूमी कधीच लाभली नव्हती. चलनवाढ आटोक्यात आहे. परकीय चलनाची गंगाजळी कधीही नव्हती इतक्या वरच्या पातळीवर आहे. रूपया बराचसा स्थीर आहे व औद्योगिक उत्पादन वाढते आहे. म्हणून रिझर्व्ह बँकेच्या या धोरणातून कांही मुख्य गोष्टींवर भर दिला आहे. पहिली १९९९-२००० या वर्षात स्थूल आर्थिक व मुद्राविषयक विकास त्यावर रिझर्व्ह बँकेचा दृष्टिकोन, वृद्धिबद्दल त्यांचे पृथक्करण, बचत, गुंतवणूक, वित्तीय परिस्थिती मुद्राविषयक व रोकड सुलभता, घरगुती वित्तीय मार्केट व बाह्य अर्थव्यवस्था यावरील त्यांचे भाष्य, अर्थव्यवस्थेची सद्यस्थिती व सातत्याने त्यात सुधारणा होण्यासाठी ही अर्थव्यवस्था कोणत्या दिशेने गेली पाहिजे, म्हणजे देशातील दारिद्र्याचे कायमचे निर्मूलन होईल, याबाबत या धोरण मसुद्यात चांगले विवेचन रिझर्व्ह बँकेने केले आहे.

अलीकडे बँकांच्या व्याज दरावर रिझर्व्ह बँकेने नियंत्रण मिळवल्यावर आता सर्व बँकाचे कामकाज चांगले सुधारेल. या धोरण मसुद्यातील दुसरा भाग २०००-०१ या वर्षातील नाणे धोरणांबाबत कोणता पवित्रा घ्यावा याविषयी रिझर्व्ह बँकेची मते होय. यापूर्वीच्या मुद्रा व पतपुरवठा धोरणातून फार मोठे पुरोगामी बदल केले गेले नव्हते. संरचनात्मक प्रश्नावर लक्ष देवून हे प्रश्नमार्गी लागतील याकडे लक्ष दिले गेले. याचे कारण अर्थव्यवस्था अस्थिर असल्याने पतपुरवठ्याची धोरणे क्रेडीट पॉलिसी जाहीर करतांना कुठलाही धोका पत्करला येत नव्हता. आता रोकड सुलभता व पैशाचा ओघ सुरू राहण्यासाठी आधीच काळजी घेतली गेल्याने १ एप्रिल २००० रोजी जाहीर झालेल्या धोरणात पुढील आर्थिक सुधारणांचा मार्ग कशाप्रकारे राहील याचा निर्णय घेणे केवळ बाकी होते. नाणे बाजार जास्त रुंद व सखोल करावा, मध्यवर्ती रिझर्व्ह बँकेची भूमिका पुन्हा स्पष्ट करून नमूद करावी, अर्थव्यवस्थेवरील पर्यवेक्षण घट्ट करावे, कर्ज देण्याची पद्धती, पत पुरवठा सुधारून संस्थात्मक संरचना पुढं आणावी यावर विचार केला गेला. बँकांनी कोणती कार्ये करावी हे नमूद केलेले आहेच. जोखीम व्यवस्थापन (रिस्क मॅनेजमेंट) पर्याप्त भांडवल व्यवस्था, जागतिक दर्जाची प्रमाणित व त्यांच्या नियमांप्रमाणे बनवलेली उत्पादने, विशेषत: लघुउद्योग क्षेत्रात पतपुरवठा पद्धतीत सुधारणा, जोखीम आधारित पर्यवेक्षण अवर्षण काळात देण्याची पद्धत, स्वत: मदत करणारा वर्ग यांना पतपुरवठा व इतर सल्ला देणे याचे निर्देशन या धोरणात येते. सर्टिफिकेट ऑफ डिपॉझिटची परिपक्क होण्याची कालमर्यादा तीन महिन्यांवरून अडीच महिने केली. पूर्वी बँकेला ८५ टक्के मुद्रा सुरक्षा प्रमाण ठेवावा लागे, आता ती रक्कम ६५ टक्यांवर आणली. दररोज बाकी काढून सरासरीने हा सी.आर.आर. ठरवला जाईल. कमर्शिअल पेपर देण्याबाबतचे नियम सोपे करून उत्पादनाला जास्त रोकड सुलभता व सखोलता प्राप्त करून दिली. बिगर बँकींग क्षेत्रासाठी प्राथमिक डिलरद्वारे व्यवहार

Scanned by CamScanner

करण्याची मुभा डिसेंबर २००० पर्यंत वाढवली आहे. रिझर्व्ह बँकेने सर्व बँकांना प्राथमिक कर्ज दर किती असावा हे मॅच्युरिटीच्या आधारे ठरवण्याची मुभा दिली आहे. सर्व कर्ज ठराविक दराने किंवा बदलत्या दराने देण्याचा अधिकार बँकांना दिला आहे. विदेश स्थित भारतीयांना त्यांच्या गटाचा आकार लक्षात घेवून व्याजाचे दर कमी जास्त ठेवण्याचे अधिकार बँकांना आहेत. त्यामुळे एन. आर. आय. क्षेत्रांकडून जास्त ठेवी आकर्षित होतील व विदेशी चलनाचा ओघ वाढता राहील. परदेशस्थ भारतीयांना ऑनलाईन स्वॅप दरावर आधारित टर्म डिपॉझिटवर ठराविक व्याजदर देण्याची मुभा बँकांनी दिली आहे. त्यामुळे या डिपॉझिटकडे विदेशस्थ भातीय जास्त आकर्षित होतील. फक्त स्टेट बँकेने दिलेल्या व्याज दरापेक्षा जास्त दर इतर बँकांना देवू नये. बँकांनी आपल्या व्यवहारासाठी लागणारा खर्च कमी केला पाहिजे. एन.पी.ए. ची व्याप्ती (बुडत्या कर्जाचे प्रमाण) कमी केले पाहिजे व जोखीम व्यवस्थापनातील स्थिती सुखावह केली पाहिजे. यासाठी अनेक प्रकारांनी सुधारणा करणे आवश्यक आहे. कायदेविषयक तरतूद करून बुडित कर्जाची वसुली चांगल्या प्रकारे केली पाहिजे व आजारी स्थितीतील बँकांची संरचना बदलली पाहिजे.

जागतिक बँकींग

वित्तीय क्षेत्रात फार मोठे बदल झपाट्याने होत आहेत व एकमेकांमध्ये विलीनीकरणाची प्रक्रिया वाढत्या प्रमाणावर होत आहे. हे पाहुन रिझर्व्ह बँकेने या धोरण मसुद्यात 'युनिव्हर्सल बँकींग' या संकल्पनेचा खुलासा केला आहे. ज्या वित्तीय संस्थेला स्वत:ला जागतिक बँकींग मध्ये परिवर्तन करून हवे असेल त्या बँकेने एक संक्रमण योजना ट्रान्झीशन प्लान बनवून त्याला रिझर्व्ह बँकेची मान्यता मिळविली पाहिजे. या नव्या धोरणात अशा संक्रमणाबाबत काय खबरदारी घ्यायची याचे योग्य मार्गदर्शन केले आहे. अशा संस्थांचे पुढे बँकांत रूपांतर होतांना कोणत्या मार्गाने जावे हे नमूद केले आहे. रिझर्व्ह बँकेने असेही नमूद केले आहे की, ज्या बँका विमा व्यवसायात शिरणार असतील त्यांच्याबाबत भागभांडवली ५०' टक्यांची मर्यादा शिथिल केली जाईल. ५० टक्के भागभांडवलाची मर्यादा विमा नियंत्रण व विकास प्राधिकरण (आय.आर.डी.ए.) यांच्या संमतीने असेल. या कायद्यान्वये दहा वर्षानंतर प्रमोटर समभाग २६ टक्यापर्यंत आणू शकतात. या धोरणात असे स्पष्टपणे म्हटले आहे की, ज्या बँका सशक्त आहेत म्हणजे ज्यांच्याकडे ५०० कोटी रूपये नेटवर्क आहे, ज्यांच्या भांडवली शक्ती १० टक्के तरी आहे व ज्यांचे बुडित कर्ज अगदी कमी आहे अशा सशक्त बळकट बँकांनाही विमा व्यवसाय चालू करता येईल. प्रत्येक शेड्युल कमर्शिअल बँक फी भरून विमा व्यवसाय करू शकेल.

या धोरणातील आणखी एक महत्वाचे वैशिष्ट्य म्हणजे आता वित्तीय क्षेत्र सुधारणांसाठी नेमण्यात आलेल्या नरसिंहन् कमेटीच्या शिफारशीप्रमाणे टप्याटप्याने घेता येईल. गेल्या मुद्रा धोरणात दिलेल्या तात्पुरत्या एम.ए.एफ. च्या जागी ही संपूर्ण एल.ए.एफ. पॉलीसी आली आहे. यापुढे निर्यात क्रेडित व्यतिरिक्त रिझर्व्ह बँकेची इतर सर्व रिफानान्स इंस्ट्रमेंट रिझर्व्ह बँकेला कर्ज देणारा शेवटचा तारणाहार म्हणून बळकटी आणतील. या आधी प्राथमिक डिलरचा सहज प्राप्त होणारा अधिकार यापुढे कमी होणार आहे. त्यांना यापुढे मार्केट दराने पुनर्वित्तव्यवस्था करावी लागेल. नेहमीच्या निधीसाठी पैसा मिळणार नाही तर ज्यावेळी समप्रमाण न होता यंत्रणा जोडणी योग्य होत नसेल तर हा निधीउपलब्ध होईल. याचा अर्थ रिझर्व्ह बँकेने सरकारी प्रतिभूती व ठराविक दराने सहाय्य म्हणून केलेली पुनर्वित्त व्यवस्था यांची मध्यस्थ म्हणून सुविधा उपलब्ध होती ती आता काढून टाकली. रुपयाच्या किंमतीत दराच्या फेरफारामुळे शिथिलता यावी व मुद्रा व फॉरेन मार्केट मध्ये तादात्मता यावी यासाठी फॉरेक्स फॉरवर्ड मार्केटमध्ये व्याजाचा जो दर अद्ययावत असतो तो बेंचमार्क म्हणून यापुढे समजला जाईल. तो एक निश्चित टप्पा असेल. आता व्याज प्राथमिक कर्जाऊ दराशी निगडीत केल्याने प्रोजेक्ट लोन वरील दरसुद्धा बदलता राहील. निर्यातीसाठी निर्यात क्रेडीट रिफायनान्स सुविधा शिथिल करण्यात आलेल्या आहेत. अर्थात या पावलामुळे फार मोठा फायदा होईल असे नाही.

Scanned by CamScanner

वरील विवेचनात मॉनेटरी क्रेडिट पॉलीसी संबंधित सर्व नवे तपशील दिले असले तरी १९९९-२००० सालात स्थूल आर्थिक व मुद्राविषयक विकास कशा प्रकारे होईल यावर या धोरणांचा भार असेल. या धोरणाच्या यशाचा गाभा म्हणून यातला एक मुद्दा सांगता येईल. वित्तीय परिस्थितीच्या भागातील एक वाक्य फार महत्वाचे आहे. "व्याजाच्या दरामध्ये केलेल्या घटीचा फायदा औद्योगिक क्षेत्राला होवून त्यांची कामगिरी सुधारली पाहिजे, रोकड सुलभतेचा लाभ मिळून उलट परिणाम होवून भाववाढ अधिक होता कामा नये." अलिकडच्या निव्वळ स्थूल घरगुती उत्पादनातील वाढीमधील संकेतांचे पृथक्करण करतांना रिझर्व बँकेने तीन मुद्दे पुढे मांडले आहेत. पहिला १९९५-९६ या वर्षात स्थूल घरगुती बचतीने उच्चांक गाठला होता त्या रिअल जीडीपी वृद्धीमध्ये घसरण सुरु आहे. याचे कारण समाजाकडून बचतीचे प्रमाण कमी झाले आहे. १९९५-९६ मध्ये स्थूल घरगुती बचत जीडीपी च्या २५.५ टक्के होती ती १९९८-९९ मध्ये २२.३ टक्के झाली. ग्रॉस डोमेस्टिक कॅपिटल फार्मेशन दर या काळात २७.२ टक्के वरुन २३.४ वर आला. पब्लिक सेव्हिंग दर १९९५-९६ मध्ये २ टक्के होता. तो १९९८-९९ मध्ये शुन्यावर आला. घरगुती बचतीचा दर या काळात १८.५ इतकाच स्थिर राहीला. खाजगी कंपन्याचा बचत दर ५ टक्यांवरून ३.८ टक्यांवर आला. अलीकडे झालेली वृद्धी अर्थव्यवस्थेमुळे उत्पादनात झालेल्या वाढीमुळे झालेली आहे. आय.सी.आर.डी. इन्क्रीमेन्टल कॅपीटल आऊटपूट रेश्यू १९९५-९६ मध्ये ४.१ टक्का होता तो १९९८ मध्ये ३.९ टक्के झाला. गेल्या दहा वर्षात अर्थव्यवस्थेत, एकूण उत्पादन क्षमतेत वाढ झालेली आहे. अलीकडच्या वर्षात मागणी व पुरवठा यांच्या हंगामी साखळीने उत्पादनात वाढ झाल्याचे दिसते. हे संरचनात्मक व साखळी असलेले घटक मुद्रा धोरणातील नक्त उत्पादन व सुप्त उत्पादन शक्ती यामध्ये फेरफार घडवून आणतात. सुप्त उत्पादनातील विकासामुळे मुद्रा धोरणातील साधारण दीर्घ मुदतीच्या धोरणावर परिणाम होवू शकतो. अल्पकाळाची कर्जे, व्याजदर, विदेशी चलन दर यासारखी यंत्रणा मुद्रा धोरणांवर परिणाम करु शकते.

रिझर्व्ह बँकेने वित्तीय तूट व मार्केट मध्ये सतत वाढत जाणारे कर्ज या गोष्टीची या धोरण मसुद्यात कसलीही काळजी व्यक्त केली नाही ही आश्चर्याची बाब आहे. १९९०-२००० सालात बजेटमध्ये ७३,०७७ कोटी रुपयाचे कर्ज काढण्याचा प्रस्ताव होता. २०००-०१ सालासाठी ७३,३८३कोटी रूपये कर्ज काढले जाईल. त्यावेळी परिपक्व झालेली कर्जे व ३६४ ट्रेझरी बिल धरून एकूण कर्जाचा बोजा १,१७,७०४ कोटी रूपये होईल. गेल्या वर्षी हा आकडा ९९,६३० कोटी रूपये होता. रिझर्व्ह बँक मुद्रा धोरणात पुढे म्हटले आहे की, मार्केटमधून घेतलेली प्रचंड प्रमाणातील कर्जे देशापुढील संकटे उभी करु शकतील. यामुळे कदाचित बँकिंग पद्धती व मार्केट दोन्हीमधील ग्रहणशक्ती संपून जाईल. बँक क्रेडिटची सर्व वैध मागणी पूर्ण केली जाईल व वाढत्या मागणीमुळे भाववाढ होणार नाही याची काळजी घेण्याचे काम रिझर्व्ह बँक करेल अशी हमी रिझर्व्ह बँकेने दिली आहे.

सरकारची ही हमी मार्केटमध्ये सहभाग घेणाऱ्यांचा व मार्केटमध्ये प्रमुख भागीदारी असणाऱ्यांचा सहभाग वाढावा म्हणून सरकारने दिली असली तरी फक्त सरकारने व्यापारी क्षेत्रामध्ये उगीचच कर्जे काढणाऱ्यांची गर्दी होणार नाही व अनुत्पादीत खर्चावर नेहमी अंकुश ठेवण्याचा प्रयत्न करून वित्तीय फुगवटा होणार नाही. वाढ व भाववाढ आटोक्यात राहील याची काळजी स्वतः घ्यायला हवी. थोडक्यात या वर्षीच्या क्रेडीट पॉलीसीचे हे उद्देश आहेत. या धोराच्या मसुद्यात प्रस्तावनेत म्हटले आहे, थोडक्या कालावधीत देशांतर्गत व आंतरराष्ट्रीय स्तरावर अकल्पित घटना घडूनही देशाने मोठी झेप घेवून नाट्यपूर्ण रितीने बदल घडवून आणले आहेत. या धोरणातून दिलेले इशारे लक्षात घेवून केंद्र सरकारने सतत जागृत राहुन अर्थव्यवस्थेची बसलेली घडी पुन्हा विस्कटणार नाही याची काळजी घेतली पाहिजे. त्यासाठी अनुत्पादीत खर्चावर व भाव वाढीवर सतत नजर ठेवून राहिले पाहिजे. नाहीतर एक दिवस सगळा फुगा फुटून जाईल.



Scanned by CamScanner

# जागतिकीकरण व जागतिक गरीबी

प्रा. सी. एस. एस. काळबांडे
श्री. बिंझाणी नगर महाविद्यालय,
उमरेड रोड, नागपूर

आधुनिक काळात जागतिकीकरण हा परवलीचा शब्द बनला आहे. समाज जीवनातील प्रत्येक क्षेत्र या संकल्पनेची भीती, स्वागत किंवा तटस्थता व्यक्त करीत असतांना दिसते. तसे पाहिले तर जागतिकीकरणाबद्दल फार मोठ्या प्रमाणात संभ्रमित अवस्था भारतीय जनमाणसाची असलेली दिसून येते. व्यापारी म्हणून आले व राज्यकर्ते बनले ही म्हण जागतिकीकरणाला लागू करण्यापासून ते २१ व्या शतकातील विकासाचा एकमात्र मार्ग इथपर्यंत टोकाची मते व्यक्त होत असतांना दिसतात.

आंतरराष्ट्रीय क्षेत्रात दुसऱ्या महायुद्धानंतर ज्या प्रमुख संघटना स्थापन झाल्या आहेत. त्यापैकी आंतरराष्ट्रीय मुद्रानिधी, जागतिक बँका व गॅट या जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत महत्वाची भूमिका बजावित आहेत. आंतरराष्ट्रीय क्षेत्राबाबत निर्माण झालेल्या अडचणींवर उपाय करण्यासाठी आंतरराष्ट्रीय मुद्रानिधीकडून योग्य कार्य व्हावे अशी अपेक्षा आहे. त्याचप्रमाणे विकसनशील देशाच्या विकासासाठी भांडवलाची गरज पूर्ण व्हावी असे करतांना विकसीत देशांकडून भांडवल विकसनशील देशाला मिळावे याद्दष्टीने जागतिक बँकेचे कार्य करून जगात पुन्हा अर्थव्यवस्था स्थापन करण्याच्या उद्देशाने गॅटने कार्य करावे अशी अपेक्षा होती परंतु असे झाले नाही. कारण आंतरराष्ट्रीय मुद्रानिधीचे स्वरूप व कार्यपद्धती पहाता तिच्यावर विकसीत राष्ट्राचे वर्चस्व स्पष्टपणे जाणवते. कर्ज देण्याच्या अटींच्याद्वारे ते नव्या स्वरूपातील वसाहतवाद तर पसरवित नाही ना अशी शंका येते. गॅटने जरी मुक्त अर्थव्यवस्थेला अनुकूल अशा धोरणाचा पुरस्कार केला तरीही भांडवलशाही प्रबळ राष्ट्रांनी मुक्त व्यापारनीती अंमलात आणली नाही. प्रबळ राष्ट्र गॅटच्या सहाय्याने आपल्याला सोईस्कर असे धोरण राबवित होते म्हणूनच या गॅटच्या व्यवस्थेला नियंत्रीत व्यापारवाद म्हणून संबोधावे लागले.

२० वे शतक क्रांतीचे शतक म्हणून ओळखले जाते या शतकात जगामध्ये अभूतपूर्व बदल घडूनआले. हे शतक साम्राज्यशाही विरोधी लढ्याची व वसाहतीना राजकीय स्वातंत्र्य मिळवून देणाऱ्या राष्ट्रीय मुक्ती लढ्याचे शतक होते. ह्या शतकातील क्रांतिकारक घटना आणि विज्ञान तंत्रज्ञान यामधील झालेल्या प्रगतीमुळे मानवी समाजाच्या विकासाच्या अतिभव्य शक्यता निर्माण झाल्या. याची सूरूवात रशियातील १९१७ च्या ऑक्टोबर क्रांतीने झाली. मार्क्स आणि लेनिन सारख्या तत्ववेत्यांनी वर्तविलेल्या अंदाजाप्रमाणे ह्या समाजसत्तावादी विजयांनी जागतिक इतिहासात नवे पर्व निर्माण केले.

**जागतिकीकरण म्हणजे काय ?**

जागतिकीकरण म्हणजे देशाच्या राजकीय सीमेबाहेर आर्थिक व्यवहाराचा विस्तार करणे होय. परंतु जागतिक अर्थव्यवस्थेच्या संदर्भात विविध देशाच्या अर्थव्यवस्थांचे एकीकरण अंतर्भूत आहे. हे एकीकरण होत असतांना विविध देशांच्या अर्थव्यवस्थांचे परावलंबन देखील त्यातून सुचित होते हे परस्परावलंबन किती राहिले हे सांगणे कठीण असले तरी विकास प्रक्रियेच्या अनुभवावरून असे सांगता येईल की, देशाच्या अर्थव्यवस्थेच्या अधिक परावलंबी होतील असे काही देश प्रभावी भूमिका पार पाडून व आपला प्रभाव वाढविण्याचा प्रयत्न करतील परंतु जागतिक अर्थव्यवस्थेचे एकीकरण महत्वाचे ठरत असल्यामुळे असे म्हणावेसे वाटते की, जागतिकीकरण ही आर्थिक एकीकरणाची प्रक्रिया आहे. तसेच ती



Scanned by CamScanner

दुसऱ्या महत्वपूर्ण अर्थाने विविध देशांच्या अर्थव्यवस्थांचे जागतिक अर्थव्यवस्थेशी एकीकरण करणारी विकासाची एक व्युहरचना देखील आहे.

### जागतिक भांडवलशाही आणि जागतिकीकरण

उदारीकरण, खुली अर्थव्यवस्था, खाजगीकरण इत्यादी नावांनी ओळखली जाणारी सध्याची जागतिक भांडवलशाही अर्थव्यवस्था 'जागतिकीकरण' या नावाने ओळखली जात आहे. प्रत्यक्षात भांडवलीअर्थव्यवस्थेचे ते विविध पैलू आहेत. जागतिकीकरण म्हणजे भांडवलशाहीने भांडवलशाहीतील अरिष्ट दूर करण्यासाठी वापरलेला मार्ग आहे.

२० व्या शतकाच्या अखेरीस आंतरराष्ट्रीय शक्तीच्या समतोलात रशियातील पडझाडीमुळे बदल होवून हा समतोल साम्राज्यशाहीच्या बाजूने कलला आहे. आजच्या काळातील मध्यवर्ती सामाजिक अंर्तविरोध हा साम्राज्यवाद विसरून समाजसत्तावाद यांच्या मधील अंतर्विरोधी बनला आहे. त्यामुळे आजच्या नवसाम्राज्यवादी जागतिक आक्रमणामुळे देश आणि तिसऱ्या जगातील देश यांच्यामधील अंतर्विरोध झपाट्याने तीव्र होत असून तो आता जागतिकीकरणाच्या रूपाने पुढे येत आहे.

जुन्या पद्धतीच्या वसाहतवादाच्या अंता नंतर साम्राज्यशाही नवसाहतवादी रणनीती पुढे येत आहे. विज्ञान-तंत्रज्ञानाचा झालेला विस्तार यामुळे वित्तीय भांडवलाचा साठा वाढला. त्यामुळे साम्राज्यवादी राष्ट्रांना आणि त्याच्या प्रभावाखालील बहुराष्ट्रीय कंपन्यांना नव्या बाजारपेठेची गरज भासू लागली. त्यासाठी व्यापारी माध्यमातून या शक्ती तिसऱ्या जगातील राष्ट्रांच्या आर्थिक, राजकीय, सांस्कृतिक नाड्या आपल्या हातात ठेवण्याचा प्रयत्न करीत आहे. जागतिकीकरणाच्या व्यापार संघटना, बहुराष्ट्रीय कंपन्या या अस्त्रांच्या द्वारे आर्थिक वसाहतवाद लादण्याचे पद्धतशीरपणे प्रयत्न करीत आहे. भारतासारखे तिसऱ्या जगातील राष्ट्राचे राज्यकर्ते या नवसाम्राज्यांवाद्यांपुढे पायघड्या पसरून त्याच्या स्वागतला सिद्ध झाले आहेत.

### जागतिकीकरणाचा जागतिक अनुभव

तिसऱ्या जगातील राष्ट्रांवर कठोर अटी लादून केवळ नफ्यासाठी अमेरिकन साम्राज्यवाद्यांच्या पुढाकाराने जे जागतिकीकरणाचे धोरण सुरू होऊन ज्यांना १०-१२ वर्ष झाली आहेत. त्याचे दृश्य परिणाम आता दिसू लागले आहे. या व्यवस्थेचे कितीही गोडवे गात असले तरी या व्यवस्थेचा गाभा शोषण आणि विषमता हाच असल्याचे संयुक्त राष्ट्रसंघाच्या एका पहाणी पथकाच्या अहवालावरून स्पष्ट होते. या अहवालात १९९० ते १९९९ या दहावर्षाचा आढावा घेवून विश्वव्यापी विषमता वाढली आहे. सर्वात श्रीमंत देशातील वरच्या २०% उत्पन्नातील प्रमाण १९६० मध्ये ३०:१ होते ते १९९० मध्ये ६०:१ तर १९९७ मध्ये ७४:१ असे झाले. सर्वात श्रीमंत देशातील वरच्या २०% लोकांकडे राष्ट्रीय उत्पन्नाचा ८६% भाग आहे. तर खालच्या २०% लोकांकडे १ टक्का भाग आहे. निर्यात व्यापारात हे प्रमाण ८२:१ असे आहे. तर परदेशी थेट गुंतवणुकीचे प्रमाण ६८:१ असून टेलिफोन लाईन्सचे प्रमाण ७४:१ आहे. जगातील श्रीमंत अशा तीन व्यक्तींची मालमत्ता अविकसीत देशातील ६० कोटी लोकांच्या मालमत्तेपेक्षा अधिक आहे. जगातील १०० कोटी लोक निरक्षर आहेत व तेवढ्याच संख्येच्या लोकांना रोज कमाई मिळत नाही. ३४ कोटी स्त्रिया ४० वर्षाच्या आत मरतात, २५ कोटी मुले बालमजुरआहेत. १६ कोटी कुपोषणाने ग्रस्त आहेत. १९९८ मध्ये सर्वात बड्या कंपन्यांकडे औषधे ३५ टक्के, कॉम्प्युटर्स ७० टक्के, टेलिफोन ८६% यांची मालकी आहे.

याचा आज जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत सर्व अर्थव्यवस्था एकसंघी आहे असा सिद्धांत मांडला जात असला तरी प्रत्यक्षात जागतिकीकरणाची धोरणे प्रचलित करणाऱ्या आंतरराष्ट्रीय नाणेनिधी, जागतिक बँक व जागतिक व्यापार संघटना यांचे कार्यक्रम विकसीत देशांनाच फायदा पोहचविणारे आहेत.

### जागतिकीकरण आणि भारत

दुसऱ्या महायुद्धानंतर स्वतंत्र झालेल्या नवस्वतंत्र राष्ट्राच्या [illegible]

Scanned by CamScanner

महत्वाचे आहे. शंभर दीडशे वर्ष पारतंत्र्यात राहिलेल्या व जगातील लोकसंख्येच्या मानाने एक मोठं राष्ट्र असलेल्या भारतासारख्या नवस्वतंत्र राष्ट्रासमोर विकासाचा भांडवली की समाजवादी मार्ग स्वीकारावा हा मोठा प्रश्न होता. वास्तविक पहाता समाजवादी विकासाचा मार्ग स्वीकारून समाजवादी देशाकडून नि:स्वार्थ सहकार्य व मदत घेवून आपले आर्थिक परवलंबित्व व मागासलेपणा झपाट्याने दूर करून आपल्या उज्वल भवितव्याचा पाया घालता येणे सहज शक्य होते. भारताच्या स्वतंत्र्य लढ्यात अग्रभागी राहिलेल्या कम्युनिस्ट क्रांतीकारकांनीही समाजवादी भारताचे स्वप्न उराशी बाळगले होते. परंतु भारतीय बड्या भांडवलदार वर्गाच्या नेतृत्वाखाली नव्या कॉंग्रेस राजवटीने भांडवली विकास मार्गाचाच स्वीकार करणे पसंत केले. मिश्र अर्थव्यवस्थेच्या नावाखाली कॉंग्रेस सरकारने स्वीकारलेले आर्थिक नियोजन हा भांडवलशाही उभारण्याच्या खटाटोपाचाच एक भाग होता. कॉंग्रेस नेतृत्वाची भाषा समजावादाची पण व्यवहार भांडवली विकासाचा हे सूत्र राहिल्यामुळे भारताच्या राज्यघटनेने, शासनाने अंमलात आणली गेली नाही.

जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत भारताच्या राज्यघटनेच्या सरनाम्याला जबर धक्का बसला. राज्यघटनेतील समाजवादी समाजरचना सामाजिक न्याय, नियोजनाद्वारे विकास, मुलभूत हक्क मार्गदर्शक तत्वे विकेंद्रीकरण, कायदे न्यायसंस्था, संसद, विधीमंडळे, कार्यपालिका यांनाही जबरदस्त हादरे बसत आहेत. सर्वच प्रकारच्या कल्याणकारी योजना मोडीत निघत आहेत. श्रमजीवी जनतेचे हक्क न्यायालयीन निकालातून मोडीत निघत आहे, नोकर कपात, कंत्राटीपद्धतीचा अवलंब इत्यादी सरकारच्या धोरणाला न्यायालयातून पाठिंबा मिळत आहे.

**जागतिकीकरणामुळे गरीबीत वाढ**

नवीन उद्योग सुरू होतील व रोजगार वाढतील अशी अपेक्षा होती, पण गेल्या १० वर्षात रोजगार व गरीबची नवीन समस्या निर्माण झाली आहे. जे लोक गरीब होते त्यांच्यापैकी फारच थोडे दारिद्र्यरेषेच्या वर गेलेत. बरेचसे छोटे उद्योग आजारी झाल्यामुळे बरेच कामगार बेरोजगार होवून दारिद्र्यावस्था निर्माण झाली. शेतकऱ्याच्या शेतमालाला योग्य किंमत न मिळाल्यामुळे शेतकरी सुद्धा दारिद्र्यरेषेच्या खाली ओढल्या गेले. संघटित क्षेत्रातील सार्वजनिक व खाजगी क्षेत्रात १९८० च्या दशकात रोजगार वाढीचा दर १.७ प्रतिशत होता तो १९९१-९२ मध्ये ९.४४ प्रतिशत झाला. श्रममंत्रालयाच्या आकड्यांवरून २००० मध्ये रोजगार वाढीचा दर ०.१५ प्रतिशत होता. या वर्षात ४५००० रोजगार कमी झालेत. संघटित क्षेत्रात १९९१ ते १९९८ या काळात १५.९ लक्ष रोजगार वाढला. या कालावधीत लोकसंख्या १२ कोटींनी वाढली व श्रमसंख्या ५.२ कोटींनी वाढली. सरकारी आकड्यावरून पंजीबद्ध बेरोजगारांची संख्या १९९७-९८ च्या दरम्यान ३.४६ प्रतिशत वाढली. उदारीकरणाच्या या दशकात बेरोजगारीचा सरासरी दर २.५ प्रतिशत होता. तो मागील दशकापेक्षा सर्वात जास्त आहे. दारिद्र्य रेषेखाली जीवन जगणारे ३५.५० कोटी लोक होते.

जीवनावश्यक वस्तूंचा किंमती वाढल्यामुळे गरीबांची संख्या द्रुतगतीने वाढली. सरकार मूल्यवाढीवर नियंत्रण ठेवू शकले नाही. सरकार जर मूल्यवाढीवर नियंत्रण ठेवू शकत नसेल तर सरकारने सार्वजनिक खर्च वाढवून गरीबांच्या उपभोग स्तराला संरक्षण द्यावयास हवे. सरकार गरीबी हटविण्यासाठी दरवर्षी सरासरी ३५०० कोटी रूपये खर्च करते पण ती मदत गरीबांपर्यंत पोहोचत नाही. लोकसंख्येत सतत वाढ होत आहे. भारतात १९९७ मध्ये ९५.१ कोटी लोकसंख्या होती. ती २००२ मध्ये १०२.९ कोटी होईल. ही वाढ सरकारसमोर आव्हान ठरणार आहे.

उदारीकरण व खाजगीकरण यामुळे विकास दराच्या तुलनेत गरीबी हटली नाही. गेल्या ५० वर्षात गरीबी हटविण्याचा प्रयत्न होवून सुद्धा ती हटली नाही. तिथे खाजगीकरणामुळे गरीबी कशी घटेल ? हे अशक्य आहे. यासाठी राजकीय इच्छाशक्ती, सामुदायिक नेतृत्व, सामाजिक अंकेक्षण आणि गरीब व श्रमिकांचा व्यवस्थापनात सहभाग हवा.



Scanned by CamScanner

### जागतिकीकरण आणि चिन

चीनने आपला आर्थिक विकास समाजवादी नियोजनाच्या माध्यमाने साधल्यामुळे चीन हे एक स्वावलंबी राष्ट्र म्हणून व आर्थिक शक्ती म्हणुन पुढे आला आहे. दोहा परिषदेत जागतिक व्यापार संघटनेचे सदस्यत्व चीनला देण्यात आले आहे. यामुळे चीन जागतिकीकरणाच्या प्रक्रियेपासून दूर राहू शकला नाही. परंतु चीनने हा निर्णय आपल्या अर्थव्यवस्थेची गरज लक्षात घेवूनच आपल्या क्षमतेचा अंदाज घेवून घेतला आहे. चीनचा जागतिक व्यापार संघटनेतील प्रवेश हा चीनच्या दृष्टीने व्यापार वाढीचा परवानाच आहे. चीनच्या वस्तु आता जागतिक बाजारपेठेत यायल्या लागल्या आहे. चीनने उत्पादन व्यवस्था पूर्णपणे आपल्या नियंत्रणात ठेवली असून स्पर्धात्मकता वाढविली आहे. परंतु चीनने हा निर्णय आपल्या अर्थव्यवस्थेची गरज लक्षात घेवून व आपल्या क्षमतेचा अंदाज घेवून घेतला आहे. परंतु चीनने आपली बाजारपेठ पूर्णत: आपल्या ताब्यात ठेवली आहे. विदेशी उत्पादकांना कोणत्याही वस्तू चीनच्या बाजारपेठेत खुलेपणाने विकता येत नाहीत. त्या चिनच्या व्यापारी मंडळाला विकाव्या लागतात. व्यापारी मंडळे त्या वस्तू देशांतर्गत विकतात. परिणाम गरज असेल तरच व तेवढ्याच विदेशी वस्तु चीन खरेदी करते. त्यामुळे मर्यादीत प्रमाणात केलेले उदारीकरण चीनला फायद्याचे ठरले आहे. चीनने परकीय भांडवलाला मर्यादित क्षेत्रात प्रवेश दिला आहे. त्यामुळे कालांतराने भांडवलाचे हस्तांतरण चीनकडे होईल अशा प्रकारचे करार केले आहेत. या धोरणमुळे विदेशी गुंतवणूक व आधुनिक उत्पादन तंत्रही चीनला मिळाले आहे. उद्या कदाचित जागतिक व्यापार संघटनेतील प्रवेश अडचणीचा वाटला तर त्यातून बाहेर पडण्याचे धाडस चीन दाखवू शकेल.

### जागतिकीकरण आणि क्यूबा

जागतिकीकरण व भांडवलशाहीच्या बाबत क्युबाची भूमिका आजही ठाम आहे. क्युबाचे अध्यक्ष कॉम्रेड फिडेल कॅस्ट्रो म्हणतात माणसाला माणसासारखे जगू द्यावयाचे असेल तर त्याचा सांस्कृतिक विकास आवश्यक आहे. परंतु जागतिकीकरणात जी भांडवलशाही फोफावते आहे ती असा विकास होवू देत नाही. जागतिकीकरणाचा बुडबुडा लवकरच फुटणार आहे. परंतु दुर्दैव असे की तोपर्यंत सगळा भार बेकारी, गरीबी, शोषण, अत्याचार यारूपात सामान्य माणसाला सोसावा लागणार आहे.

### दहतशवादाचे जागतिकीकरण

दशहतवादाची सर्वाधिक झळ भारताला पोहोचली आहे. भारताचे दोन पंतप्रधान आणि हजारो नागरिक याला बळी पडले आहेत. राज्यकर्त्यांनी चुकीची जनताविरोधी धोरणे, पिळवणूक, बेरोजगारी, जातीयता यामधून भारताच्या इशान्यपूर्व भागात दहशतवादाचा जन्म झाला. तर पंजाब, जम्मु-काश्मिरमधील दहशतवादाला आंतरराष्ट्रीय राजकारणातून जमातवादी आश्रय देण्याचा प्रयत्न झाला. इस्लाम मूलतत्ववादी व हिंदु मुलतत्ववाद्यांनी आपआपल्या सोईस्कर राजकरणासाठी दहशतवादाचा अवलंब केला आहे. भारतीय भांडवली राजकारण हा तर दहशतवादाचा उत्कृष्ट नमूना आहे. या भांडवली पक्षोपक्ष मध्ये असलेले भांडवलदार, जमीनदार, व्यापार, साधू, साध्वी इत्यादी मंडळ सामाजिक, राजकीय, आर्थिक, धार्मिक, सांस्कृतिक, दहशतवाद आपल्या स्वार्थी व मतलबी राजकारणासाठी जोपासतात.

जागतिक भांडवलशाही व साम्राज्यशाही हिच खरी दशहतवादाची जननी आहे. आपआपल्या आर्थिक व राजकीय हितसंबंधाच्या जपवणूकीसाठी त्यांनी वेगवेगळ्या पद्धतीच्या दहशतवादी कारवायांना सर्वप्रकारची मदत करून जोपासण्याचे काम केले आहे. आज जागतिकीकरणाच्या नावाखाली हे नवसाम्राज्यवादी नवा आर्थिक दहशतवाद आणून जगावर राज्य करू पहात आहेत. या आर्थिक दहशतवादी संघटना ते आंतरराष्ट्रीय नाणेनिधी जागतिक बँक व जागतिक व्यापार संघटना इत्यादींचा वापर करीत आहेत.

अशाप्रकारे २१ वे शतक हे साम्राज्यवादाविरुद्ध समाजवादाच्या लढ्याचे शतक ठरणार आहे.



Scanned by CamScanner

समाजवादाच्या विजयासाठी चालू असलेल्या या लढाईत आपणही एक अभ्यास म्हणून आपली जबाबदारी पार पाडण्याची गरज आहे.

संदर्भ : १. श्रीनिवास खांदेवाले, जागतिकीकरण व विकसनशील देशांच्या विकासांच्या समस्या, श्रमिक प्रतिष्ठान, मुंबई मे २000, २. ऐजाज अहमद : '२0 वे शतक:क्रांत्याचे शतक', ३. डॉ. सुभाष जाधव : जागतिकीकरण विरोधाचे जागतिकीकरण प्रबोधन प्रकाशन, ४. फिडेल कॅस्ट्रो : दृष्ट भांडवलशाही जागतिकीकरण : एक संकट, ५. २१ वी अर्थशास्त्र परिषद अध्यक्षीय भाषण, - डॉ. डी. वाय. जाहगीरदार, ६. योजना मासिक : ७. बहुराष्ट्रीय कंपन्यांच्या विळख्यात भारत :डॉ. सुलभा ब्रम्हे, ८. १0 ऑक्टोबर २00२ तरूण भारत संपादकीय या पर्वात 'जागतिकीकरणाचा वरवंटा अन् जनतेचं उद्रेक', प्राचार्य डॉ. गोविंद नि. हडप यांचा लेख (नरेंद्रनगर, नागपूर)

Scanned by CamScanner

# वाणिज्य शिक्षणातील परिवर्तनाची आवश्यकता व वर्तमान आव्हान

प्रा. सुनिल एस. डहाके
कला-वाणिज्य कनिष्ठ महाविद्यालय,
मौंदा. जि. नागपूर

आजच्या आधुनिक युगात विविध प्रकारचे शिक्षण उपलब्ध आहे. कला, वाणिज्य, विज्ञान अभियांत्रिकी, वैद्यकशास्त्र इत्यादी अनेक शाखांमधून शिक्षण उपलब्ध आहे. या विविध शाखांमधून शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. परंतु मागील दहा वर्षांचा काळ तपासून बघितला असता असे निदर्शनात येते की, वाणिज्य शाखेतील विद्यार्थ्यांची संख्या दरवर्षी तुलनात्मकदृष्ट्या कमी झालेली आहे. याची अनेक कारणे आहेत.

परंतु याचा अर्थ अभ्यासक्रमातून वाणिज्य शिक्षणाला तिलांजली द्यावी असा होत नाही. कारण वाणिज्य शिक्षणाचे महत्व कमी होवू शकत नाही. कालपरत्वे वाणिज्य शिक्षणात असलेल्या त्रुटी जर दूर केल्या तर आजही वाणिज्य शिक्षण शिखरावर पोचल्याशिवाय राहणार नाही . आवश्यकता आहे केवळ परिस्थिती सापेक्ष योग्य बदल करण्याची . त्यामुळे विद्यार्थी खऱ्या अर्थाने स्वयंपूर्ण करायचा असेल तर यथायोग्य बदल केलेले वाणिज्य शिक्षण स्वयंरोजगार व रोजगार निर्मितीस उत्कृष्ट ठरल्याशिवाय राहणार नाही.

### वाणिज्य शिक्षणाची आवश्यकता

आजच्या खूल्या अर्थव्यवस्थेच्या काळात व्यापार, उद्योग व सेवा क्षेत्रात योग्य दिशेने बदल केलेले वाणिज्य शिक्षण म्हणजे प्रगती व विकासाचीगंगोत्रीच ठरणार आहे. कारण वरील सर्व क्षेत्रात वाणिज्य शिक्षणाशिवाय पर्याय नाही. बँका. विमा. सहकार, व्यावसायिक मंडळे, वित्तसंस्था इत्यादी क्षेत्रात वाणिज्य शिक्षणाशिवाय पर्याय नाही. योग्य वाणिज्य शिक्षण घेतलेले मनुष्यबळ वरिल क्षेत्रात उपयोगात आणले नाही तर या क्षेत्राच्या विकासात अडथळे निर्माण होतील. म्हणून आपणास वाणिज्यशिक्षणाच्या आवश्यकतेवर योग्य विचार करायला पाहिजे.

आधुनक जीवनात वाणिज्यशास्त्राला खूपच महत्व प्राप्त झाले आहे. दैनदिन जीवनात प्रत्येकाचा वाणिज्यशास्त्राशी संबंध येतो.

जीवनाला आवश्यक असणाऱ्या अनेक वस्तू आणि सेवा आपण बाजारातून विकत घेतो. उदा. धान्य, कापड, पुस्तके, औषधे वगैरे. तसेच अनेक व्यावसायिकांच्या सेवाही आपण दैनंदिन जीवनात विकत घेत असतो. बँकेत आपण खाते उघडतो व आपल्याजवळील पैसे त्या खात्यात भरतो. जीवनातील विशिष्ट धोक्यांपासून होणारे नुकसान भरून मिळावे म्हणून आपण विमा उतरवितो. या सर्व वस्तू आणि सेवा ग्राहकांना उपलब्ध करून देणारे कार्य वाणिज्याद्वारे होत असते.

जीवननिर्वाहासाठी आपण जे काही काम करतो त्याचाही वाणिज्याशी संबंध येतो. सामान्यत: आपण कारखान्यात किंवा कचेरीत नोकरी करतो, दुकान काढतो व्यवसाय चालवितो किंवा कारखाना चालवितो. कोठेही काम केले तरी शेवटी वस्तू आणि सेवा ग्राहकांना उपलब्ध करून देण्यालाच आपण हातभार लावतो. म्हणून जीवननिर्वाहासाठी काम करून आपण हे जे पैसे मिळवितो त्या कामाचाही वाणिज्याशी संबंध येतोच.

वाणिज्याची व्यवस्था आधुनिक जीवनात खूपच गुंतागूंतीची आणि विशाल झाली आहे. प्रत्येक



Scanned by CamScanner

नागरिकाला या व्यवस्थेची काही माहिती असणे आवश्यक आहे. यासाठी प्रत्येकाने वाणिज्य यंत्रणेचा परिचय करून घेतला पाहिजे. स्टीफन्सन यांच्या मते 'वाणिज्याचे शिक्षण खऱ्या अर्थाने जीवन जगण्याचे शिक्षण होय.'

### वाणिज्याची परिभाषा

वस्तूंची देवघेव किंवा खरेदी- विक्री हा वाणिज्यशास्त्राचा गाभा आहे. वस्तूंचे उत्पादन झाल्यानंतर त्या वस्तू ग्राहकांच्या हातात पडेपर्यंत जे खरेदी- विक्रीचे व्यवहार होतात. त्यांच्याशी संबंधित असलेल्या आर्थिक व्यवहारांचा वाणिज्य शास्त्रात अभ्यास केला जातो.

आधुनिक अर्थव्यवस्थेचा वाणिज्य हा अत्यंत महत्वाचा व अविभाज्य घटक मानला जातो. वस्तूंचे उत्पादन करणारा उत्पादक आणि वस्तूंचे शेवटी उपभोग घेणारा उपभोक्ता यांच्यात आधुनिक काळात खुपच अंतर निर्माण झालेले आहे. या दोघांना जोडणारी एक सुसंबद्ध साखळी असेल तरच खरेदी-विक्रीचे व्यवहार सुलभतेने होऊ शकतील.

### विविध क्षेत्रातील बदल

अलिकडील काळात अधिकोष, विमा, सहकार, व्यावसायिक मंडळे, वित्तसंस्था, सेवा देणाऱ्या स्वायत्त संस्था यात बरेच बदल झालेले आहेत.

### बँकांच्या व वित्तीय धोरणात सुधारणा

नवीन आर्थिक धोरणात वित्तीय क्षेत्रातही बदल करण्यात आले. त्याचे हेतू दोन: (१) राष्ट्रीयकृत व्यापारी बँका नफ्यात चालाव्यात (२) देशान्तर्गत भांडवल बाजाराचे व्यवस्थापन चांगले व्हावे.

मुक्त बाजार व्यवस्था आली की, तिची काही शिस्त असते या शिस्तीमुळे वित्तीय क्षेत्रातील सुधारणा सहज होतील असा सरकारचा समज होता

बरीच वर्षे सरकारी बँका प्रचंड तोट्यात चालतात. हा तोटा येण्याची अनेक कारणे आहेत. सरकारच्याच आदेशानुसार या बँकांना कर्जे व्याजदर वगैरेचे धोरण ठेवावे लागेल. कर्ज मेळे भरवून सरकारने बँकांना कर्जाची खिरापत वाटायला लावली . काहीही तारण हमी न घेता कर्जे दिली पाहिजेत असे फतवे काढले. व्याज दर अल्प ठेवायला लावले. राजकीय हस्तक्षेप केला.

सामाजिक न्याय या तत्वानुसार गरीब होतकरू, कष्टकरी, स्वयंरोजगार निर्माण करणाऱ्या लोकांना सुलभ कर्जे देणे आवश्यकच होते. पण येथेही गरीबांच्या नावाने धोरणे आखण्यात आली आणि फायदा बिनबोभाट बड्यांना मिळत राहिला.

बँकांची बुडीत कर्जे प्रचंड वाढली. खापर फोडण्यात आले कर्मचाऱ्यांचया अकार्यक्षमतेवर. सरकारी बँकातील अधिकारी कर्मचारी सर्व कार्यक्षम आहेत असा दावा कोणी करू शकणार नाही. पण लोकांना बनविण्यासाठी कर्मचाऱ्यांची अकार्यक्षमता या एका कारणावर अधिक भर देण्यात येतो. लोकांनाही हे म्हणणे पटते कारण त्यांना प्रत्यक्ष व्यवहारात कर्मचाऱ्यांच्या वागणुकीचा अनुभव आलेला असतो.

भरमसाठ कर्जे वाटली गेली, ती वसूल झाली नाहीत, वसूल करण्यासाठी बँकांजवळ स्वतंत्र यंत्रणा नाही. न्यायालयात प्रकरणे दाखल केली तर दहा पंधरा वर्षे प्रकरण भिजत पडते.

बँकाचे राष्ट्रीयकरण चांगल्या उद्देशाने केले होते. या धोरणामुळे कितीतरी छोटे उद्योजक शेतकरी, तरुण डॉक्टर्स, छोटे कारागीर, टॅक्सी ऑटो रिक्षावाले, दुकानदार कर्ज मिळवून जीवनात उभे राहिले. नंतरच्या काळात सरकारने अतिरेक केला.

कर्ज वाटायचे सरकारी हुकूमानुसार, वसूलीसाठी जबाबदार मात्र मॅनेजर अशी चमत्कारिक अवस्था झाली. मोठे धनवान भांडवलदार बँकांना बुडवू लागल्याच्या बातम्या वृत्तपत्रात येऊ लागल्या वर मध्यमवर्गीय गरीबांना सुद्धा कर्ज बुडविण्याची दुर्बुद्धी झाली. सरकारी कर्ज बुडवायसाठीच द्यायचे अशी लोकांची भावना झाली. पूर्वी लोक कर्ज देणे अशक्य झाले की आत्महत्या करीत. आता बँकेची मोहीम येणे हे जणू प्रतिष्ठेचे लक्षण झाले आहे. कोर्टाचीही लोकांना भिती वाटत नाही.

अशा परिस्थितीत बँकांची प्रकृती बिघडली आहे. ती सुधारणे आवश्यक होतेच. बँका धंदा म्हणून



Scanned by CamScanner

चालतात. त्यांना रास्त नफा मिळालाच पाहिजे कारण जे लोक बँकात रक्कम ठेव म्हणून ठेवतात त्यांना व्याज द्यावे लागते. शेअर होल्डर्सना डिव्हिडंड द्यावा लागतो. इमारत, कर्मचाऱ्यांचे वेतन, सुरक्षा व्यवस्था, वीज इत्यादी खर्च असतात. बँका म्हणजे धर्मदाय संस्था नव्हते.

सरकारने ती महत्वाचे निर्णय घेतले. बँकामधे एकूण जितकी रक्कम ठेवी रूपाने जमा होईल त्यापैकी काही प्रमाणात रक्कम सरकारी रोख्यात गुंतवली पाहिजे असा नियम आहे. याला 'स्टॅट्युटरी लिक्विडिटी रेशो' असे म्हणतात. हे प्रमाण कमी केले. बँकांनी ठेवीपैकी काही प्रमाणात रक्कम रोख, ठेवली पाहिजे. असाही एक नियम आहे. याला 'कॅश रिझर्व रेशो' असे म्हणतात. हेही प्रमाण सरकारने कमी केले. या नियमांचा उद्देश असा की, बँकांमधे जितक्या ठेवी जमा होतील त्या जास्तीत जास्त खाजगी क्षेत्रामधे गुंतविल्या जाव्यात. तिसरा निर्णय सरकारने असा जाहीर केला की व्याजदरावरील बंधने आता शिथिल करावयाची. कर्ज देताना बँका आता व्याजदर लवचिक ठेवू शकतील.

या निर्णयांमुळे बँका आता नफा मिळवू लागतील अशी सरकारची अपेक्षा आहे. याचवेळी सरकारने आपल्या दीर्घ मुदतीच्या कर्जरोख्यावरील व्याजदर वाढविले आणि ते बाजारातील व्याजदराच्या जवळपास आणले. कारण आता सरकारला बँकांच्या ठेवीमधील आयता कायदेशीर हिस्सा कमी मिळणार. बँका नफ्यात चालाव्यात यासाठी सरकारने काही मार्गदर्शक तत्वेही आखून दिली. भारतीय बँकांचा सर्व व्यवहार, हिशोब, ठेवण्याची पद्धत विशिष्ट कालावधीत जागतिक बँकांच्या दर्जाची झाली पाहिजे असा सरकारचा आग्रह आहे.

खाजगी क्षेत्रात भरपूर भांडवली पुरवठा व्हावा, तो आपल्या बँकांनाही करावा, परदेशी बँका, वित्तीय संस्था यांनीही करावा अशी सरकारची इच्छा आहे. बँका मजबूत व्हाव्यात म्हणून त्यांनी शेअर्स वाढविले, ठेवी वाढविल्या त्यासाठी नवे प्रकल्प हाती घेतले तर आता सरकारच्या पूर्वसंमतीची गरज नाही.

शेअर बाजारावर नजर ठेवण्यासाठी सरकारने सेबी (सेक्युरिटीज अँड एक्सेंज बोर्ड ऑफ इंडिया) या संस्थेची स्थापना केली आहे. कारण आता शेअर बाजारला अभूतपूर्व महत्व आले आहे.

परंतु अलीकडे बँकांवरील किंवा वित्तीय संस्थावरील सरकारचे आणि रिझर्व बँकेचे नियंत्रण कमी झाल्यामुळे शेअर घोटाळे फार मोठ्या प्रमाणात होत आहेत.

वित्तीय क्षेत्रात सुधारणा आवश्यक होत्या यात शंका नाही. परंतु संभाव्य धोक्यांची काळजी घेतली नाही तर करायला गेलो एक आणि झाले भलतेच असे म्हणण्याची पाळी आली आहे.

याचप्रकारे विमा, सहकार या क्षेत्रात आमुलाग्र बदल झालेले आहेत. विमा कंपन्यांचे खाजगीकरण करण्यात आलेले आहे. ईकॉमर्स व इंटरनेटद्वारे व्यवसायाचे स्वरूप पार बदलुन गेले आहे. यामुळे जागतिक बाजरपेठेचा अभ्यास अगदी काही मिनिटात करता येवून आर्थिक व्यवहार करता येतात. त्यामुळे ई. कॉमर्स व इंटरनेट व्यापार व्यवसायाचे स्वरूप प्रगत करण्यास वरदानच ठरले आहे.

### वर्तमान वाणिज्य अभ्यासक्रमातील बदलाची आवश्यकता

वर्तमान वाणिज्य अभ्यासक्रम हा अजुनही परंपरागत पद्धतीने शिकविणे चालू आहे, यात बदल करणे ही काळाची नितांत गरज आहे. लेखाकर्म, वाणिज्य संघटन, सचिवाची कार्यपद्धती यांचे वर्तमान स्वरूप सैद्धांतिक असून त्यात प्रात्यक्षिक स्वरूपाचा बदल आवश्यक आहे. तसेच अभ्यासक्रमाचे विशेषीकरण करणे आवश्यक आहे. लेखाकर्म विषय विद्यापीठाप्रमाणे इंग्रजी माध्यमातून शिकविण्याची व्यवस्था करण्यात यावी. कारण पुढे सी. ए., आय. सी, डब्ल्यू ए. अभ्यासक्रमाकरीता विद्यार्थ्यांचा पाया मजबूत होण्यास मदत होईल. वाणिज्य संघटन व सचिवाची कार्यपद्धती या विषयांमध्ये प्रात्यक्षिकाचा समावेश करण्यात यावा. केवळ चार भिंतीच्या आड शिकवून चालणार नाही तर प्रत्यक्ष कारखाना, कंपनी कार्यालयामधे शिकाऊ उमेदवार म्हणून काम



Scanned by CamScanner

करण्याची संधी उपलब्ध करून देणे आवश्यक आहे.

संयुक्त स्कंध प्रमंडळ, भागीदारी, सहकारी संस्था यात फार बदल झालेले आहेत. त्यांच्या भांडवलाची रचना, व्यवस्थापन, नियंत्रण व मूल्यमापन यात आमुलाग्र बदल झालेले आहेत. विशेष म्हणजे संगणकाचा वापर होत आहे. याकरिता वाणिज्य अभ्यासक्रमात संगणक विषयाचा आवश्यक विषय म्हणून समावेश करण्यात यावा.

**कृषी आणि व्यापार यातील सहसंबंध**

कृषी आणि व्यापार यांचा संबंध पूर्वीपासून आहे व आजही तो कायम आहे. कारण बरेच उद्योग कृषीमधून होणाऱ्या कच्च्यामालावर आधारीत आहेत. विविध प्रकारच्या तेलबिया, धान्य, फळे व फुले आपणास कषीपासून उपलब्ध होतात व या वस्तुंचा आंतरराष्ट्रीय व्यापार होतो. त्यामुळे कषी आणि व्यापार एकमेकांशी निगडीत असे घटक आहेत. जंगल ही निसर्गाने दिलेली संपत्ती आहे. जंगलावर आधारीत लाकूड, मध, डिंक, साल, औषधीयुक्त वनस्पती व यावर आधारीत अनेक उद्योग आहेत. सध्या जंगलावर आधारीत उद्योगांकरीता नवनवीन साधनांचा उपयोग करून जास्तीत जास्त उत्पन्न मिळविण्याचे प्रयत्न सुरू आहेत. या उद्योगांकरीता ग्रामीण भागात दहा-दहा व्यक्तींचे गट पाडून त्यांना सरकारतर्फे आवश्यक साधने उपलब्ध करून जंगलावर आधारित अनेक उद्योग करण्यास मदत करण्यात येते व ग्रामीण भागातील जनतेचे उत्पन्न वाढविण्यास मदत होते.

सध्या कृषीवर आधारित उद्योगात बऱ्याच प्रमाणात वाढ झाली आहे. फळांवर प्रक्रिया करणे, औषधी वनस्पती तयार करणे, धान्यावर प्रक्रिया करणे, कागद उद्योग इत्यादी उद्योगात दिवसेंदिवस वाढ होत आहे. या उद्योगांचा जर वाणिज्य शिक्षणात समावेश करण्यात आला तर उद्योगाची मानसिकता विद्यार्थ्यांमध्ये जोपासण्यास मदत होवून ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना या माध्यमातून स्वयंरोजगाराची संधी उपलब्ध होण्यास मदत होईल यात शंका नाही.

**व्यावसायिक संघटनेचे स्वरूप**

अलिकडील काळात देशी-विदेशी कंपन्या, संयुक्त उपक्रम, सार्वजनिक व खाजगी क्षेत्र, बहुराष्ट्रीय कंपन्या व विदेशातील भारतीय कंपन्या यांचा गुंतवणूकीमधील सहभाग वाढलेला असून स्पर्धेचे स्वरूप निर्माण झाले. त्यामुळे तुटपुंज्या भांडवलीवर स्वयंरोजगार करणाऱ्यांचा प्रश्न पडतो. त्यांच्या उत्पादनाची साधने मर्यादित असल्यामुळे वरील व्यावसायीक संघटनेपुढे त्यांचा टिकाव लागणे कठीण झाले आहे.

अशा परिस्थितीत वाणिज्य शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना स्वयंरोजगाराकरिता सरकारने उद्योगाला लागणारी साधने व काही प्रमाणात भांडवलाची मदत करणे आश्यक आहे. त्यामुळे वाणिज्य शिक्षण घेणारा सहज स्वयंरोजगार मिळवू शकेल. या दृष्टीने अभ्यासक्रमाची पुनर्रचना करण्यात यावी.

केवळ अभ्यासक्रमात बदल करून चालणार नाही तर आधुनिक अभ्यासक्रमाकरिता शिक्षकांचे योग्य प्रशिक्षण व सामाजिक दृष्टिकोण बदलविणे आवश्यक आहे. या करिता शिक्षक, विद्यार्थी, सरकार व समाज या सर्वांचा सहभाग अपेक्षित आहे.


हार्दिक शुभेच्छा !

साईकृपा प्रोव्हीजन

शिंदे मंगल कार्यालयाजवळ,
सरकारनगर, चंद्रपूर

प्रोप्रा. राजेंद्र गुजरकर


Scanned by CamScanner

# चंद्रपूर-गडचिरोली जिल्ह्याचा औद्योगिक विकास व समस्या

प्रा. व्ही. बी. पाटक
सी. पी. ॲन्ड बेरार कॉलेज,
नागपूर

**भौगोलिक माहिती**

विदर्भात ६०% जंगले आहे. ३८ चौ. मी. क्षेत्रात खनिज संपत्ती आढळते. चंद्रपूर जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात खनिज संपत्ती, पाणी व कोळसा आहे. या औद्योगिक जिल्ह्यात विविध उद्योग उभे झाले आहेत. चंद्रपूर परिसरांत २९ कोळसा खाणी आहेत. त्यामुळे वेकोफिने या खाणी विकसीत केल्या. या कोळशामुळे चंद्रपूर मध्ये दुर्गापूर महाऔष्णीक केंद्र विकसीत करण्यात आले. विपुल वनसंपदा असल्यामुळे बल्लारपूर पेपर कारखाना विकसीत झाला. विपुल खनिज संपत्तीच्या आधारावर चार सिमेंट कारखाने स्थापन झाले. याशिवाय ४४ मोठे उद्योग सुरू झाले. २० मध्यम उद्योग व ५०० लघुउद्योग या जिल्ह्यात स्थापन करण्यात आले. या उद्योगामुळे चंद्रपूर जिल्ह्याला औद्योगिक जिल्ह्याचा दर्जा मिळाला. या जिल्ह्यात रोजगारनिर्मिती होवून स्थानिक लोकांना काम मिळाले.

**सामाजिक स्थिती-** परंतु विदर्भात १ लाख लोकसंख्येत ६०७ कामगार आहेत. विदर्भात १९६१ मध्ये ९.०१ टक्के कामगार होते. आज विदर्भात १०.३१ टक्के कामगार आहेत. विदर्भाच्या सामाजिक स्थितीत मागासलेपणा आहे. अनुसूचित जाती जमातीचे प्रमाण २९.५७ टक्के आहे. तेच पश्चिम महाराष्ट्रात १७.१८ टक्के आहे तर मराठवाड्यात १९.४५ टक्के आहे. विदर्भात प्रचंड संसाधने असूनही विदर्भ मागासला आहे.

**उद्योगनिर्मिती-** गडचिरोली जिल्ह्यात एटापल्ली तालुक्यात सूरजागड भागात मोठ्या प्रमाणात कच्चा लोहा उपलब्ध आहे. कुरखेडा भागात मसोली जवळ कच्चा लोहा मोठ्या प्रमाणात सापडतो. आरमोरी भागात मॅगनिज सापडते. त्यामुळे भिलाई पोलाद कारखान्याप्रमाणे गडचिरोली परिसरात स्टिल प्लँट स्थापन होवू शकतो. गडचिरोली जिल्ह्यात ७० टक्के जंगल असल्यामुळे रेऑन झाडाच्या सालीपासून कापड तयार होवू शकते. तसेच मध, वनौषधी, तेलबिया इत्यादी आधारावर उद्योग सुरू करण्यास वाव आहे. धानोरा जंगलातील मध प्रसिद्ध आहे. वाहतुकीची साधने उपलब्ध झाल्यास कारखान्यांचा विकास होवू शकतो. चंद्रपूर व गडचिरोली परिसरात शासनाने उत्तम रस्ते तयार केलेले आहेत. नागपूर, गडचिरोली, चंद्रपूर रस्ता हा जागतिक बँकेकडून कर्ज काढून तयार करण्यातआला. तसेच नागपूर हैद्राबाद हा राष्ट्रीय महामार्ग तयार झाल्यास उद्योगाला चालना मिळणार आहे.

चंद्रपूर ते गोंदिया व ब्रॉडगेज रेल्वेलाईन विकसित केल्यास विकासाचा मार्ग मोकळा होवू शकेल.

चंद्रपूर व गडचिरोली जिल्ह्यात बांबूचे उत्पादन मोठ्या प्रमाणात होते. या बांबूवर आधारित कागदाचे लघुउद्योग सुरू करता येतात.

चंद्रपूर व गडचिरोली जिल्ह्यात घनदाट जंगले व मोठ्या नद्या आहेत. यामुळे ताडोबा सारखी उद्याने विकसीत करण्यास वाव आहे. भरपूर वन संपदेमुळे पर्यटन उद्योगाला वाव आहे. परंतु चंद्रपूर व गडचिरोली भागात भरपूर पर्यटन स्थळे विकसित झालेली नाहीत.

चंद्रपूर, गडचिरोली परिसरात कवेलू उद्योगाला अवकळा आलेली आहे. सूर्याची उष्णता कमी करण्यासाठी कवेलूंचा वापर होणे आवश्यक आहे. परंतु कवेलूचा वापर न करता सिमेंट कॉंक्रीटकडे कल अधिक



Scanned by CamScanner

दिसून येतो. वेकोलीतर्फे कोळसा पुरवठा करणे आवश्यक आहे. कवेलूवरील विक्री कर व आयकर कमी केल्यास या उद्योगाला चालना मिळणार आहे. आज गुजराथमधून कवेलू मागवले जातात परंतु या भागात कवेलु कारखाने बंद होत आहेत. याकडे शासनाने लक्ष दिल्यास कवेलू उद्योगात रोजगारनिर्मीती होवू शकते.

चंद्रपूर महाऔष्णीक केंद्राला आवश्यक साहित्य पुरवण्यासाठी लघूउद्योगाची निर्मीती होणे आवश्यक आहे. चंद्रपूर विज निर्मीती केंद्रातील राखेपासून विटा, सिमेंट तयार करण्यात आल्यास पर्यावरणाचा प्रश्न सुटणार आहे.

चंद्रपूर व गडचिरोली जिल्ह्यात मोठे तलाव आहेत. या तलावानं मुबलक झिंगा प्रकल्प तयार करता येतो. भरपूर वनसंपदा व पाणी असल्याने दूध प्रकल्प, शेळीपालन, मत्स्यव्यवसायास भरपूर वाव आहे.

**समस्या** - परंतु चंद्रपूर परिसरात उद्योगाबरोबरच अनेक समस्येला तोंड द्यावे लागत आहे. या भागात प्रदूषणाची फार मोठी समस्या आहे. या उद्योगांमुळे सांडपाणी, हवा, घनकचरा व हॉस्पीटलमधील कचरा, ध्वनी प्रदूषण निर्माण होत आहे.

या जिल्ह्यात हवेचे प्रदूषणामुळे, हवेतील धुलीकरणामुळे अनेक नागरिकांना श्वसन संस्था व कातडी रोगाची लागण होत आहे. विविध कोळसा खाणीच्या परिसरात यकृतात सिमेंट व कोळशाचा धूर आढळून येतो. विश्व आरोग्य संघटनेने या समस्येकडे लक्ष केंद्रित केले आहे.

चंद्रपूर, गडचिरोली परिसरात सतत सुरू राहणारी कोळशाची वाहतूक, महाऔष्णीक केंद्रातील धुर व १२ हजार टन राख यामुळे या जिल्ह्यात हवा, पाणी प्रदूषणाचा प्रश्न आहे. यावर उपाययोजना करण्यासाठी प्रदूषण नियंत्रण मंडळ प्रयत्न करीत आहे.

या परिसरातील २१ कोळसा खाणीत करण्यात येत असलेला सुरूंग स्फोटामुळे जमिनीतील पाण्याचे प्रमाण कमी होत आहे. चंद्रपूर परिसरातील शेतीवर परिणाम होत असून नापिकीचे प्रमाण वाढत आहे.

**उपाय**- चंद्रपूर जिल्ह्यातील प्रदूषण नियंत्रण मंडळाने कोळसा खाणीतील धूर नियंत्रण यंत्र बसविण्यास बाध्य केले आहे. या मंडळाने १ लाख झाडे लावण्याचा संकल्प सोडला आहे. पाण्याचे स्वयंचलित फवारे धूर नियंत्रणास मदत करतात. वाहतुकीची साधने धुळीपासून सुरक्षित ठेवली जात आहेत. कोळसा खाणीमध्ये मोठ्या प्रमाणावर वृक्षारोपण केले जात आहे. कोळसा खाणीतील पाणी पुन्हा वापरले गेल्यास प्रदूषणाचा प्रश्न सुटू शकतो.

लोकप्रतिनीधींच्या प्रयत्नातून प्रदूषणाचा प्रश्न सोडविण्यासाठी केंद्रीय भूजल सर्वेक्षण मंडळ सर्वेक्षणाचे कार्य करीत आहेत. चंद्रपूर परिसरातील जमिनीचे सर्वेक्षण 'निरी' संस्था करीत आहे. या परिसरातील पेपर मिल, सिमेंट उद्योग, महाराष्ट्र इलेक्ट्रीसिटी येथील कचऱ्याचा निपटारा करण्यासाठी उपाययोजना केली आहे.

महाऔष्णीक उद्योग केंद्रातील राख विटा व सिमेंट उद्योगात वापरल्यास प्रदूषण कमी होणार आहे. याशिवाय नैसर्गिक स्थितीत बदल होईल.

वेकोलीच्या कर्मचाऱ्यांनी कोळसा शेगडीसाठी न वापरता गॅसचा वापर केल्यास प्रदुषण नियंत्रणात हातभार लागणार आहे. महाऔष्णीक केंद्राच्या धुराच्या चिमण्यांत बदल केल्यास प्रदूषण कमी होवू शकेल. बल्लारपूर कागद कारखाण्यातील सांडपाणी शेतीसाठी वापरता आल्यास प्रदूषण नियंत्रित होईल.

**शिक्षण म्हणजे वर्तन परिवर्तन होय.**



Scanned by CamScanner